(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

उप सभापती : आता लक्षवेधी सूचना घेण्यात येतील.

पृ. शी. : गेल्या चार वर्षात 150 सूत गिरण्या बंद पडल्यामुळे गिरणी कामगारांची होत असलेली उपासमार

मु. शी. : गेल्या चार वर्षात 150 सूत गिरण्या बंद पडल्यामुळे गिरणी कामगारांची होत असलेली उपासमार यासंबंधी श्रीमती शोभा फडणवीस, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वस्त्रोद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"राज्यातील वस्त्रोद्योगांवर गंभीर परिणाम झाला असून संघटीत क्षेत्रातील जवळपास १५० सूत कापड गिरण्या गेल्या चार वर्षात बंद होणे, परिणामी ५०,१५१ कामगारांना रोजीरोटी गमवावी लागणे, देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर घटलेली मागणी आणि त्यातच सूत धाग्याच्या किंमतीला लागलेली ओहोटी तसेच महत्वाच्या निर्यात बाजारपेठांनाही ग्रहण लागल्याने त्याचा परिणाम वस्त्रोद्योगांवर होणे, कापड धंद्याला आलेल्या या अवकळेमुळे बहुतांश कंपन्यांनी घेतलेल्या कर्जाची परतफेड करणे अवघड झाले असून खेळत्या भांडवलाचीही मोठी चणचण भासणे, परिणामी कापड गिरण्या बंद होणे, परिणामी कामगारांवर व त्यांच्या कुटुंबीयांवर आलेली उपासमारीची पाळी, त्यामुळे त्यांच्यात निर्माण झालेला असंतोष, याकरिता वस्त्रोद्योगांची नव्याने फेरमांडणी करणे गरजेचे झाल्याने, रिझर्व्ह बँकेने घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्वांच्या आधारे बँकांनी वस्त्रोद्योग क्षेत्रातील कंपन्यांना दिलेल्या कर्जाची प्रकरणवार प्राध्यान्याने पुनर्रचना करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

श्री. प्रकाश सोळंके (वस्त्रोद्योग राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस : विदर्भातील बंद पडलेले उद्योग, एमआयडीसीतील बंद पडलेल्या उद्योगांचे पुनरुत्थान करण्यात येईल, उद्योगांना पॅकेजेस देऊन पुनर्वसन करण्यात येईल अशी घोषणा माननीय मुख्यमंत्र्यांनी परवा केली आहे. त्यामुळे या लक्षवेधी सूचनेला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झालेले आहे. केंद्र शासनाने टेक्नॉलॉजी अपग्रेडेशन स्कीम सुरु केलेली आहे. त्यामुळे आपण किती गिरण्यांना केंद्र शासनाच्या टेक्नॉलॉजी अपग्रेडेशन स्किमचा फायदा मिळवून दिलेला आहे ? ज्या गिरण्या बंद पडलेल्या आहेत त्या गिरण्यांतील कामगारांना दुसरी रोजी रोटी मिळेपर्यंत पुनर्वसन फंड म्हणून केंद्र शासनाने वस्त्रोद्योग कामगार पुनर्वसन निधी देण्याचे सुरु केलेले आहे त्यामुळे केंद्रशासनाचा हा निधी आपण किती कामगारांना उपलब्ध करुन दिलेला आहे?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, टेक्नॉलॉजी अपग्रेडेशन स्कीम ही योजना केंद्र शासनाची आहे. या योजनेअंतर्गत जून 2010 अखेर महाराष्ट्रातील एकूण 51161 कोटी रुपयांचे प्रकल्प मंजूर झालेले आहेत. राज्य शासनाने वस्त्रोद्योग धोरण जाहीर करतांना "टफ" या योजनेबरोबर आपण लिंकेज केलेले आहे. टफच्या अंतर्गत मिळणारी 5 टक्के व्याज सवलत योजना व राज्य शासनाच्या माध्यमातून मिळणारी व्याज सवलत योजनेच्या माध्यमातून जे कापूस उत्पादक प्रदेश आहेत तेथील उद्योगांना शुन्य टक्के इफेक्टीव्ह दर मिळावा तसेच इतर प्रदेशांना 2 टक्के दर मिळावा अशा पध्दतीने आपण वस्त्रोद्योग धोरण जाहीर केलेले आहे. या योजनेमुळे वस्त्रोद्योगाच्या उद्योगांना मोठया प्रमाणात उपयोग व्हावयास सुरुवात झालेली आहे.

श्रीमती शोभाताई फडणवीस : सभापती महोदय, कामगार पुनर्वसन निधीच्या बाबतीतील प्रश्नाचे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी दिलेले नाही. कामगारांना दुसरा रोजगार मिळत नाही तोपर्यंत किती कामगारांना आपण पुनर्वसन निधी दिलेला आहे ?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विणकरांच्या बाबतीतील उप प्रश्न उपस्थित केलेला आहे. विणकरांच्या प्रश्ना संदर्भात आजच्या कामकाजात 5 क्रमांकाची लक्षवेधी सूचना देण्यात आलेली आहे. विणकरांची लक्षवेधी सूचना आल्यानंतर यासंदर्भातील उत्तर देण्यांत येईल. वस्त्रोद्योग क्षेत्राशी निगडीत अशी कोणतीही योजना नाही. परंतु हातमागाच्या संदर्भात अशा प्रकारची योजना आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक राऊत : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी उत्तर देत असतांना सांगितले आहे की, केंद्र शासनाच्या "टफ" योजनेअंतर्गत 51 हजार कोटी रुपये देण्यात आलेले आहेत. उत्तरामध्ये आपण 4 कापड गिरण्यांना बदं करण्याची परवानगी दिलेली आहे. या चार गिरण्या पुन्हा सुरु करण्यासाठी केंद्रशासनाच्या योजनेचा फायदा दिला जाईल असे काही सांगितले होते काय ? कोणत्या कारणास्तव या 4 गिरण्यांना गिरण्या बंद करण्याची परवानगी देण्यात आली होती ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, औद्योगिक विवाद अधिनियम 1947 च्या कलम 25 (ओ) अंतर्गत कामगार आयुक्तांकडे अर्ज करुन गिरणी जर सातत्याने लॉसमध्ये जात असेल किंवा इतर कारणामुळे लॉस होत असेल व इतर कारणाने गिरण्या बंद पडल्या असतील तर त्यांना अशा प्रकारची परवानगी औद्योगिक विवाद अधिनियमाच्या माध्यमातून देण्यात येत असते.

यानंतर श्री.औटवणेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्याप्रमाणे यशवंत सहकारी सूत गिरणी, सोलापूर, सोलापूर विणकर सूत गिरणी, सोलापूर, सिंप्लेक्स मिल, शिवनी, अकोला, साईबाबा कॉटन वेस्ट स्पिनिंग अँड विविंग मिल्स या चार मिल्सनी या अधिनियमान्वये उद्योग बंद करण्याची परवानगी मागितली होती. त्यानुसार त्यांना उद्योग बंद करण्याची परवानगी देण्यात आली आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, शेती प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांच्या कर्जाची पुनर्रचना करण्याचे धोरण शासन बदलेल काय ? साखर उद्योगाबाबत पुनर्रचना करण्याचे धोरण राबविण्यात आले आहे. शेवटी साखर उद्योग लिलावात निघाले. आज विदर्भामध्ये अधिवेशन होत आहे. या विदर्भामध्ये जास्तीतजास्त कापूस उत्पादक शेतकरी आहेत. तेथे चांगल्या प्रकारे वस्त्रोद्योग धोरण राबविण्याचा निर्णय शासन जाहीर करणार आहे काय, तसेच पुनर्रचना करताना त्यांना कायम स्वरूपी पॅकेज दिले जाईल काय ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचा पहिला प्रश्न विदर्भाशी निगडित आहे. विदर्भातील सर्वच शेतकरी कापूस उत्पादक आहेत. वस्त्रोद्योग धोरण ठरविताना जे कापूस उत्पादक प्रदेश किंवा जिल्हे आहेत त्यांना 10 टक्के भांडवली अनुदान देण्याचा विशेष निर्णय शासनाने घेतला आहे. तसेच टफशी लिंकअप केले असल्यामुळे सबसिडी देखील मोठ्या प्रमाणावर मिळत आहे. मराठवाडा, विदर्भ आणि खानदेश हे कापूस उत्पादक प्रदेश आहेत. या भागातच हे उद्योग यावेत अशा प्रकारचा धोरणात्मक निर्णय शासनाने घेतला आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, वस्त्रोद्योगाबाबत शासनाने अत्यंत चांगले धोरण आणले आहे. कापूस उत्पादक परिसरामध्ये अधिकाधिक उद्योग उभे राहिले पाहिजेत अशी त्या मागची कल्पना आहे. पण यामधून दोन महत्त्वाचे घटक सुटलेले आहेत. एक म्हणजे यात आपण विणकरांना कुठेही सामावून घेतलेले नाही. त्यांना नवीन धोरणामध्ये कशा प्रकारे न्याय देता येईल याचा विचार करावा लागेल. त्याच बरोबर उद्योग सुरू करण्यासाठी विदर्भामध्ये सर्वात जास्त गरज जिनिंग आणि प्रेसिंग मिलची आहे. परंतु, जिनिंग, प्रेसिंगचासुद्धा या धोरणामध्ये समावेश केलेला नाही. त्यामुळे या दोन्ही बाबींचा धोरणामध्ये समावेश करून विणकरांना न्याय द्यावा. कारण विदर्भामध्ये मोठ्या प्रमाणावर विणकर आहेत. त्यांना कुठल्याही प्रकारची लाभाची योजना मिळत नाही. तेव्हा याचा वस्त्रोद्योग धोरणामध्ये समावेश करून या वर्गाला फायदा देण्याचा प्रयत्न शासन करणार आहे काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अत्यंत चांगला प्रश्न उपस्थित केला आहे. मी पहिल्यांदा असे सांगेन की, जिनिंग प्रेसिंगमध्ये जे युनिटस येतील त्यांना टफने मान्यता दिली असेल तर त्यांना आपल्या योजनेचे लाभसुद्धा निश्चितपणाने मिळतील. तसा आपण धोरणात्मक निर्णय घेतला आहे. आपले वस्त्रोद्योग धोरण टफशी लिंकअप केले आहे. ज्या जिनिंग, प्रेसिंग युनिटला टफ मान्यता देईल त्याला आपल्या भांडवली गुंतवणुकीची सवलत किंवा व्याज सवलतीची योजना लागू होतील. येथे विणकरासंबंधी देखील सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला आहे. केंद्र सरकारने हँण्डलूम रिव्हायवल, रिफॉर्म अँड रिस्ट्रक्चरल पॅकेज जाहीर केले आहे. त्या अंतर्गत 3884 कोटी रूपये या योजनेसाठी दिलेले आहेत. त्या माध्यमातून विदर्भातील आणि महाराष्ट्रातील विणकरांना त्याचा लाभ होईल. परंतु, वस्त्रोद्योग धोरणामध्ये विणकरांचा समावेश नाही ही गोष्ट मान्य आहे. सदर बाब तपासून त्याबाबात काय करता येईल याबाबत शासन विचार करेल.

उप सभापती : मंत्री महोदय, आपली बोलताना एक चूक झाली. आपण उत्तर देताना म्हणालात की, "विदर्भ आणि महाराष्ट्रातील विणकर...." मी आपणास सांगू इच्छितो की, विदर्भ हा महाराष्ट्रातच आहे.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी वस्त्रोद्योग धोरणा संबंधी सांगितले. विदर्भ, मराठवाडा आणि खानदेश या भागात कापूस मोठ्या प्रमाणावर पिकतो. पण राज्य शासनाने वस्त्रोद्योग धोरण लागू करताना ते बिगर कापूस उत्पादक भागात लागू केले आहे हे खरे आहे काय, असल्यास त्याचा कापूस उत्पादक भागातील शेतकऱ्यांवर अन्याय होईल असे मंत्री महोदयांना वाटत नाही काय ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, वस्त्रोद्योग धोरण संपूर्ण राज्यासाठी राबवित आहोत.....

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, ज्या भागात शंभर क्विंटल देखील कापूस होत नाही अशा भागामध्ये वस्त्रोद्योग धोरण लागू करणार म्हणजे विदर्भातील कापूस पश्चिम महाराष्ट्रात जाणार आणि त्यामुळे विदर्भाला न्याय मिळणार नाही. मागील वेळी देखील विदर्भात कापूस पिकत असताना पश्चिम महाराष्ट्रात सूत गिरण्या उभाण्यासाठी प्राधान्य देण्यात आले. असाच प्रकार वस्त्रोद्योग धोरणात होणार आहे काय ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी मला उत्तर पूर्ण करु न देता पुढील प्रश्न विचारला. मी अगोदर सांगितल्याप्रमाणे वस्त्रोद्योग धोरण राज्यातील सर्व भागांना लागू आहे. परंतु कापूस उत्पादक प्रदेशांना प्राधान्य द्यायचे असे शासनाचे धोरण आहे. त्याशिवाय शासन त्यांना भांडवली गुंतवणुकीवर दहा टक्के अनुदान देणार आहे. व्याजामध्ये शंभर टक्के सबसिडी मिळणार आहे.साडेबारा टक्के व्याजदरापर्यंत 100 टक्के व्याजाचा परतावा होईल. शासनाने विशेषत: विदर्भ, मराठवाडा आणि खानदेशासाठी हे धोरण घेतले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी.: "अ" जीवनसत्त्वाच्या औषधाची खरेदी प्रक्रिया रेंगाळल्यामुळे राज्यातील वीस लाख लहान मुलांचे आरोग्य धोक्यात येणे

मु. शी.: "अ" जीवनसत्त्वाच्या औषधाची खरेदी प्रक्रिया रेंगाळल्यामुळे राज्यातील वीस लाख लहान मुलांचे आरोग्य धोक्यात येणे यासंबंधी सर्वश्री मोहन जोशी, जयवंतराव जाधव, अनिल भोसले,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.मोहन जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

""अ" जीवनसत्वाच्या औषधाची (लहान मुलांना अत्यावश्यक असलेला बुस्टर डोस) खरेदी प्रक्रिया रेंगाळल्यामुळे त्याचा थेट फटका राज्यातील वीस लाख लहान मुलांच्या आरोग्याला बसण्याचा धोका निर्माण झाला असल्याची धक्कादायक बाब नुकतीच उघडकीस येणे, रोग प्रतिकारशक्ती वाढवून रातांधळेपणा टाळण्यासाठी "अ" जीवनसत्व अत्यंत आवश्यक असणे, शासनाच्या योजनेप्रमाणे आतापर्यंत राज्यातील 13 महिने ते पाच वर्ष या वयोगटातील मुला-मुलींना दर सहा महिन्यांनी "अ" जीवनसत्वाचा डोस नियमितपणे देण्यात येत असणे, परंतु सार्वजनिक आरोग्य विभागाने केंद्रीय पध्दतीने औषध खरेदीची प्रक्रिया सुरू केली असल्यामुळे "अ" जीवनसत्वाची खरेदीच अद्याप पर्यंत झालेली नसणे, परिणामी मागील 2 महिन्यापासून राज्यातील लहान मुले या जीवनसत्वाच्या डोसापासून वंचित राहणे, केंद्र सरकारकडुन प्रसुती व बालआरोग्य (आरसीएच) कार्यक्रमा अंतर्गत होणारा "अ" जीवनसत्वाचा पुरवठा बंद करण्यात आला असणे, बालकांना जीवनसत्वाचे डोस देण्याचे विशिष्ट वेळापत्रक असते, त्यातील एक डोस जरी उशिरा दिला गेला तरी त्याचा परिणाम पुढील डोसावर होत असणे, त्यामुळे राज्यातील नऊ महिने ते पाच वर्षे वयोगटातील बालके या डोसापासून वंचित राहत असल्याने पालकांमध्ये निर्माण झालेले तीव्र

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मोहन जोशी....

चिंतेचे वातावरण, याबाबत राज्यशासनाने केंद्रीय पध्दतीने होणारी खरेदीची निविदा प्रक्रिया, मंजूरी प्रक्रिया, वेगाने पूर्ण करुन "अ" जीवनसत्वाचा डोस राज्यात सर्वत्र उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे दुर्लक्ष व याबाबत शासनाने करावयाची तातडीची उपाययोजना."

प्रा.फौजिया खान (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, "अ "जीवनसत्व हे लहान मुलांच्या डोळ्यांसाठी आणि रोगप्रतिकारशक्ती यासाठी अत्यंत महत्वाचे आहे असे निवेदनात सुरुवातीलाच नमूद करण्यात आले आहे. मागील तीन महिन्यांपासून या डोसचा पुरवठा झाला नसल्यामुळे पुणे परिसरातील लाखो मुलांना डोस देण्यात आला नाही असे आरोग्य उप संचालकांनी कबूल केलेले आहे. "अ" जीवनसत्व तसेच जंतूनाशक मोहिमेसाठी 100 मी.मी जीवनसत्वाच्या एकूण 5 लाख 43 हजार बाटल्यांची आवश्यकता असताना भारत सरकार व राज्याची एकूण खरेदी मिळून फक्त 2 लाख 60 हजार बाटल्यांचा पुरवठा झालेला आहे. म्हणजे जवळपास 2 लाख 40 हजार बाटल्यांचा तुटवडा आहे आणि याचा फटका लहान मुलांना बसलेला आहे. निवेदनात नमूद केले आहे की, पहिला डोस 8 लाख 73 हजार 116 मुलांना देण्यात आला तर दुसरा डोस 7 लाख 76 हजार 675 मुलांना देण्यात आलेला आहे. म्हणजे पहिल्या आणि दुसऱ्या डोसमध्ये एक लाखपेक्षा जास्त मुलांचा फरक आहे. माझा प्रश्न आहे की, अजून 5 लाख 43 हजार 249 बाटल्यांची आवश्यकता आहे. तेव्हा या बाटल्यांचा पुरवठा पुढील तीन महिन्यात करण्यात येईल काय ? निवेदनात नमूद करण्यात आले आले की, आजपावेतो 16 जिल्ह्यांमध्ये हा पुरवठा झाला असून तो दिनांक 14.12.2012 पावेतो सर्व जिल्ह्यांना पुरवठा होण्याची अपेक्षा आहे. तेव्हा त्याप्रमाणे पुरवठा करण्यात येईल काय ? माझा शेवटचा प्रश्न आहे आहे की, शासनाने 30 मार्च 2012 रोजी औषधांच्या खरेदीसाठी आदेश देऊनही त्याची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही. तेव्हा संबंधितांची चौकशी करुन शासन त्यांच्यावर कारवाई करणार काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, जीवनसत्व "अ"च्या डिवर्मिंगसाठी अल्टामेडिझॉलचे वर्षभरात नऊ डोस देणे आवश्यक आहे. पाच वर्षापर्यंतची जवळपास 20 कोटी मुले लाभार्थी आहेत. आपण त्यांना नऊ डोसेस देतो त्याशिवाय कॅम्पेन घेऊन डोस देण्याचा प्रयत्न करतो. सन्माननीय सदस्यांनी विचारल्याप्रमाणे उर्वरित बाटल्यांचा पुरवठा तीन महिन्यात करण्यात येईल. ही औषधे सर्व राज्यांना देण्यात येणार आहेत. कॅम्पेन घेण्याबाबत WHO ने नॉर्मस ठरवून दिलेले आहेत त्याच्या पेक्षा चांगल्या दर्जाचे आपण कॅम्पेन घेतो

यानंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान....

यामध्ये थोडासा उशीर झाला आहे. याचे कारण नवीन प्रॉक्युरमेंट पॉलीसी आणून ई-टेंडरींग प्रक्रिया सुरु केली आहे. अशाप्रकारे काही तांत्रिक कारणांमुळे यामध्ये उशीर झाला आहे. येत्या दोन ते चार दिवसात हा सर्व पुरवठा सुरळीत सुरु होईल. कोणतेही बालक बूस्टर डोसशिवाय राहणार नाही.

श्री. मोहन जोशी : याबाबत संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करणार काय?

प्रा. फौजिया खान : यामध्ये अधिकाऱ्यांची काहीही चूक नाही.

श्रीमती दीप्ती चवधरी : सभापती महोदय, अ जीवनसत्वाच्या औषधाची खरेदी प्रक्रिया रखडल्यामुळे अनेक बालकांना डोस दिले नाही. तीन महिन्यामध्ये पुरवठा होईल असे मंत्रीमहोदयांनी सांगितले. याकरिता विशेष मोहिम घेऊन आपण बूस्टर डोस पोहोचविणार काय?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, मघाशी सांगितल्याप्रमाणे या करिता विशेष मोहीम घेऊन मार्च महिन्यापर्यंत सर्व लाभार्थींना डोस देण्यात येतील. त्याचप्रमाणे पूर्वी जी किंमत होती त्यापेक्षा किंमत खूप कमी करण्यात आली आहे.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, लहान मुलांच्या आरोग्याच्या दृष्टीने अ जीवनसत्वाचा बूस्टर डोस ही एक प्राथमिक स्तरावरील गरज आहे. मला वाटते ही योजना राबवितांना ई-टेंडरींग हे दिरंगाईचे कारण सांगितले असले तरी बूस्टर डोसची संकल्पना अशासाठी आहे की, ते ठरावीक वेळेमध्ये दिले गेले पाहिजे. त्यानंतर जर ते दिले तर त्याचा लहान मुलांच्या तब्येतीवर विपरीत परिणाम होऊ शकते. हे टाईम टेबल एकदा आपल्याकडून चुकले तर लहान मुलांमध्ये अ जीवनसत्वाच्या कमतरतेमुळे रातांधळेपणा आणि दृष्टीदोष मोठया प्रमाणावर निर्माण होऊ शकतो. त्यामुळे अ जीवनसत्वाच्या बूस्टर डोसची मागणी पूर्ण करणे ही अशक्य कोटीतील बाब नाही. हे डोस दरवर्षी ठराविक वेळेला पुरविले गेले पाहिजेत, हे डोस पाठविण्यामध्ये होणारी दिरंगाई अजिबात खपवून घेता कामा नये. त्याकरिता आवश्यक ती यंत्रणा राबविली गेली पाहिजे. पुढील डोस देण्याबाबतचे शेडयुल्ड येण्यापूर्वी दोन महिने अगोदर त्याची संपूर्ण तयार झाली आहे की नाही या करिता विशेष दक्षता घेणे आवश्यक आहे. जेणेकरुन भविष्यात असे प्रसंग पुन्हा उद्भवणार नाहीत. त्या करिता शासन प्रयत्न करणार आहे काय?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, मी मघाशी सांगितल्याप्रमाणे नियमित डोसचा पुरवठा करण्याच्या बाबतीत कमतरता राहिलेली नाही. डोसचा पुरवठा नियमितपणे करण्यात आलेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान...

परंतु आपण अतिरिक्त कँपेन घेत असतो त्यामध्ये तांत्रिक कारणांमुळे थोडीफार दिरंगाई झाली असली तरीसुध्दा कोणतेही बालक बूस्टर डोसशिवाय वंचित राहिलेले नाही आणि यापुढे राहणार नाही.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: लक्षवेधी सूचनेसंबंधी

उप सभापती : लक्षवेधी सूचना क्रमांक तीन, माननीय सदस्य श्री. रामदास कदम.

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

श्री. निरंजन डावखरे : सभापती महोदय, लक्षवेधी सूचना क्रमांक तीनच्या निवेदनावर मला उप प्रश्न विचारण्याची परवानगी मिळावी ही विनंती.

उप सभापती : ठीक आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: गडचिरोली जिल्हा परिषदेमार्फत 1792 बांधकामांचे तुकडे केल्याचा उघडकीस आलेला प्रकार.

मु.शी.: गडचिरोली जिल्हा परिषदेमार्फत 1792 बांधकामांचे तुकडे केल्याचा उघडकीस आलेला प्रकार यासंबंधी श्री. रामदास कदम,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय ग्राम विकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"गडचिरोली जिल्हा परिषदेमार्फत बांधण्यात येणाऱ्या ११ कोटी ६ लाखांच्या बांधकामाचे तब्बल १७९२ कामामध्ये तुकडे केल्याचा प्रकार माहे ऑगस्ट, २०१२ च्या सुमारास उघडकीस येणे, एवढया मोठया प्रमाणावर कामाचे तुकडे करण्याचा राज्यातील हा कदाचित पहिलाच प्रकार असणे, कोणत्याही सरकारी विभागातील ५० हजार रूपयांवरील खरेदीसाठी किंवा बांधकामासाठी निविदा काढून वृत्तपत्रात जाहिरात प्रकाशित करून ती कामे शासनाच्या यादीतील कंत्राटदारांना देण्याचे बंधनकारक असूनही त्याकडे संबंधित अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष करणे, तसेच जिल्हा परिषदेच्या लेखा विभागाने देखील या कामांना बिनदिक्कत परवानगी देणे, ३०५४ मार्ग व पूल या शीर्षाखाली या जिल्हापरिषदेच्या बांधकाम विभागाला सदरहू निधी प्राप्त झाला असून कार्यकारी अभियंत्याच्या संमतीने संबधित कनिष्ठ अभियंत्यानी आपल्या स्तरावर या बांधकामाचे तब्बल १७९२ तुकडे करून शासनाच्या नियमाला या अधिकाऱ्यांनी पायदळी तुडविण्यात आल्याने शासनाचे झालेले नुकसान लक्षात घेता सदर प्रकरणाची शासनाने तातडीने चौकशी करून संबधित अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील (ग्राम विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. निरंजन डावखरे :सभापती महोदय, ग्रामीण भागातील रस्तांच्या कामावर शासनाच्या वतीने लाखो-करोडो रुपये खर्च होतात. तरीसुध्दा त्या रस्त्यावर सातत्याने अपघात होऊन त्यामध्ये बरेच लोक मृत्युमुखी पडत असतात. ट्रॅफिक सिग्नल आणि झेब्रा क्रॉसिंगच्या अभावी असे प्रकार होत असतात. तेव्हा अशाप्रकारची उपाय योजना करण्या संदर्भात शासन धोरण तयार करणार आहे काय?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, 3054, मार्ग व पूल या शीर्षांतर्गत व्हीआर आणि ओडीआरची कामे जिल्हा परिषदेच्या माध्यमातून होतात. माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या अनुषंगाने सांगू इच्छितो की, शासनाने पहिल्यांदा 3054 मार्ग व पूल या शीर्षाखाली रस्त्यावर जो निधी खर्च होईल त्यामध्ये 5 टक्के इतका निधी कंपल्सरी युटीलिटी डक, रम्बलर्स, ब्रिंकल्स, कॅटाईज यासाठी खर्च करण्याची तरतूद केली आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, विभागातर्फे एकच मोठे टेंडर काढण्याऐवजी 50/50 हजाराचे तुकडे करुन कामांचे टेंडर काढले जाते व त्याप्रमाणे कामाचे वाटप केले जाते. त्याबाबत हरकत घेण्यात आल्यानंतर त्याची चौकशी करण्यात आली. सदर चौकशी अहवाल जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी दाबून ठेवला आहे. त्याबाबत निवेदनामध्ये कोणतेही उत्तर देण्यात आले नाही. नियमाप्रमाणे कामाचे 50/50 हजाराचे तुकडे करता येत नाहीत असे असतांना तुकडे करुन कामे देण्यात आली आहेत. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, सदर चौकशी अहवाल शासनाकडे आला आहे काय?

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी असा मुद्दा उपस्थित केला आहे की,बांधकामाचे 1792 तुकडे केले आहेत. त्याबाबत सांगावयाचे तर असा कोणताही प्रकार घडलेला नाही.जेव्हा कामे येत असतात. तेव्हा दीड पटीने कामे सुचविली जातात. कदाचित त्यावेळी 25-30 कोटी रुपयांची कामे सुचविली असतील. परंतु प्रत्यक्षात ज्यावेळी . . ..

श्रीमती.शोभा फडणवीस : सभापती महोदय, माझे असे म्हणणे आहे की, ...

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, माझे उत्तर पूर्ण होऊ द्यावे.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, 50-50 हजाराचे तुकडे करणे हा भाग वेगळा आहे आणि वाढीव काम देता येते हे आम्हालाही आहे. प्रश्न असा आहे की, 1792 कामाचे 50-50 हजाराचे तुकडे केले. मग त्याबाबत हरकत घेण्यात आली. त्यानंतर याबाबत चौकशी झाल्यानंतर चौकशी अहवाल आला पण सी.ई.ओ.यांनी त्या अहवालाच्या अनुषंगाने कारवाई केली नाही हाच खरा महत्वाचा प्रश्न असून त्याबाबतच सदरहू लक्षवेधी सूचना दिलेली आहे.

.श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, मला सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांना नम्रपणे सांगावयाचे आहे की, याठिकाणी तशा प्रकारचा कोणताही प्रकार घडलेला नाही. याठिकाणी जी कामे आली त्याबाबत सांगावयाचे तर प्रशासनाने 71 कामे मंजूर केली. या सगळया मंजुरीचे अधिकार डी.पी.डी.सी.मध्ये माननीय पालकमंत्र्यांना असतात. त्यामुळे 1792 तुकडे केलेले नाहीत हे मला सांगावयाचे आहे.

उप सभापती : आता लक्षवेधी सूचना क्रमांक 4 आणि लक्षवेधी सूचना क्रमांक 14 या एका पाठोपाठ चर्चेसाठी घेण्यात येतील.

. . . .ई-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : कराड तालुक्यातील (जिल्हा सातारा) फलटण येथील 4 महाविद्यालयीन युवतींचे झालेले अपहरण

मु.शी. : कराड तालुक्यातील (जिल्हा सातारा) फलटण येथील 4 महाविद्यालयीन युवतींचे झालेले अपहरण यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री.राम पंडागळे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.राम पंडागळे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"कराड तालुक्यातील (जिल्हा सातारा) फलटण येथील 4 महाविद्यालयीन युवतींचे अपहरण करुन त्यांना देवीला बळी देण्याचा अपहरणकर्त्यांनी दिनांक 1 फेब्रुवारी 2012 रोजी केलेला प्रयत्न् त्यापैकी एका युवतीने कराड जवळ अपहरणकर्त्यांची नजर चुकवून सुटका करुन घेणे, अपहरणकर्त्यांनी चारही युवतींना केलेली बेदम मारहाण, या प्रकारामुळे तेथील महिला वर्गात विशेषत: विद्यार्थ्यांत पसरलेले भीतीचे वातावरण, अद्यापही आरोपींना अटक करण्यास पोलिसांना आलेले अपयश, त्यामुळे सदर परिसरात पसरलेला तीव्र असंतोष, अपहरणकर्त्यांना त्वरीत अटक करण्याची होत असलेली मागणी, यावर शासनाने तातडीने केलेली वा करावयाची उपाययोजना."

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचने संबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

. . . .ई-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, सातारा जिल्ह्यातील कऱ्हाड तालुक्यातील ही घटना आहे.त्याठिकाणी एका महाविद्यालयीन युवतीचे अपहरण झालेले आहे आणि त्यामुळे ती शिक्षणा पासून वंचित राहिली आहे. निवेदनामध्ये शेवटी असे म्हटलेले आहे की,"आम्ही गुन्हा उघडकीस आणण्याच्या दृष्टीने प्रयत्न करीत असून तपास सुरु आहे." माझा असा प्रश्न आहे की, शासकीय पातळीवरुन हा तपास कधी पूर्ण होणार आहे आणि त्यांना योग्य न्याय कधी मिळणार आहे?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, घरी गेल्यानंतर या मुलीचे अपहरण झाले अशी तक्रार करण्यात आली. त्यानंतर सदर मुलीचा तपास करण्यात आला. तसेच त्या मुलीकडे दोन मोबाईल्स असल्यामुळे आपण त्या दोन्ही मोबाईल्स्चे सी.डी.आर.काढला असून त्यामध्ये बरीच विसंगती दिसून आली आहे. त्यामुळे आपण उत्तरामध्ये तपास सुरु आहे असे सांगितले आहे. याठिकाणी अपहरणाचा कोणताही प्रकार घडलेला नाही.

प्रा.डॉ.अपूर्व प्रशांत हिरे : सभापती महोदय, कराड तालुक्यातील फलटण येथे 4 विद्यार्थीनींचे देवीला बळी देण्यासाठी अपहरण झाले. त्यातील एका मुलीने संबंधितांची नजर चुकवून आपली सुटका करुन घेतली.त्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. हा अतिशय गंभीर विषय आहे. राज्यामध्ये असे प्रकार वारंवार होऊ नयेत या उद्देशाने कोणती कारवाई करणार आहे ?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, मुळात जो प्रश्न विचारण्यात आलेला आहे तसा कोणताही प्रकार घडलेला नाही. याबाबतीत गरजेनुसार ज्या उपाययोजना करावयाच्या आहेत, त्या शासन निश्चितपणे करील.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय असे उत्तर देत आहेत की, अशा प्रकारे काही घडलेले नाही. परंतु जर एक मुलगी पोलीस स्टेशनमध्ये येऊन अशा प्रकारे सांगत असेल तर मग तो प्रकार खोटा होता काय? मग खरा प्रकार काय आहे याची सभागृहाला माहिती देण्यात यावी.

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, सदरहू मुलगी दोन दिवसामध्ये अपहरण झाले असे सांगत आहे.परंतु त्या दोन दिवसातील तिचे सी.डी.आर.चे रिपोर्टस् काढण्यात आले. तिचा एक मोबाईल बंद होता परंतु दुसऱ्या मोबईलवरुन जवळजवळ 65 कम्युनिकेशन्स् झाली आहेत. तसेच एस.एम.एस.असतील किंवा जे फोन केले असतील. ते तिच्या मित्राबरोबर किंवा नातेवाईकांबरोबर झालेले आहेत. त्यामुळे तिचे अपहरण झालेले नाही असे याठिकाणी निष्पन्न झालेले आहे.

पृ.शी. : राज्यातील येरवडा कारागृहाच्या सुरक्षा व्यवस्थेत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असलेल्या गंभीर त्रुटी

मु.शी. : राज्यातील येरवडा कारागृहाच्या सुरक्षा व्यवस्थेत असलेल्या गंभीर त्रुटी याबाबत श्री.मोहन जोशी,वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.मोहन जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"राज्यातील सर्वात मोठ्या येरवडा कारागृहाच्या सुरक्षेत अनेक गंभीर त्रुटी असल्याची धक्कादायक बाब पुणे पोलिसांनी केलेल्या "सिक्युरिटी ऑडीट" मध्ये उघडकीस येणे, कारागृहात साडेतीन हजार कैदी तर अवघे वीस अधिकारी व प्रत्येक पाळीला केवळ दोनशे रक्षक काम करत असणे, पुणे पोलिसांनी कारागृहाच्या सुरक्षा यंत्रणेत अनेक त्रुटी असल्याचे निदर्शनास आणून दिले असणे, पंधरा कैद्यांमागे एक रक्षक तर 50 कैद्यांमागे एक अधिकारी असे अत्यंत विषम व नियमबाह्य गुणोत्तर असणे, सव्वाशे एकर परिसराच्या कारागृहात आत व बाहेर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याच्या सूचनेवर प्रशासनाकडून अद्याप काहीच कार्यवाही झालेली नसणे, रक्षकांकडे अत्यंत कमी शस्त्रे असून काडतुसांच्या कमतरतेमुळे त्यांना शस्त्रांचा नियमित फायरिंग अभ्यासही मागील अनेक दिवसापासून करता आला असल्यामुळे ऐनवेळी त्यांच्याकडील शस्त्रे उपयोगात येतीलच याबाबत खात्री नसणे, कारागृहातील सात मनोऱ्यांवरील सुरक्षा यंत्रणा देखील पुरेशी नसल्याची बाब समोर येणे, कारागृहात अंमली पदार्थ आणि मोबाईल सापडण्याचा उल्लेख कारागृहाच्या सांख्यिकीय अहवालात असणे, आपत्कालीन व्यवस्थापनाकरिता असलेला भोंगा दुरुस्त व दुरुस्ती अभावी बंद असणे, अलमल कसाबला दिलेली फाशी आणि इंडियन मुजाहीद्दीनचा कट्टर अतिरेकी कातील सिध्दीकी याचा अंडा सेलमध्ये गळा दाबून खून केल्याच्या पार्श्वभूमीवर येरवडा कारागृहातील सुरक्षा व्यवस्था अधिक बळकट करण्याची निर्माण झालेली आवश्यकता व याकडे झालेले शासनाचे दुर्लक्ष व याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना."

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचने संबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

17-12-2012 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) E-5

APR/ D/ KTG/ 11:20

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, 133 वर्षापूर्वी म्हणजे 1866 मध्ये बांधलेले राज्यातील सर्वात मोठे येरवडा कारागृह आहे. या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून मी शासनाचे आणि गृह विभागाचे मनापासून अभिनंदन करतो. कारण त्यांनी अतिरेकी कसाबला फाशीची शिक्षा दिली आणि

त्यांनी ज्यापध्दतीने ऑपरेशन एडस् यशस्वी केले त्याबद्दल येरवडा जेलच्या संदर्भातील ही लक्षवेधी सूचना असल्याने सुरुवातीलाच मी शासनाचे मनापासून अभिनंदन करतो. 1866 मध्ये येरवडा जेल बांधण्यात आले आणि 100 ते 125 एकर इतके त्याचे क्षेत्रफळ आहे.

यानंतर श्री.बरवड . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोहन जोशी.....

या कारागृहाचा विस्तार लक्षात घेता 2 महिन्यापूर्वी पुणे पोलिसांनी त्याचे सिक्युरिटी ऑडिट केले. या सिक्युरिटी ऑडिटमध्ये काही गंभीर बाबी निदर्शनास आणल्या आहेत. पुणे शहर अतिरेक्यांचे केंद्र बनलेले आहे आणि कसाबच्या फाशीनंतर येरवडा जेलची सुरक्षा अतिशय महत्वाची झालेली आहे. तेथील रक्षकांकडे ज्या जुन्या रायफली आहेत त्यांची काडतुसे सुध्दा आता मिळत नाहीत. सिक्युरिटी ऑडिटमध्ये सीसीटीव्ही असतील, अत्याधुनिक शस्त्रे असतील, मल्टीडोअर फ्रेम असेल, हॉल डिटेक्टर असेल इत्यादी कमतरतेबद्दल ताशेरे ओढलेले आहेत. सदरहू आवश्यक यंत्रसामुग्री किती कालावधीमध्ये बसविण्यात येईल ? बंदीच्या क्षमतेच्या तुलनेने जी पदे मंजूर आहेत त्यानुसार सरासरी बंदीच्या संख्येनुसार जी पदे आवश्यक आहेत ती मंजूर करणार का, असल्यास किती कालावधीत करणार ?

सभापती महोदय, एक महत्वाचा प्रश्न मी आपल्या माध्यमातून विचारणार आहे. त्या ठिकाणी जे रक्षक असतात त्यांच्या वेतनामध्ये 1700 रुपयांची तफावत आहे. ती तफावत किती दिवसात दूर करणार ? येरवडा कारागृहातील पोलीस म्हणजे जेल पोलीस आणि राज्य पोलीस हे दोन्ही गृह खात्याची अंगे आहेत. राज्य पोलिसांच्या बाबतीत 2003 पासून सहाव्या वेतन आयोगाची अंमलबजावणी झाली परंतु यांच्या वेतनामध्ये जी 1700 रुपयांची तफावत आहे त्या संदर्भात शासन काय निर्णय घेणार आहे ? राज्य पोलिसांना आपण ज्या सोयीसुविधा पुरवितो मग त्यामध्ये वैद्यकीय सोयी असतील किंवा इतर कल्याणकारी योजना असतील त्या योजना कारागृह पोलिसांना लागू करणार का ? कारागृह उप अधीक्षक आणि पोलीस निरीक्षक ही दोन्ही पदे सारखीच असून दोघांच्या ग्रेड पे मध्ये 400 रुपयांचा फरक ठेवला असून उप अधीक्षकांच्या श्रेणी 2 च्या ग्रेड पेमध्ये व श्रेणीमध्ये शासन श्रेणीवाढ करणार का ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, एका कलमाखाली सन्माननीय सदस्यांनी अनेक आरोप सादर केलेले आहेत. निश्चितपणे येरवडा जेलच्या बाबतीत सिक्युरिटी ऑडिट केलेले आहे. सिक्युरिटी ऑडिट करुन मेटल डिटेक्टर असतील, सीसीटीव्ही कॅमेरे असतील या सर्व अत्याधुनिक सुविधा त्या ठिकाणी करण्यासाठी सूचना दिलेल्या आहेत. साधारणपणे पुणे, मुंबई, तळोजा,ठाणे या ठिकाणी 7 कोटी 20 लाख रुपये खर्च करुन फक्त सुरक्षा व्यवस्था

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील ....

अत्याधुनिक करण्याचा आराखडा निश्चित झालेला आहे. अर्थसंकल्पीय तरतूद देखील झालेली आहे. जेलच्या रक्षकांच्या आणि पोलिसांच्या वेतनामधील जी तफावत आहे ती दूर करण्यासाठी देखील शासनाचा सकारात्मक भूमिका घेण्याचा प्रयत्न चालू आहे. त्याचबरोबर जेलमध्ये असणारी कर्मचाऱ्यांची 20 ते 22 टक्के कमतरता भरुन काढण्याच्या दृटीने लवकरात लवकर निर्णय घेत आहोत.

.....3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : एका कुटुंबाला सवलतीच्या दराने वर्षाला फक्त सहा गॅस सिलेंडर देण्याचा घेतलेला निर्णय

मु. शी. : एका कुटुंबाला सवलतीच्या दराने वर्षाला फक्त सहा गॅस सिलेंडर देण्याचा घेतलेला निर्णय यासंबंधी सर्वश्री संजय दत्त, चरणसिंग सप्रा, डॉ. सुधीर तांबे, श्रीमती अलका देसाई, सर्वश्री मोहन जोशी, सुभाष चव्हाण, श्रीमती दिप्ती चवधरी, सर्वश्री हेमंत टकले, रमेश शेंडगे, विक्रम काळे, किरण पावसकर, अनिल भोसले, नागो पुंडलिक गाणार, नितीन गडकरी, जयवंतराव जाधव, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय अन्न व नागरी पुरवठा अ ाणि ग्राहक संरक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"एका कुटुंबाला सवलतीच्या दराने वर्षाला फक्त सहा गॅस सिलेंडर देण्याच्या निर्णयाचा फटका राज्यातील सर्वसामान्य जनता, शाळा, आश्रमशाळा, वसतिगृह तसेच सामाजिक संस्थांना बसणार असल्याचे माहे ऑक्टोबर-२०१२ च्या सुमारास निदर्शनास येणे, त्यात कुष्ठरोगींचा आधारवड असलेल्या बाबा आमटे यांच्या आनंदवन या संस्थेचा देखील समावेश असणे, विनाअनुदानित सिलेंडरच्या जादा दरामुळे आनंदवनवर सुमारे ६० लाखांचा वाढीव बोजा पडणे, तसेच राज्यातील इतरही सेवाभावी संस्थांना गॅस दरवाढीचा फटका बसणार असणे, तसेच जादा भावाने उर्वरित सिलेंडर घ्यावे लागणार असल्याने सामान्य नागरिकांत पसरलेला तीव्र असंतोष, राज्यातील पिवळ्या केसरी रंगाच्या रेशनकार्डधारक गॅसधारकांना अतिरिक्त ३ सिलेंडर सवलतीच्या दरात देण्याचा शासनाने घेतलेला निर्णय स्तुत्य असला तरी तो सर्वच ग्राहकांना लागू करण्याबाबत होत असलेली मागणी, राज्यशासनाने राज्यातील सामाजिक संस्थांना अनुदानित सवलतीच्या दराने गॅस सिलेंडर वितरीत करण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रिया."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल देशमुख (अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, सर्वप्रथम युपीएच्या अध्यक्षा आदरणीय श्रीमती सोनियाजी गांधी यांच्या सूचनेवरुन माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या पुढाकाराने राज्य शासनाने हा जो लोकाभिमुख निर्णय घेतलेला आहे त्याबद्दल मी तिघांचे विशेष अभिनंदन करतो. माझा स्पेसिफिक प्रश्न विचारण्यापूर्वी मला काही मुद्दे आपल्या निदर्शनास आणावयाचे आहेत.

उप सभापती : आपण प्रश्न विचारता त्यावेळी शासनाचे अभिनंदन केलेच पाहिजे असे काही नाही. आपण स्पेसिफिक प्रश्न विचारावा.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, या संदर्भात जनतेतून सर्वत्र मागणी झाली होती आणि विशेष लक्ष देऊन ही बाब केली गेली आहे. आपण सहज टीका करतो तसेच आपण अभिनंदन सुध्दा केले पाहिजे. या संदर्भात स्पेसिफिक प्रश्न विचारण्यापूर्वी दोन तीन मुद्दे मला आपल्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहेत. पहिला मुद्दा असा आहे की, या संदर्भातील नोटिफिकेशन अजूनही निघालेले नाही. दुसरा मुद्दा असा आहे की, बीपीएलच्या लोकांना याचा फायदा मिळणार आहे पण त्याचा डाटा 2002 चा घेण्यात आलेला आहे. या संदर्भात अपडेटेड डाटा नाही ही बाब मला आपल्या निदर्शनास आणून द्यावयाची आहे.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त...

दुसरा प्रश्न असा आहे की, मोठ्या आणि संयुक्त कुटुंबांना 6 सिलेंडर्स पुरु शकतील काय? गॅस सिंलेडर हा सर्वसामान्यांना भेडसावणारा प्रश्न निर्माण झालेला आहे. जर पेट्रोलची भाववाढ झ ाली तर माणूस बस किंवा ट्रेनने जाऊ शकेल. परंतु स्वयंपाकासाठी सिलेंडर शिवाय दुसरा पर्याय नाही. फक्त बीपीएलच्या लोकांना सवलतीच्या दराने सिलेंडर देण्याचा निर्णय घेणे हे भेदभाव करण्यासारखे आहे. बाबा आमटेच्या आनंदवन सारख्या सेवाभावी संस्थांना देखील गॅस सिलेंडरचा प्रश्न भेडसावू लागलेला आहे. तेव्हा राज्य शासनाने 9 सिलेंडरर्स देण्याचा घेतलेला निर्णय सरसकट सर्वांना लागू केला जाईल काय ? तसेच केन्द्र शासनाने 6 ऐवजी 9 सिलेंडर्स देण्याचा निर्णय घेतला तर राज्य शासन एकूण 12 सिलेंडर्स सवलतीच्या दराने देण्याचा निर्णय घेईल काय?

श्री. अनिल देशमुख : आपणास कल्पना आहे की, केन्द्र सरकारने 6 सिलेंडर्स सब्सिडाईज रेटने देण्याचा निर्णय घेतलेला आहे. राज्य शासनाने देखील त्यापुढे जाऊन बीपीएल आणि अेपीएल मधील लोकांना 3 सिलेंडर्स सब्सिडाईज रेटने देण्याचा निर्णय घेतलेला आहे. आता 6 ऐवजी 9 सिलेंडर्स देण्याची बाब केन्द्र शासनाच्या विचाराधीन आहे. त्या बाबतीत अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही. ज्या सेवाभावी संस्था आहेत, आश्रमशाळा, वृद्धाश्रम आहेत त्यांना देखील सब्सिडाईज रेटने सिलेंडर देण्याच्या बाबतीत सहानुभूतीपूर्वक विचार करण्यात येईल.

श्री. रामनाथ मोते : केवळ सेवाभावी संस्थांपुरताच हा प्रश्न मर्यादित नाही. राज्यातील प्रयोगशाळांसाठी सिलेंडर लागते, आश्रमशाळांसाठी पोषण आहाराकरिता सिलेंडर लागते. सिलेंडर सवलतीच्या दराने देण्याची मर्यादा निश्चित केलेली आहे. तेव्हा प्रयोगशाळा तसेच आश्रमशाळा यांना या अटीतून वगळण्यात येणार आहे काय ?

श्री. अनिल देशमुख : गँस सिलेंडरची किंमत वाढल्यामुळे सहाजिकच आश्रमशाळांना पोषण आहाराकरिता जास्त खर्च येईल. अशा संस्थांच्या बाबतीत शासन सहानुभूतीपूर्वक विचार करुन निर्णय घेईल.

श्री. जयंत प्र. पाटील : राज्यात 11 कोटी जनता आहे. त्यापैकी शहरी आणि ग्रामीण भागातील किती लोक स्वयंपाकासाठी गॅसचा वापर करतात ?

श्री. अनिल देशमुख : महाराष्ट्रामध्ये एकूण 1 कोटी 57 लाख गॅस कनेक्शन्स आहेत. शहरी आणि ग्रामीण भागातील गॅस कनेक्शनची माहिती मी पटलावर ठेवतो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : माननीय मंत्री महोदय अंदाजे आकडेवारी देऊ शकतील काय ?

श्री. अनिल देशमुख : मी संपूर्ण महाराष्ट्रामध्ये किती गॅस कनेक्शन्स आहेत त्याची माहिती दिलेली आहे.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ल.सू.क्र.6...

श्री.विनायक राऊत : सभापती महोदय, या सभागृहात अत्यंत महत्वाचा विषयावर लक्षवेधी सूचना मांडली, त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. परंतु या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी उप प्रश्न विचारला आहे, दुर्देवाने त्यांच्या प्रश्नाचे उत्तर माननीय मंत्री महोदयांकडून दिले गेले नाही. देशात ज्या राज्यामध्ये कॉग्रेस पक्षाचे शासन आहे, त्या राज्यात शासनाच्या माध्यमातून 6 गॅस सिलेंडर शिवाय अतिरिक्त 3 गॅस सिलेंडर राज्य शासनाने अनुदान स्वरुपात द्यावेत असे आदेश सन्माननीय कॉग्रेस अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी यांनी दिले होते. त्याप्रमाणे महाराष्ट्र शासन महाराष्ट्रात सवलतीच्या दरात 3 गॅस सिलेंडर एपीएल, बीपीएल असा भेदभाव न ठेवता सर्वांना तातडीने देईल काय ?

श्री.अनिल देशमुख : ज्यां कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न 1लाख रुपये आहे, ज्याच्याकडे पिवळे आणि केशरी रंगांचे रेशनकार्ड आहे, अशा कुटुंबीयांना जास्तीचे 3 गॅस सिलेंडर सवलतीच्या दरात देण्याचा राज्य शासनाने निर्णय घेतलेला आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, या सभागृहात अत्यंत महत्वाची लक्षवेधी सूचना सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी उपस्थित केली आहे. केंद्र शासनाने 6 गॅस सिलेंडर देण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय घेतल्या नंतर कॉग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी यांनी स्पष्ट सांगितले की, देशातील ज्या राज्यात कॉग्रेस पक्षाचे सरकार असेल, त्या ठिकाणच्या एपीएल ,बीपीएल धारकांना आणखी 3 गॅस सिलेंडर देण्यात येईल. त्यानंतर भविष्यात केंद्र सरकारकडून आणखी 3 गॅस सिलेंडर देण्याचा निर्णय घेण्यात येणार आहे, केंद्र सरकारकडून एकूण 9 गॅस सिलेंडर आणि राज्य शासनाकडून 3 सिलेंडर असे एकूण 12 सिलेंडर राज्यातील जनतेला मिळणार आहेत. राज्यात महत्वाच्या समाजसेवी संस्था आहेत, त्या संस्थांना काही प्रमाणात अनुदान द्यावे लागेल. या संदर्भातील विचार भविष्यात राज्य शासन करणार आहे काय ? राज्य शासन तत्काळ अशा गोष्टींबाबत निर्णय घेणार नसेल, पण राज्य शासनास भविष्यात अशा प्रकारचे निर्णय घ्यावे लागतील.

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, मी मघाशीच सांगितले की, या बाबतीत राज्य शासन अवश्य विचार करील.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ल.सू.क्र.6...

श्री.दिवाकर रावते : सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे हे महाराष्ट्राचे कॉग्रेस पक्षाचे अध्यक्ष आहेत. ज्या राज्यात कॉग्रेस शासन आहे, त्या राज्यात बी.पी.एल.यांना तीन सिलेंडर सवलतीच्या दरात देण्यात येत आहे, परंतु ए.पी.एल.यांना सुध्दा सवलतीच्या दरात तीन सिलेंडर देण्याबाबतची मागणी आहे. परंतु या राज्यात कॉग्रेस पक्षाचे सरकार आहे काय ? राष्ट्रवादी पक्षाचे सरकार आहे की नाही याची मला माहिती नाही. कारण या निर्णयाच्या बाबतीत राष्ट्रवादी पक्षाने पत्र लिहून खोडा घातला होता की, आम्हाला विचारल्या शिवाय हा निर्णय कसा काय घेतला ? या राज्यात नक्की शासन कोणाचे आहे? हॉटेल व्यवसायिकांकडे बेकायदेशीर मार्गाने गॅस सिलेंडर जातील, त्यामुळे गरीब जनतेला पुरेसे गॅस सिलेंडर उपलब्ध होणार नाहीत. व्यवसायिकांकडे बेकादेशीरपणे गॅस सिलेंडर जाऊ नयेत यासाठी शासन कोणत्या प्रकारची यंत्रणा निर्माण करणार आहात ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, राज्य शासनाने तीन गॅस सिलेंडर सवलतीच्या दरात देण्याचा निर्णय घेतलेला आहे. केंद्र शासनाने 6 गॅस सिलेंडर देण्याचे जाहीर केल्यानंतर त्या अनुषंगाने राज्य शासनाने याबाबतचा निर्णय घेतलेला आहे. या राज्यात कॉग्रेस आणि राष्ट्रवादी पक्षाचे संयुक्त सरकार आहे या गोष्टीची सन्माननीय सदस्यांना कल्पना आहे. सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारताना सांगितले की, या निर्णयाच्या अनुषंगाने राष्ट्रवादी पक्षाने खोडा घातला होता. या अनुषंगाने मी सांगू इच्छितो की, सवलतीच्या दरामध्ये लोकांना गॅस सिलेंडर दिले पाहिजेत अशी भूमिका राष्ट्रवादी पक्षानेही घेतली होती. कमर्शियल उपयोगासाठी गॅस सिलेंडर वापरले जातात

उप सभापती : शासन हे जनतेचे आहे असे सांगितले असते तर त्यांना ते त्यांना जास्त पटले असते.

श्री.अनिल देशखुख : कमर्शियल उपयोगासाठी गॅस सिलेंडर वापरले जातात, त्यांच्यावर सुध्दा कडक कारवाई करण्याचे काम राज्य शासनाच्या माध्यमातून प्रत्येक जिल्हयात केले जात आहे.

उप सभापती : ठीक आहे.

यानंतर श्री. भोगेले..

अशुद्ध मुद्रित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-6....

श्री.निरंजन डावखरे : सभापती महोदय, घरगुती वापरासाठी अनुदानित स्वरुपातील गॅस सिलेंडर 458 रुपये आणि विनाअनुदानित स्वरुपातील गॅस सिलेंडर 1359 रुपयांना उपलब्ध करुन दिले जात आहे. शाळा आणि महाविद्यालयांना 1359 रुपयांना गॅस सिलेंडर खरेदी करावे लागते. आज खडू विकत घेण्याची ऐपत नाही अशा शाळांना 1359 रुपयांना गॅस सिलेंडर घेणे परवडत नाही. या संदर्भात शासन धोरण निश्चित करणार आहे काय?

श्री.अनिल देशमुख : अवश्य याबाबत विचार करण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, केंद्र सरकारने निर्णय घेतल्यानंतर दोन महिन्यापर्यंत राज्य शासनाने हे धोरण स्वीकारले नव्हते. देशातील काँग्रेसप्रणित राज्यांमध्ये तातडीने निर्णय लागू करावा असे केंद्र शासनाचे आदेश होते. आज राज्याच्या तिजोरीमध्ये निधीची चणचण आहे हे स्पष्ट झालेले आहे. अनुदानित गॅस सिलेंडर देण्याकरिता राज्याच्या तिजोरीवर किती आर्थिक भार पडणार आहे? राज्य सरकारवर 2.7 लाख कोटी रुपयांचे कर्ज असताना आणखी 10 हजार कोटी रुपयांचे कर्ज काढण्याचा राज्य सरकारने निर्णय घेतला आहे. अनुदानित गॅस सिलेंडर देण्यामुळे आर्थिक तरतूद करावी लागणार आहे. परिणामी कोणत्या योजनांच्या आर्थिक तरतुदीमध्ये कपात करण्यात येणार आहे?

श्री.अनिल देशमुख : संपूर्ण भारतामध्ये महाराष्ट्र शासनाने सर्वप्रथम अनुदानित गॅस सिलेंडर देण्याचा निर्णय जाहीर केला. केवळ आम्ही हा निर्णय घेऊ असे सांगितले नाही. महाराष्ट्र शासनाने कॅबिनेट बैठकीसमोर हा विषय मांडून निर्णय जाहीर केला. देशामध्ये अनुदानित स्वरुपात गॅस सिलेंडर देण्याबाबत धोरण जाहीर करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. 3 अनुदानित गॅस सिलेंडर देण्याकरिता 1300 कोटी रुपयांचा अतिरिक्त भार पडणार असून त्यासाठी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आलेली आहे. माननीय सदस्यांनी त्याबाबत चिंता बाळगण्याची आवश्यकता नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयातील दुरवस्था

मु. शी. : अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयातील दुरवस्था यासंबंधी श्री. प्रविण पोटे, डॉ.रणजित पाटील ,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.प्रवीण पोटे (अमरावती स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक आरोग्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"अमरावती जिल्हा सामान्य रूग्णालयाच्या दुरवस्थेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि.०४/०८/१२ रोजी मा.आरोग्य मंत्री यांना निवेदन देवून मागणी करणे, जिल्हा सामान्य रूग्णालयामध्ये जुलै २००० पासून सि.टी. स्कॅन मशीन बंद पडणे, एक्स-रे मशीन व इतर महत्वाची यंत्रसामुग्री बंद असणे, रुग्णांना योग्य त्या वॉर्डात हलविण्याकरिता आवश्यक असलेली लिफ्ट सुध्दा बंद असणे, अतिदक्षता विभागात आवश्यक असणारी कुठल्याही प्रकारची उपकरणे नसल्यामुळे योग्य तसा इलाज होत नसणे, अपुरे वैद्यकीय अधिकारी, शीतपेटी व वेळेवर लागणारी औषधे उपलब्ध नसणे, खाटांची संख्या कमी असल्यामुळे रुग्णांना जमिनीचा आश्रय घ्यावा लागत असणे, जिल्ह्यातील गरीब अपघातग्रस्त रुग्णांना ऐनवेळी खाजगी रुग्णालयामध्ये हलविण्यात येणे, जिल्हा शल्य चिकित्सक सामान्य रुग्णालय, अमरावती यांनी सन २००९-२०१० मध्ये विस्तारीत बेड व पद भरती संबंधी महाराष्ट्र शासन यांना प्रस्ताव तसेच स्मरणपत्रे सादर केलेली असणे, याबाबत, अद्यापपर्यंत कोणत्याही प्रकारची कार्यवाही न होणे, यामुळे सामान्य गोरगरीब जनतेचा रोष व तीव्र स्वरुपाच्या असंतोषाशी सामान्य रुग्णालयाला सामना करावा लागत असणे, याप्रकरणी शासनाने तातडीने उपाययोजना करुन कारवाई करण्याची नितांत आवश्यकता व याबाबत शासनाची भूमिका."

श्री.सुरेश शेट्टी (सार्वजनिक आरोग्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-7...

श्री.प्रवीण पोटे : सभापती महोदय, जिल्हा शल्य चिकित्सक, अमरावती यांनी वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविला आहे हे खरे आहे काय? या संदर्भातील निर्णय किती दिवसात घेण्यात येईल?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, वर्ग.2 च्या एकूण 38 मंजूर पदांपैकी 28 पदे भरण्यात आली असून 10 पदे रिक्त आहेत. नर्सिंग स्टाफची 142 पदे मंजूर असून त्यापैकी 140 पदे भरली आहेत व 2 पदे रिक्त आहेत. वर्ग.1 आणि वर्ग.2 ची वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया सुरु असून फेब्रुवारी, 2013 अखेर संपूर्ण राज्यात वर्ग.2 ची जेवढी रिक्त पदे आहेत ती उपलब्ध होणाऱ्या उमेदवारांमधून भरण्याचा प्रयत्न करीत आहोत.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या सभागृहात मी आणि माजी सदस्य श्री.राजन तेली वारंवार रायगड आणि सिंधुदुर्ग जिल्हा रुग्णालयातील सी.टी.स्कॅन मशीन बंद असल्याबाबत प्रश्न उपस्थित करीत होतो. आज राज्यात ज्या जिल्हा रुग्णालयामध्ये तंत्रज्ञ उपलब्ध आहेत तेथे मशीन उपलब्ध नाही आणि जेथे मशीन उपलब्ध आहे तेथे तंत्रज्ञांचे पद रिक्त आहे ही वस्तुस्थिती आहे. खाजगी व्यायसायिक पैसे देतात म्हणून काही ठिकाणी जाणुनबुजून सी.टी.स्कॅन व एक्स-रे मशीन बंद ठेवले जाते. जेणेकरुन खाजगी व्यावसायिकांचा फायदा होतो. रायगड जिल्हा रुग्णालयातील सी.टी.स्कॅन मशीन अनेकदा बंद पडले होते. जिल्हा रुग्णालयातील सी.टी.स्कॅन आणि एक्स-रे मशीन व्यवस्थितरित्या चालू राहतील यासाठी शासन धोरणात्मक निर्णय घेणार आहे काय?

नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, याच विषयाच्या लक्षवेधी सूचनेवर मागील हिवाळी अधिवेशनात चर्चा झाली होती व त्यामध्ये मी उत्तर दिले होते की, या विषयाच्या संदर्भात शासनाने धोरणात्मक निर्णय घेतलेला असून संपूर्ण राज्यातील जिल्हा रुग्णालय आणि महिला रुग्णालयामध्ये आऊट सोर्सींग करण्यात येईल. पहिल्या टप्प्यात वेस्टर्न महाराष्ट्र, कोकण, खानदेश व मराठवाडयाचा थोडया भागाचे टेंडर काढले आहे. टेंडर फक्त मशिन मॅन्यूफॅक्चरर्सच अप्लाय करतील असा निर्णय घेण्यात आलेला आहे. डिसेंबर महिन्याच्या 20 तारखेला मॅन्यूफॅक्चरर्स बरोबर ॲग्रीमेंट साईन करणार आहोत. गेल्या 60 वर्षापासून आपल्या कोणत्याही हॉस्पिटलमध्ये एमआरआय मशिन उपलब्ध करुन देण्यात आलेले नव्हते. मेडीकल फिल्डमध्ये आज जी काही लेटेस्ट एमआरआय, सीटी स्कॅन मशिन, मेमोग्राफी, सोनोग्राफी मशिन्स तसेच एक्सरे मशिन्स आहेत ती जी.ई मार्फत घेतले जाणार आहेत. ही सुविधा 24 तास सुरु राहणार आहे. या मशिनवर टोटल कंट्रोल मॅन्युफॅक्चरर्सचा राहणार आहे. आतापर्यंत ज्या रुग्णांना आपण मोफत सेवा देत होतो ती मोफत सेवा या पुढेही सुरु राहणार आहे. राजीव गांधी जीवनदायी योजनेमध्ये जे लाभार्थी आहेत त्या लाभार्थ्यांना या मशिनची फ्री सर्व्हीस दिली जाणार आहे. ज्या रुग्णांचे एक लाखापेक्षा जास्त इन्कम असेल अशा रुग्णांनांणा चार्जेस भरावे लागतील. येत्या 15-20 दिवसात विदर्भ व मराठवाडयाचा ज्या काही थोडया भागांना मशिन्स उपलब्ध झालेल्या नव्हत्या त्या ठिकाणीही टेंडर काढले जाणार आहेत. एका कंपनीला जास्तीत जास्त दोनच टेंडर मिळेल असा आपण निर्णय घेतलेला असल्यामुळे या वेळी जी.ई.ला टेंडर मिळणार नसून या डिव्हीजनमध्ये फिलीप्स आणि सिमेन्स या कंपनीपैकी एका कंपनीला टेंडर दिले जाणार आहे. तीन महिन्यात विदर्भ आणि मराठवाडयाच्या उरलेल्या भागातील जिल्हा हॉस्पिटल आणि महिला हॉस्पिटलमध्ये टोटल आऊट सोर्सिंगचा निर्णय घेतलेला आहे.

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, गेल्या अधिवेशनात सुध्दा मी रिक्त पदांची माहिती निदर्शनास आणून दिली होती. मी माहितीच्या अधिकाराखाली "अमरावती जिल्हा सामान्य रुग्णलयातील रिक्त पदांची माहिती माहितीच्या अधिकाराखाली मागवलेली आहे. या ठिकाणच्या 55 पदांपैकी 24 पदे रिक्त असून केवळ 17 पदे भरलेली आहेत. या हॉस्पिटलमध्ये सिटी स्कॅन मशिन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. रणजित पाटील....

कार्यान्वित झाल्यापासून या मशिनवर 6.75 कोटी रुपये खर्च झाले असून या मशिनवर केवळ 25 हजार सिटी स्कॅन काढण्यात आलेले आहेत. प्रत्येक सिटीस्कॅन मागील खर्च साधारण 2400 रुपये झालेला असून हा खर्च खाजगी मशिनपेक्षा दुपटीने जास्त झालेला आहे. जर खाजगीमध्ये काढण्यात आलेल्या सिटीस्कॅनला 1200-1500 रुपये लागत असतील आणि शासकीय दवाखान्यात जर 2400-2500 रुपये लागत असतील तर त्याचा काय उपयोग ? मशिनच्या किमती, त्यावरील व्याज व मशिनवरील रिपोर्टींगचा खर्च पाहिला तर आपला खर्च कोठल्या कोठे जातो. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी सांगितले आहे की, मशिन ऑपरेटर खोडसाळपणा करुन मशिन बंद पाडतात, त्याचे लागे बांधे बाहेरच्या सिटीस्कॅन मशिनवाल्यांशी असतात त्यामुळे त्या टेक्नीशियन्सवर रिस्पॉन्सिबीलीटी, अकौंटीबिलीटी फिक्स करण्यात येईल काय ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली माहिती खरी आहे. मागील अधिवेशनात सेम टू सेम लक्षवेधी सूचना याच सभागृहात आली होती व त्यावर आपण चर्चा केली होती. दि. 18.11.2011 पासून सिटीस्कॅन मशिन बंद असल्याची माहिती मी उत्तरमध्ये दिली होती. आता डॉ.पंजाबराव देशमुख हॉस्पिटलमध्ये सिटीस्कॅन केले जाते. जे रुग्ण सिटीस्कॅनसाठी येतात त्यांना आपण खाजगी डॉक्टरांकडे पाठवित नाही तर या रुग्णांना डॉ. पंजाबराव देशमुख हॉस्पिटलमध्ये पाठवतो व 1400 रुपये या दराने सिटीस्कॅन केले जाते व हे पैसे डॉ. पंजाबराव देशमुख हॉस्पिटलला शासनाकडून डायरेक्ट दिले जातात.

यानंतर श्री.ओटवणेकर .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी...

आता पर्यंत आपण 34 केसेस डॉ.पंजाबराव मेडिकल कॉलेजकडे संदर्भासाठी पाठविल्या आहेत व त्यांना आपण पैसे दिलेले आहेत. सन्माननीय सदस्यांचा दुसरा मुद्दा रिक्त पदांसंबंधीचा आहे. त्यासंबंधातील सर्व माहिती मी पटलावर ठेवतो. आरोग्य खात्याने वेळापत्रक निश्चित केले आहे. त्यानुसार 15 फेब्रुवारी पर्यंत सर्व पदे भरण्याचा प्रयत्न करणार आहोत. MPSC ने उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या असून त्यांचा निकाल लवकरच येणार आहे. पदोन्नती संबंधी देखील वाद होता. त्याबाबत दहा वर्षाचा रेकॉर्ड काढून डीपीसी पूर्ण झालेली आहे. 1125 वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत. ही पदे आपण MKCL मार्फत भरणार आहोत. या महिन्यातच या पदांसंबंधातील जाहिरात येणार आहे. गेल्या वेळी जी पद्धती अवलंबिली होती तीच येथे आपण स्वीकारणार आहोत. गेल्या वेळी लेखी परीक्षा, मुलाखत घेतली नव्हती. MBBS परीक्षेमध्ये जे गुण मिळाले आहेत त्या धर्तीवर गुणवत्ता यादी निश्चित करण्यात येणार आहे. रत्नागिरी, सिंधुदुर्ग, आदिवासी व नक्षलवादी जिल्ह्यात जे उमेदवार पहिले पोस्टींग घेण्यासाठी तयार आहेत त्यांना 20 गुण जादा देऊन त्यांना गुणवत्ता यादीमध्ये आणण्यात येणार आहे. मागच्या वेळी देखील आपण असाच निर्णय घेतला होता. तो निर्णय आता पण फॉलो करणार आहोत. जेवढी म्हणून पदे रिक्त आहेत ती मार्च पर्यंत भरण्याचा प्रयत्न करण्यात येईल एवढे मी या निमित्ताने सांगतो.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, अत्यंत दुर्दैवाची गोष्ट आहे की, गेले 13 महिने सिटीस्कॅन मशिन बंद असल्याचे लेखी उत्तरामध्ये नमूद करण्यात आले. ही अवस्था एकट्या अमरावती शहराची नाही. मुंबई सारख्या शहरामध्ये देखील आपली आरोग्य व्यवस्था अशाच प्रकारची आहे. आरोग्य सेवा अत्यंत आवश्यक आहे. अशा आरोग्य सेवेकडे आपण दुर्लक्ष करीत आहोत. मला एक गोष्ट मंत्रिमहोदयांच्या लक्षात आणून द्यायची आहे. परवा मी आरोग्य खात्याच्या अधिकाऱ्यांशी बोलत होते. तेव्हा त्यांनी अत्यंत धक्कादायक माहिती सांगितली आहे की, निधीच उपलब्ध करून दिला जात नाही. जीडीपीच्या 6 टक्के निधीची तरतूद आवश्यक सेवेवर करणे आवश्यक असताना शासनाकडे निधीची कमतरता असेल, आवश्यक असणारा स्टाफ नसेल, वैद्यकीय उपचारासाठी जी यंत्रसामुग्री लागते ती बंद अवस्थेत असेल तर राज्यातील जनतेला मरण्यासाठी मोकळे सोडून दिले आहे काय, असा प्रश्न निर्माण होतो. शासनाला राज्यातील जनतेची कुठलीच काळजी नाही काय ? दर अधिवेशनामध्ये आपण ठरावीक उत्तर देणार असाल तर त्याला काहीच अर्थ नाही. सिटी स्कॅनच्या मशिनची मुंबई व अमरावतीमध्ये एक सारखीच अवस्था आहे. आपल्याकडे निधी नसेल तर मग आपण नेमके काय करणार आहात ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी आपल्या मार्फत सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आरोग्य खात्याचे मुंबईमध्ये मालवणी येथे फक्त एकच रूग्णालय आहे. ते पण आपण दोन वर्षापूर्वी सुरू केले आहे. आरोग्य खात्याचे मुंबई शहरात एकही रूग्णालय नाही. शासकीय वैद्यकीय कॉलेज वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अंतर्गत येते. या विभागाचे मंत्री हे आपल्या पक्षाचे आहेत. त्यांना भेटून आपण या संबंधी चर्चा करावी. शासनाकडून बजेट उपलब्ध होत नाही असा आरोप देखील सन्माननीय सदस्यांनी केला आहे. मी आपणास सांगू इच्छितो की, 4 दिवसापूर्वी केंद्रीय मंत्री श्री.गुलाबनबी आझाद यांनी बजेटमध्ये वाढीव तरतूद केल्याबद्दल आपले पत्राद्वारे अभिनंदन केले आहे. या वर्षी वित्त विभागाने आपल्याला एकूण 4329 कोटी रूपये दिले. NRMH अंतर्गत केंद्र सरकारने 1918 कोटी रूपये दिले आहेत. पहिल्यांदाच एवढी वाढ स्टेट व सेंट्रल बजेटमधून आपल्याला मिळालेली आहे म्हणून आज 700 ठिकाणी नवीन कन्स्ट्रक्शनचे व अपग्रेडेशनचे काम सुरू आहे.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देताना सांगितले की, "आपल्या पक्षाचे मंत्री आहेत." माननीय मंत्री महोदय या ठिकाणी सरकार म्हणून उत्तर देत आहेत. ते एखाद्या पक्षाचे मंत्री म्हणून उत्तर देत नाहीत. तेव्हा वरील उल्लेख रेकॉर्डवर राहू नये असे मला वाटते.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्रीमती शोभा फडणवीस)

पृ. शी. : नागपूरसह राज्यातील 20 जिल्ह्यात सिकलसेलचा मोठ्या प्रमाणावर झालेला प्रादुर्भाव

मु. शी.: नागपूरसह राज्यातील 20 जिल्ह्यात सिकलसेलचा मोठ्या प्रमाणावर झालेला प्रादुर्भाव या संबंधी सर्वश्री जयवंतराव जाधव, हेमंत टकले, रमेश शेंडगे, अनिल भोसले,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.जयवंतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"नागपूरसह राज्यातील 20 जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात सिकलसेलचा प्रादुर्भाव झाल्याचे आढळून येणे, तसेच या आजारावर कायम औषध नसल्यामुळे सिकलसेल रुग्णांचे होणारे हाल, हा आजार समूळ नष्ट करण्यासाठी असलेला अस्थिमज्जा प्रत्यारोपण हा उपाय महागडा असणे, परिणामी सर्वसामान्य रुग्णांची सिकलसेल सारख्या आजारातून मरेपर्यंत सुटका न होणे, शासनामार्फत फक्त सिकलसेल या आजाराचे निदान करण्याची सुविधा उपलब्ध असणे, मात्र या आजाराच्या उपचारासाठी सर्वसामान्य रुग्णांना परवडतील अशा मुबलक औषधोपचाराच्या सोयीसुविधा शासनामार्फत निर्माण करण्याची आवश्यकता, यावर शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

प्रा.फौजिया खान (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्य मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवते.

तालिका सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, सिकलसेल ॲनामिया हा एक भयंकर अनुवांशिक आजार आहे. या आजाराचा प्रादुर्भाव विदर्भात मोठ्या प्रमाणावर झालेला आहे. या आजारावर अस्थिमज्जा प्रत्यारोपण हा महागडा उपचार आहे. परंतु तो सर्वसामान्यांना परवडणारा नाही. तेव्हा या आजारावर उपाय योजना करण्यासाठी शासन काही जेनेटीक ट्रीटमेंट शोधणार आहे काय ? या आजारा बाबत अनेक गैरसमजुती आहेत. तेव्हा सोल्युबिल्टी टेस्ट करण्याबाबत शासन युवक आणि युवतींमध्ये अवेअरनेस आणणार काय ? शासन 20 जिल्ह्यांमध्ये सिकलसेलच्या आजाराबाबत उपाय योजना करीत आहे परंतु राज्यातील उर्वरित जिल्ह्यांमध्ये शासनाचे उदासीनतेचे धोरण दिसत आहे. तेव्हा त्या ठिकाणी सुध्दा काही उपाय योजना करणार आहे काय ? विदर्भामध्ये या आजारांचा मोठ्या प्रमाणावर प्रादुर्भाव आहे. तेव्हा शासकीय रुग्णालयांमध्ये डे-केअर सेंटर आहेत त्याप्रमाणे मेडिकल कॉलेजेसमध्ये सुध्दा डे-केअर सेंटर सुरु करणे आवश्यक आहे. परंतु नागपूरच्या मेडिकल कॉलेजेसमध्ये डे-केअर सेंटर सुरु झालेले नाही. तेव्हा नागपूर मेडिकल कॉलेजमध्ये डे-केअर सेंटर उभे करणार आहे काय ? तसेच नागपूर येथे मॉल्युक्युलर जेनेटीक लॅबोरेटरी सुरु करणार काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सिकलसेल हा अनुवंशिक आजार आहे. यामध्ये चार गोष्टी खूप महत्वाच्या आहेत. पहिला या रोगाचा शोध घेणे, दुसरा चाचणी करणे, तिसरा समुपदेशन करणे आणि डिसीजचे मॅनेजेमेंट करणे. या कार्यक्रमांतर्गत राज्यातील 20 जिल्ह्यांचा टप्प्याटप्प्याने समावेश करण्यात आलेला आहे. कारण त्या ठिकाणी सिकलसेलचा आजार मोठ्या प्रमाणावर आढळून येत आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये सोल्युबिलिटीची चाचणी करण्यात येते. जिल्हा पातळीवर डे-केअर सेंटर्स आहेत. ज्यावेळी मॅनेजमेंटचा प्रश्न येतो त्यावेळी मेडिकल कॉलेजमध्ये डे-केअर सेंटर उघडण्यात येते. महाराष्ट्र राज्य सिकलसेलच्या आजाराबाबत चांगल्या प्रकारे काम करीत आहे असे केंद्र सरकारने म्हटलेले आहे. या आजारावर मात करण्यामध्ये महाराष्ट्र राज्य हे देशामध्ये पहिल्या क्रमांकावर आहे. सन 2007 पासून जवळपास 5 लाख 9 हजार 617 रुग्णांची चाचणी करण्यात आली. त्यापैकी 8 हजार 955 रुग्णांमध्ये हा आजार आढळून आला तर 87 हजार 710 रुग्ण कॅरिअर झालेले आहेत. रुग्णांना चांगल्या प्रकारे समुपदेशन करण्यात आले आहे. हा आजार असलेल्या रुग्णांची लग्ने टाळण्यात आलेली आहेत. या आजाराच्या निर्मूलनासाठी निधीची तरतूद करण्यात आलेली आहे.

यानंतर श्री.सरफरे..

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखाची नाही

प्रा. फौजिया खान...

250 कोटींची तरतूद करण्यात आली आहे. सन्माननीय सदस्यांनी मेडिकल कॉलेजमध्ये डे केअर सेंटर सुरु करण्यासंबंधी प्रश्न विचारला आहे. त्या करिता सहा मेडिकल कॉलेजला विनंती करण्यात आली असून पुढील वर्षीपासून नागपूरमध्येही सुरु करण्यात येणार आहेत.

श्री. दिवाकर रावते सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी उत्तर देतांना सांगितले की, केंद्र शासनाने आम्हाला देशामध्ये नंबर एक ठरविले आहे. मला आपल्याला विचारावयाचे आहे की, आपली उपाय योजना महागडी आहे त्यामध्ये आपण नंबर एक वर आहात काय, हे उपचार सर्वसामान्यांना परवडत नाही यामध्ये आपण नंबर एक वर आहात काय, सिकलसेल आजाराचे निदान करण्याकरिता उपलब्ध असलेल्या औषधामध्ये लोकांना सवलत मिळत नाही यामध्ये आपण नंबर एक वर आहात काय, मुबलक औषधांच्या सोयी-सुविधा शासनामार्फत लोकांकरिता निर्माण करण्यामध्ये हे शासन अयशस्वी ठरले त्यामध्ये आपण नंबर एक वर आहात काय?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, या राज्यामध्ये ब्लड ट्रान्सफ्युजन करणे आणि अतिरिक्त उपचार मोफत करण्यात येतात. जॉईंट रिप्लेसमेंटसारख्या महत्वाच्या उपचारासाठी राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेमध्ये आणि संजय गांधी निराधार योजनेमध्ये त्याबाबत तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे यामध्ये बाधित झालेल्या लोकांचे आजार आनुवंशिकता असल्यामुळे त्यावर ट्रीटमेंट होत नाही तर हे आजार रोखण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहेत. त्यामध्ये उच्च श्रेणीतील उपचार सर्वसामान्य लोकांना कसे परवडतील याकरिता देखील शासनाने काळजी घेतली आहे.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सिकलसेल आजारावर करावयाच्या शासकीय उपाय योजनासंबंधी माहिती दिली. त्याचबरोबर या क्षेत्रामध्ये अतिशय चांगले काम आपल्या खात्याकडून केले जात असल्याचे त्यांनी सांगितले. या कामासाठी 9 जिल्ह्यांमध्ये स्वयंसेवी संस्थांची नेमणूक करण्यात आली आहे व 11 जिल्ह्यांमध्ये शासकीय पातळीवर हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. माझा प्रश्न असा आहे की, 9 जिल्ह्यातील स्वयंसेवी संस्थांचा या संदर्भातील एकूण कामकाजाचा अहवाल आणि 11 जिल्ह्यांमध्ये शासनामार्फत राबविला जात असलेला कार्यक्रम यामधील तुलनात्मक पडताळणी आपण केली आहे काय, यामध्ये स्वयंसेवी संस्था अधिक चांगल्या प्रकारे काम करीत असल्याचे आढळून आले आहे काय, उर्वरित 11 जिल्ह्यांमध्ये अशाप्रकारचे काम करण्यासाठी स्वयंसेवी संस्था पुढे आल्या नाहीत काय, या ठिकाणी स्वयंसेवी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले...

संस्थांसाठी 9 जिल्ह्यांची निवड कशी केली व त्यामधून 11 जिल्ह्यांना कां वगळण्यात आले, स्वयंसेवी संस्था आणि शासन यांनी एकत्रितपणे या विषयाकडे अधिक चांगले लक्ष देता येईल, रुग्णांना अधिक चांगली सेवा देता येईल यासाठी शासन पावले उचलणार आहे काय?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, ठाणे, नाशिक, नंदूरबार, गोंदिया, गडचिरोली, नागपूर, वर्धा, चंद्रपूर आणि भंडारा या जिल्ह्यांमध्ये स्वयंसेवी संस्थांची मदत घेऊन त्यांच्यामार्फत काम करण्यात येते. यामध्ये स्वयंसेवी संस्थांची भूमिका ही फक्त अवेअरनेस आणि योजना समजावून सांगणे या पध्दतीची असते. त्याप्रमाणे त्यांच्याकडून काम सुरु आहे.

पृ.शी./मु.शी.: लक्षवेधी सूचना क्रमांक 9 संबंधी

तालिका सभापती (श्रीमती शोभा फडणवीस) : लक्षवेधी सूचना क्रमांक 9 ही माननीय मुख्यमंत्री सभागृहामध्ये उपस्थित झाल्यानंतर घेण्यात येईल.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : बुलढाणा जिल्ह्यात उद्‌भवणाऱ्या पाणी टंचाईला तोंड देण्यासाठी करावयाची उपाय योजना

मु. शी. : बुलढाणा जिल्ह्यात उद्‌भवणाऱ्या पाणी टंचाईला तोंड देण्यासाठी करावयाची उपाय योजना यासंबंधी श्री. पांडुरंग फुंडकर, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. पांडुरंग फुंडकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" यंदाच्या संपूर्ण पावसाळी मोसमात कमी व अनियमित पावसामुळे भूजल पातळीत कमालीची घट झाली असून बुलढाणा जिल्ह्यातील १३ तालुक्यांमध्ये सरासरी १ ते ३ मिटरपर्यंत पाण्याची पातळी घसरलेली असणे, बुलढाणा जिल्ह्यातील ७५० गावांमध्ये आतापासून पाणी टंचाईला सुरुवात होणे, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणेच्या अहवालानुसार जिल्ह्यातील १३ तालुक्यातील विहिरींमध्ये भूजलाच्या पातळीत वाढ झालेली नसल्याचे सिध्द होणे, बुलढाणा जिल्ह्यातील बहुतांश तालुक्यात पावसाने सरासरी गाठलेली नसणे, जिल्ह्यातील बहुतांश पाणी पुरवठा योजना प्रकल्पांवर आधारीत असल्याने आगामी काळात या योजनांवर अवलंबून असलेल्या हजारो नागरीकांवर पिण्याच्या पाण्याची ओढावणारी बिकट परिस्थिती, भूजल विभागाने प्रशासनाला दिलेल्या अहवालान्वये एकूण ७४६ गावांमध्ये उद्‌भवणाऱ्या पाणी टंचाई निवारण्यासाठी उपाययोजना करण्याचे नमूद करुनही अद्यापपर्यंत प्रशासनाकडून कोणतीही उपाययोजना न होणे, आगामी काळात बुलढाणा जिल्ह्यात उद्‌भवणाऱ्या पाणी टंचाईला तोंड देण्याचे दृष्टीने शासनाने तातडीने उपाययोजना सुरु करण्याची आवश्यकता व याबाबतची शासनाची भूमिका. "

प्रा. लक्ष्मणराव ढोबळे (पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या वर्षी बुलढाणा जिल्ह्यामध्ये पावसाळी मोसमात कमी व अनियमित पावसामुळे भूजल पातळीत कमालीची घट झाली आहे. बुलढाणा जिल्ह्यातील 13 तालुक्यांपैकी बुलढाणा, चिखली, देऊळगाव राजा, लोणार, सिंदखेड राजा, मलकापूर, मोताळा, शेगांव, मेहकर व नांदुरा या तालुक्यांमध्ये सरासरीपेक्षा कमी पर्जन्यमान झाले तर संग्रामपूर, खामगाव व जळगाव जामोद या तालुक्यांमध्ये सरासरीपेक्षा अधिक पर्जन्यमान झाले आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जिल्ह्यातील 57 पाणलोट क्षेत्रातील 167 निरीक्षण विहिरीपैकी 145 निरीक्षण विहिरींमधील भू-जल पातळीमध्ये घट झाली. भूजल पुनर्भरण अपुऱ्या प्रमाणात आहे. बुलढाणा जिल्ह्यातील 13 तालुक्यां-मध्ये ऑक्टोबर ते डिसेंबर 2012 या तीन महिन्यामध्ये 103 गावे, जानेवारी ते मार्च 2013 या कालावधीत 223 गावे आणि एप्रिल 2013 ते जून 2013 या कालावधीमध्ये 406 गावे अशा प्रकारे एकूण 732 गावांमध्ये पाणी टंचाईची परिस्थिती निर्माण होण्याबाबतचा अहवाल भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेने सादर केला आहे.

सभापती महोदय, याठिकाणी ज्या तीन तालुक्यांचा उल्लेख केला आहे त्यामध्ये खामगाव, जळगाव, जामोद व संग्रामपूर याठिकाणी सरासरीपेक्षा जास्त पर्जन्यमान नोंदविण्यात आले. परंतु पर्जन्यमापक यंत्र तालुक्याच्या ठिकाणी आहे. ग्रामीण भागातील एकेका तालुक्यात 150-150 गावे आहेत. एका तालुक्याच्या ठिकाणी पर्जन्यमान मोजले म्हणजे त्याठिकाणी अधिक पाऊस झाला असे यातून निदर्शनास येत नाही. त्यामुळे गावांच्या संख्येमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. माननीय मंत्री महोदयांनी याठिकाणी जे उत्तर दिले आहे, त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, जून 2012 ते ऑक्टोबर 2012 आणि जून 2013 या कालावधीत टंचाईपूर्ती आराखडा जिल्हा स्तरावर तयार करण्यात आला आणि 1055 गावांमध्ये 1880 उपाययोजना प्रस्थापित केल्या.

सभापती महोदय, दिवाळी संपल्यानंतरच बुलढाणा जिल्ह्यामध्ये आज 700 ते 750 गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाईची स्थिती असून याठिकाणी 13 ते 14 टँकर सुरु आहेत असे दाखविण्यात आले आहे. तसेच अनेक गावामध्ये एम.एस.ई.बी.ची कनेक्शन कापल्यामुळे नळ योजना बंद आहेत. मी याठिकाणी माननीय कृषी मंत्री महोदयांना माहिती देऊ इच्छितो की, ग्राम पंचायती विजेचे बिल भरत नाहीत, त्याचे पैसे थकीत झाले असल्याने पाण्याचे कनेक्शन कापण्यात आले. ज्या नळ योजनेच्या विहिरी आहेत त्या आटलेल्या आहेत. त्यामुळे तेथील गावांना पाणी पुरवठा होत नाही अशा पध्दतीचे मायक्रो सर्वेक्षण आजपर्यंत आपल्या विभागाने केलेले नाही हे खरे आहे काय आणि तसेच याबाबत प्रस्तावित आराखडा तयार केलेला आहे. पण आता डिसेंबर महिना सुरु आहे आणि या महिन्यामध्ये देखील 700 ते 750 गावांमध्ये पाणी नाही. मग जानेवारी, फेब्रुवारी, मार्च मध्ये काय परिस्थिती असेल हा मुद्दा आहे. विदर्भातील बुलढाणा जिल्हा हा विदर्भ आणि मराठवाड्याच्या बॉर्डरवरील आहे. याठिकाणी उष्णतामान अधिक असते म्हणून याठिकाणी केवळ

. . . .एन-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर . . ..

आराखडा प्रस्तावित करुन चालणार नाही तर हा आराखडा ताबडतोब कार्यान्वित करण्यासाठी एकंदर किती खर्च येणार आहे आणि त्यासाठी शासन कोणते पाऊल उचलणार आहे?

प्रा.लक्ष्मणराव ढोबळे : सभापती महोदय, हा आराखडा पूर्णपणे कार्यान्वित करण्यासाठी 22 कोटी रुपये इतका खर्च येणार आहे. त्याचबरोबर पहिल्या टप्प्यामध्ये 110 गावे, दुसऱ्या टप्प्या मध्ये 228 गावे आणि तिसऱ्या टप्प्यामध्ये 408 गावे अशी एकूण 476 गावे यानिमित्ताने कव्हर करण्यात आली आहेत आणि आराखडा तयार करण्यात आला आहे. त्याचबरोबर राष्ट्रीय पेयजल या नावाखाली 336 गावांना या आराखड्यामध्ये समाविष्ट करण्यात आले आहे. या कामाचे नियोजन हे पूर्णपणे केले असून पहिल्या तीन महिन्यामध्ये कशा पध्दतीने आणि कोणत्या गावांवर अधिक लक्ष द्यावे लागेल याचाही आराखडा तयार केला आहे. त्याचबरोबर 4 प्रादेशिक पाणी पुरवठा योजना आहेत त्या योजनांसाठी देखील निश्चितपणे एक आराखडा तयार करुन त्यासाठी देखील निधीची व्यवस्था करुन या चारही कामांना गती देण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, या सर्व परिस्थितीमध्ये सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली वस्तुस्थिती ही अतिशय विदारक आहे. त्याठिकाणी जर आपण पाणी पुरवठ्यासाठी तातडीने काही उपाययोजना करु शकलो नाही तर या गावांमध्ये अडचण निर्माण होण्याची शक्यता आहे. जे सर्व स्त्रोत आहेत हे भूजल स्त्रोत असल्यामुळे, त्या स्त्रोताच्या आधारावर उभ्या असलेल्या ज्या पाणी पुरवठा योजना आहेत तेथे तीन मीटरने पाण्याची पातळीच खाली गेल्यामुळे या भागामध्ये मोठी अडचण निर्माण झालेली आहे. त्यामुळे तातडीने या सर्व भागामध्ये लक्ष देण्यात आलेले आहेच आणि त्याचबरोबर नागरी पाणी पुरवठा योजना म्हणून सिंदखेडराजा आणि देऊळगावराजा या दोन्ही ठिकाणच्या योजनांना देखील तातडीने मान्यता देऊन आणि तेथील पाईप लाईन बदलून तातडीने या तीन महिन्याच्या आत सिंदखेडराजा येथे नव्या पाईप लाईनने पाणी पुरवठा करण्याबद्दल कशी तरतूद करता येईल याबद्दलचेही नियोजन करण्यात आले आहे.

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

यानंतर श्री.बरवड . . ..

प्रा. लक्ष्मण ढोबळे ....

या सर्व योजना करीत असताना तातडीने काही ठिकाणी कनेक्शन तोडल्याबद्दलच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. याबद्दल सन्माननीय ऊर्जा मंत्री यांनी कोणत्याही प्रकारे चालू बिल भरण्याबद्दलची 15 दिवसांची नोटीस दिल्या शिवाय कनेक्शन तोडू नये अशा प्रकारच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिलेल्या आहेत. त्यामुळे आता कनेक्शन तोडले जाणार नाही अशी अपेक्षा आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी स्पेसिफिक दोन प्रश्न विचारले होते. आपण पर्जन्यमापक यंत्र साधारणत: तालुक्याच्या ठिकाणी ठेवतो. परंतु आता पावसाचे सरासरी प्रमाण पाहता एका गावात पाऊस पडतो तर दुसऱ्या गावात पाऊस पडत नाही. तालुक्याच्या ठिकाणी बसविलेल्या पर्जन्यमापक यंत्रावरुन त्या तालुक्याचे पर्जन्यमान ठरविण्यात येत असेल तर ते चुकीचे आहे. त्याचे निकष बदलण्याची गरज आहे. एका गावात सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडतो तर दुसऱ्या गावात सरासरीपेक्षा कमी पाऊस पडतो त्यामुळे तालुक्याच्या ठिकाणी बसविलेल्या पर्जन्यमापक यंत्राचा आधार घेऊन जर त्या तालुक्याचे पर्जन्यमान ठरविले जात असेल तर तो निकष बदलणे गरजेचे आहे. तो निकष शासन बदलणार का ? जिल्हा परिषदेचा किंवा पंचायत समितीचा एक गट समोर ठेऊन त्या ठिकाणी पर्जन्यमापक यंत्र बसवून मग त्या भागाचे पर्जन्यमान ठरविण्यासंबंधीचा निकष अंमलात आणणार का ?

दुसरी बाब अशी की, यावेळी दुष्काळसदृश्य परिस्थिती लक्षात घेता ज्या ग्रामपंचायतीच्या योजना आहेत किंवा ज्या 17-18 गावांच्या योजना आहेत, आमच्या खामगाव तालुक्यामध्ये लाखानवाडा ही 22 ते 25 गावांची योजना आहे, त्या योजनेचे बिल जिल्हा परिषदेने एमएसईबीकडे भरले नाही म्हणून त्या 22 गावांचा पाणीपुरवठा आज बंद आहे. अशा ज्या योजना आहेत त्याचे एमएसईबीचे बिल भरण्यात आले नाही म्हणून त्या गावांचा पाणीपुरवठा बंद केला जाणार असेल तर त्या बिलाची व्यवस्था राज्य शासनाने करुन त्यांचा पाणीपुरवठा सुरु ठेवला जाईल का ?

प्रा. लक्ष्मण ढोबळे : सभापती महोदय, पर्जन्यमानाच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला त्यामध्ये तालुक्याच्या प्रमुख ठिकाणी पर्जन्यमान मोजले जाते त्यामुळे गावाच्या पातळीवर पडलेल्या पावसाचा अंदाज व्यक्त होत नाही याबद्दल सन्माननीय सदस्यांनी सांगितले. पंचायत समितीच्या केंद्रावर देखील अशा प्रकारचे पर्जन्यमापक यंत्रे उभी करण्याबद्दलचा निर्णय या

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. लक्ष्मण ढोबळे ....

आधीच मंत्रिमंडळाने घेतलेला आहे. त्याची अंमलबजावणी महसूल विभागामार्फत सुरु आहे. त्याचबरोबर या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी चार योजना सांगितल्या त्या प्रादेशिक योजनांच्या संदर्भात देखील काम सुरु आहे असे मी सांगितले. पण त्याचबरोबर ज्या ठिकाणी कनेक्शन तोडलेले आहेत त्या ठिकाणचे कनेक्शन सुरु करण्याबद्दल चालू बिल भरण्यापुरती मर्यादा घालून त्या ठिकाणची पाणीपुरवठा योजना सुरु करण्याबद्दल निश्चितपणे आदेश देण्यात येतील.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ D/

लक्षवेधी सूचना क्रमांक 11 बाबत

उप सभापती : आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेतील अनुक्रमांक 11 वरील जी लक्षवेधी सूचना आहे त्या संदर्भात माननीय मंत्री महोदयांचे पत्र आलेले आहे की, त्यांच्या विभागा संदर्भात विधानसभेत कामकाज चालू असल्यामुळे सदरहू लक्षवेधी सूचना सोळाव्या किंवा सतराव्या क्रमांकावर घ्यावी. त्यामुळे आता लक्षवेधी सूचना क्रमांक 12 चर्चेला घेण्यात येईल.

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : महिला व बालविकास विभागाच्या मान्यतेने चालविल्या जाणाऱ्या बालगृहांना अनुदान व सोयीसुविधा न मिळणे

मु. शी. : महिला व बालविकास विभागाच्या मान्यतेने चालविल्या जाणाऱ्या बालगृहांना अनुदान व सोयीसुविधा न मिळणे यासंबंधी सर्वश्री हेमंत टकले, विक्रम काळे, रमेश शेंडगे, किरण पावसकर, चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, भगवान साळुंखे, अनिल भोसले, जयवंतराव जाधव, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय महिला व बालविकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्य शासनाच्या महिला व बालविकास विभागाच्या मान्यतेने चालविली जाणारी राज्यात सुमारे 1 हजारांहून अधिक बालगृहे असणे, या बालगृहात निराश्रित मुलांची संख्या 90 हजाराच्यावर असून त्यासाठी शासनामार्फत या बालगृहांना कोट्यावधी रुपयाचे अनुदान देण्यात येणे, तथापि ते वेळेवर न मिळणे, बालगृहात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना तुटपुंजे वेतन मिळत असून त्यांना कोणत्याही प्रकारच्या सोयीसुविधा मिळत नसणे, परिणामी तेथील निराश्रित बालकांना अर्धपोटी उपाशी रहावे लागणे, कोट्यावधी रुपयांचे अनुदान शासनाकडे प्रलंबित असल्याची धक्कादायक बाब दिनांक 12 नोव्हेंबर, 2012 रोजी उघडकीस येणे, बालगृहांचे अनुदान वेळेवर देण्याबाबत, शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया. "

प्रा. फौजिया खान (महिला व बालविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवते.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, राज्यातील या बालगृहातील निराश्रित मुलांच्या संदर्भात ही लक्षवेधी सूचना आहे. एकूण जी मंजूर संख्या आहे त्याप्रमाणे 92 हजार म्हणजे जवळजवळ 1 लाख मुले या बालगृहांमध्ये आहेत. माननीय मंत्री महोदयांनी हे सर्व विवरण निवेदनामध्ये दिलेले आहे. पण त्यामध्ये कोठे तरी विरोधाभास निर्माण होतो की काय अशी शंका या निवेदनातून येते. निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, स्वयंसेवी निरीक्षणगृह या योजनेअंतर्गत कर्मचाऱ्यांच्या वेतनावर 100 टक्के अनुदान देण्यात येते. अशा संस्थांना रु. 635/- दरमहा दरडोई अनुदान मुलांच्या परिरक्षणासाठी देण्यात येते. पुढे असे म्हटले आहे की, तथापि स्वयंसेवी बालगृह योजनेमध्ये कर्मचारी वेतनावर स्वतंत्र अनुदान देण्यात येत नाही. एका ठिकाणी असे म्हटले आहे की, 100 टक्के अनुदान देण्यात येते आणि पुढे असे म्हटले आहे की, स्वतंत्र अनुदान देता येत नाही किंवा देत नाही. हा एका दुर्लक्षित घटकाचा प्रश्न आहे. आमच्याकडे वेळोवेळी जी माहिती येते त्यामध्ये अनेक स्वयंसेवी संस्था अशा बालगृहांना मदत करण्याच्या हेतूने भेटी देत असतात. त्या ठिकाणी इतकी विदारक अवस्था असते की, त्या ठिकाणी कोणत्याही सोयी धड नसतात. शासन जे अनुदान देते ते पुरेसे आहे का, त्या अनुदानातून त्यांचा कारभार व्यवस्थित चालत आहे का, ते अनुदान कमी पडत असेल तर ते वाढवून देण्यासाठी शासन काही प्रयत्न करणार आहे का ? यामध्ये संस्थेच्या बाबतीत जी आकडेवारी दिलेली आहे त्यामध्ये शासकीय संस्था 46 आहेत आणि स्वयंसेवी संस्था 1073 आहेत. म्हणजे यातील मोठा भाग स्वयंसेवी संस्थामार्फतच चालविला जातो.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले...

आणि या स्वयंसेवी संस्थांच्या कारभाराचे वाभाडे या सभागृहामध्ये अनेक वेळा काढण्यात आलेले आहेत. या स्वयंसेवी संस्थांच्या कारभारावर शासनाचे कसे नियंत्रण नाही या गोष्टीची चर्चा या सभागृहामध्ये झालेली आहे. या संस्थांना जे अनुदान राज्य शासन देत आहे ते पुरेसे नाही. या अनुदानाचा योग्य वापर केला जात आहे काय ? कर्मचा-यांच्या वेतनाचे जे अनुदान देय आहे ते अपुरे आहे. त्यामध्ये शासन किती टक्के वाढ करणार आहे ?

प्रा. फौजिया खान : एका संस्थेला 950 रु. दिले जातात. त्यामध्ये 650 रुपये हे वेतन, इमारत भाडे आणि प्रशासकीय खर्चासाठी आहेत, 315 रु. ॲडमिनिस्ट्रेशन एक्स्पेन्सेससाठी आहेत. या मानधनामध्ये वाढ होण्याची आवश्यकता आहे. अनुदानामध्ये वाढ करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने पारित केलेला आहे. 635 रुपयावरुन 900 रुपयापर्यन्त अनुदान वाढविण्यात येणार आहे. मतिमंद मुलांच्या संस्थासाठी 825 रुपयावरुन 990 रुपयापर्यन्त वाढ करण्याचा निर्णय घेतलेला आहे. या बाबतीत कार्यवाही सुरु असून चार-पाच दिवसात ती पूर्ण करण्यात येईल.

श्रीमती शोभा फडणवीस : नियमाप्रमाणे एका कुटुंबातील एका व्यक्तीला आणि एका ट्रस्टला एका पेक्षा जास्त बालगृहे चालविण्याची परवानगी देता येत नाही. परंतु बीड जिल्ह्यामध्ये 109 बालगृहामधील 27 बालगृहे ही नांदेड, उस्मानाबाद आणि हिंगोली या जिल्ह्यातील एकाच संस्थेला दिलेली आहेत. बीड आणि परभणीमध्ये जी बालगृहे चालविण्यात येतात त्यामधील 90 टक्के बालगृहांमध्ये मुलांमुलीसाठी एकच इमारत आणि एकच गेट आहे हे खरे आहे काय ?

प्रा. फौजिया खान : सन्माननीय सदस्यांनी ज्या प्रश्नाकडे लक्ष वेधले तो प्रश्न शासनाच्या देखील लक्षात आलेला आहे. त्या बाबतीत आयुक्तस्तरावर पाहणी करुन 186 संस्थांची मान्यता रद्द करण्यात आलेली आहे. या संस्थांची दोन वेळा तपासणी करण्यात आली. एकदा 500 संस्थांची आणि दुस-या वेळी 95 संस्थांची तपासणी करण्यात आली आणि त्या तपासणीमधून 186 संस्थांचे परवाने रद्द करण्यात आलेले आहेत. तेव्हा त्याबाबतीत जी काही कारवाई करायची आहे ती शासनाने केलेली आहे. इतकेच नाही तर या संस्थांवर आणि दोषी अधिका-यांवर एफआयआर दाखल करण्यात येत आहे.

--

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : अकोला विमानतळाच्या धावपट्टीचे करावयाचे विस्तारीकरण

मु. शी. : अकोला विमानतळाच्या धावपट्टीचे करावयाचे विस्तारीकरण यासंबंधी श्री. गोपीकिसन बाजोरिया, ॲड. अनिल परब आणि श्री. किसनचंद तनवाणी, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.गोपीकिसन बाजोरिया (अकोला तथा वाशिम तथा बुलढाणा स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"विदर्भात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती व्हावी यादृष्टीने अकोला येथे विमानतळाच्या धावपट्टीचा विस्तार होण्याची आवश्यकता असणे, अकोला विमानतळाच्या विस्तारीकरणाचा प्रस्ताव शासनाकडे अनेक दिवसांपासून प्रलंबित असणे, हा प्रश्न निकाली निघावा यासाठी अनेकदा विधीमंडळ अधिवेशनात प्रश्न उपस्थित होणे, प्रत्येक अधिवेशनात माननीय मंत्री महोदयांमार्फत समाधानकारक उत्तरे देण्यात न येणे, विस्तारीकरणासाठी डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाची भूमिका स्पष्ट नसणे, यामुळे होणारा विलंब परिणामी स्थानिक व प्रादेशिक उद्योजक, व्यापारी वर्ग, प्रगतीशील शेतकरी, कुशाग्र विद्यार्थी यांची कुचंबणा होणे व यामुळे अकोला येथे नवीन मोठे उद्योग येण्यास इच्छुक नसणे, यामुळे जनतेमध्ये निर्माण झालेला असंतोष व संताप, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, त्याबाबतची शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

प्रा. फौजिया खान (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवते.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गोपीकिसन बाजोरिया : हा अकोला विमानतळाचा प्रश्न राज्याच्याच नाही तर संपूर्ण देशाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा असून या सभागृहामध्ये एकूण 5 वेळा हा प्रश्न विविध आयुधांच्या माध्यमातून उपस्थित करण्यात आलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर हे विरोधी पक्षनेते असताना त्यांनी हा प्रश्न या सभागृहामध्ये उपस्थित केलेला होता. सन्माननीय सदस्य डॉ.रणजित पाटील यांनी देखील हा प्रश्न या सभागृहामध्ये उपस्थित केलेला होता. आता माझ्या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात दिलेले उत्तर हे असत्य आणि निराधार आहे. या विषयासंबंधी सन्माननीय सदस्य डॉ. रणजित पाटील यांनी विचारलेल्या तारांकित प्रश्नाला वेगळे उत्तर दिलेले आहे आणि लक्षवेधी सूचनेला वेगळे उत्तर दिलेले आहे.

...नंतर श्री. गिते....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गोपीकिसन बाजोरिया.....

सभापती महोदय, या सभागृहामध्ये अनेक वेळा या लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने माननीय उद्योग मंत्री श्री.नारायण राणे, माननीय कृषि मंत्री बाळासाहेब विखे-पाटील, माननीय महसूल मंत्री श्री. बाळासाहेब थोरात आणि सामान्य प्रशासन राज्यमंत्री प्रा.फौजिया खान यांनी उत्तर दिले आहे की, अकोला शहरातील विमानतळाच्या धावपट्टीच्या विस्तारीकरणासाठी तात्काळ बैठक घेऊन माननीय मुख्यमंत्र्यांच्या दालनात बैठक घेऊ. कृषि मंत्री,महसूल मंत्री आणि सामान्य प्रशासन मंत्री यांची संयुक्त बैठक जोपर्यंत होत नाही, तोपर्यंत हा प्रश्न निकाली निधू शकत नाही. या सभागृहात ही लक्षवेधी सूचना सात वेळा उपस्थित करण्यात आलेली आहे.

उप सभापती :माननीय कृषि मंत्री, माननीय उद्योग मंत्री, माननीय महसूल मंत्री आणि माननीय सामान्य प्रशासन मंत्री यांनी या विषयाच्या संदर्भात संयुक्त बैठक घ्यावी.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने मी पूर्णपणे उत्तरे देण्यास तयार आहे.

श्री. गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, मला एक दोन महत्वाचे प्रश्न विचारावयाचे आहेत, त्यासाठी कृपया आपण परवानगी द्यावी.

उप सभापती : ठीक आहे.

श्री.गोपीकिसन बाजोरिया : अकोला शहरातील विमानतळाची धावपट्टी ही नॉर्थ-साऊथ आहे. ती धावपट्टी 1.32 कि.मी.ची असताना 1.40 कि.मी.ची करण्यात आली आहे. परंतु नॉर्थ-साऊथ धावपट्टी वाढविणे ही बाब फिजिकली शक्य नाही असे प्राधिकरण आणि पी.के.व्ही.ने स्पष्टपणे सांगितले आहे. 120 च्या अँगलमध्ये ईस्ट-वेस्ट धावपट्टी करावयाची आहे. त्यासाठी 174.67 एकर जमिनीची आवश्यकता असताना 200 एकर जमीन संपादित करणे प्रस्तावित आहे. त्याची छाननी करण्याचे काम सुरु आहे..

उप सभापती : आपण स्पेसिफिक प्रश्न विचारावा.

श्री.गोपीकिसन बाजोरिया : या विषयाच्या बाबतीत याच सभागृहात माननीय मंत्री महोदयांनी सात वेळा वेगवेगळया प्रकारची उत्तरे दिलेली आहेत. सभापती महोदय, ती वेगवेगळी उत्तरे आपण वाचून पहावीत. एक खाजगी जमिनीच्या मालकाची चार एकर जागा या प्रकल्पात जात असल्याने तो न्यायालयात गेला आहे. त्याने भूसंपादनाच्या बाबतीत स्टे आणला आहे. त्या जमीन

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गोपीकिसन बाजोरिया...

मालकास बोलावून त्याच्याशी समोपचाराने चर्चा करुन तो जमीन देण्यास तयार झाला तर त्याची जमीन संपादन करा. राज्य शासनास हा प्रश्न निकाली काढावयाचा आहे की नाही या बाबतची सविस्तर माहिती सभागृहात देण्यात यावी. माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या दालनात संबंधित विभागाच्या विभागाच्या मंत्र्यांची सुंयुक्त बैठक घेण्यात येईल काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, हे प्रकरण राज्य शासनान निश्चितपणे निकालात काढावयाचे आहे. या प्रश्नाची सोडवणूक होण्यासाठी अपर मुख्य सचिवांनी दिनांक 24.8.2012 रोजी बैठक घेतली. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी प्रस्ताव पाठवावा असे त्यांनी आदेशित केले. यासंबंधीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांचेकडून प्राप्त झालेला आहे. सध्या हा प्रस्ताव प्रोसेसमध्ये आहे. यामध्ये 25.06 हेक्टर खाजगी जमीन संपादित करणे गरजेचे आहे. 54.15 हेक्टर एवढी जमीन पंजाबराव कृषि विद्यापीठाच्या मालकीची आहे, ती जमीन देखील संपादित करणे गरजेचे आहे. अशी एकूण 79.21 हेक्टर म्हणजे 174.67 एकर एवढी जमीन विमानतळासाठी आवश्यक आहे. यासंदर्भातील सर्व प्रस्ताव शासनास प्राप्त झालेले आहेत. पंजाबराव कृषी विद्यापीठाच्या कार्यकारी समितीची अनुमती असणे गरजेचे आहे. विद्यापीठाच्या कार्यकारी समितीमध्ये निर्णय घ्यावा असेही आदेशित करण्यात आले आहे. परंतु एका खाजगी जमिनीचा मालक न्यायालयात गेला असून त्याने दिनांक 5.10.2012 रोजी रिट पिटीशन दाखल केले आहे. या बाबतीत विद्यापीठाच्या जमिनीवर कोणत्याही त्रयस्त पक्षकारांना हक्क निर्माण न करण्याच्या बाबतीत कोर्टाने अंतरिम आदेश दिले आहेत. सध्या हे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. परंतु या कामास ती फार मोठी बाधा आहे असे नाही. शासनाकडे जो प्रस्ताव आलेला आहे, तो प्रस्ताव माननीय मुख्यमंत्र्यांच्या स्वाक्षरीसाठी पाठविलेला आहे. तो प्रस्ताव शेवटच्या टप्प्यावर आहे. त्या प्रस्तावावर निर्णय झाल्यानंतर जमीन संपादनाची प्रक्रिया सुरु होणार आहे.

यानंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / शोधनीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक 13...

श्री.अमरनाथ राजूरकर : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.गोपीकिसन बाजोरिया यांनी अकोला येथील विमानतळाच्या धावपट्टीबाबत लक्षवेधी सूचना उपस्थित केली आहे. मागील पावसाळी अधिवेशनात मी नांदेड येथील विमानतळाच्या विस्ताराबाबत सभागृहात प्रश्न उपस्थित केला होता. त्या प्रश्नाला मंत्री महोदयांनी मोघम उत्तर दिले होते. राज्यातील सर्व विमानतळांच्या प्रलंबित प्रश्नाबाबत मुख्यमंत्री महोदयांकडे व्यापक बैठक आयोजित करुन हे प्रश्न निकाली काढले जातील काय?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, अकोला विमानतळाच्या धावपट्टीचा विस्तार पूर्व पश्चिम असा करण्याचा शासनाचा विचार आहे. नांदेड प्रमाणेच अनेक जिल्हयातील विमानतळांचे प्रश्न प्रलंबित आहेत. यासाठी एअरपोर्ट पॉलिसी तयार होत आहे. मुख्यमंत्री स्तरावर याबाबत चर्चा सुरु आहे. एअरपोर्ट पॉलिसी तयार झाल्यानंतर व्हीजिबिलिटी पाहून निर्णय घेणे शक्य होईल. अकोला विमानतळाच्या धावपट्टीबाबतचा निर्णय तत्वत: मान्य करण्यासाठी प्रस्ताव मूव्ह झालेला आहे. शेवटच्या टप्प्यात प्रक्रिया सुरु असून मान्यता मिळाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, गेल्या 3 वर्षापासून अनेक आयुधांचा वापर करुन हा प्रश्न सदनात मांडण्यात आला आहे. याच विषयावर मागील हिवाळी अधिवेशनात लक्षवेधी सूचना चर्चेला आली होती. त्या लक्षवेधी सूचनेवर दीर्घ चर्चा होऊन माननीय उद्योगमंत्री श्री.नारायण राणे यांनी महसूल, सामान्य प्रशासन, कृषी आणि उद्योग या संबंधित चार विभागांच्या मंत्री महोदयांची संयुक्त समिती स्थापन करुन 15 जानेवारी, 2012 पर्यंत बैठक घेऊन ठोस निर्णय घेण्यात येईल असे सभागृहात जाहीर केले होते. आता माननीय राज्यमंत्री सांगतात की, प्रस्तावाची छाननी सुरु आहे. प्रस्तावाची कायम छाननी होत राहणार आहे काय? 54 एकर जमिनीची आवश्यकता आहे. नोव्हेंबर, 2012 मध्ये जिल्हाधिकारी, अकोला यांनी स्वत:हून प्रस्ताव शासनाकडे सादर केला आहे. केवळ प्रस्तावाची छाननी करुन चालणार नाही. ठोस निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. किती दिवसात या प्रश्नाबाबत ठोस निर्णय घेण्यात येईल?

प्रा.फौजिया खान : मी यापूर्वी सांगितले आहे की, तत्वत: मान्यतेसाठी माननीय मुख्यमंत्र्यांकडे फाईल सादर झालेली आहे. शेवटचा निर्णय त्यांच्या स्तरावर प्रलंबित आहे.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक 13.....

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, अकोला हा मंत्रीमहोदयांचे माहेर असलेला जिल्हा आहे. म्हणून आमचा आग्रह आहे की, या संदर्भात त्यांनी ठोस निर्णय घ्यावा. मागील हिवाळी अधिवेशनात मी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. त्यावरील चर्चेनंतर माननीय उद्योगमंत्री श्री.नारायण राणे यांनी उत्तर देत असताना असे सांगितले होते की, 15 जानेवारी, 2012 च्या पूर्वी बैठक घेऊन निर्णय घेणार आहोत.

नंतर श्री.जुन्नरे.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

आश्वासन देऊन एक वर्ष उलटून गेलेले आहे. अकोला हे गाव विदर्भ व खानदेशच्या बॉर्डरवरील आहे. या ठिकाणचे विमानतळ सुरु होण्यास एवढा विलंब लागणे हे काही योग्य नाही. या ठिकाणी पंजाबराव कृर्षी विद्यापीठाची हजारो एकर जमीन रिकामी आहे. डॉ. पंजाबराव कृषी विद्यापीठ शासनाचे आहे. शासनालाच जमिनीची आवश्यकता असतांनाही विमान तळाच्या कामासाठी डिले होतो आहे. त्यामुळे अकोला येथील विमानतळाच्या प्रकल्पाला चालना किती दिवसात दिली जाणार आहे याचे स्पेसिफिक उत्तर माननीय मंत्रीमहोदयांनी द्यावे.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विमानतळाच्या संदर्भात मागणी केलेली असल्यामुळे माननीय मुख्यमंत्र्यांची सन्माननीय सदस्यांबरोबर एक बैठक आयोजित करण्यात येईल व हा प्रश्न लवकरात लवकर निकाली काढण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या विमानतळाच्या संदर्भात पाच वेळा लक्षवेधी सूचना या सभागृहात आलेल्या आहेत. या लक्षवेधी सूचनेचे उत्तर सुध्दा विक्षिप्त देण्यात आलेले आहे. एकर आणि हेक्टरच्या विषयात गोंधळ घातला आहे. यासंदर्भात मला विचारावयाचे आहे की, केंद्रीय मंत्री श्री. प्रफुल्ल पटेल यांनी माननीय कृषी मंत्री श्री. शरद पवार साहेबांना अकोला येथे बोलावून सर्वांना एकत्र करुन वाजत गाजत कोणत्या धावपट्टीचे उद्घाटन केले होते ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, अकोला येथील विमानतळाचा प्रस्ताव मागविण्यात आला असून हा विषय आता अंतिम टप्प्यामध्ये आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, अकोला येथील धाव पट्टीवर 25 कोटी रुपये खर्च होऊन सुध्दा त्या ठिकाणी एकही विमान उतरले जात नाही. या प्रश्नाला ज्या पध्दतीने उत्तर दिले जाते त्यामुळे या सभागृहाचा अवमान होतो. अकोला विमानतळाच्या संदर्भात आम्ही वारंवार प्रश्न उपस्थित करीत असतो परंतु शासनाकडून योग्य उत्तर येत नसल्यामुळे, सभागृहाची टिंगल टवाळी होत असल्यामुळे आम्ही या प्रश्नाच्या संदर्भात निषेध व्यक्त करुन सभात्याग करतो.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य सभात्याग करतात.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. :ठाणे जिल्हयातील मध्य वैतरणा,लेंडी व सूर्या प्रकल्पग्रस्तांचे नियमानुसार पुनर्वसन न होणे.

मु. शी. :ठाणे जिल्हयातील मध्य वैतरणा,लेंडी व सूर्या प्रकल्पग्रस्तांचे नियमानुसार पुनर्वसन न होणे यासंबंधी सर्वश्री विनोद तावडे, रामनाथ मोते,चंद्रकांत पाटील, ॲड.आशिष शेलार, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. विनोद तावडे : (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पुनर्वसन व मदत कार्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"ठाणे जिल्ह्यातील मध्य वैतरणा, लेंडी व सूर्या इत्यादी प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांचे नियमानुसार पुनर्वसन झाले नसल्याचे तसेच प्रकल्पग्रस्तांना रोजगार व इतर सुविधा अद्याप देण्यात आल्या नसल्याचे निदर्शनास येणे, उक्त प्रकल्पग्रस्तांना देण्यात आलेला मोबदल्याची रक्कम पुरेशी नसणे, फळबागा, फळझाडांचे योग्य मूल्यांकन न होणे, पुनर्वसनाच्या ठिकाणी नियमानुसार आवश्यक त्या सर्व नागरी सुविधा उपलब्ध नसणे, प्रकल्पग्रस्तांना अद्याप पर्यंत दाखले न दिल्याने प्रकल्पग्रस्त लाभार्थी रोजगारापासून वंचित राहणे, अनेक प्रकल्पग्रस्तांचे वन हक्काचे दावे प्रलंबित असणे, परिणामी उक्त प्रकल्पग्रस्तांमध्ये शासनाविषयी निर्माण झालेली चिडीची व संतापाची भावना, प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या व तक्रारींकडे जिल्हाधिकारी किंवा प्रकल्प अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले असल्याचे निदर्शनास येणे, प्रकल्पग्रस्तांच्या उक्त मागण्या पूर्ण करण्याबाबत शासनाने तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता तसेच एखाद्या प्रकल्पासाठी जमीन अधिग्रहित करताना प्रकल्पग्रस्ताला रास्त भाव देण्याच्या दृष्टीने शासनाने रेडी रेकनरचे दर प्रत्यक्ष बाजारभावाशी सुसंगत ठेवण्यासाठी ते वेळच्या वेळी अद्ययावत करण्याची नितांत आवश्यकता, या प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कारवाई."

श्री. प्रकाश सोळंके (पुनर्वसन व मदत कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे :सभापती महोदय, मागील काही दिवसामध्ये मी ठाणे जिल्हयातील मध्य वैतरणा, लेंडी व सूर्या प्रकल्पाची पाहणी करुन त्या ठिकाणच्या प्रकल्प ग्रस्तांशी चर्चा केली आहे. आधी पुनर्वसन व नंतर धरण अशा प्रकारे आपल्या घोषणा असतात. परंतु कोणत्याही प्रकल्पाला सामान्य माणूस विरोध का करतो याचा आपण कधी विचार केला आहे काय ? सामान्य माणूस विरोध का करतो हे मला ठाणे जिल्हयाच्या दौऱ्यातून दिसून आलेले आहे. मध्य वैतरणा प्रकल्पाला मुंबई महानगर पालिका पैसे देऊन काम करणार आहे. या ठिकाणच्या प्रकल्पग्रस्तांनी पाण्यासाठी जमीन दिली होती. परंतु या लोकांचे जेथे पुनर्वसन झालेले आहे त्या ठिकाणी त्यांना पाणी सुध्दा उपलब्ध करुन दिलेले नाही. लेंडी व सूर्या पाटबंधारे प्रकल्पातील प्रकल्प ग्रस्तांना प्रकल्पग्रस्तांचा दाखला दिलेला नाही. उत्तरामध्ये म्हटले आहे की, "योग्य कागदपत्र सादर करण्यात आली नाहीत." या ठिकाणचे प्रकल्पग्रस्त लोक संबंधित अधिकाऱ्याकडे सर्व कागदपत्रे घेऊन गेले होते. परंतु अधिकाऱ्यांना एवढी अर्थपूर्ण कामे असतात की, ते प्रकल्पग्रस्तांकडे लक्षच देत नाहीत. या ठिकाणचा आदिवासी अशिक्षित असल्यामुळे त्याला काही कळत नाही.

यानंतर श्री.ओटवणेकर ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

त्यांची कागदपत्र अपूर्ण आहेत असे सांगून त्यांना कोणतीही मदत दिली जात नाही. प्रकल्पग्रस्तांना दाखला देण्यासाठी 10 ते 15 वर्षाचा कालावधी जात आहे. त्यांना लवकर दाखला देण्यास कोणती अडचण आहे ? ज्यांची 50 टक्के, 20 टक्के 25 टक्के जमीन गेली आहे त्यांना नोकऱ्या तरी मिळतील. ते ही आपण करीत नाही. त्यामुळे माननीय मंत्र्यांना माझे दोन-तीनच प्रश्न आहेत. आरटीओ लायसेन्स देण्यासाठी ज्या प्रमाणे विशेष शिबिरे भरवतात त्याप्रमाणे विशेष शिबिर भरवून पुढच्या एका महिन्यात प्रकल्पग्रस्तांना दाखले देण्यात येतील काय ? त्यांना ठाण्याला न बोलाविता त्या त्या भागात विशेष छावणी उघडून दाखले दिले पाहिजेत. छावणी उघडण्याची घोषणा आपण आठ दिवस अगोदर केली पाहिजे.

माझा दुसरा प्रश्न असा आहे की, ही सर्व जमीन आदिवासींची आहे. ती ग्रामीण भागामध्ये आहे. त्यामुळे रेडी-रेकनरचे रेट खूप कमी आहेत. जव्हारची जमीन पाच कोटी रूपये एकरला जात आहे. असे असताना आपण 16 हजार रूपये आदिवासींना देत आहोत. एवढी तफावत आहे. सूर्या प्रकल्पांच्या परिसरात येणाऱ्या जमिनीचा दर एकरी 2 लाख आहे. आपण मात्र बारा हजार रूपये देत आहोत. ज्याप्रमाणात प्रकल्पग्रस्तांना मोबदला मिळायला पाहिजे त्या प्रमाणात मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे. केंद्र सरकारने नवीन कायदा आणला आहे, त्यामुळे प्रकल्पग्रस्तांना चौपट मदत मिळेल असे माननीय श्री.शरद पवार साहेबांनी नवी मुंबई येथे सांगितले आहे. ते सगळे फायदे आपण माननीय उप सभापतींच्या मतदार संघातील लोकांना मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार आहात काय ?

उप सभापती : नाव उप सभापतींचे आणि पोळी आपली.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, ही पोळी गरीब आदिवासींच्या जनतेची आहे. या प्रकल्पांतर्गत काजू, आंबा, साग यांची झाडे येतात. या जागेची मोजणी करताना जॉईंट मेजरमेंट रिपोर्ट कृषि खात्याच्या सहीने घ्यायला पाहिजे होता तो घेतलेला नाही. त्यामुळे त्यांना योग्य ती भरपाई दिली गेलेली नाही. तेव्हा याबाबत फेर मोजणी शासन करणार आहे काय ?

आदिवासींचे वन हक्काचे दावे देखील प्रलंबित आहेत. आदिवासींच्या नावावर वन पट्टाझाला नाही तर त्याला मोबदला मिळत नाही. हा विषय पुनर्वसन व मदत कार्य विभागासह वन विभागाशी देखील संबंधित आहे. किमान प्रकल्पाच्या भागातील वनपट्टयांचे दावे शीघ्र

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

गतीने क्लिअर केले तर पुनर्वसन खाते त्यांना मोबदला देऊ शकेल. अन्यथा ते पेंडींग राहते व आदिवासींना वर्षानुवर्षे मोबदला मिळत नाही. कायद्याने वन पट्टे हे प्रकल्प सुरू होण्याच्या आधी देण्याचे काम शासन करणार आहे काय व हा जो विलंब होत आहे तो पुढच्या किती महिन्यामध्ये दूर करण्यात येणार आहे, अशा प्रकारचे चार प्रश्न माननीय उप सभापतींच्या मतदार संघातील आहेत.

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी पहिला प्रश्न दाखले देण्यासंबंधीचा उपस्थित केला आहे. प्रकल्पग्रस्तांना विशेष मोहीम राबवून दाखले देण्यात यावे अशी सूचना सन्माननीय सदस्यांची आहे. मध्य वैतरणा प्रकल्प, शहापूर, मोखाडा, शहापूर, सूर्या प्रकल्प या दोन्ही प्रकल्पांबाबत जानेवारी महिन्यात विशेष मोहीम राबवून ज्यांची मागणी आहे अशा सर्व प्रकल्पग्रस्तांना दाखले देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल. लेंडी प्रकल्पग्रस्तांनी सुरूवातीला स्वेच्छा पुनर्वसनाची मागणी केली होती. परंतु, आता त्यांनी शासकीय पुनर्वसन मान्य केले आहे. त्यासंबंधातील भूसंपादन प्रक्रिया सुरू आहे. भूसंपादन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर त्यांना प्रकल्पग्रस्तांचे दाखले देण्यात येतील.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके....

माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी एकाच वेळी पाच-सहा प्रश्न विचारलेले आहेत त्यामुळे नेमक्या कोणत्या प्रश्नाचे उत्तर देऊ हे लक्षात येत नाही.

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, मी लेंडी प्रकल्पाबाबत प्रश्न विचारणार आहे. लेंडी प्रकल्पग्रस्तांना अजून अंत्योदय कार्डाचे वितरण करण्यात आलेले नाही. तेव्हा त्यांना अंत्योदय कार्डाचे वितरण केव्हा करण्यात येईल ? माझा दुसरा प्रश्न आहे की, रोजगार विषयक अर्ज देण्याची मुदत संपली असली तरी ती वाढवून देण्यात येईल काय ?प्रकल्पग्रस्त गावामध्ये रस्ते, वीज आणि पाण्याची सोय नाही. तेव्हा त्यांना त्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतील काय ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, लेंडी प्रकल्पग्रस्तांनी शासकीय पुनर्वसनास सप्टेंबर 2010 मध्ये मान्यता दिलेली आहे. भूसंपादनाची प्रक्रिया सुरु आहे. तेथील 63 कुटुंबाचे पुनर्वसन सर्व नागरी सुविधांसह करण्यात येईल.

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, माझ्या दोन प्रश्नांची उत्तरे माननीय मंत्रिमहोदयांनी दिलेली नाहीत. प्रकल्पग्रस्तांना अंत्योदय कार्ड केव्हा देणार तसेच प्रकल्पग्रस्तांना रोजगारासंबंधी अर्ज देण्याची सुविधा देणार काय ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, भूसंपादनाचे काम पूर्ण झाल्यानंतर पुनर्वसनाचे जे फायदे आहेत त्याबाबत निर्णय घेण्यात येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, लेंडी प्रकल्पाच्या पुनर्वसनासाठी किती निधी जमा झालेला आहे ? आधी पुनर्वसन नंतर धरण असे शासनाचे धोरण आहे. या प्रकल्पामध्ये ठेकेदाराला किती ॲडव्हान्स देण्यात आला आहे ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन झाल्याशिवाय धळभरणी न करण्याचे आदेश शासनाने दिलेले आहेत. त्यामुळे धरणाचे काम पूर्ण होऊ शकणार नाही. 63 कुटुंबाना घराचा मोबदला म्हणून आतापर्यंत 74.66 लाख रुपये अदा करण्यात आले आहेत. या 63 कुटुंबांचे 18 नागरी सुविधांसह पुनर्वसन करण्याचे शासनाने मान्य केलेले आहे आणि शासनाने भूसंपादनाची कार्यवाही सुरु केलेली आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, त्या ठिकाणी अजून भूसंपादन झालेले नसताना रेड्डी नावाच्या ठेकेदाराने काम सुरु केलेले आहे. त्यामुळे तेथील लोकांना शेती करता येत नाही. तेव्हा सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी मांडलेला अंत्योदय कार्डाचा मुद्दा महत्वाचा आहे. ठेकेदाराने स्थानिक लोकांना कामावर न घेता आंध्र प्रदेशमधील लोकांना कामावर ठेवले आहे. ही सर्व परिस्थिती तेथील जनतेने आम्हाला भेटून सांगितली आहे. त्या ठिकाणी जवळपास 55 टक्के काम झालेले आहे. तेव्हा याबाबत मंत्रिमहोदय माहिती देतील काय ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्यासाठी 18 एकर जमिनीची आवश्यकता आहे...

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, या प्रकल्पाला स्टे देण्यात आलेला आहे. प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन होत नाही तोपर्यंत स्टे व्हेकेट करण्यात येणार नाही.

उप सभापती : सभागृहाची विशेष बैठक सकाळी 11.00 ते दुपारी 12.45 पर्यंत होती. परंतु आजच्या कामकाजपत्रिकेतील उर्वरित दोन लक्षवेधी सूचनांवरील चर्चा पूर्ण होईपर्यंत सभागृहाच्या बैठकीची वेळ मी दुपारी 1.00 वाजेपर्यंत वाढवित आहे.

अशुद्धीत प्रत / अशुद्धीसाठी नाही

पृ. शी. : नागपूरमध्ये मागासवर्गीय मुलामुलींसाठी वसतिगृह सुरु करण्याचे घोषित करुनही त्याची अंमलबजावणी न होणे

मु. शी. : नागपूरमध्ये मागासवर्गीय मुलामुलींसाठी वसतिगृह सुरु करण्याचे घोषित करुनही त्याची अंमलबजावणी न होणे या संबंधी सर्वश्री सुभाष चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्रीमती दिप्ती चवधरी, डॉ.नीलम गोऱ्हे,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" मागासवर्गीय मुला-मुलींच्या शिक्षणाची सोय व्हावी म्हणून त्यांच्यासाठी वसतीगृह सुरू करण्याचा शासनाने निर्णय घेणे, मुलांसाठी 60 आणि मुलींसाठी 40 अशी एकूण 100 नवीन शासकीय वसतीगृहे अभिप्रेत असणे, प्रत्येक वसतीगृहात 100 मुलांची संख्या मान्य करण्यात येणे सोबतच मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर आणि लातूर या सात विभागीय मुख्यालयाच्या ठिकाणी प्रत्येकी एक अशी सात वसतीगृहे सुरू करण्यास राज्य शासनाने मान्यता देण्यात येणे, राज्याच्या सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने घेण्यात आलेला हा निर्णय विभागाच्या प्रधान सचिवांच्या स्वाक्षरीने दिनांक 28 जून, 2007 रोजी निर्गमित करण्यात येणे, त्याचबरोबर विभागीय स्तरावरील वसतीगृहाचे व्यवस्थापन पाहण्यासाठी गृहपाल, प्रमुख लिपीक, कनिष्ठ-लिपीक, पहारेकरी आणि सफाई कामगार ही पदे देखील निर्माण करण्यात येणे, केवळ शासन निर्णय आणि पदांची निर्मिती करण्यात आली नाही तर नागपूर आणि लातूर येथील वसतीगृहाच्या बांधकामासाठी प्रत्येकी अंदाजे 25 कोटी रूपये मंजूर करण्यात येणे, त्यादृष्टीने शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येणे, मात्र जून, 2007 पासून अद्यापही नागपूरात अशा प्रकारच्या वसतीगृहाची निर्मिती करण्यात न येणे, त्यामुळे मागासवर्गीयाबाबत आखलेल्या योजना कागदावरच राहत असल्याचे दिसून येणे, गेल्या पाच वर्षात मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या वसतीगृहासाठी उप राजधानी नागपूर येथे जागा मिळू नये ही अतिशय खेदाची बाब असून वंचित घटकांसाठी अनास्था दर्शविणारी असणे, शासनाने याबाबत तातडीने करावयाची कारवाई व याबाबत राज्य शासनाची प्रतिक्रिया. "

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शिवाजीराव मोघे (सामाजिक न्याय मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, महाराष्ट्रातील मागासवर्गीय मुला-मुलींच्या वसतिगृहासंबंधीची ही लक्षवेधी सूचना आहे. मी, विधिमंडळाच्या अनुसूचित जाती व कल्याण समितीवर सदस्य म्हणून आहे. या कामाचा एक भाग म्हणून आम्ही राज्यभर मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी असलेल्या वसतिगृहांची पाहणी करतो. त्या पाहणीवरुन असे दिसते की, राज्यातील वसतिगृहांची अवस्था अतिशय दयनीय आहे. मुला-मुलींना निकृष्ट दर्जाचे जेवण मिळते, रुममध्ये दिवा नसतो, इतर सुविधा नसतात. मुलींच्या वसतिगृहांची तर अतिशय वाईट अवस्था आहे. मुलींच्या सुरक्षितेच्या दृष्टीने कोणतीही सोय नाही. वसतिगृहामध्ये गृहपाल, प्रमुख लिपिक व लिपिक, पहारेकरी इत्यादी पदे रिक्त आहेत. माझी मागणी आहे की, फाईव्ह स्टार हॉटेलप्रमाणे ही वसतिगृहे बांधण्यात यावीत.

यानंतर श्री.सरफरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण...

आपल्या महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळातील सामाजिक न्याय विभागाचे मंत्री धाडशी आहेत. त्यांचा कामाचा परफॉर्मन्स चांगला आहे. याकरिता एक टाईम बाऊंड कार्यक्रम तयार करुन येत्या अर्थसंकल्पामध्ये त्याकरिता आर्थिक तरतूद करण्यात येईल काय?

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी अतिशय चांगला प्रश्न विचारला आहे. महाराष्ट्राची स्थापना झाली तेव्हा राज्यामध्ये 271 शासकीय वसतिगृहे होती. आपण 2007 मध्ये 100 वसतिगृहांना मान्यता दिली असली तरी त्यापैकी एकही वसतिगृह सुरु नव्हते. इमारतीचे बांधकाम झाल्यानंतर ही वसतिगृहे सुरु करण्यात येतील असा पूर्वी निर्णय झाला होता. परंतु सन 2011-12 मध्ये शासनाने निर्णय घेतला की, इमारतीचे बांधकाम पूर्ण होवो अगर न होवो, भाडयाच्या जागेमध्ये 100 पैकी 100 वसतिगृहे आम्ही सुरु करुन गरीब माणसाला न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. दुसरी गोष्ट अशी की, यामध्ये निधीची काहीही अडचण येणार नाही. माझ्याजवळील माहितीनुसार 53 वसतिगृहांच्या इमारतींचे बांधकाम पूर्ण झाले असून त्या ठिकाणी फर्निचरची व्यवस्था करण्यात येत आहे. 27 इमारतींचे काम चार महिन्यात पूर्ण होईल. म्हणजेच 100 पैकी 80 इमारती पूर्ण होतील. राहिलेल्या 20 वसतिगृहांकरिता घेण्यात आलेल्या जमिनीचे प्रश्न देखील सुटण्याच्या अवस्थेत आहेत. पुढील दीड वर्षात 100 वसतिगृह पूर्ण होतील. त्याकरिता निधीची कमतरता राहणार नाही.

श्री. वसंतराव खोटरे : सभापती महोदय, पूर्ण झालेल्या वसतिगृहांच्या ठिकाणी लिपिक, टंकलेखक, अधीक्षक इत्यादी कर्मचाऱ्यांची भरती करण्याकरिता आपण जाहीरात देऊन सुध्दा त्यांची नेमणूक करण्यात आलेली नाही व त्यांना वेतनश्रेणी देण्यात आलेली नाही. माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे या वसतिगृहांची अवस्था अतिशय दयनीय आहे, त्याठिकाणी वीज आणि पाण्याची व्यवस्था करण्यात आलेली नाही. मुलांना शिकविण्यासाठी शिक्षक नेमले नाहीत. ज्या शिक्षकांना नेमण्यात आले आहे ते त्याठिकाणी काम करण्यासाठी जात नाहीत. या करिता आपण कोणती कारवाई करणार आहात?

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, या ठिकाणी वसतिगृहाबाबत लक्षवेधी सूचना मांडण्यात आली असून माननीय सदस्य निवासी शाळांमधील शिक्षकांसंबंधी प्रश्न विचारीत आहेत. निवासी शाळांबाबत आणि वसतिगृहांबाबत माननीय मुख्यमंत्र्यांकडे दोन वर्षापूर्वी बैठक घेण्यात आली. मला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शिवाजीराव मोघे...

सांगण्यास आनंद वाटतो की, निवासी शाळेकरिता 1500 कर्मचारी आणि वसतिगृहांसाठी 400 कर्मचाऱ्यांची पदे मंजूर झाली असून जवळ जवळ 90 टक्के नेमणुका झालेल्या आहेत. माननीय शिक्षकांच्या प्रतिनिधींना मला सांगितले पाहिजे की, शिक्षकांची त्या शाळांमध्ये नेमणूक केली तरीसुध्दा जवळ जवळ 20 टक्के शिक्षक सेवेमध्ये रुजू झाले नाहीत. त्यामुळे प्रतिक्षा यादीवरील उमेदवारांना नेमणुकीची पत्रे देऊन सेंट पर्सेंट कर्मचारी भरण्याचा आमचा प्रयत्न सुरु आहे.

पृ.शी./मु.शी.: लक्षवेधी सूचना क्रमांक 16 संबंधी

उप सभापती : माननीय सदस्य श्री. किरण पावसकर हे अनुपस्थित असल्यामुळे सदर लक्षवेधी सूचना मांडण्याची परवानगी मिळावी अशी विनंती माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांनी केली आहे. त्यामुळे मी माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांना सदर लक्षवेधी सूचना मांडण्यास अनुमती देत आहे. परंतु त्यांनी फक्त एकच प्रश्न विचारावा.

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, धन्यवाद.

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

पृ. शी. : सांगली जिल्ह्यात पाण्याचे टँकर व चारा डेपो पूर्ववत सुरु करण्याची होत असलेली मागणी

मु. शी. : सांगली जिल्ह्यात पाण्याचे टँकर व चारा डेपो पूर्ववत सुरु करण्याची होत असलेली मागणी यासंबंधी सर्वश्री किरण पावसकर ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पुनर्वसन व मदत कार्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"सांगली जिल्ह्यात निर्माण झालेल्या दुष्काळसदृश्य परिस्थितीवर मात करण्यासाठी शासनाकडून माहे एप्रिल, २०१२ पासून पाण्याचे टँकर आणि चारा डेपो सुरु करण्यात आले मात्र टॅकर आणि चारा डेपो यांची मुदत ८ ऑगस्ट, २०१२ रोजी संपल्याने पाणी आणि चारा यांचा प्रश्न बिकट होणे, जून-जुलै, २०१२ या महिन्यात पडणारा मान्सून पाऊसही समाधानकारक न झाल्याने सांगली जिल्ह्यातील जत, आटपाडी, कवठेमहाकांळ, खानापूर पूर्व, मिरज पूर्व आणि कडेगाव तालुक्यातील काही भागातील दुष्काळी परिस्थिती कायम असणे, याबाबत जिल्ह्यात सुरु करण्यात आलेले पाण्याचे टँकर व चारा डेपो पूर्ववत सुरु ठेवण्याची स्थानिक लोकप्रतिनिधी, नागरिक यांचेकडून होत असलेली मागणी, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

डॉ.पतंगराव कदम (पुनर्वसन व मदत कार्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, सांगली जिल्ह्यामध्ये कायम स्वरुपी दुष्काळात होरपळून निघालेले हे तालुके आहेत. आदरणीय पुनर्वसन व मदत कार्य मंत्री डॉ.पतंगराव कदम हे सांगली जिल्ह्याचे पालक मंत्री आहेत. त्यांच्याकडून हे प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न होत आहेत. कालच मंत्रीमहोदयांनी शासनाच्या वतीने उत्तर दिले की, ज्या ठिकाणाहून मागणी येईल त्या ठिकाणी छावण्या सुरु करण्यात येतील. परंतु आज निवेदनामध्ये मंडल स्तरावर छावण्या देण्यात येतील असे म्हटले आहे. ज्या ठिकाणी मागणी करण्यात आली आहे त्या ठिकाणी आपण किती दिवसात छावणी सुरु करणार?

सभापती महोदय, माझा दुसरा प्रश्न असा आहे की, आपण छावण्यांमध्ये जनावरे ठेवतो. काल आटपाडी तालुक्यामध्ये छावण्यातील चार जनावरे भाजून मेली अशी माहिती आहे. याची माहिती शासनाकडे असेल तर मंत्रीमहोदयांनी ती सभागृहाला द्यावी. त्या जनावरांची नुकसान भरपाई शेतकऱ्यांना मिळणार नाही. याचे कारण जनावरे छावणीमध्ये पाठवितांना संबंधित शेतकऱ्यांकडून "आम्ही कोणतीही नुकसान भरपाई मागणार नाही" असे लिहून घेतले जाते. तेव्हा या जनावरांची नुकसान भरपाई देणार काय, त्यासंबंधी आपण योग्य धोरण ठरविणार काय? तिसरा प्रश्न असा की, मागील महिन्यात केरवाडी, ता. कवठेमहाकाळ या माझ्या गावामध्ये चार जनावरे मेली, त्यांचा पंचनामा झाला त्यांना अजूनपर्यन्त नुकसान भरपाई मिळाली नाही. डी.पी.डी.सी. च्या बैठकीत मंत्रीमहोदयांनी आम्ही जनावरांच्या छावण्या सुरु करु असे मान्य केले आहे. त्यामुळे शेतकरी आपली जनावरे विकू लागले आहेत. जर सर्व शेळया-मेंढयांचे कळप विकले गेले तर पुढे काय परिस्थिती निर्माण होईल याचा सभागृहातील सर्व माननीय सदस्यांनी विचार करावा. मटणाचे भाव किती वाढतील याचाही विचार करावा. त्यांच्या छावण्यांचा प्रश्न आपण लवकर सोडविणार काय? असल्यास, आपण केव्हा सोडविणार?

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, आता शासनाने छावण्यांच्या बाबतीत निर्णय घेतला आहे. आपण पूर्वी कलेक्टर, प्रांत ऑफीसर यांना अधिकार दिले होते. परंतु आता पालक सचिव, कमिशनर आणि कलेक्टर हे परत छावण्यांचा आढावा घेणार आहेत आणि आवश्यकतेनुसार त्यासाठी परवानगी दिली जाईल हे पहिल्या प्रश्नाचे उत्तर आहे. दुसऱ्या प्रश्नाबाबत सांगावयाचे तर काल करगणीच्या छावणीमध्ये पाच म्हशी भाजल्या आहेत. मात्र या म्हशी मेल्या आहेत ही माहिती खरी नाही. त्यांच्यावर औषधोपचाराचे काम सुरु आहे. मात्र याबाबत खास बाब म्हणून संबंधितांना नुकसान भरपाईच्या दृष्टीने काही मदत केली जाईल.

. . . .डब्ल्यू-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : सन 1991 ते 1999 या कालखंडातील नेट सेट मुक्त शिक्षकांच्या बाबतीत दिलेल्या लेखी अभिवचनाचे पालन न होणे.

मु.शी. : सन 1991 ते 1999 या कालखंडातील नेट सेट मुक्त शिक्षकांच्या बाबतीत दिलेल्या लेखी अभिवचनाचे पालन न होणे याबाबत सर्वश्री.वसंतराव खोटरे,विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.वसंतराव खोटरे (अमरावती विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"सन 1991 ते 1999 या कालखंडातील नेटसेट मुक्त शिक्षकांच्या बाबतीत दिलेल्या लेखी अभिवचनाचे पालन न होणे, दिनांक 1 जानेवारी 2006 रोजीपासून पुढच्या चार वर्षासाठी येणाऱ्या थकबाकीचा 80 टक्के अंशभाग केंद्र शासन देण्यास तयार आहे असा शासन निर्णय काढला असताना उच्च शिक्षण विभागाने अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई न करणे, प्रत्यक्ष शासन निर्णय निर्गमित झालेला असताना शासन निर्णयाची अंमलबजावणी न करणे, विविध मागण्यांच्या संदर्भात महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या अध्यक्षांनी मागण्यांबाबतचे एक निवेदन मा.उच्च शिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक 24 सप्टेंबर 2012 रोजी किंवा त्या दरम्यान देणे, निवेदनामध्ये दिनांक 10 ऑक्टोबर, 2012 रोजी मुंबई येथे राज्यस्तरीय धरणे आंदोलन, दिनांक 5 नोव्हेंबर 2012 रोजी पुणे येथे उच्च शिक्षण संचालक कार्यालयावर मोर्चा, दिनांक 10 डिसेंबर 2012 रोजी विधान भवन, नागपूर येथे भव्य मोर्चा आंदोलनाचे आयोजन करणे, अद्यापपर्यंत शासनाने याबाबत कोणतीही कार्यवाही न करणे व याबाबत शासन निर्णय निर्गमित न झाल्यामुळे या शिक्षकांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष व याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

श्री.डी.पी.सावंत (उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

डब्ल्यू-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

. . . .डब्ल्यू-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, सदरहू लक्षवेधी सूचना अतिशय महत्वाची आहे. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ, महाराष्ट्रातील विद्यापीठीय व महाराष्ट्रातील शिक्षकांचा दीर्घकाळ पासून प्रलंबित असलेला हा प्रश्न असून त्यांना रस्त्यावर येण्यासाठी शासनाने भाग पाडलेले आहे. त्यांच्या ज्या मागण्या आहेत त्या मान्य करण्यासाठी, सोडविण्यासाठी शासनाने कोणतीही पावले उचलली नाहीत. म्हणून प्राध्यापक महासंघाने 24 सप्टेंबर 2012 रोजी एक पत्र दिले आणि त्यामध्ये आपल्या मागण्या मांडलेल्या आहेत.

उप सभापती : सन्माननीय सदस्यांची प्रश्न विचारण्याची वेळ संपलेली आहे.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, मी अजून याबाबत बोललोच नाही. माझा फक्त एकच प्रश्न आहे आणि तो असा आहे की, या विषयाबाबत प्राध्यापक महासंघाने तीन वेळा आंदोलने केली आहेत. एकदा मुंबई येथे आझाद मैदानावर केले होते,त्यानंतर पुणे येथील संचालक कार्यालयाच्या ठिकाणी केले आणि काल-परवा दहा हजार विद्यापीठीय शिक्षकांचा मोर्चा काढण्यात आला तेव्हा त्या मोर्चाला माननीय राज्यमंत्री महोदय सामोरे गेले होते आणि त्यांची भेट घेतली हे खरे आहे. त्याठिकाणी मोठ्या प्रमाणात प्राध्यापक रस्त्यावर आले. मी सोपा प्रश्न विचारतो की, त्यांना विद्यापीठ आयोगाने नेट सेट मधून मुक्त केले आणि त्यांना 80 टक्के अनुदान देण्याचे देखील मान्य केले आणि हे तुम्ही स्वीकारलेले आहे पण अजूनपर्यंत त्याबाबतीत कोणताही शासन निर्णय काढलेला नाही. म्हणून माझे छोटे-छोटे चार प्रश्न आहेत आणि त्याचे माननीय मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे अशी विनंती आहे.

सभापती महोदय, माझा पहिला प्रश्न असा आहे की, महाराष्ट्र प्राध्यापक संघाच्या पदाधिकाऱ्यांशी दिनांक 2 मे 2000 रोजी झालेल्या बैठकीमध्ये विद्यापीठ आयोगाच्या निर्णया प्रमाणे करण्यात येईल असा निर्णय माननीय मुख्यमंत्र्यांनी दिला हे खरे आहे काय? दिनांक 2 मे 2000 रोजी झालेल्या बैठकीस माननीय मुख्यमंत्री, माननीय उच्च शिक्षण मंत्री, संबंधित विभागाचे सचिव आणि पदाधिकारी, संघटनेचे अध्यक्ष देखील उपस्थित होते. त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी जे सांगितले ते मी वाचून दाखवितो. त्यामध्ये असे म्हटले आहे की,"या सर्व बाबी कार्यान्वित केल्या-नंतर माननीय मुख्यमंत्र्यांनी दोन ओळीमध्ये आदेश दिलेले आहेत की, "सदर बाब अशीच स्वीकृत करण्याचे ठरले" आणि दुसरे म्हणजे आयोगाचे हे मत संमत केल्याचे माननीय मुख्यमंत्र्यांनी म्हटलेले आहे. ते खरे आहे काय?

. . . .डब्ल्यु - 4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माझा दुसरा प्रश्न असा आहे की, विद्यापीठ अनुदान आयोगाने वरील पत्रामध्ये नमूद केल्यानुसार दिनांक 19-9-1991 ते 2003-2004 पर्यंतच्या कालावधीत बिगर नेट सेट अध्यापकांच्या स्थान निश्चिती, वेतन निश्चितीबाबत आणि त्याअनुषंगाने मिळणाऱ्या थकबाकी संबंधात मंत्रिमंडळ ताबडतोब निर्णय घेईल असे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री महोदयांनी सांगितले हे खरे आहे काय, तसेच ते पत्राने कळविले हे देखील खरे आहे काय? आपण याठिकाणी एक बाब नमूद केली त्याबद्दल माननीय मंत्री महोदयांना धन्यवाद देतो. माझा शेवटचा प्रश्न असा आहे की, 1991 ते 1999 या काळातील उक्त नेट सेट शिक्षकांच्या बाबतीत सुध्दा 80 टक्के रकमेची प्रतिपूर्ती केंद्र शासनाकडून केली जाणार आहे काय? असे माझे तीन-चार प्रश्न आहेत, त्याचे उत्तर देण्यात यावे.

श्री.डी.पी.सावंत : सभापती महोदय, नेट सेटच्या बाबतीत सूट मिळण्याच्या संदर्भात यु.जी.सी.ने शासनाला 2011 मध्ये जो निर्णय कळविला होता. त्याबाबतीत प्राध्यापक संघटनांनी आंदोलने केली आणि त्यावेळी परीक्षेवर बहिष्कार टाकला होता. त्यावेळी 2 मे रोजी माननीय मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात आली होती. त्यावेळी आम्ही प्राध्यापकांना हेच सांगितले होते की,याबाबतीत शासन सकारात्मक विचार करील. नंतर नस्ती तयार करण्यात आली. पण आपल्याला माहिती आहे की, दुर्दैवाने जूनमध्ये मंत्रालयाला जी आग लागली होती, त्यामध्ये ती जळाली. त्यामुळे दोन-तीन महिने विलंब झाला. त्यामध्ये परत यु.जी.सी.ने काही डी-लिंकींग केले. आपल्याला माहिती आहे की, अगोदर यु.जी.सी.चे असे म्हणणे होते की, तुम्ही जोपर्यंत रिटायरमेंटचे वर्ष वाढवित नाही तोपर्यंत आम्ही तुम्हाला लाभ देणार नाही. त्यानुसार शासनाने रिटायरमेंटचे वर्ष वाढविले. त्यानंतर परत यु.जी.सी.ने ते रोल बॅक केले. अशा प्रकारच्या गडबडी मुळे याबाबतीत जरुर विलंब झालेला आहे. परंतु आता ही बाब आम्ही लवकरात लवकर मंत्रिमंडळा समोर आणू आणि येत्या 3 महिन्यामध्ये याबाबत निर्णय होईल एवढे मी सांगू इच्छितो.

यानंतर श्री.बरवड . . ..

अशुद्धीत पत्र / मुद्रणेसाठी नाही

श्री. वसंतराव खोटरे : माननीय मुख्यमंत्री त्या बैठकीमध्ये आयोगाप्रमाणे देण्यास अनुकूल होते की नाही ?

श्री. डी.पी.सावंत : सभापती महोदय, सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक विचार केला जाईल असे म्हटले होते. यामध्ये फायनान्शियल इम्लीकेशन्स फार आहेत. नियुक्तीच्या दिनांकापासून सेट-नेट केले तर 400 कोटी रुपयांचा भार शासनावर पडतो आणि जर आपण काल्पनिक तारीख देऊन त्या दिवसानंतर केले तर 200 कोटी रुपयांचा भार पडतो. त्यामुळे ही बाब मंत्रिमंडळासमोर आणल्याशिवाय निर्णय होणे शक्य नाही. मी सांगितल्याप्रमाणे येत्या तीन महिन्यांमध्ये शासनातर्फे सकारात्मक निर्णय घेतला जाईल.

श्री. सतीश चव्हाण : सभापती महोदय, उत्तरामध्ये आधी अनुकूल उत्तर दिलेले आहे पण याची अंमलबजावणी कधी करणार याचे ठोस उत्तर यामध्ये दिसत नाही. 1991 ते 1999 या काळात बिगर नेट-सेट धारक लागले होते त्यावेळी नेट-सेट धारक मिळत नव्हते म्हणून त्यांना सेवेत घेतले आणि शासनाने सुध्दा त्यांना मान्यता दिलेली आहे. इतके दिवस राज्य शासन असे सांगत होते की, युजीसीने मान्यता दिली तर आम्ही त्याला मान्यता देऊ. या ठिकाणी शासनाने मान्य केले आहे की, विद्यापीठ अनुदान आयोगाने नेट-सेट अर्हतेतून सूट दिली आहे. मग राज्य शासन ताबडतोब हे का मान्य करीत नाही, शासन किती दिवसात हे मान्य करणार ? दुसरा विषय थकबाकीच्या संदर्भात आहे. केंद्र शासनाने असे सांगितले आहे की, राज्य शासनाने अर्थसंकल्पात तरतूद करावी. येत्या बजेटमध्ये शासन तरतूद करणार का ? तिसरा प्रश्न आपण ज्याचे नेतृत्व करता त्या नांदेड विद्यापीठाशी संबंधित आहे. नांदेडच्या जॉइन्ट डायरेक्टर यांनी काही प्रकरणांमध्ये 1991 ते 1999 या काळामध्ये जे बिगर नेट-सेट धारक होते त्यांना रुजू दिनांकापासून मान्यता दिली होती. त्याप्रमाणे त्यांचा पगारही चालू केला होता. परंतु आता त्याची वसुली चालू केली आहे. शासन हे मान्य करते की, युजीसीने मान्यता दिली आणि आम्ही सुध्दा मान्यता देऊ तर ही वसुली शासन थांबविणार का ?

श्री. डी.पी.सावंत : सभापती महोदय, मी मघाशी उत्तर दिले की, कोणत्या तारखेपासून नेट-सेट लागू करावयाचे हा सुध्दा कॅबिनेटचा निर्णय राहील. कारण यामध्ये फायनान्शियल इम्लीकेशन्स आहेत. 80 टक्केच्या बाबतीत आपण युजीसीला लिहिले होते आणि युजीसीने

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

श्री. डी.पी.सावंत ....

सांगितले की, आपण हे पहिल्यांदा द्यावे. हे पहिल्यांदाच होत आहे. याच्या अगोदर चौथ्या आणि पाचव्या वेतन आयोगाच्या वेळी युजीसीने आपल्याला ॲडव्हान्समध्ये पैसे दिले होते. आता जवळजवळ 1526 कोटी रुपयांचा भार आहे आणि आपली तरतूद नसल्यामुळे बजेटमध्ये तरतूद केल्याशिवाय ते देता येणार नाही. म्हणून येणाऱ्या कॅबिनेटमध्ये यावर निर्णय घेऊन ते करण्याचा प्रयत्न करीत आहोत.

श्री. नागो पुंडलिक गाणार : सभापती महोदय, विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेल्या आदेशाचे पालन करणे राज्य शासनाला बंधनकारक असताना आणि 1999 ते 2010 पर्यंतच्या सर्व बिगर नेट-सेट प्राध्यापकांना कालबध्द पदोन्नतीचे लाभ देण्याबाबत विद्यापीठ आयोगाने निर्देश दिले असताना त्याचे पालन राज्य शासनाने का केले नाही आणि ते करणार आहे की नाही, करणार असेल तर ते किती दिवसात करणार ?

.श्री. डी.पी.सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. नागो पुंडलिक गाणार यांनी सांगितल्याप्रमाणे युजीसीने जरी सांगितले असले तरी आम्ही नक्कीच या बाबतीत सकारात्मक विचार करीत आहोत. आपण सांगितल्याप्रमाणे अनेक प्राध्यापकांना आपण संधी दिली होती की, या दहा ते पंधरा वर्षाच्या कालावधीमध्ये त्यांनी नेट-सेट करावे, पी.एचडी करावी आणि क्वालिफाय व्हावे. त्यांच्यापैकी काही प्राध्यापक क्वालिफाय झाले पण आजही काही प्राध्यापक नेट-सेट होऊ शकलेले नाहीत. परंतु त्यांना शासनाने वाऱ्यावर सोडलेले नाही. युजीसीने सांगितल्याप्रमाणे त्या तारखेपासून जर त्यांना सवलत द्यावयाची असेल तर त्याप्रमाणे आपल्याला बजेट प्रोव्हीजन करावी लागणार आहे. हा केवळ कॅबिनेटचा निर्णय असणार आहे. विभागातर्फे आणि कॅबिनेटकडे अतिशय सकारात्मक प्रस्ताव पाठविलेला आहे. मी सांगितल्याप्रमाणे येत्या तीन महिन्यांच्या काळामध्ये या सर्व बाबतीत आम्ही निर्णय घेऊ.

डॉ. अपूर्व हिरे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, नेट-सेटच्या अगेन्स्ट सवलत दिलेली आहे. जे पी.एचडी झाले नाहीत परंतु एम.फिल झाले त्यांना विद्यापीठाने एम.फिल झाल्यानंतर परमनंट अप्रूव्हल दिलेले आहे. दुसरीकडे जॉइन्ट डायरेक्टर यांनी 8000 रुपये वेतनानुसार त्यांचा जो पगार सुरु झाला त्याची माहिती घेऊन त्यांची रिकव्हरी सुरु केलेली आहे. एकीकडे शासनाची एक यंत्रणा त्यांना परमनंट ॲप्रूव्हल देते

.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अपूर्व हिरे...

आणि दुसरीकडे त्याच्या सर्व्हिसेसचा प्रश्न निर्माण करतो. तेव्हा या बाबतीत शासन काय भूमिका घेणार आहे ?

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. जयवंतराव जाधव)

श्री. डी.पी.सावंत : ही गोष्ट खरी आहे की एमफिल झालेल्या प्राध्यापकांच्या बाबतीत मध्यंतरी युजीसीने एक सर्क्युलर काढले होते. त्याद्वारे एमफिल झालेल्यांना क्वालिफाय केले होते. त्यानंतर ते सर्क्युलर रोल बॅक केले. जे एमफिल झालेले आहेत त्यासंर्भात नक्की वेगळा विचार करण्यात येईल.

तालिका सभापती : सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.30 वाजता पुन्हा भरेल.

(दुपारी 1.01 ते 1.30 पर्यन्त सभागृहाची बैठक स्थगित झाली.)

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

पृ.शी.मु.शी.: तोंडी उत्तरे

खामगांव (जि.बुलढाणा) येथील सामान्य रूग्णालयातील डॉक्टरांची रिक्त पदे भरण्याबाबत

(1) * 34014 श्री.पांडुरंग फुंडकर : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) खामगांव (जि.बुलढाणा) येथे असलेल्या उपजिल्हा सामान्य रूग्णालयातील डॉक्टरांची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर पदे भरण्यासाठी शासनाकडून कोणती उपाययोजना करण्यात येणार आहे वा करण्यात येत आहे,

(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा.फौजिया खान,श्री.सुरेश शेट्टी यांच्याकरिता : (1) हे अशंत: खरे आहे.

खामगांव (जि.बुलढाणा) येथील सामान्य रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी गट-अ वर्ग-1 च्या मंजूर 15 पदांपैकी 6 पदे भरलेली असून 9 पदे रिक्त आहेत. तसेच वैद्यकीय अधिकारी गट-अ च्या मंजूर 15 पदांपैकी 8 स्थायी, 1 बंधपत्रीत व 6 अस्थायी वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत.

(2) गट-अ वर्ग-1 संवर्गातील रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याबाबत विभागीय पदोन्नती समितीची बैठक झाली असून पुढील कार्यवाही सुरु आहे. तसचे वैद्यकीय अधिकारी गट-अ ची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(3) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, खामगाव येथील सामान्य रुग्णालय खूपच जुने आहे. माननीय श्री.शरद पवार हे पुलोदच्या वेळी मुख्यमंत्री होते, त्यावेळी सदर रुग्णालय सुरु करण्यात आले होते. आता त्या रुग्णालयाची अवस्था अतिशय वाईट आहे. या रुग्णालयासाठी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

वर्ग-1 ची 15 पदे मंजूर होती, त्यापैकी 6 पदे भरण्यात आलेली असून 9 पदे रिक्त आहेत. वर्ग-2 वैद्यकीय अधिकाऱ्यांची एकूण 37 पदे मंजूर होती, प्रत्यक्षात 24 पदे भरण्यात आलेली असून अजूनही 13 पदे रिक्त आहेत. वर्ग 4 ची 61 पदे मंजूर होती, प्रत्यक्षात 55 पदे भरली असून अजूनही 6 पदे रिक्त आहेत. वर्ग-3 ची 32 पदे रिक्त आहेत. बुलढाणा जिल्हयातील खामगाव, शेगाव, रामपूर, जळगांव, नांदुरा इतके तालुके कव्हर करणारे हे रुग्णालय आहे. या रुग्णालयाकडे शासनाने पूर्णपणे दुर्लक्ष केलेले आहे. या रुग्णालयात सर्व मशिनरीज् आहेत, परंतु त्यासाठी लागणारे तंत्रज्ञ नाहीत. त्या ठिकाणचे एक्स-रे मशीन बंद आहे. नाक-कान-घसा या विभागास वैद्यकीय अधिकारी नसल्यामुळे तो विभाग पूर्णपणे बंद आहे. ॲर्थोपेडीक सर्जन त्या ठिकाणी नाही. चर्मरोग तज्ज्ञ नाही, या रुग्णालयातील प्रत्येक विभागातील पदे रिक्त आहेत. सन्माननीय मंत्री महोदयांनी लेखी उत्तरात म्हटले आहे की, गट-अ वर्ग-1 संवर्गातील रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याबाबत विभागीय पदोन्नती समितीची बैठक झाली असून पुढील कार्यवाही सुरु आहे. ही सर्व पदे केव्हापासून रिक्त आहेत, अद्यापपर्यंत ती पदे न भरण्याची कारणे काय आहेत, विभागीय पदोन्नती समितीची बैठक कोणत्या तारखेस झाली, या बैठकीला कोण कोण अधिकारी उपस्थित होते, या बैठकीत रिक्त पदे भरण्याबाबत काय निर्णय झाला व किती कालावधीत ही पदे भरली जाणार आहेत ?

प्रा.फौजिया खान : बुलढाणा जिल्हयातील खामगाव येथे 220 खाटांचे हे सामान्य रुग्णालय आहे. यात 200 खाटांचे सामान्य रुग्णालय आणि 20 खाटांचे ट्रामा केअर युनीट आहे. या स्पेशालिस्ट केडर आहे, त्यातील 15 पदे मंजूर असून त्यातील 6 पदे भरलेली आहेत व 9 पदे रिक्त आहेत. नेत्रशल्य चिकित्सकांची पदे भरण्याकरिता दिनांक 17.11.2012 रोजी विभागीय पदोन्नती समितीची बैठक झाली. कान-नाक-घसा या विभागातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्यासंदर्भात दिनांक 31.10.2012 रोजी विभागीय पदोन्नती समितीची बैठक घेण्यात आली आहे. क्ष-किरण तज्ज्ञ व शारीरिक विकृती तज्ज्ञ ही पदे भरण्यासाठी दिनांक 17.11.12 रोजी विभागीय पदोन्नती समितीची बैठक झाली. क्षय रोग चिकित्सक, चर्मरोग चिकित्सक ही पदे भरण्यासाठी दिनांक 31.10.12 रोजी विभागीय पदोन्नती समितीची बैठक झाली. वैद्यकीय अधिकाऱ्यांची 14 पदे मंजूर आहेत. ती सर्व पदे भरलेली आहेत.

यानंतर श्री. भोगले....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, चुकीची माहिती सभागृहासमोर येत आहे. 15 वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे भरली आहेत असे मंत्री महोदयांनी सांगितले. ट्रॉमा केअर युनिटमधील वर्ग 2 ची गट अ मधील 2 पदे व गट ब मधील 13 अशी 15 पदे रिक्त आहेत. वर्ग 1 ची 9 पदे व वर्ग 2 ची गट ब मधील 13 पदे, वर्ग 3 ची जवळपास 32 पदे व वर्ग 4 ची 6 पदे रिक्त आहेत. संपूर्ण युनिट बंद असल्यासारखी परिस्थिती आहे. 6 तालुक्यातील रुग्ण तेथे उपचारासाठी येत असतात, त्यांना योग्य ती रुग्णसेवा मिळत नसल्यामुळे अकोला जिल्हा रुग्णालयात शिफ्ट करावे लागते. वर्षानुवर्षे ही रिक्त पदे भरण्याची मागणी केली जात आहे. तेथील वैद्यकीय अधिकारी दर महिन्याला उपसंचालक, सह संचालक यांच्याकडे प्रस्ताव सादर करतात, परंतु त्याकडे लक्ष दिले जात नाही. वर्ग 1 ते 4 मधील ही रिक्त पदे किती कालावधीत भरली जातील?

प्रा.फौजिया खान : वर्ग 1 ची 9 पदे अतिरिक्त मुख्य सचिवांच्या सांगण्यानुसार 15 फेब्रुवारी, 2013 पर्यंत भरण्यात येणार आहेत. उर्वरित पदे भरण्याची प्रक्रिया सुरु आहे. आज सकाळी लक्षवेधी सूचनेवरील चर्चेच्या अनुषंगाने माननीय सार्वजनिक आरोग्यमंत्र्यांनी सभागृहात आश्वासन दिले आहे. आरोग्य विभागातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे लवकरात लवकर भरण्याचे काम राज्यामध्ये सुरु आहे, त्यानुसार या रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : वर्ग 3 मधील 32 पदे रिक्त आहेत. त्यामुळे वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे भरली गेली तरी वर्ग 3 मधील कर्मचाऱ्यांअभावी तेथील रुग्णसेवेमध्ये अडचणी येणार नाहीत काय? वर्ग 3 आणि वर्ग 4 मधील रिक्त पदे तातडीने भरुन हे रुग्णालय रुग्णसेवेसाठी सज्ज ठेवण्याच्या दृष्टीने लक्ष दिले जाईल काय?

प्रा.फौजिया खान : फेब्रुवारी, 2013 पर्यंत सर्व पदे भरण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

उप सभापती : मंत्री महोदयांनी प्रयत्न करणार आहोत असे उत्तर दिले आहे. "प्रयत्न" हा शब्द वापरला म्हणजे ते मोघम असल्याचे म्हणता येईल. बहुतेक सरकारी विभागांमध्ये आपल्याला असे पहावयास मिळते आणि मला देखील हे जाणवले आहे. विभागामार्फत परीक्षा घेतली जाते आणि तीन-चार वर्षे परीक्षेचा निकाल जाहीर होत नाही. तीन-चार वर्षानंतर आपल्याला हव्या त्या नावाचा निकाल जाहीर होतो. चार वर्षापूर्वी परीक्षा झाली आणि आता निकाल जाहीर केला जाणे

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

हा शासनाच्या प्रशासनामधील गोंधळ मंत्री महोदयांनी थांबविला पाहिजे. याची गंभीर दखल घेतली पाहिजे. अधिकाऱ्यांच्या मनाजोगी पद भरती होते. चार वर्षापूर्वी झालेल्या परीक्षेचा निकाल मंत्री महोदयांना माहित नसतो. मंत्री महोदय एका खात्यातून दुसऱ्या खात्यात बदलून गेलेले असतात. नव्याने पदभार स्वीकारलेल्या मंत्री महोदयांना याची माहिती नसते. हे अतिशय गंभीर आहे. मंत्री महोदयांनी हा प्रकार थांबविला पाहिजे. काय काय झाले, कसे कसे झाले याचे मी स्पेसिफिक उदाहरण देऊ शकतो.

श्री.विनायक राऊत : सभापती महोदय, आपण शासनाला निदेश दिले त्याबद्दल मी आपले आभार मानतो. संपूर्ण ग्रामीण भागातील रुग्णालये आजारी पडलेली आहेत. माननीय सदस्यांनी खामगाव येथील रुग्णालयाबाबतचा प्रश्न उपस्थित केल्यानंतर शासनाने दिनांक 17.11.2012 रोजी निवड समिती नेमली आहे. निवड समितीने किती क्वालिफाईड उमेदवारांच्या शिफारशींचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे? आज महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील रुग्णालये आजारी पाडण्याचे काम शासनाकडून केले जात आहे काय? ग्रामीण भागातील आरोग्य संस्थांमधील डॉक्टरांची रिक्त पदे 15 फेब्रुवारी, 2013 पर्यंत भरली जातील असे ठोस आश्वासन मंत्री महोदय सभागृहाला देतील काय?

प्रा.फौजिया खान : आज सकाळी लक्षवेधी सूचनेवरील चर्चेच्या अनुषंगाने सार्वजनिक आरोग्यमंत्र्यांनी सभागृहात स्पष्टपणे सांगितले की, महाराष्ट्रातील सर्व रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

नंतर श्री.जुन्नरे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 34014....

श्री. विजय गिरकर : सभापती महोदय, 31.10.2010 रोजी बैठक झाली होती. परंतु 2 वर्षे उलटून सुध्दा अद्याप पर्यंत पदे भरली गेली नाहीत. त्यामुळे दोन वर्ष उलटून गेलेली असतांना सुध्दा लवकरात लवकर ही पदे भरण्यात येतील अशा प्रकारे जे उत्तर देण्यात आले आहे ते योग्य आहे काय ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात 31.10.2010 रोजी बैठक इ ाली नव्हती तर ही बैठक 2012 रोजी झाली होती व पुढील कार्यवाहीची प्रक्रिया सुरु झालेली आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

चारकोप-वांद्रे-मानखुर्द च्या प्रकल्पातील जागा सीआरडीझेडमध्ये येत असल्याबाबत

(२) * ३३६६१ ॲड.आशिष शेलार , श्री.विनोद तावडे , श्री.चंद्रकांत पाटील , श्री.रामनाथ मोते , श्री. विजय गिरकर : तारांकित प्रश्न क्रमांक २८००० ला दिनांक ११ एप्रिल, २०१२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चारकोप - वांद्रे - मानखुर्द या मेट्रो-२ च्या प्रकल्पातील काही जागा सीआरझेड मध्ये येत असल्यामुळे, केंद्रीय पर्यावरण विभागाने राज्य सरकारला नव्याने सर्वेक्षण करण्याची सूचना दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पातील काही जागा सीआरझेड मध्ये येत असल्यामुळे यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संजय देवतळे : (१) केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने या प्रकल्पास सीआरझेडच्या अनुषंगाने दिनांक २० डिसेंबर, २०११ रोजी अनुमती दिलेली आहे. तथापि, मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाने (एम.एम.आर.डी.ए.) सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा सीआरझेड क्षेत्रात उभारण्यासाठी या अनुमतीमध्ये सूट देण्याविषयी केंद्र शासनाला केलेल्या विनंतीस अनुसरून याबाबत नव्याने सर्वेक्षण करण्याची सूचना केंद्र शासनाने मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणास केलेली आहे, हे खरे आहे.

(२) नवीन सागरतटीय क्षेत्र विनियम (सीआरझेड) अधिसूचना, २०११ नुसार नवीन सीआरझेड नकाशा तयार करण्यासाठी सर्वेक्षणाचे काम केंद्र शासनाने प्राधिकृत केलेल्या आय.आर.एस. चेन्नई या संस्थेमार्फत प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, मेट्रो प्रोजेक्ट हा मुंबई शहरासाठी अतिशय महत्वाचा आहे. दि. १८ ऑगस्ट, २००९ रोजी त्यावेळेचे माजी राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते भूमिपूजन झाले होते. मेट्रो वन प्रोजेक्ट अजूनही पूर्ण झालेला नाही. मेट्रो २ ची वर्क ऑर्डर २०११ रोजी दिली असून त्यामध्ये ३१ कि.मी. अंतर असून त्यासाठी ७६६६ कोटी रुपये खर्च येणार आहे. हा प्रोजेक्ट कॉस्टवाईज, मुंबई शहरासाठी अतिशय महत्वाचा असून ट्रान्स्पोर्टच्या दृष्टीनही अतिशय महत्वाचा आहे. या कामाचे टेंडर रिलायन्स कंपनीला देण्यात आलेले आहे. त्यामुळे कॉस्टींग यार्डवर डेपोसाठी केंद्रीय पर्यावरण खात्याची परवानगी अद्यापही मिळालेली नाही हे खरे आहे काय ? इंडियन रेल्वेवरुन मेट्रो रेल जाणार आहे त्यामुळे सेंट्रल रेल्वेला कुर्ला स्टेशनवर तर पश्चिम रेल्वेला बांद्रा स्टेशनसाठी परवानग्या मिळाल्या नाहीत हे खरे आहे काय ? जूहू येथून सुध्दा मेट्रो रेल जाणार आहे. त्यामुळे एअरपोर्ट ॲथोरिटीने सुध्दा परवानगी दिली नाही हे खरे आहे काय ? ..३..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार ...

मेट्रो ३ चा प्रोजेक्ट कुलाब्या पासून एअरपोर्ट पर्यंत जाणार आहे, हा मार्ग अंडरग्राऊंड आहे, सबर्ब आणि शहरातून अंडरग्राऊंड रेल्वे गेली पाहिजे यासाठी आंदोलन सुरु आहेत, पीआयएल दिलेले आहेत. त्यामुळे मेट्रो ३ चा जो अंडरग्राऊंड प्रोजेक्ट आहे त्याबरोबर मेट्रो-२ चा प्रोजेक्ट मर्ज करावा अशी मागणी आली असेल तर शासन त्याचा विचार करणार आहे काय ?

श्री. संजय देवतळे : सभापती महोदय, मेट्रो २ चा प्रकल्प चारकोप-बांद्रा-मानखुर्द असून या प्रोजेक्टला पर्यावरणाची परवानगी केंद्रशासनाच्या पर्यावरण विभागाने २० डिसेंबर रोजी दिलेली आहे. या प्रकल्पाला परवानगी देत असतांना पर्यावरण विभागाने काही अटी टाकलेल्या आहेत. चारकोप-मानखुर्द येथे मेंटेनन्स आणि रिपेअरिंगसाठी कारशेड प्रस्तावित करण्यात आले होते. त्यामुळे प्रस्तावित करण्यात आलेल्या कारशेडच्या ठिकाणी त्यांनी फक्त वाहनतळ उभारावे. मेन्टेनंस व रिपेअरिंग करता येणार नाही. जे वाहनतळ उभारावयाचे आहे ते स्टील टू वर्क उभारावे अशा काही अटी होत्या. ज्यांनी टेंडर घेतलेले होते त्यांनी या अटी तपासल्यानंतर बांधकाम सुरु करण्यास असमर्थता दर्शवली. ज्या अटी घालण्यात आलेल्या आहेत त्यामुळे खर्च वाढणार होता. यासंदर्भात एमएमआरडीए व माननीय मुख्यमंत्र्यांनी केंद्रीय पर्यावरण मंत्र्यांना विशेष बाब म्हणून परवानगी द्यावी अशी विनंती केली होती परंतु ३ सप्टेंबर, २०१२ रोजी केंद्रीय पर्यावरण मंत्र्यांचे पत्र आले होते की, सीआरझेडचे नवीन नोटीफिकेशन २०११ रोजी निघाले असून त्यानुसार परवानगी देता येत नाही. त्यामुळे मॅपिंग करण्याची प्रक्रिया सुरु आहे. मॅपिंग करुन घेण्याची सूचना पर्यावरण मंत्र्यांनी केलेली आहे. सर्वेक्षण करुन हा विषय सीआरझेमधून बाहेर निघू शकतो काय याबाबत त्यांनी सूचना केलेली आहे.

यानंतर श्री. ओटवणेकर ....

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.33661

श्री.संजय देवतळे....

सीआरझेड 2011 नुसार आपण हे काम इन्स्टिटयूट ऑफ रिमोट सेसिंग,चेन्नई या संस्थेला दिलेले आहे. ते काम साधारणपणे मार्च 2013 पर्यंत पूर्ण होईल. जुना नकाशा 1:25 हजार स्केलचा होता. त्यात स्पष्टता नव्हती. आता 1:4 हजार प्रमाणे गाव नकाशे करण्याची कार्यवाही सुरू आहे. त्यामुळे स्पष्टता येईल. त्यानंतर मग हा भाग सीआरझेड I, II मध्ये येतो किंवा बाहेर येतो हे ठरविण्यात येईल. तद्नंतर मग MMRDA चा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठवून मंजुरी मिळण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील.

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, 100 मीटर, 1 मीटर नंतर कॉस्ट बदलू शकते. आपण रिलायन्सला टेंडर दिले आहे. आपण जो रूट प्रस्तावित केला होता त्यास केंद्र शासनाने परवानगी दिली नाही. त्यामुळे आता नवीन मॅपिंग करण्यात येत आहे. कार डेपो आणि कार कास्टींगला केंद्र शासनाची परवानगी मिळाली नाही. हा भाग सीआरझेड मध्ये येत असल्यामुळे परवानगी मिळू शकत नाही असे मंत्रिमहोदयांनी स्वत: सांगितले आहे. रिलायन्स या कामाचा कंत्राटदार असल्यामुळे व त्यांने या कामास असमर्थता दाखविली असल्यामुळे आपण त्यांना नोटीस दिली आहे. माझा प्रश्न असा आहे की, रूट ठरलेला नाही, सीआरझेड मॅपिंग झालेले नाही त्यामुळे रूट अल्टर होऊ शकतो. कंत्राटदराने असमर्थता दाखविली असल्यामुळे नोटीस देण्यात आली आहे. तेव्हा रिलायन्सला दिलेले काम शासन रद्द करणार आहे काय ?

श्री.संजय देवतळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जे प्रश्न विचारले आहेत ते पर्यावरणाच्या परवानगी संबंधातील आहेत. पहिला व दुसरा मेट्रो प्रकल्प आहे त्यातील हा एकत्रित प्रस्ताव आहे. पहिले काम वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर मेट्रोचे आहे. हे काम 95 टक्के पूर्ण झालेले आहे. हे काम सन 2013 मध्ये पूर्ण होईल. सीआरझेड-II च्या कामामध्ये कारशेड प्रस्तावित करण्यात आली आहे. यामध्ये देखभाल करण्यात येणार आहे. जेव्हा परवानगी मागितली तेव्हा हा भाग सीआरझेड मध्ये येत असल्याचे निदर्शनास आले. सीआरझेड 2011 च्या अधिसूचनेनुसार सीआरझेड I मध्ये कुठलेच काम अलाऊड नाही. फक्त स्टील्ट वर्क बांधण्यास परवानगी आहे. मॅपिंग केल्यानंतर हा भाग सीआरझेड II मध्ये गेला तर मग देखभाल करता येईल. जो पर्यंत मॅपिंग करत नाही तो पर्यंत सत्यता कळणार नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी स्पेसिफिक प्रश्न विचारला आहे. त्याचे आपण उत्तरच दिलेले नाही. सर्व अडचणी लक्षात घेऊन कंत्राटदाराने असमर्थता दर्शविली आहे. त्यामुळे त्या कंत्राटदाराचे लायसेन्स शासन रद्द करणार आहे काय ? त्यासाठी दुसरी प्रक्रिया काय करणार आहात ? ह्या दोन प्रश्नाचे उत्तर माननीय मंत्र्यांनी द्यावे.

श्री.संजय देवतळे : सभापती महोदय, कार शेड हा या प्रकल्पातील भाग आहे. कार शेडच्या कामाला केंद्रीय पर्यावरण विभागाची अजून पर्यंत परवानगी आलेली नाही. त्यामुळे त्यांनी या कामाबद्दल असमर्थता दाखविली आहे. त्यासाठी पर्यावरण विभागाची परवानगी आवश्यक आहे. येथे स्टील्टचे काम करावयाचे आहे. त्यासाठी अतिरिक्त खर्च येणार आहे. त्यामुळे माननीय मुख्यमंत्र्यांनी स्वत: लक्ष घातले असून केंद्रीय पर्यावरण मंत्र्यांना विनंती केली आहे की, विशेष बाब म्हणून परवानगी देण्यात यावी. सीआरझेड 2011 ची मॅपिंगची प्रक्रिया पूर्ण झाल्याशिवाय करता येणार नाही अशी सूचना केंद्रीय पर्यावरण विभागाने केली आहे. त्या दृष्टीने राज्य शासनाच्या पर्यावरण विभागातर्फे चेन्नई येथे मॅपिंगचे काम सुरू आहे. त्यामुळे आम्ही MMRDA ला कळविले आहे की, आपण ऑन लाईन द्वारे ज्या कंपन्यांची नावे दिली आहेत त्यांनी स्वत:च्या स्तरावर वेगळे काम केले तर बरे होईल. जो पर्यंत परवानगी येत नाही तो पर्यंत निर्णय घेता येणार नाही.

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, कार शेड व कास्टींग यार्डचा भाग हा सीआरझेड मध्ये येतो अशी जी माहिती माननीय मंत्री महोदय देत आहेत ती खरी आहे. त्यासाठी ते स्टील्टचे उदाहरण देत आहेत हे खरे आहे. मेट्रो-2 प्रकल्पातील रूटची काही जागा सीआरझेड-II मध्ये येते असे MMRDA च्या कमिशनरांनी सांगितले आहे. त्यामुळे आता दोन वेगवेगळे प्रश्न आहेत. सीआरझेड मध्ये कास्टींग यार्ड येणे हा एक भाग. रूट मधील काही भाग येणे हा दुसरा भाग.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.33661...

ॲड.आशिष शेलार...

या दोन्ही गोष्टींसाठी सीआरझेडची आवश्यकता नसेल आणि आपण आता मॅपिंग करता याचा अर्थ कास्टींग यार्ड वेगळ्या ठिकाणी होऊ शकतो, रुट मॅपमध्येसुध्दा बदल होऊ शकतो. अशा परिस्थितीमध्ये त्या टेंडरची सेन्सीटी काय राहणार ? तेव्हा या दोन्ही गोष्टी सीआरझेडमध्ये येत असतील आणि ठेकेदार कामा बाबत असमर्थता व्यक्त करीत असेल तर शासन त्यांच्यावर कारवाई करणार काय ?

श्री.संजय देवतळे : सभापती महोदय, हा 31 कि.मी.चा रुट आहे. मानखुर्द आणि चारकोप ही शेवटची दोन टोके आहेत. त्या ठिकाणी कारशेड होणार आहे आणि त्याच ठिकाणी सीआरझेडच्या परवानगीची आवश्यकता आहे. केंद्र शासनाकडून परवानगी मिळालेली नाही. तेव्हा ही परवानगी मिळविणे हे राज्य शासनाचे काम आहे व तसे राज्य शासनाचे प्रयत्न सुरु आहेत.

उप सभापती : ता.प्र.क्र. 34374.

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

औरंगाबाद जिल्हयातील पैठण येथे संतपीठाची प्रशासकीय इमारत नऊ वर्षापासून उद्घाटनाच्या प्रतिक्षेत असल्याबाबत

(4) * 33905 प्रा.सुरेश नवले , श्री.संजय दत्त , डॉ.सुधीर तांबे : सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) औरंगाबाद जिल्हयातील पैठण येथे संतपीठाची प्रशासकीय इमारत नऊ वर्षापासून उदघाटनाच्या प्रतीक्षेत असून वापरात नसल्याने सदर इमारतीची दुरवस्था झाल्याचे माहे ऑगस्ट, 2012 मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर प्रशासकीय इमारत बांधून विनावापर पडून का आहे याबाबतची चौकशी करण्यात आली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर प्रशासकीय इमारत शासकिय कामासाठी वापरण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(4) अद्याप याबाबत कोणतीच कार्यवाही होत नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.संजय देवतळे : (1) अंशत: खरे आहे. संतपीठाच्या इमारतीचे बांधकाम सन 2008-09 मध्ये पूर्ण झाले आहे.

(2) व (3) ज्ञानेश्वर उद्यानाची जागा जायकवाडी पक्षी अभयारण्यासाठी अधिसूचित केली आहे. संत ज्ञानेश्वर उद्यानाची जागा संतपीठासह पक्षी अभयारण्यातून वगळण्याबाबत मा.सर्वोच्च न्यायालय येथे वाद सुरु होता. सदर प्रकरण न्याप्रविष्ठ असल्याने संतपीठाच्या प्रशासकीय इमारतीचे बांधकाम पूर्ण होऊनही संतपीठाचे कामकाज सुरु करता आलेले नाही. यासंदर्भात राष्ट्रीय वन्यजीव बोर्डाने प्रस्तावित केलेल्या 6 अटींची पूर्तता करण्याच्या अधीन राहून संत ज्ञानेश्वर उद्यानाची जागा संतपीठासह पक्षीअभयारण्यातून वगळण्याचा निर्णय मा. सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. या अटींची पूर्तता झाल्यानंतर संत ज्ञानेश्वर उद्यानाची जागा संतपीठासह पक्षीअभयारण्यातून वगळण्याबाबतची अधिसूचना वन विभागामर्फत प्रसिध्द करण्यात येईल. त्यानंतर संतपीठ कार्यान्वित करणे शक्य आहे. अटींच्या पूर्ततेची कार्यवाही जलसंपदा विभागामार्फत सुरु आहे.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

..3.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या अटींची पूर्तता झाल्यावरच हे काम होऊ शकते हे समजण्यासारखे आहे. पण यासाठी काही कालमर्यादा ठरविण्यात आली आहे काय, किंवा हे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी एक मॉनेटरींग समिती नेमण्यात आली आहे काय ?

श्री.संजय देवतळे : सभापती महोदय, राष्ट्रीय वन्यजीव बोर्डाने सहा अटी टाकल्या आहेत त्याची पूर्तता झाल्यानंतरच पुढील परवानगी देण्यात येईल. यातील प्रमुख अट म्हणजे या कामासाठी निधी देण्याबाबतची होती. स्टेट ऑफ आर्ट इंटरप्रिटेशन सेंटर निर्माण करावे अशी एक अट होती. त्यासाठी 201.92 लाख रुपये इतक्या निधीची मागणी उप वन्यजीव संरक्षक, औरंगाबाद यांनी केली होती. त्यापैकी दिनांक 30.4.2011 रोजी 64.98 लाख इतका निधी दिलेला आहे. उर्वरित 136.94 लक्ष रुपये देण्याबाबत माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी बैठक घेऊन निधी देण्याबाबत संबंधितांना सूचना दिलेल्या आहेत. निधीची उपलब्धता झाल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभाग काम करेल. हे बांधकाम पूर्ण झालेले आहे असे जलसंपदा विभागास न्यायालयात सादर करावे लागेल. त्यानंतर त्यास परवानगी मिळेल. तेव्हा लवकर निधी उपलब्ध करुन दिल्यावर ते काम लवकर पूर्ण होईल.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, औरंगाबाद जिल्ह्यातील पैठण येथे संतपीठाची प्रशासकीय इमारत उभारुन तीन-चार वर्षे झालेली आहेत. ही जमीन अभायारण्यामध्ये येत होती तर शासनाने इतक्या मोठ्या प्रमाणावर निधी खर्च का केला ? ती इमारत आता मोडकळीस आलेली आहे. तेव्हा त्याबाबत शासनाचे काय धोरण आहे ?

श्री.संजय देवतळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी सांगितले की, ती इमारत मोडकळीस आलेली आहे. परंतु तशी वस्तुस्थिती नाही. माझ्याकडे त्या इमारतीचे लेटेस्ट फोटो उपलब्ध आहेत. त्या इमारतीच्या सभोवताली झाडेझुडपे वाढलेली आहेत. सन 2001 पासून काम झालेले आहे. सन 2004 मध्ये एक मच्छीमार संस्था कोर्टामध्ये गेली. त्यावेळी या बाबी लक्षात आल्या. यामध्ये अभयारण्याचा काही परिसर येतो. हे लक्षात आल्यानंतर त्यानुसार कामास सुरुवात झालेली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.33905...

श्री.सतीश चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी तीन-चार वर्षाचा उल्लेख केला. संतपीठ स्थापन करण्याचा निर्णय तीस वर्षापूवी झालेला आहे. माझा पहिला प्रश्न आहे की, संतपीठाची इमारत नेमकी कोणत्या विभागाच्या अखत्यारितील आहे ? कारण एकही विभाग त्या इमारतीची जबाबदारी घेण्यास तयार नाही. उत्तरात नमूद करण्यात आले आहे की, जलसंपदा विभाग कार्यवाही करीत आहे. ही इमारत सांस्कृतिक कार्य विभागाच्या अखत्यारित आहे, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित आहे की उच्च शिक्षण विभागाच्या अखत्यारित आहे,

यानंतर श्री.सरफरे..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 33905....

श्री. सतीश चव्हाण...

की, उच्च शिक्षण विभागाच्या ताब्यात आहे हा माझा पहिला प्रश्न आहे. दुसरा प्रश्न असा की, अभ्यासक्रम समिती स्थापन केल्याचे तीन-चार वर्षापूर्वी जाहीर केले. त्या समितीचे अध्यक्ष डॉ. यु.म. पठाण यांना नेमण्यात आले. त्यांचे वय 84 वर्षे असतांना सुध्दा त्यांनी संमती दिली आहे. परंतु शासनातर्फे त्यांना अजूनपर्यंत अधिकृतरित्या कळविण्यात आलेले नाही. मंत्रालयातील सेक्रेटरी त्यांना मिटींग घेण्यासाठी फोन करतात. या वयामध्ये त्यांनी कुठे जाऊन मिटींग घ्यायची? अभ्यासक्रम समितीची पहिली बैठक केव्हा होणार आहे? डॉ. यु.म. पठाण यांना समितीचे अध्यक्ष नेमल्याबाबत अधिकृतपणे केव्हा कळविणार आहात?

श्री. संजय देवतळे : सभापती महोदय, औरंगाबाद जिल्ह्यातील पैठण येथे संतपीठ स्थापन करण्याबाबतचा निर्णय दि.6.12.1994 रोजी घेण्यात आला आहे. सन 2001 मध्ये त्याला मंजुरी देण्यात आली आणि त्याचे काम सुरु झाले आहे. यामध्ये 6 कोटी 61 लक्ष रुपयांच्या अंदाजपत्रकास 11.1.2001 च्या शासन निर्णयाप्रमाणे प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्याकरिता 470 लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात आला. सन 2008-09 पर्यंत काम पूर्ण झाले आहे. त्यानंतरचे काम न्यायालयीन प्रक्रियेमुळे राहिले आहे. हा निधी सांस्कृतिक कार्य विभागाने दिलेला आहे. सदरचे काम औरंगाबाद विभागाचे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने केले जात आहे. हे काम पूर्ण होणे बाकी असल्यामुळे ते अजूनपर्यंत हँडओव्हर करण्यात आले नाही. वित्त विभागाने हे स्टेट ऑफ आर्ट इंटरप्रिटेंशन सेंटर उभे करण्याकरिता रु.136 कोटी अतिरिक्त देण्याचे ठरविले आहेत. त्यानंतर सांस्कृतिक कार्य विभागाकडून या संतपीठाच्या उर्वरित कामासाठी जो काही निधी लागेल तो उपलब्ध करुन दिला जाईल. मध्यंतरी याकरिता एक अभ्यासगट नेमण्यात आला असून डिसेंबर अखेरपर्यंत त्यांच्याकडून या संबंधीचा अहवाल प्राप्त होईल अशी अपेक्षा आहे.

श्री. सतीश चव्हाण : सभापती महोदय, अभ्यासक्रम समिती स्थापन करण्यात आली त्या समितीच्या अध्यक्षांना अद्याप पावेतो का कळविण्यात आले नाही?

श्री. संजय देवतळे : सभापती महोदय, या अभ्यासक्रमाकरिता संत साहित्यिक अभ्यासक ह.भ.प. गोखले महाराज, बद्रीनाथ तनपुरे, यु.म. पठाण, सदानंद मोरे, फ्रान्सिस दिब्रिटो, अण्णासाहेब मोरे यांना समितीवर नेमण्यात आले असून त्यांनी एकत्र बसून अभ्यासक्रम तयार करुन शासनाला सादर करावा. त्यानंतर शासनाने पुढील कार्यवाही करावी असे ठरले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 33905....

श्री. सतीश चव्हाण : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांच्या उत्तराला माझा आक्षेप आहे. डॉ. यु.म. पठाण यांना फोन करुन अभ्यासक्रम समितीची बैठक लवकर घेण्यात यावी असे सारखे सांगितले जाते....

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, औरंगाबाद येथे संत विद्यापीठ स्थापन करण्याचा निर्णय 1994 साली घेण्यात आला. त्यानंतर माजी मुख्यमंत्री श्री. मनोहर जोशी साहेबांच्या उपस्थितीत त्या ठिकाणी मोठा कार्यक्रम करुन त्याची सुरुवात करण्यात आली त्यावेळी मी देखील उपस्थित होतो. तेव्हापासून आतापर्यन्त या विद्यापीठाची फक्त इमारत बांधून पूर्ण करण्यात आली. परंतु कामकाजाला सुरुवात झाली नसल्यामुळे त्या इमारतीचा काही उपयोग नाही. त्यानंतर प्रकरण कोर्टामध्ये गेल्यानंतर सुप्रिम कोर्टाने 6 अटींच्या पूर्तता करण्यास सांगितले. या सहा अटी आपण केव्हा पूर्ण करणार आहात? त्यानंतर प्रत्यक्ष कामकाजाला आपण केव्हा सुरुवात करणार आहात? यामध्ये शासनाचे काही अधिकारी जाणीवपूर्वक याकडे दुर्लक्ष करीत आहेत असे मला दुर्दैवाने म्हणावेसे वाटते. यामुळे यामध्ये कालापव्यय होत असून हे काम प्रगतिपथावर येत नाही. जे अधिकारी या कामामध्ये दुर्लक्ष करीत आहेत त्यांच्यावर आपण कोणती कारवाई करणार आहात? याबाबतीत आपली वैयक्तिक भेट घेऊन मी काही नावे सांगण्यास देखील तयार आहे. त्या सहा अटींची पूर्तता करुन आपण कामकाज केव्हापर्यंत सुरु करणार आहात?

श्री. संजय देवतळे : सभापती महोदय, स्टेट ऑफ आर्ट इंटरप्रिटेंशन सेंटरच्या निर्मितीकरिता राष्ट्रीय वन्य जीव बोर्डाने मागितलेल्या निधीमध्ये रु.64.98 कोटी निधी दिला आहे व रु.136 कोटी त्वरित देण्याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांनी आदेश दिले आहेत. हा निधी प्राप्त झाल्यानंतर अटींची पूर्तता करण्यात आली असे प्रतिज्ञा पत्र कोर्टामध्ये सादर करावे लागेल. त्यानंतर वन विभागामार्फत अधिसूचना काढली जाईल.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

अशुद्धीत मूल / शीघ्रलेखासाठी नाही

ता.प्र.क्र.33905 . . . .

श्री.संजय देवतळे . . . .

सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन मी स्वत: जातीने लक्ष घालून लवकरात लवकर हे विद्यापीठ कार्यान्वित होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करीन. तोपर्यंत त्यांनी अभ्यासक्रम तयार करावा आणि पुढील जून पासून हा अभ्यासक्रम सुरु करावा यादृष्टीने आमचा पूर्ण प्रयत्न राहील.

. . . .2 एफ-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जव्हार (जि.ठाणे) येथील डोमझिरा धरणाच्या बांधकामात झालेल्या अनियमिततेबाबत

(5) * 33333 श्री.विनोद तावडे , श्री.चंद्रकांत पाटील , ॲड.आशिष शेलार , श्री.रामनाथ मोते : सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) जव्हार (जि.ठाणे) येथे सुमारे 68 कोटी रूपये खर्च करून डोमझिरा धरण बांधण्यात आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या दगडी धरणाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे असल्यामुळे पहिल्याच वर्षी धरणाला गळती लागली, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, या धरणाचे काम करणारे ठेकेदार व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबतचे पत्र मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक 8 ऑक्टोबर 2012 रोजी दिले होते, हे खरे आहे काय,

(4) असल्यास, या पत्राच्या अनुषंगाने ठेकेदार व संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे ?

श्री.राजेंद्र मुळक, श्री.सुनील तटकरे यांच्याकरिता : (1) धरणांवर आजतागायत रु 64.09 कोटी इतका खर्च झाला आहे. सदर प्रकल्पाचे नांव डोमझिरा नसून डोमहिरा आहे.

(2) सदर धरण हे मातीचे असून धरणाचा सांडवा कोलग्राऊट व दगडी बांधकामात बांधण्यात आलेला आहे. सांडव्याच्या बांधकामातून पाणी गळती आढळून आली होती.

(3) होय.

(4) गळतीप्रतिबंधक उपाययोजना मूळ ठेकेदाराच्या स्वखर्चाने चालू आहे.

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, सदर विषय अतिशय गांभीर्याने घेण्याचा आहे. डोमझिरा धरणाच्या ठिकाणी स्वत: माननीय विरोधी पक्षनेते आणि आम्ही गेलो होतो. त्या धरणा- तील पाणी झिरपत आहे. आम्ही त्याचे फोटो देखील आणलेले आहेत. त्याठिकाणी इतक्या ठिकाणी लिकेज आहे की, तेथील पाणी धबधब्यासारखे वाहून जात आहे आणि असेच होत राहीले तर कदाचित 2-3 महिन्यामध्ये तेथील सर्व पाणी देखील वाहून जाईल अशी परिस्थिती आहे. माझा स्पेसिफीक प्रश्न असा आहे की, याबाबतीत देखरेख करण्याचे काम श्री.नागा रेड्डी यांना दिलेले आहे, ते काम सरकार त्यांच्याकडून करुन घेणार आहे की स्वत: करणार आहे? हे काम किती महिन्यामध्ये पूर्ण करणार आहे ?

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या अनुषंगाने सांगावयाचे तर हे खरे आहे की, त्या धरणातील समोरच्या भागातून पाणी झिरपत आहे. हे होत असताना आमच्या विभागाच्या अधिकाऱ्यांनी सर्व चौकशी केली आणि तेथील इपॉक्सीचे काम करण्याबाबत कंत्राटदाराला सांगितले असून हे काम केल्यावर पाण्याचे झिरपणे कमी झाले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पण जेव्हा या धरणाची मूळ संकल्पना तयार करण्यात आली, ती करीत असताना फाऊंडेशन व त्यावरील स्ट्रक्चरसाठी काही मापदंड ठरवून देण्यात आले होते त्यामध्ये कुठेतरी अनियमितता झाली आहे असा प्रकार तेथे दिसून येत आहे. म्हणून यासंदर्भात आम्ही चौकशी समिती गठीत करीत आहोत आणि त्यामध्ये गुण नियंत्रण विभागाचे अधिकारी यांचाही समावेश करु आणि चौकशीअंती जो काही निकाल येईल त्याअनुषंगाने कारवाई केली जाईल.

श्री.विजय गिरकर : सभापती महोदय, याठिकाणी माननीय राज्यमंत्री महोदयांनी कबूल केले आहे की, या धरणातून पाणी झिरपत आहे. मात्र त्यांनी उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, आम्ही गाळ काढत आहोत. पण गाळ काढणे वेगळे आणि झिरपणारे पाणी थांबविणे वेगळे आहे. माझा स्पेसिफीक प्रश्न आहे की, विरोधी पक्षनेत्यांनी भेट दिली असता आणि तेथील फोटो पाहिले असता ते धरण झिरपत आहे हे दिसून येते. तेथे धबधबा आहे. मुले तेथे पिकनिकसाठी जातात आणि तेथे पोहतात. हे धरण थोडेसे सिमेंट, थोडासा गाळ याचे मिळून बांधलेले आहे आणि या धरणाच्या कामामध्ये अनियमितता झालेली आहे. अशा प्रकारे संबंधित कॉन्ट्रॅक्टरने हलगर्जीपणाने जे धरण बांधलेले आहे, त्याच्यावर कोणती कारवाई करणार आहात ? तसेच झिरपणारे धरण केव्हा दुरुस्त करण्यात येणार आहे ?

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी सांगितले की, जेव्हा याबाबत मूळ संकल्पना तयार करण्यात आली, डिझाईन तयार केले तेव्हा काम करताना काही कॉप्रमाईज झाले आहे. ही वस्तुस्थिती मी नाकारीत नाही. म्हणूनच या कामाची तातडीने चौकशी करुन ठेकेदार किंवा आणखी कोणी अधिकारी दोषी असले तरी कोणालाही पाठीशी घालण्यात येणार नाही. याबाबतीत चौकशी समितीमध्ये गुण नियंत्रक विभागाचे अधिकारी देखील असणार आहेत. या चौकशीचा रिपोर्ट येईल त्यानुसार ही कारवाई करु. तत्पूर्वी जेथे-जेथे ज्या मेजर स्ट्रक्चर्स्मधून झिरपणे सुरु आहे तेथे इपॉक्सी आणि बाकीची सोल्युशन वापरुन तेथील गळती कमी करण्याचा आपण प्रयत्न केलेला असून त्याबाबतीत अंशत: काही मार्ग निघालेला आहे. अजूनही आम्ही त्या स्ट्रक्चरची दुरुस्ती करण्याच्या बाबतीत तज्ज्ञांकडून माहिती घेत आहोत आणि ती घेतल्यानंतर तेथे दुरुस्ती करु. अशा वेळी तेथील जो कंत्राटदार असेल किंवा अधिकारी असतील त्या कोणालाही पाठीशी घालण्याची गरज नाही.

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

चौकशीचा जो अहवाल येईल त्याप्रमाणे निश्चितपणे कारवाई केली जाईल.

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय वारंवार ही गोष्ट मान्य करीत आहेत की, सकृतदर्शनी गळती झाल्याचे दिसते आणि कामामध्ये काही तरी गडबड झालेली आहे. या बाबतीत चौकशी होईल असे सांगितले पण कालावधी सांगितलेला नाही. चौकशी करण्यासाठी किती कालावधी लागेल आणि काय कारवाई करण्यात येईल ?

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, नुसते असे सांगून चालणार नाही. एकदा चौकशी समिती गठीत करावी लागेल. या संदर्भात चौकशी समिती गठीत करण्यात येईल. त्या समितीमध्ये तज्ज्ञ घेण्यात येतील. त्यामध्ये फाऊंडेशन आणि बाकीच्या गोष्टी लक्षात घेऊन स्ट्रक्चरच्या लोकांना घ्यावे लागेल. ही समिती गठीत करुन तीन महिन्यांच्या आत याचा निकाल घेतल्यानंतर कारवाई करण्यात येईल.

श्री. विनायक राऊत : सभापती महोदय, या धरणाचे बांधकाम 2005 च्या आसपास झाले असे आमच्या निदर्शनास आलेले आहे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जे फोटो दिलेले आहेत ते ऑक्टोबर, 2012 मधील आहेत. या धरणाची गळती नेमकी कोणत्या वर्षापासून सुरु झाली ? शासनाने दोन तीन वर्षामध्ये ठोस कारवाई का केली नाही ?

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, हे धरण पूर्ण झाल्यानंतर आता दीड ते दोन वर्षे आधी ही गळती सुरु झाल्याचे आढळून आले अशा प्रकारची माहिती विभागाच्या अधिकाऱ्यांकडून देण्यात आलेली आहे. ही कारवाई लवकर व्हावयास पाहिजे हे मी सुध्दा मान्य करतो. म्हणूनच या संदर्भामध्ये चौकशी करावयाची आहे. चौकशी करीत असताना अधिकाऱ्यांच्या संदर्भात, मग तेथील कार्यकारी अभियंता, उप अभियंता किंवा कनिष्ठ अभियंता असतील, जे मेन्टेनन्सचे काम बघत असतील किंवा इरेक्शनच्या काळातील अधिकारी असतील, त्या सर्वांना या चौकशीच्या घेऱ्यात घेणार आहोत. लोकप्रतिनिधींना जर चौकशीच्या वेळी आपले म्हणणे मांडावयाचे असेल तर निश्चितपणे ते समितीसमोर आपला विषय मांडू शकतील.

श्री. विनायक राऊत : सभापती महोदय, तज्ज्ञ समितीचा अहवाल अजून आलेला नाही पण माननीय मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, गळती प्रतिबंधक उपाययोजना मूळ

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 33333.... श्री. विनायक राऊत ....

ठेकेदाराच्या स्वखर्चाने चालू आहे. तज्ज्ञ समितीचा अहवाल आलेला नसताना नेमकी गळती मूळ स्ट्रक्चरमधून होत आहे, प्लास्टरमधून होत आहे की पूर्वी बांधलेल्या दगडाच्या बांधकामातून होत आहे हे जोपर्यंत तज्ज्ञ समिती निश्चित करीत नाही तोपर्यंत मूळ ठेकेदार कोणत्या आधारावर त्या गळतीचे थातूरमातूर काम करीत आहे ?

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, निविदा झाल्यानंतर काम देत असताना ज्यावेळी ॲग्रिमेंट करण्यात येते त्यामध्ये असा क्लॉज असतो की, कामाच्या वेळी किंवा काम संपल्या नंतरच्या विशिष्ट कालावधीमध्ये जर असा काही घटनाक्रम घडला तर संबंधित ठेकेदाराकडे त्याची जबाबदारी निश्चितपणे करण्यात येईल. यामध्ये तज्ज्ञांकडून अहवाल येईपर्यंत वाट पहावयाची आणि गळती थांबवावयाची नाही अशातील भाग नाही. जो कंत्राटदार आहे त्याच्याकडून त्या ठिकाणी हिपॉक्सी किंवा इतर सोल्यूशनचा वापर करुन ती गळती थांबविण्याचा प्रयत्न केलेला आहे. मी ब्रिफींग घेतल्यानंतर आणि हे सर्व फोटो दिल्यानंतर मलाही असे वाटते की, या संदर्भामध्ये चौकशी करणे आवश्यक आहे. ज्यावेळी स्ट्रक्चरचे इरेक्शन होत होते त्यावेळी तसेच मेन्टेनन्सच्या काळामध्ये त्या संदर्भात पाहिजे त्या पध्दतीची दक्षता घेतली गेली नाही म्हणून ही चौकशी समिती स्थापन करीत आहोत.

सभापती : मी सन्माननीय राज्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, विशेषत: मातीच्या पध्दतीची जी धरणे असतात त्यामध्ये मधोमध एक सॅनिटरी गॅलरीची व्यवस्था शास्त्रोक्त पध्दतीने केलेली असते. धरणाच्या पाण्याचे फार मोठे प्रेशर धरणावर येऊ नये या दृष्टीने मधोमध शास्त्रोक्त पध्दतीने लिकेजस ठेवण्यात येतात. आपण जी तपासणी करणार आहात त्यामध्ये हेही बघावे की, ही जी पाणी गळती आहे ती सॅनेटरी गॅलरीमधील आहे की अन्य कोठली आहे ?

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, आपण केलेली सूचना तज्ज्ञ समितीच्या चौकशीच्या वेळी त्यांना सांगण्यात येईल आणि आपल्या सूचनेचे पालन करण्यात येईल.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यवतमाळ येथील वसंतराव नाईक जिल्हा शासकीय रुग्णालयात सीटी स्कॅन मशिन नसल्याबाबत

(६) * ३४९८५ श्री.संदिप बाजोरिया , श्री.सतीश चव्हाण , श्री.किरण पावसकर , श्री.हेमंत टकले , श्री.रमेश शेंडगे : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ येथील वसंतराव नाईक जिल्हा शासकीय रुग्णालयात सीटी स्कॅन मशिन नसल्याने गोरगरीब रुग्णांना खाजगी रुग्णालयातून औषधोपचार करावा लागत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१२ च्या तिसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर रुग्णालयात सीटी स्कॅन मशिन बसविणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ.विजयकुमार गावित : (१) हे खरे नाही.

(२) सी.टी.स्कॅन मशीन बंद कालावधीत नागपूर येथे (GMC) मधून रुग्णाचे सी.टी.स्कॅन केले आहेत. सद्य:स्थितीत यंत्र बसविण्यात आले असून प्रायोगिक तत्वावर सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, मला प्रश्नाच्या छापील उत्तरामध्ये सुधारणा करावयाची आहे. ती करण्यास मला अनुमती द्यावी.

सभापती : ठीक आहे.

डॉ. विजयकुमार गावित : छापील उत्तराच्या भाग (२) मधील "सी.टी.स्कॅन मशीन बंद कालावधीत नागपूर येथे (GMC) मधून रुग्णाचे सी.टी.स्कॅन केले आहेत." हे वाक्य वगळावे. बाकी छापल्याप्रमाणे.

श्री. संदीप बाजोरिया : मला दोन प्रश्न विचारावयाचे आहेत. या मशिनसाठी डीपीडीसीमधून पैसे दिलेले होते हे खरे आहे काय ? हे मशिन किती दिवसात सुरु होईल, तसेच हे मशिन केव्हा बसविण्यात आले होते ?

डॉ. विजयकुमार गावित : ही गोष्ट खरी आहे की, यवतमाळ डीपीडीसी मधून हे मशिन खरेदी करण्यासाठी रु. 5 कोटी 50 लाख मंजूर करण्यात आले होते. हे मशिन 30.11.2012 ला क्षकिरण विभागाकडे सुपूर्द करण्यात आले होते. दिनांक 3.12.2012 ते 12.12.2012 पर्यंत हे मशिन प्रायोगिक तत्वावर सुरु होते. त्यावर 27 रुग्णांच्या तपासण्या करण्यात आल्या. दिनांक 12 डिसेंबर रोजी या मशिनचा एक भाग निकामी झाल्यामुळे ते बंद पडले होते. ते मशिन आता सुरु करण्यात आलेले आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 34985...

डॉ. दीपक सावंत : उत्तरामध्ये सांगितलेले आहे की, हे मशिन 30.11.2012ला क्षकिरण विभागाकडे सुपूर्द करण्यात आले. जेव्हा हा प्रश्न विचारण्यात आला त्यावेळी डीपीडीसीमध्ये पैशाची व्यवस्था करुन ते मशिन बसविण्यात आले. काही दिवसातच हे नवीन मशिन बंद पडले. या बाबतीत राज्य शासनाने पुरवठादारावर कोणती कारवाई केलेली आहे ? हे मशिन बंद असलेल्या कालावधीत यवतमाळ मधील रुग्ण सिटीस्कॅनसाठी कोठे जात होते आणि त्यांना किती फी द्यावी लागत होती ?

डॉ. विजयकुमार गावित : यवतमाळ मेडिकल कॉलेजमध्ये रुग्ण येत होते आणि त्यांना तेथे ट्रिटमेण्ट दिली जात होती. मशिन बंद होते त्या कालावधीत रुग्णांना नागपूर येथील जीएमसी मध्ये रेफर केले जात होते. ज्यांची कुवत होती ते रुग्ण खाजगी रुग्णालयात जात होते. सरकारने त्यासाठी कोणताही निधी दिलेला नाही. हे मशिन प्रायोगिक तत्वावर 3 डिसेंबरला सुरु करण्यात आले होते. कंपनीच्या इंजिनिअर समोर मशिन सुरु होते. मशिन सुरु असताना मशिनचा एक भाग निकामी झाला. तो भाग बसविण्यात आलेला असून आता ते मशिन प्रायोगिक तत्वावर सुरु आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करावयाची उपाययोजना

(७) * ३३८१२ श्री.संजय दत्त , श्री.चरणसिंग सप्रा , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , डॉ.सुधीर तांबे , प्रा.सुरेश नवले , श्री.जयप्रकाश छाजेड , श्री.मोहन जोशी , श्री.सुभाष चव्हाण : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१०-११-१२ मध्ये शुन्य ते एक वयोगटातील ४ हजार १२० बालकांच्या तर एक ते सहा वयोगटातील १ हजार ७२५ बालकांचा कुपोषणाने मृत्यू झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक योजना आणि कोटयवधी रूपये खर्च करुनही महाराष्ट्रातील बालमृत्यू आणि मातामृत्यू रोखण्यास आरोग्य विभाग अपयशी ठरत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील बालमृत्यू रोखण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप याबाबत कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. फौजिया खान, श्री. सुरेश शेट्टी यांच्याकरिता : (१) नाही.

(२) व (३) नाही.

बालमृत्यू टाळण्यासाठी सामान्य रूग्णालयात नवजात बालकांवर तात्काळ उपचारासाठी विशेष कक्ष स्थापन करून (SNCU) २०२१० नवजात बालकांना उपचारासाठी दाखल करण्यात आले. ग्राम बाल विकास केंद्र व बाल उपचार केंद्रात दाखल करण्यात आलेल्या बालकांची संख्या खालील प्रमाणे आहे.

वर्ष	VCDC	CTC
२०१०-११	९७,८१२	८,५०२
२०११-१२	१८८,१४५	८,२३५
२०१२-१३ ऑक्टोबर अखेर	२९,२६३	९७०

संपूर्ण राज्यात जानेवारी/फेब्रुवारी, २०११ नोव्हेंबर/डिसेंबर, २०११ या कालावधीत बालकांसाठी जंतनाशक व जीवनसत्व "अ" पुरविण्याची मोहिम राबविण्यात आली आणि ७३.३५ लक्ष (फेब्रुवारी, २०११), ६२.८८ लक्ष (डिसेंबर, २०११) बालकांना जंतनाशक गोळया आणि ६३.२२ लक्ष, (फेब्रुवारी, २०११) ५९.०२ (डिसेंबर, २०११), बालकांना "अ" जीवनसत्व पुरविण्यात आले. या योजनांच्या अंमलबजावणीमुळे राज्याचा अर्भक मृत्यू दर ३१ वरून (२००९) २५ पर्यंत (२०११) खाली आणणे शक्य झाले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, मला प्रश्नाच्या छापील उत्तरामध्ये सुधारणा करावयाची आहे. ती करण्यास आपण मला अनुमती द्यावी.

सभापती : ठीक आहे.

..३..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान : प्रश्नभाग ३ मध्ये दिलेल्या टेबल मधील वर्ष २०११-१२मध्ये व्हीसीडीसीची संख्या "१८८,१४५" ऐवजी "१,७१,५३७" अशी वाचावी आणि सीटीसी संख्या "८२३५" ऐवजी "७५३६" अशी वाचावी २०१२-१३ ऑक्टोबर अखेर व्हीसीडीसीची संख्या "२९२६३" ऐवजी - ५७५८०" आणि सीटीसीची संख्या "९७०" ऐवजी "२८८३" अशी वाचावी, बाकी छापल्याप्रमाणे.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, माझी उत्तरालाच हरकत आहे. प्रश्न भाग (१), (२) व (३)ला "नाही" असे उत्तर दिलेले आहे. सन २००९पासून जे बालमृत्यू झाले त्यासंबंधीचा हा प्रश्न विचारलेला असून त्या प्रश्नाला उत्तरच दिलेले नाही. आम्ही तीन-तीन महिने आधी प्रश्न दिल्या नंतर अशी उत्तरे अपेक्षित नाहीत. ४१२० बालकांचा मृत्यू झालेला आहे काय, असा पहिला प्रश्न विचारलेला आहे. त्याचे उत्तर दिलेले नाही. म्हणून माझी या उत्तरालाच हरकत आहे. राज्यामध्ये कुपोषणामुळे होत असलेले बालमृत्यू ही बाब शासनाला भूषणावह नाही. म्हणून हा प्रश्न राखून ठेवण्यात यावा.

प्रा. फौजिया खान : प्रश्नामध्ये ज्या संख्येचा उल्लेख करण्यात आलेला आहे त्याबाबतीत "नाही" असे उत्तर दिलेले आहे. बालमृत्यूच्या आणि कुपोषणाच्या संदर्भात विचारण्यात येणा-या सर्व प्रश्नांची उत्तरे देण्याची माझी तयारी आहे. बालमृत्यू दरात लक्षणीय घट झालेली आहे. शासनाने जी काही उपाययोजना केलेली आहे त्याची फलनिष्पत्ती दिसत आहे. बालमृत्यू आणि कुपोषणाच्या विषयावर आम्ही राईट ट्रॅकवर जात असून आम्हाला यश मिळत आहे. हा प्रश्न शासनाने लाईटली घेतलेला नाही. बालमृत्यूचे प्रमाण हळूहळू कमी होत आहे.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी सदर प्रश्नाला दिलेल्या छापील उत्तराच्या अनुषंगाने येथे भाष्य केले. सन्माननीय सदस्यांना एवढेच सांगायचे आहे की, ज्या पध्दतीने प्रश्न विचारला जातो त्या पध्दतीने त्या प्रश्नाचे सविस्तर उत्तर मिळावे. प्रश्न विचारल्यानंतर उत्तर देण्यास जवळ जवळ ४० दिवसाची मुदत असते. या दृष्टीने मी सर्व विभागांना सूचना देतो की, अशा सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला हा मुद्दा योग्य आहे.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, हे बालमृत्यू कुपोषणामुळे झालेले नाहीत.

...नंतर श्री. गिते...

अशुद्धीत प्रत / अशुद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार : सन्माननीय राज्यमंत्री महोदयांनी उत्तर दिले त्यामुळे आणखी प्रश्न उपस्थित झाले आहेत. बालमृत्यू कुपोषणामुळे झाले नसतील तर कशामुळे झाले यासंबंधीची माहिती उत्तरातून स्पष्टपणे दिसून येत नाही. या प्रश्नात प्रश्न क्रमांक 3 हा स्पेसिफीक विचारण्यात आला होता की, राज्यातील बालमृत्यू रोखण्यासाठी कोणती उपाययोजना करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे या प्रश्नास राज्यमंत्री महोदयांनी "नाही" असे उत्तर दिले आहे. आता बालमृत्यू होत नाहीत काय, कुपोषणामुळे बालमृत्यू होत नाहीत काय, बालमृत्यूच्या अनुषंगाने कार्यवाही होत आहे काय, या संदर्भात आपल्या विभागाने काही नवीन सर्व्हे केला आहे काय या प्रश्नांची उत्तरे माननीय राज्यमंत्री महोदयांनी दिलेली नाहीत. त्यामुळे मी विचारलेल्या सर्व प्रश्नांची माननीय राज्यमंत्री महोदयांनी उत्तरे द्यावीत अशी माझी विनंती आहे.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, दुसरा प्रश्न असा विचारण्यात आला आहे की, अनेक योजना आणि कोटयावधी रुपये खर्च करुनही महाराष्ट्रामधील बालमृत्यू आणि मातामृत्यू रोखण्यास आरोग्य विभाग अपयशी ठरत आहे हे खरे आहे काय, त्यास "नाही" असे उत्तर देण्यात आले आहे. तिसरा प्रश्न कोणकोणती उपाययोजना केली गेली याबाबतचा आहे. त्याच्या बाबतीत थोडक्यात माहिती देण्यात आलेली आहे. सन्माननीय सदस्यांकडून विचारलेल्या उप प्रश्नांची सविस्तर माहिती मी देण्यास तयार आहे.

श्री.भाई जगताप : माननीय राज्यमंत्री महोदयांचा विभाग मनापासून प्रयत्न करीत आहे याची आम्हाला जाणीव आहे. या बाबतीत विभागास काही अंशी यश आले आहे ही बाब देखील मान्य केली आहे. विभाग या प्रश्नाकडे अतिशय लाईटली पहात असून त्याचे समर्थन केले जाते आहे ही गोष्ट जास्त वाईट आहे. प्रश्न क्रमांक 3 ला "नाही" असे उत्तर देऊन विभागाने उत्तराच्या शेवटी खुलासा केलेला आहे. कृपा करुन या सदनातील सदस्यांना लाईटली घेऊ नका. सन्माननीय सदस्य हे तीन-तीन महिन्यांपूर्वी प्रश्न विचारीत असतात. माननीय राज्यमंत्री महोदय, तुम्ही तुमच्या विभागाच्या अधिकाऱ्यांचे कृपया समर्थन करु नका. बालमृत्यू किती झाले व ते कोणत्या कारणामुळे झाले? बालमृत्यूचा दर 35 टक्क्यांवरुन 31 टक्क्यांपर्यंत आला आहे असे आपण पाठ थोपटून सांगता आहात. 35 टक्के गृहीत धरले तरी किती बालमृत्यू झाले व ते कोणत्या कारणामुळे झाले ?

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.33812.....

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, मी कोणत्याही मुद्याचे समर्थन केलेले नाही. सविस्तर लेखी उत्तर आले पाहिजे हे मला मान्य आहे. यापुढे प्रश्नाच्या अनुषंगाने सविस्तर पध्दतीने उत्तर देण्यात येईल. बालमृत्यू आणि कुपोषणाबाबत जागतिक आरोग्य संघटनेचे जे स्टॅण्डर्ड आहे किंवा भारतात जे स्टॅण्डर्ड आहे त्यापेक्षा महाराष्ट्राने अधिक यश प्राप्त केलेले आहे, हे मला सभागृहाला सांगितले पाहिजे. अर्भक मृत्यू दर 52 होता, यावर्षी तो 25 पर्यंत खाली आला आहे. भारताचा अर्भक मृत्यू दर 2005 मध्ये 58 होता, यावर्षी तो 44 वर आला आहे. महाराष्ट्रामध्ये आपण ज्या उपाययोजना करीत आहोत, त्या उपाययोजनांमुळे आपल्याला हे यश प्राप्त होत आहे. बालमृत्यू किंवा कुपोषण ही बाब भूषणावह नाही. यावर अधिक लक्ष देण्याची गरज आहे. शासनाचे हे फोकल पॉईंट आहे. सर्व विभागाचे कन्व्हर्जन्स करुन महिला व बालकल्याण विभागाला नोडल विभाग निश्चित करुन न्यूट्रिशन स्टेटस वाढविण्यासाठी त्या विभागाकडून प्रयत्न होत आहेत. आरोग्य विभागाच्या माध्यमातून एम.एस.सी.न्यूट्रिशन्स स्टेटससाठी ज्या उपाययोजना करीत आहोत त्यामधून आपल्याला निश्चितच लक्षणीय घट दिसून येत आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, बालमृत्यू आणि अर्भक मृत्यू दर यामध्ये फरक आहे. It is a neo natal death. अर्भक मृत्यू दर 31 वरुन 25 वर आला आहे. बालमृत्यू दर 31 वरुन 25 वर आलेला नाही. कुपोषणानंतर बालमृत्यू होतात. जन्मजात दहा किंवा पंधरा दिवसानंतर ज्या अर्भकांचा मृत्यू होतो त्याला निओ नेटल डेथ म्हटले जाते. त्याची व्याख्या वेगळी आहे आणि चाईल्ड डेथची व्याख्या वेगळी आहे. माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी सांगितले ते सत्य आहे. अ जीवनसत्वाच्या अभावी मृत्यू होत असतील तर ते अयोग्य आहे. जंतनाशक गोळ्यांमुळे बालमृत्यूवर नियंत्रण आणता येते हा मंत्रीमहोदयांनी नवीन शोध लावलेला आहे. त्यामुळे हा प्रश्न राखून ठेवण्यात यावा, अशी माझी विनंती आहे.

सभापती : मंत्री महोदया, आपण आपल्या परीने या प्रश्नाचे अचूक उत्तर देण्याचा जरुर प्रयत्न केलेला आहे. परंतु विभागामार्फत अत्यंत सविस्तर उत्तर आपल्याकडे येणे आणि आपण प्रश्नाच्या उत्तराच्या माध्यमातून सभागृहाला सांगणे या दृष्टीने पुष्कळ कमतरता आहे असे मला वाटते. म्हणून मी हा प्रश्न राखून ठेवतो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.33812.....

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, माझ्याकडे बालमृत्यूची आकडेवारी उपलब्ध आहे.

सभापती : मंत्री महोदया, यापूर्वी मी हे सांगितले की, या सभागृहात प्रश्नाबाबत अचूक उत्तर देण्याचा आपण पूर्ण प्रयत्न केलेला आहे. प्रश्नाच्या संदर्भात आरोग्य विभागाकडून दिली जाणारी माहिती सभागृहाच्या पसंतीला उतरत नसल्यामुळे मी त्या अनुषंगाने अपवाद म्हणून हा प्रश्न राखून ठेवीत आहे.

नंतर श्री.जुन्नरे....

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 33812....

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत हे कुपोषणाच्या संदर्भात सभागृहात सातत्याने प्रश्न उपस्थित करीत असतात. माननीय मंत्री महोदया इतरत्र फिरत असतात परंतु त्यांनी कुपोषणग्रस्त भागांना भेटी दिल्यातर तेथील जनतेला काही तरी न्याय मिळू शकेल असे मला वाटते त्यामुळे मंत्री महोदया कुपोषणग्रस्त भागांना भेटी देणार आहेत काय ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, मी अनेक वेळा मेळघाटला भेटी दिलेल्या आहेत.

सभापती : सदर प्रश्न मी राखून ठेवलेला आहे.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बालेवाडी क्रीडा प्रबोधिनी,महाळुंगे (जि.पुणे) येथे क्रीडापटूसाठीच्या इमारतीची दुरुस्ती करणेबाबत

(८) * ३३९८९ श्री.अनिल भोसले , श्री.हेमंत टकले , श्री.जयवंतराव जाधव , श्री.दीपकराव साळुंखे : सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बालेवाडी क्रिडा प्रबोधिनी, महाळुंगे (पुणे) येथील क्रीडापटू युवकांना ठेवण्यात आलेल्या इमारतीची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय?

(२) सदर इमारतीची दुरूस्ती तसेच सोयीसुविधा देणेबाबतचे निवेदन मा.क्रीडा व युवक मंत्री यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ११ जून २०१२ रोजी दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर इमारतीची दुरूस्ती आणि तेथे सोयीसुविधा करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.पद्माकर वळवी : (१) नाही.

(२) होय.

(३) होय.

(४) व (५) लोकप्रतिनिधींनी दिलेल्या निवेदनास अनुसरून क्रीडा प्रबोधिनी वस्तीगृहामध्ये काही दुरूस्ती व नुतनीकरणाची कामे पुर्ण केलेली आहेत.

श्री. अनिल भोसले : सभापती महोदय, बालेवाडीला राज्याच्या क्रीडा घोरणामध्ये महत्वाचे स्थान आहे. या प्रश्नाच्या संदर्भात विभागाने जे उत्तर दिलेले आहे ते चुकीचे आहे. बालेवाडीला मी दर आठवडयाला जात असतो. बालेवाडी क्रीडानगरीत जवळपास ३५० ते ७०० मुले शिक्षण घेत आहेत. या ठिकाणच्या एका खोलीत ४ मुलांना रहावे लागते, त्या ठिकाणच्या विद्यार्थ्यांना पिण्याचे पाणी मिळत नाही, खिडक्या आहेत परंतु काचा नाही अशा प्रकाराची दुरावस्था बालेवाडीमध्ये झालेली आहे. उत्तरात म्हटले आहे की, "बालेवाडीमध्ये कशाचीही दुरवस्था नाही." त्यामुळे बालेवाडीच्या दुरवस्थेच्या संदर्भात अर्जून अवॉर्ड मिळालेले, छत्रपती पुरस्कार मिळाले तसेच संबंधित अधिकाऱ्यांची एक समिती नेमली जाणार आहे काय ? तसेच चुकीचे उत्तर देणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासन कोणती कारवाई करणार आहे ?

श्री. पद्माकर वळवी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी बालेवाडीला भेट दिली असता त्यांना तेथे दुरावस्था आढळली होती. क्रीडा प्रबोधनितील खिडक्यांच्या काचा फुटलेल्या होत्या तसेच दुसऱ्या काही असुविधेच्या बाबतीत दुरवस्था झाली होती. परंतु त्या ठिकाणची सर्व दुरवस्था आता दूर करण्यात आलेली आहे. बालेवाडीचा कारभार फार मोठा आहे. बालेवाडीला आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू तयार करण्याचे आव्हान आपण चांगल्या पध्दतीने पेलत आहोत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.:३३९८९.....

श्री. पद्माकर वळवी ....

सन्माननीय सदस्यांनी समिती नेमण्याची सूचना केली आहे. या ठिकाणी समिती असावी असे शासनाचे सुध्दा मत आहे. बालेवाडीसाठी आतापर्यंत अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्यात आली नव्हती. तीन महिन्याच्या आत बालेवाडी क्रीडा प्रबोधनिसाठी अशासकीय सदस्यांची नियुक्ती केली जाईल. सन्माननीय सदस्य श्री. अनिल भोसलेंचा सहभाग बालेवाडीच्या क्रीडा प्रबोधिनिसाठी घेण्यात येईल असे मी या ठिकाणी आश्वासित करु इच्छितो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये तसेच देशामध्ये आशियन गेमसाठी पुणे येथे जागतिक दर्जाची क्रीडा प्रबोधिनी पुण्यामध्ये सुरु झालेली आहे. या क्रिडानगरीसाठी माननीय खासदार श्री. सुरेश कलमाडी यांचा आग्रह होता. बालेवाडीसाठी महाराष्ट्र शासनाने अर्थसहाय्यही केले होते. त्यामुळे मला माननीय मंत्रीमहोदयांना विचारावयाचे आहे की, आपण केलेल्या अर्थसहाय्याचा हिशोब महाराष्ट्र शासनाला मिळाला आहे काय ? यासंदर्भात लेखा परीक्षण झाले आहे काय ? बालेवाडी क्रीडनगरीच्या संदर्भात जे घोटाळे झालेले आहेत त्याची माहिती आम्हाला वर्तमानपत्राच्या माध्यमातून मिळालेली आहे. त्यामुळे बालेवाडी क्रीडा प्रबोधनिमध्ये झालेल्या घोटाळयाच्या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय ?

श्री. पद्माकर वळवी : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात बालेवाडीचे वेळोवेळी ऑडीट करण्यात आलेले आहे. बालेवाडीच्या बाबतीत कॅगने काही आक्षेप घेतले होते त्यासंदर्भात विधीमंडळाची समिती चौकशी करण्याचे काम करीत आहे. यासंदर्भात विधानमंडळाची समिती जी काही शिफारस करेल त्यासंदर्भात निश्चितपणे कारवाई करण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, बालेवाडीला महाराष्ट्र शासनाने निधी देऊन फार वर्षे झालेली आहेत. त्यासंदर्भात लेखापरीक्षण झाल्यामुळे त्यामध्ये अनेक त्रुटी निदर्शनास आल्या होत्या. त्यामुळे बालेवाडीच्या संदर्भात चौकशी समिती कधी नेमण्यात आली, समिती नेमून किती कालावधी झाला, व या समितीचा अहवाल शासनापुढे कधीपर्यंत येणार आहे ?

यानंतर श्री.औटवणेकर .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पद्माकर वळवी : सभापती महोदय, कॅगने काही आक्षेप नोंदवले आहेत. त्याची छाननी करण्यासाठी विधान मंडळाची समिती आहे. समितीने लगेचच शिफारशी केल्या तर आम्हाला पुढील कार्यवाही करता येईल. कॅगने जे आक्षेप नोंदविले आहेत ते विधानमंडळाच्या लोकलेखा समितीला सादर करण्यात आले आहेत. या समितीने बालेवाडीला एकदा भेट देखील दिली आहे. ज्या ज्या कागदपत्रांची मागणी समिती करील ते सर्व उपलब्ध करून देण्यात येतील. बालेवाडी क्रीडा संकुलाला महत्व आहे. सदर संकुल पूर्ण क्षमतेने काम करण्यासाठी शासन निश्चितच हस्तक्षेप करणार आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या समितीवर कोण सदस्य आहे, या समितीला किती कालावधी दिलेला आहे असा आमचा स्पेसिफिक प्रश्न आहे.

श्री.पद्माकर वळवी : सभापती महोदय, या संबंधातील माहिती घेतो. माझ्या माहिती प्रमाणे यासंबंधातील चर्चा विधि मंडळामध्ये देखील झालेली आहे.

सभापती : मंत्री महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकरजी रावते यांना एवढेच म्हणावयाचे आहे की, बालेवाडी संकुलासाठी महाराष्ट्र शासनाने खर्च केला आहे, त्याचे ऑडिट झाले आहे काय, केंद्र शासनाने ऑडिट केले असेल तर त्यासंबंधातील माहिती आपल्याकडे आली आहे काय ? ती माहिती प्रलंबित असेल तर उपलब्ध करून घ्यावी व सदनाला अवगत करावे.

श्री.पद्माकर वळवी : सभापती महोदय, माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, बालेवाडी क्रीडा प्रबोधिनीवर आता पर्यंत किती खर्च झाला आहे तसेच दुरूस्तीवर किती खर्च झाला आहे ?

श्री.पद्माकर वळवी : सभापती महोदय, युवा राष्ट्रकूल परिषदेच्या स्पर्धा झाल्या तेव्हा राज्य सरकारच्या माध्यमातून एकत्रितपणे निधी खर्च करण्यात आला आहे. तेव्हा तेथे सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. सन 2008 च्या स्पर्धा झाल्यानंतर राज्य शासन दर वर्षी एक ते दीड कोटी रूपये ग्रँटच्या स्वरूपात उपलब्ध करून देत आहे.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.जयंतराव पाटील यांनी बालेवाडीच्या मूळ खर्चाच्या अनुषंगाने प्रश्न विचारला असता तर माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिले असते. हा जो प्रश्न आहे तो दरवर्षीच्या दुरूस्ती व देखभाली संबंधातील आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.33989.....

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, दुरूस्तीसाठी किती खर्च झाला हे मंत्री महोदय काहीच सांगत नाही.

सभापती : बालेवाडीकरिता एकूण किती खर्च झाला असा सन्माननीय सदस्यांचा प्रश्न आहे. मूळ प्रश्न बालेवाडी क्रीडा इमारतीसाठी किती खर्च झाला असा आहे. तेव्हा माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, दर वर्षी दीड ते दोन कोटी रूपये खर्च येतो.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदय कुठल्याही प्रश्नाचे उत्तर देत नाहीत.

सभापती : बालेवाडी क्रीडा संकुलाच्या प्रकल्पाला एकूण किती खर्च झाला, या संबंधातील माहिती आपण पटलावर ठेवावी.

श्री.पद्माकर वळवी : ठीक आहे.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जलसंपदा विभागाच्या विविध प्रकल्पाबाबत एसआयटी नेमण्या संदर्भातील घोषणा

श्री.सुनील तटकरे (जलसंपदा मंत्री): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने शासनाच्या वतीने घोषणा करीत आहे. जलसंपदा विभागाच्या विविध प्रकल्पाबाबत विधि मंडळात एसआयटी नेमण्या संदर्भात होत असलेल्या मागणी नुसार शासनाने डॉ.माधवराव चितळे, जल तज्ज्ञ यांच्या अध्यक्षतेखाली एसआयटी नेमण्याचा निर्णय घेतलेला आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, एसआयटी कशासाठी नेमणार आहात ? कुठल्या नियमाखाली नेमणार आहात ? हे सर्व सांगितले पाहिजे. किती कालावधीत चौकशी होणार हे सांगितले पाहिजे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, या संबंधातील समितीची कार्यकक्षा, समिती सदस्यांच्या नेमणूकीबाबत समितीच्या माननीय अध्यक्षांची चर्चा करून निर्णय घेण्यात येईल. या संबंधातील घोषणा डिसेंबर 2012 अखेर पर्यंत निश्चितपणे करण्यात येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, एसआयटी नेमण्याची घोषणा झाली. पण समितीची कार्यकक्षा व समिती सदस्य किती असणार या संबंधातील देखील घोषणा झाली पाहिजे. तसेच, या एसआयटीचा अहवाल सभागृहाला किती दिवसात सादर होईल या सर्व बाबींची घोषणा हे अधिवेशन संपण्याच्या आत शासन करणार आहे काय ? फक्त एसआयटीची घोषणा करून चालणार नाही.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगितले की, या समितीची कार्यकक्षा, समितीवरील सदस्य आणि समितीचा कालावधी या सर्व बाबींची माहिती 31 डिसेंबर 2012 पूर्वी जाहीर करण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सभागृहात सिंचनाच्या बाबतीत चर्चा झाली. त्या अनुषंगाने माननीय मंत्री महोदयांनी चौकशी करण्यासाठी एक खास पथक नेमण्याची घोषणा येथे केली. या समितीमध्ये कोण कोण सदस्य असतील, त्या समितीची कार्यकक्षा काय असणार आहे याची माहिती दिनांक 31 डिसेंबर, 2012 पर्यंत देण्याचे त्यांनी सांगितले. त्या विभागाचे प्रमुख असलेले श्री.शिर्के यांनाच आपण प्रमुख म्हणून नेमले होते अशी चर्चा येथे झाली होती आणि वर्तमानपत्रात देखील त्याबाबत बातम्या आल्या होत्या. श्री.शिर्के हे त्या पदावर प्रमुख म्हणून काम करीत असतील तर चौकशी करताना त्यांना त्या पदावरुन बाजूला ठेवणे महत्वाचे आहे.

माननीय मंत्री महोदयांनी सिंचना संबंधी एसआयटी नेमण्याची घोषणा केली त्याचे आम्ही स्वागत करतो. परंतु समोरचे आमचे सन्माननीय मित्र सदस्य आम्हाला प्रत्येकवेळी "आपल्यापासून चौकशीस सुरुवात करायची काय ? असे आव्हान देत होते. त्यावेळी आम्ही त्यांना सांगितले की, "हो, आपण चौकशी करावी." आता माझा त्यांना प्रश्न आहे की, ज्यावेळी शिवशाहीचे सरकार होते त्यावेळी आपल्याकडून जे आक्षेप घेण्यात आले होते, मंत्री महोदयांची नावे घेण्यात आली होती, त्या मंत्री महोदयांना राजीनामे द्यायला लावले होते, चौकशी नेमण्यास सांगितले होते आणि चौकशीमधून जे निर्दोष सुटतील त्यांनाच मंत्रीपदावर बसवावे आणि बाकीच्यांना घरी पाठवावे असे सांगितले होते. तेव्हा आज आपण संबंधित मंत्री महोदयांचे राजीनामे घेणार आहात काय ?

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, जलसंपदा मंत्री माननीय श्री.सुनील तटकरे यांनी श्री.माधव चितळे यांच्या अध्यक्षतेखाली एसआयटी नेमण्याची घोषणा केली त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. सिंचनाच्या अनुषंगाने ही घोषणा आहे असे त्यांनी सांगितले. या समितीवर कोण सदस्य असतील, त्याच्या टर्म आणि कंडीशन्स काय असतील याची माहिती दिनांक 31 डिसेंबर, 2012 पूर्वी देण्यात येईल असेही त्यांनी सांगितले. माननीय मंत्री महोदयांनी एवढी स्पष्ट माहिती दिली असताना समोरच्या बाकावरुन विनाकारण आक्षेप घेऊन पुन्हा चर्चा उपस्थित करुन हेत्वारोप करण्याचा प्रयत्न करावा हे बरोबर नाही.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : माननीय जलसंपदा मंत्री श्री.सुनील तटकरे यांनी सिंचनाच्या अनुषंगाने सभागृहात जी सातत्याने मागणी होत होती त्या मागणीला प्रतिसाद देण्याच्या अनुषंगाने एसआयटी नेमण्याचे मान्य केलेले आहे. समितीचे रेफरन्स आणि ज्या अन्य बाबी आहेत त्या दिनांक 31 डिसेंबर, 2012 पर्यंत देण्याची सरकारची तयारी आहे असेही त्यांनी सांगितले आहे. आता मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना बोलण्याची संधी देत आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी आज माननीय जलसंपदा मंत्री श्री.सुनील तटकरे यांचे स्वागत केले त्याचा मला आनंद झाला. कारण सिंचनासंबंधी एसआयटी नेमावी अशी मागणी आम्ही गेले पाच दिवस करीत होतो. तेव्हा समोरच्या बाकावरुन आरडाओरड सुरु होता. सरकारला उशिराने सुचलेले हे शहाणपण आहे. कारण सरकारने आमची मागणी अगोदरच मान्य केली असती तर अधिवेशनाचे पाच दिवस फुकट गेले नसते. ही संवेदनशीलता सरकारने अगोदर दाखविली असती तर विदर्भातील आणि दुष्काळाच्या प्रश्नासंबंधी सभागृहात चर्चा करता आली असती. मागील पाच दिवस आमची मागणी करुन घसा कोरडा पडला होता. आमची ताकद वाया जात होती. पण आज सरकारने एसआयटी नेमण्याची घोषणा केली. माझी सरकारला एवढीच विनंती आहे की, टर्म्स ऑफ रेफरन्स संबंधी विरोधी पक्षाला विश्वासात घ्यावे. कारण आम्हाला जे म्हणावयाचे आहे ते आपण घेतल्यास आपल्याला जी पारदर्शकता दाखवावयाची आहे ती दाखविण्यास आपण तयार आहात हे सिध्द होईल.

यानंतर श्री.सरफरे..

अशुधारित प्रत/ग्रंथसंग्रहासाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाच्या सूचनेबाबत
माननीय सभापतींनी दिलेला निर्णय

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय,....

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील आपण कृपया खाली बसावे. आपण जेव्हा जेव्हा बोलावयास उभे रहाता त्या त्यावेळी मी आपणास बोलण्याची परवानगी देतो. परंतु आता आपण कृपया खाली बसावे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मी गेल्या आठ दिवसापासून या विषयावर बोलत होतो. त्यामुळे आपण मला बोलण्यास परवानगी दिली नाही तर हा माझ्यावर अन्याय होईल. मला या ठिकाणी रेफरन्स दिला पाहिजे....

सभापती : माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोदजी तावडे व गट नेते श्री. दिवाकर रावते व इतर सन्माननीय सदस्यांनी नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाच्या सूचनेसंबंधी निर्णय देत आहे. आज मी सकाळी माझ्या दालनामध्ये सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोदजी तावडे व गटनेते सन्माननीय श्री. दिवाकर रावते ....

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मी देखील ठराव मांडला आहे, त्या संदर्भात मी आठ दिवस या सभागृहामध्ये मागणी करीत आहे...

सभापती : मी आपल्याला सातत्याने परवानगी देत असतो. त्यामुळे मी दिलेला निर्णय आता मला बदलता येणार नाही.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, हे बरोबर नाही. मी कधीही वेडे वाकडे बोलत नाही. या सभागृहामध्ये मला जे अधिकार आहेत त्याप्रमाणे मला बोलण्यास मिळाले पाहिजे. हा माझ्यावर अन्याय होत आहे. आपण मला बोलण्याची संधी देत नाही हे बरोबर नाही. मला फक्त रेफरन्स द्यावयाचा आहे. मी सभागृहाचा फार वेळ घेणार नाही....

सभापती : सभागृहाचे नेते उपमुख्यमंत्री माननीय श्री. अजित पवार, विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे,गट नेते श्री. दिवाकर रावते यांच्याबरोबर सभागृहाच्या कामकाजाच्या अनुषंगाने सकाळी चर्चा झाली. महाराष्ट्रामध्ये विशेषत: विदर्भ व मराठवाडयामध्ये पडलेला दुष्काळ व

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती ....

निर्माण झालेली टंचाईची परिस्थिती, पिण्याच्या पाण्याची टंचाई या अनुषंगाने सत्ताधारी पक्षाकडून नियम 260 अन्वये 18 डिसेंबर 2012 रोजी चर्चा घेण्याची विनंती करण्यात आली ती मी मान्य केली आहे. त्यामुळे उद्या राज्यामध्ये पडलेला दुष्काळ व पाणी टंचाई या बाबतीत नियम 260 अन्वये सत्तारुढ पक्षाचा प्रस्ताव येणार आहे. दुष्काळाशी व पिण्याच्या पाण्याशी संबंधित असलेले हे दोन्ही विषय अतिशय महत्वाचे आहेत. विदर्भ, मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रामधील दुष्काळी विभागाशी संबंधित आहेत. त्यामुळे या प्रस्तावंवर चर्चा करण्याचे मी ठरविले आहे. ही चर्चा पूर्ण झाल्यानंतर त्या अनुषंगाने अन्य काही विषय असतील तर त्याबाबत देखील या सभागृहामध्ये कामकाज करण्यात येणार आहे.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय,....

सभापती : मी आता आपले काहीही ऐकून घेणार नाही. कृपया आपण खाली बसावे...

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, आपण सभागृहामध्ये एकदा निर्णय दिल्यानंतर देखील आपल्या निर्णयाचा मान न ठेवता आपल्याविषयी सभागृहामध्ये बोलणे हा आपला व या सभागृहाचा अवमान आहे...

सभापती : या ठिकाणी सभागृहाचा अवमान होईल किंवा सभापतींचा व्यक्तिगत अवमान होईल अशाप्रकारचे वक्तव्य केले गेले असेल तर ते कामकाजातून काढून टाकण्याची व्यवस्था मी करीन.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री. गुलाबराव देवकर (परिवहन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचा सन 2010-2011 या वर्षाचा हिशेब व हिशेब तपासणी अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : हिशेब तपासणी अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा दिनांक 31 मार्च, 2011 रोजी समाप्त होणाऱ्या वर्षाचा सदतिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : सदतिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर (सामाजिक न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा सन 1997-1998, 1998-1999 व 1999-2000 या वर्षाचा अनुक्रमे चोविसावा, पंचविसावा व सव्विसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित मुंबई, यांचा सन 2003-2004 या वर्षाचा एकोणिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, सदनामध्ये 15 वर्षापूर्वीचा अहवाल ठेवला जात आहे. आपण याबाबतीत वारंवार निर्देश दिलेले आहेत. तरी देखील ही बाब संबंधित प्रशासकीय अधिकारी गांभीर्याने घेत नाहीत असे मला आपल्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे.

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, याबाबत मूलभूत कारण होते. एकतर 2005 मध्ये मुंबई शहरात पूर आला होता. तसेच सदरहू कार्यालय हे बांद्रा येथे असल्याने त्यावेळी तेथील कार्यालयातील इतर सर्व फाईली आणि त्याच बरोबर लेखा परीक्षणाच्या फाईलीही नष्ट झाल्या. त्यामुळे लेखा परीक्षण करावे लागले आणि ही वस्तुस्थिती असली तरी माझ्याकडे जो अहवाल आला तेव्हा मी देखील याबाबत नाराजी व्यक्त केली होती. याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत की, या पुढच्या काळामध्ये एकत्रितपणे ऑडीट करुन ते अहवाल सदनासमोर ठेवले जातील.

श्री.डी.पी.सावंत (उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये अधिनियम, 1967 (सन 1967 चा महा.34) च्या कलम 26 च्या पोट-कलम (3) अन्वये महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये (सहायक अनुदान आणि इमारत व साधनसामग्री यासाठी मान्यता) (सुधारणा) नियम, 2012 प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांकमराग्रं, 2011/प्र.क्र.124/साशि-5, दिनांकित 7 सप्टेंबर 2012 सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली.

. . . .2 ओ-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: औचित्याचे मुद्दे

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.मोहन जोशी यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आज सोमवार आहे.शुक्रवारी औचित्याचे मुद्दे मांडण्यात येतात.

सभापती :शुक्रवारी औचित्याचे मुद्दे मांडले जातात. परंतु एखाद्या सन्माननीय सदस्यांनी जर अचानक औचित्याचा मुद्दा उपस्थित करण्याची परवानगी मागितली तर मी काही वेळेला सभापती म्हणून त्यांना ती परवानगी देतो. सन्माननीय सदस्य श्री.मोहन जोशी यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

.श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

स्व.वसंतराव देशपांडे स्मृती सभागृहाचे (नागपूर) याचे भाडे शासनाने 4000 रुपयावरुन वाढवून तब्बल 11 हजार 360 रुपये व अनामत रक्कम 11,000 रुपये केल्यामुळे नागपूरसह विदर्भातील सांस्कृतिक क्षेत्रातील कार्यकर्ते व रसिक प्रेक्षक, हौशी नाट्य चळवळीतील कलाकार, तंत्रज्ञ, निर्माते यांच्यांमध्ये शासनाविषयी नाराजीची भावना निर्माण झालेली आहे. नागपूर ही महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी आहे. विदर्भाला राम गणेश गडकरी, सुरेश भट, राम शेवाळकर, कवी ग्रेस, कवी अनिल, दारव्हेकर बुवा अशा दिग्गज कलाकारांची परंपरा लाभली आहे. परंतु नागपूरामध्ये सांस्कृतिक चळवळीची जोपासना व्हावी ती फोफवावी याकरता शासन स्तरावरुन काहीच प्रयत्न केले जात नाहीत. हौशी कलावंतांना स्वस्त दरातील सभागृहांची उपलब्धता होण्याची आवश्यकता आहे, देखभाल दुरुस्तीच्या नावाखाली सभागृहाचे अवाच्या सव्वा भाडे आकारले जाते. त्या सभागृहातील 25 टक्के खुर्च्यांची अवस्था दयनीय असून त्यावर बसणे शक्य नाही.सभागृहा-तील आरक्षण विभाग कायम स्वरुपी बंद असतो. इव्हेन्ट एजन्सीचे कंत्राटदार बेकायदेशीपणे, विना अधिकार पूर्णवेळ सभागृहात असतात. शनिवार व रविवारी सभागृह मिळविण्या साठी काळाबाजार केला जातो. तसेच याबाबतीत सांगावयाचे तर आरक्षित केलेल्या सभागृहाचे आरक्षण अचानक सरकारी कार्यक्रमासाठी रद्द करण्यात येते. अकलूज, नंदुरबार सारख्या शहरामध्येही पालिकेची मिनी थिएटर आहेत. परंतु नागपूर सारख्या शहरात महापालिकेचे मिनी थिएटर करावे या मागणीकडे शासनाचे दुर्लक्ष होत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, सध्या राज्य नाट्य महोत्सवाची प्राथमिक फेरी नागपूरात सुरु आहे. परंतु शनिवार व रविवार सायंकाळी 7.20 वाजता शासनाला सभागृह देखील उपलब्ध होऊ शकले नाही व ते शासनाने मिळविलेही नाही. यावरुन शासनाची नाट्य चळवळीच्या प्रती असलेली उदासीनता स्पष्ट होते. तसेच ही बाब सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंतर्गत येते. मी या औचित्याच्या मुद्याव्दारे शासनाकडे मागणी करतो की, शासनाने देशपांडे, इतर सर्व नाट्यगृहे ही हौशी कलावंताना, संस्थांना वाजवी दरात भाडे आकारुन उपलब्ध करुन द्यावी. तसेच नागपूर शहरात एक मिनी थिएटर तातडीने मंजूर करावे. त्याचबरोबर नागपूर शहरातील नाट्य कलावंतांना दिलासा मिळण्यासाठी शासनाने पूर्वी प्रमाणेच 4000 रुपयांचे भाडे कायम ठेवावे आणि आता 7000 हजार रुपयावरुन 11,000 रुपयापर्यंत जी भाडेवाढ केली आहे ती रद्द करावी अशी मी आपल्यामार्फत शासनाला विनंती करीत आहे.

---

2 ओ-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

2012 मध्ये नक्षलदृष्टया अती संवेदनशील आणि आदिवासी बहुल असलेल्या गोंदिया जिल्ह्यातील चिचगड नदीच्या भागी येथे असलेल्या शेठ राधाकिशन आहुजा अनुदानित आश्रम शाळेतील कृष्ण बस्तर धुर्वे या दुसरी इयत्तेमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्याचा प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे दिनांक 15 डिसेंबर 2012 रोजी मृत्यू झाला. मागील तीन दिवसापासून या मुलाची प्रकृती बिघडलेली होती. मात्र त्याला उपचारासाठी दवाखान्यामध्ये दाखल न करता स्थानिक डॉक्टरांकडूनच उपचार करण्यात आल्यामुळे त्याची प्रकृती अधिक खालावली आणि त्यामुळे त्याचा मृत्यू झाल्याचे चौकशीअंती उघडकीस आले.

यानंतर श्री.बरवड . . ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयवंतराव जाधव ....

आश्रमशाळा प्रशासनाच्या गलथान कारभारामुळे जुलै 2012 ते डिसेंबर, 2012 या कालावधीत गोंदिया जिल्ह्यातील अनुदानित खाजगी आश्रमशाळांमध्ये चार विद्यार्थ्यांचा मृत्यू होऊन काल झालेला मृत्यू हा पाचवा बळी आहे. शासनाने निष्पाप बालकांचे बळी घेणाऱ्या आश्रमशाळा प्रशासनाच्या कारभाराची सखोल चौकशी करुन आश्रमशाळा प्रशासनावर कडक कारवाई करण्याची आवश्यकता असून तातडीच्या उपचाराअभावी या मुलांचे आश्रमशाळेमध्ये मृत्यू झाल्याने त्या विद्यार्थ्यांच्या पालकांना शासनाने आर्थिक सहाय्य द्यावे अशी मागणी मी या औचित्याच्या मुद्याव्दारे करीत आहे.

सभापती : सन्माननीय मंत्री महोदय श्री. संजय देवतळे यांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यांनी या ठिकाणी जो औचित्याचा मुद्दा उपस्थित केलेला आहे त्याची आपण नोंद घेणे गरजेचे आहे. या दृष्टीने आपण स्वत: लक्ष घालावे.

श्री. संजय देवतळे : सभापती महोदय, मी नोंद घेतलेली आहे. तो मुद्दा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकारात येतो तरी सुध्दा सांस्कृतिक कार्य विभागामार्फत त्यांच्याशी या अगोदर सुध्दा पत्रव्यवहार केलेला आहे. मी स्वत: यामध्ये लक्ष घालीन.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

. मी एका छोट्या विषयाच्या संदर्भात औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे. नागपूर येथे अधिवेशन भरल्यानंतर राज्य शासनाच्या माहिती विभागातर्फे लोकराज्याच्या नावाने एक प्रदर्शन भरविले जाते. त्या प्रदर्शनाला आपण स्वत: आणि विधानसभेचे माननीय अध्यक्ष यांनी उपस्थित राहून भेट दिल्याचे छायाचित्रही माझ्याकडे आहे. मराठी भाषेच्या संदर्भात हा अगदी छोटासा प्रश्न आहे. त्या ठिकाणी वर जो फलक लावण्यात आलेला आहे त्यावर "महाराष्ट्र शासन लोकराज्य प्रदर्शनी व विक्री" असे लिहिले आहे. या संदर्भात मी माहिती घेतली. आपल्या भाषा विभागाकडूनही माहिती घेतली. मराठीत 'प्रदर्शनी' असा शब्द वापरत नाहीत. त्या ठिकाणी 'प्रदर्शन' असाच उल्लेख करावयास पाहिजे. 'प्रदर्शनी' हा चुकीचा उल्लेख आहे. ज्या ठिकाणी आपल्या सारख्या सन्माननीय व्यक्ती जातात त्या ठिकाणी तरी मराठी भाषेसाठी हे प्रयत्न करताना एका वेलांटीचा जरी प्रश्न असला तरी तो भाषेचा प्रश्न आहे म्हणून त्याकडे अधिक गांभीर्याने बघितले पाहिजे आणि अशा चुका आपल्या कोणत्याही खात्याकडून होऊ नयेत याची खबरदारी घेतली पाहिजे अशी विनंती मी या औचित्याच्या मुद्याव्दारे करीत आहे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

या सभागृहामध्ये या राज्याचे गृहमंत्री यांनी राज्यातील शेतकऱ्यांना बैलगाडी शर्यती सुरु ठेवण्याचे आश्वासन दिले होते. या राज्यामध्ये घोड्यांच्या शर्यती घेऊन त्यावर राजरोसपणे मुंबई शहरामध्ये पैसे लावले जातात. त्या ठिकाणी रेस खेळली जाते आणि मोठ्या प्रमाणात जुगार खेळला जातो. परंतु गेली 500 वर्षे सुरु असलेल्या शेतकऱ्यांच्या बैलगाडीच्या खेळाच्या बाबतीत गेली तीन चार वर्षे मुंबईतील कोणी तरी एनजीओ हायकोर्टात जातात आणि स्थगिती आणतात. या बाबतीत सभागृहामध्ये चर्चा करीत असताना मी माननीय गृह मंत्र्यांच्या निदर्शनास ही बाब आणली होती की, या संदर्भातील जे कायदे आहेत ते जर अपुरे पडत असतील तर यासाठी एक कायदा तयार करावा. हे सभागृह कायदेमंडळ आहे. आपण कायदे तयार करावयाचे असतात आणि तयार केलेल्या कायद्याप्रमाणे हायकोर्टाने निकाल द्यावयाचा असतो. या सभागृहामध्ये एक कायदा असा तयार करावा जो शेतकऱ्यांच्या बैलगाडीच्या खेळाच्या बाबतीत समर्थनीय असेल. आज महाराष्ट्रामध्ये अनेक शेतकऱ्यांमध्ये असंतोष आहे. त्या दृष्टीने राज्य शासनाने तातडीने या संदर्भात एक अध्यादेश काढावा. अनेक वेळा राज्य शासन अध्यादेश काढते त्याप्रमाणे अध्यादेश काढून हा खेळ तातडीने चालू होण्यासाठी शासनाने दखल घ्यावी. माननीय गृह मंत्र्यांनी या सभागृहामध्ये जोरात सांगितले होते की, जयंत पाटील, पुढच्या वेळी तुम्हाला या सभागृहात बोलण्याची संधी देणार नाही. ती संधी त्यांनी पुन्हा देऊ नये अशी विनंती मी महाराष्ट्रातील सर्व शेतकऱ्यांच्या वतीने करीत आहे.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

राज्यात मानवी हक्कांची पायमल्ली थांबविणे व प्रत्येकाला सन्मानाने जगता यासाठी जगभरात 10 डिसेंबर हा दिवस मानवी हक्क दिन म्हणून पाळण्यात येतो. 10 डिसेंबरला आपल्या विधिमंडळाचे अधिवेशन सुरु झाले. तथापि आयोगाच्या अध्यक्षांनी राजीनामा दिल्याने आणि सदस्य निवृत्तीमुळे मार्च 2012 पासून सुमारे 9 महिने या मानवी हक्क आयोगाचे काम बंद आहे. परिणामी या आयोगाकडे तक्रारींचा मोठ्या प्रमाणात ढीग साचलेला आहे. आयोगाच्या अध्यक्षांची नियुक्ती आणि निवृत्तीमुळे रिक्त झालेल्या सदस्यांची पदे तातडीने भरुन तक्रारींचे निवारण करण्याची आवश्यकता आहे. मानवी हक्क आयोगाचे अध्यक्ष आणि सदस्य यांची रिक्त पदे तातडीने भरण्यात यावीत अशी मी या औचित्याच्या मुद्याव्दारे विनंती करीत आहे.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>विशेष उल्लेख</u>

पृ. शी./मु. शी. : ठाणे जिल्हयातील भिवंडी वाडा रस्त्याच्या रुंदीकरणाची आवश्यकता याबाबत श्री. निरंजन डावखरे,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. निरंजन डावखरे (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"माझ्या मतदारसंघामध्ये ठाणे जिल्ह्यातील भिवंडी वाडा या मुख्य रस्त्याचे रुंदीकरण होणे अत्यंत गरजेचे आहे. मात्र याला मौ.शेलार, ता. भिवंडी येथील ग्रामस्थांचा मोठ्या प्रमाणावर विरोध आहे. याचे मुख्य कारण रुंदीकरणाच्या मार्गामध्ये जुन्या इमारती असून तेथील रहिवाशांचा विस्थापित होण्यासाठी तीव्र विरोध आहे. तसेच मौ.शेलार येथे हेरिटेज दर्जा असलेले पुरातन श्रीहनुमान मंदिर हे सुध्दा या रस्त्यामुळे बाधित होत आहे. मौ. शेलार येथील ग्रामस्थांसमवेत अनेक वेळा स्थानिक लोकप्रतिनिधींनी चर्चा व बैठका घेऊन सुध्दा लोकांचा विरोध कमी झालेला नाही. हा तिढा सोडविण्यासाठी सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील, माजी जिल्हा परिषदचे अध्यक्ष व भिवंडीचे विद्यमान खासदार श्री. सुरेश टावरे यांनी स्थानिकांशी चर्चा करुन विश्वभारती ते वडपे व्हाया भिनार असा बायपास मार्ग प्रस्तावित केलेला आहे. अशा प्रस्तावित बायपास मार्गास जिल्हा नियोजन समितीने मंजुरी दिलेली आहे. त्यामुळे विश्वभारती ते वडपे व्हाया भिनार असा बायपास मार्ग तातडीने बांधून पूर्ण करण्यात यावा अशी मागणी मी सभागृहाच्या माध्यमातून करीत आहे."

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : आकोली (जि.वर्धा) तालुक्यातील मदन उन्नई प्रकल्पाचे निकृष्ट दर्जाचे झालेले काम याबाबत श्रीमती अलका देसाई, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडते.

"आकोली (जि.वर्धा) तालुक्यात बांधण्यात आलेल्या मदन उन्नई या प्रकल्पाचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे झाले असून या प्रकल्पात 3.72 दशलक्ष घनमीटर पाणी साठ्याची क्षमता असतानाही क्षमतेपेक्षा कमी पाणी साठा होतो. यामुळे शेतक-यांच्या शेतापर्यन्त पाणी पोहोचतच नसल्याचे आढळून आले आहे. त्याचप्रमाणे कालव्यांचेही काम अतिशय निकृष्ट झाल्यामुळे, कालवे वारंवार फुटत असल्यामुळे शेतक-यांच्या शेतपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. यामुळे शेतक-यांच्या उत्पन्नामध्ये मोठ्या प्रमाणात घट होत आहे. परिणामी शेतक-यांमध्ये तीव्र असंतोष व संतापाची भावना निर्माण झालेली आहे. तेव्हा या प्रकल्पाची त्वरित दुरुस्ती करुन निकृष्ट काम करणा-या संबंधित दोषीवर कडक कारवाई करावी, अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे सूचना देत आहे."

--

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : नागपूर महामार्गावरील तिवसा जवळील भारवाडी गावावरुन जाणा-या पुलावर झालेल्या भीषण अपघातात

भारतीय जनता पक्षाच्या कार्यकत्यांचा झालेला मृत्यू
याबाबत श्री. पांडुरंग फुंडकर,वि. प. स. यांनी दिलेली
विशेष उल्लेखाची सूचना

श्री. पांडुरंग फुंडकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"दिनांक 11 डिसेंबर 2012 रोजी नागपूर येथे भारतीय जनता पक्षाने आयोजित केलेल्या मोर्चात सहभागी होऊन खामगाव, जिल्हा बुलढाणा येथे परतणा-या भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या इंडिका गाडीचा नागपूर महामार्गावरील तिवसाजवळील भारवाडी गावावरुन जाणा-या पुलावर भीषण अपघात झाला. या अपघातात इंडिका गाडीतील सर्वश्री मनिष ठाकूर व युवराज पुरोहित या तरुण कार्यकर्त्यांना आपला प्राण गमवावा लागला असून सर्वश्री प्रमोद सरोदे, निखिल दुबे व कुणाल श्रीवास्तव हे तरुण गंभीर जखमी झाले. या जखमी व्यक्तीपैकी श्री. कुणाल श्रीवास्तव या तरुणाचे आजच निधन झाले.

या ठिकाणी 4 पदरी रस्त्याचे बांधकाम सुरु असून रस्त्याचे काम अपूर्ण असल्यामुळे या रस्त्यावर वळणमार्ग दिलेला होता. जेथे वळणमार्ग दिला होता तेथे कोणताही सूचना फलक लावलेला नव्हता किंवा वळणमार्ग दाखविण्यासाठी कंपनीचा सुरक्षा रक्षकही उपस्थित नव्हता. वळणमार्ग दाखविण्यासाठी तेथे सूचना दर्शक लाल दिवेही लावलेले नसल्यामुळे वाहन चालकाला वळणमार्ग असल्याचे निदर्शनास आले नाही. ज्या ठिकाणी अपघात झाला ते ठिकाण राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 6 वरील भारवाडी गावाजवळ नवीन उड्डाण पुलानजीक होते. सदर उड्डाणपुलाचे बांधकाम नव्याने झाले असून ते पूर्ण झालेले नसल्याचे घटनास्थळावरुन आढळून आल्याची माहिती तिवसा पोलीस स्थानकाकडून अमरावती हायवे अथॉरिटीच्या प्रकल्प संचालकांना दिनांक 13 डिसेंबर 2012 रोजी पाठविलेल्या पत्राद्वारे केली आहे. या उड्डाण पुलाचे बांधकाम कोणत्या कंपनीने केले आहे व काम पूर्ण झाल्याबाबतचा अहवाल कंपनीने आपल्याकडे कधी दिला आहे, सदर उड्डाणपुलावरुन सार्वजनिक वाहनांची वाहतूक कधी व कोणाच्या आदेशाने सुरु करण्यात आली, सदर उड्डाण पुलाचे काम पूर्ण झाल्याबाबत व तो वापराबाबत कोणत्या अधिका-याने तपासणी केली अशी विचारणा तिवसा पोलीस स्थानकाकडून प्रकल्प संचालकांना केली असून

..4..

श्री. पांडुरंग फुंडकर....
याबाबतचा अहवाल मागितला असल्याचे समजते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

या अपघातस्थळाला मी स्वत: भेट देऊन पाहणी केली असता वर नमूद केलेल्या त्रुटी माझ्या निदर्शनास आल्या. झालेला अपघात हा रस्त्याच्या सुरु असलेल्या चौपदरीकरणाच्या कामावर सूचना फलक नसल्यामुळे व त्या ठिकाणी सुरक्षा कर्मचा-याची नियुक्ती केलेली नसल्यामुळेच झालेला आहे. या अपघातास रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम करणारा ठेकेदार जबाबदार असल्यामुळे त्यांच्यावर तातडीने कठोरात कठोर कारवाई करावी अशी आग्रही मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे."

--

...5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : गोरेगाव ता. जि. अकोला येथील समाज कल्याण विभागाच्या शासकीय आश्रमशाळेतील कुमारी जया चक्रनारायण या विद्यार्थीनीचा झालेला संशयास्पद मृत्यू याबाबत डॉ.रणजित

पाटील, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

डॉ. रणजित पाटील (अमरावती विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

...नंतर श्री. जुन्नरे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. रणजित पाटील .....

गोरेगाव तालुका जिल्हा अकोला येथील समाज कल्याण विभागाच्या शासकीय आश्रमशाळेत कुमारी जया चक्रनारायण या 14 वर्षे वयाच्या शाळकरी विद्यार्थीनाचा दिनांक 4.12.2012 रोजी संशयास्पद मृत्यू होणे, चक्रनारायण कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असणे, या घटनेचे गांभीर्य समजून न घेता उलट त्यांच्या कुटुंबीयांना उध्दटपणाची वागणूक देणे, कुमारी जया चक्रनारायण हिच्या मृत्यू प्रकरणी संबंधित वसतिगृह प्रशासक व समाज कल्याण विभागाच्या अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे झालेल्या मृत्यूची सखोल मागणी होणे, वसतिगृहात मूलभूत सुविधा उपलब्ध नसणे, काही दिवसापूर्वी लैंगिक अत्याचाराची तक्रार होऊन कर्मचाऱ्यांवर कारवाई झालेली असणे, मृत्यू पावलेल्या विद्यार्थिनीच्या कुटुंबीयाना सदर प्रकरण दडपण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी धमकावणे, सदर प्रकरणाची तातडीने सीआयडी कडून चौकशी होण्याची आवश्यकता असणे यासाठी मी विशेष उल्लेख दिलेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. :मुंबई,पुणे,ठाणे, नवी मुंबई या ठिकाणच्या विशिष्ट रस्त्यावर मोटार बाईकची रेस लावणे याबाबत श्री. दिवाकर रावते,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

सभापती महोदय, ध्वनिप्रदूषण हा महत्वाचा विषय आहे. कुठे सभा घ्याव्यात, कोणत्या मैदानावर सभा घेऊ नयेत याबाबत नियम आहेत. परिवहन मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. रोज रात्री प्रचंड आवाज करुन मोटार-सायकल रस्त्यावरुन जात असतात. या मोटर-सायकलच्या मोठया आवाजाने लोकांना झोप येत नाही. ही मंडळी रात्रभर रेस खेळत असतात, वेगवेगळया कसरती करीत असतात व असे असतांना त्यांच्यावर पोलिसांचा कोणताही निर्बंध नसतो. त्यामुळे हे प्रकार मुंबईतून तातडीने बंद व्हावे यासाठी मी विशेष उल्लेखाचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. या रेसमध्ये अनेक तरुण मृत्युमुखी पडत आहेत. त्यामुळे संबंधित खात्याने या मोटर-सायकली तातडीने जप्त करुन कायदेशीर कारवाई करावी यासाठी मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : औचित्याचे मुद्दे

(पुढे सुरु....

सभापती : सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सांवत यांचा औचित्याचा मुद्दा आहे त्यांनी तो मांडावा.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. या विषयाच्या संदर्भात आपल्या दालनात मी चर्चा केली होती. नागपूरमध्ये दिनांक 13.6.2010 रोजी रिजनल विदर्भ स्पेशालिटी हॉस्पिटल म्हणून कॅन्सर हॉस्पिटल व्हावे याबाबत एक प्रस्ताव पारित झाला होता. गेल्या काही दिवसापूर्वी कॅन्सर रुग्णांनी आंदोलन केले होते. काल माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यांच्यामध्ये मध्यस्थी केली ही बाब अभिनंदनीय आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी मध्यस्थी केली असली तरी नागपूरचा कॅन्सरचा प्रश्न यामुळे सुटणार नाही. नागपूर, पुणे, मुंबई व औरंगाबाद पेक्षा नागपूरमध्ये सर्वात जास्त कॅन्सरचे रुग्ण आढळून येतात. माननीय मंत्री महोदय श्री. शेट्टी साहेबांना या विषयाची माहिती आहे. नागपूरमध्ये स्त्रियांना स्तनाचा कॅन्सर तसेच गर्भाशयाच्या मुखाचा कॅन्सर मोठया प्रमाणात होतो.

नागपूरमध्ये केवळ नागपूरचेच पेशंट येतात असे नाही तर मध्यप्रदेश, छत्तीसगड तसेच आंध्रप्रदेशमधून सुध्दा पेशंट येत असतात. माजी सन्माननीय सदस्य श्री. जोगेंद्र कवाडे सभागृहात वारंवार कोबाल्ट युनिटच्या माध्यमातून विषय उपस्थित करत असत. ज्या रुग्णांना रेडिओथेरपी किंवा केमोथेरपी करावयाची असते त्या युनिटची क्षमता आता संपलेली आहे. रेडिओथेरपीसाठी एक एक महिन्याची प्रतीक्षा सूची आहे. स्त्रियांना ब्रेकी थेरपी घेण्यासाठी एक ते दीड महिन्याची प्रतीक्षा सूची आहे. या वेटींगमुळे त्यांचा मृत्यू देखील होत असतो. 10 लाख लोकांसाठी एक केमोथरपी युनिट असले पाहिजे परंतु येथे 45 लाख लोकांच्या मागे एक केमोथरपी युनिट आहे. माझी औचित्याच्या माध्यमातून आपल्याला विनंती आहे की, माननीय मुख्यमंत्र्यांनी कॅन्सर पेशंटला काही आश्वासन दिले होते त्यामुळे या आश्वासनाची पूर्तता लवकरात लवकर होणे अत्यंत आवश्यक आहे. या ठिकाणी अद्यायावत केमोथेरपी युनिट उभे राहणे आवश्यक आहे. या युनिटसाठी साधारण 50 ते 60 कोटी रुपये खर्च येणार आहे.

यानंतर श्री. ओटवणेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

त्याच बरोबर स्त्रियांसाठी देखील ब्रॅकी थेरपीचे युनिट असणे आवश्यक आहे. कारण माननीय मंत्री डॉ.गावित साहेबांनी त्यांना अनेक वेळा आश्वासने दिलेली आहेत. पण त्याबाबत काहीच झाले नाही. आता यात माननीय मुख्यमंत्र्यांनी लक्ष घातले आहे. तो निर्णय आपण तडीस न्यावा अशी मी औचित्याच्या मुद्याद्वारे आपल्याला विनंती करीत आहे.

=====

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.अपूर्व हिरे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, धुळे आदिवासी विभागाचे प्रकल्प कार्यालय स्वतंत्र करण्यात आले. ते स्वतंत्र करण्यात आल्यानंतर त्यास ग्रँट देण्यात आलेली नाही. त्यामुळे गेल्या तीन महिन्यापासून आदिवासी विकास विभाग कर्मचारी आणि त्या अंतर्गत येणाऱ्या शिक्षकांचे पगार झालेले नाहीत. त्याकडे आपण तातडीने लक्ष द्यावे अशी मी आपणा मार्फत विनंती करीत आहे.

.....

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, राज्यातील मागास समाजातील अनुसूचित जाती - जमातीच्या घटकांसाठी केंद्र शासनाच्या इंदिरा आवास योजनेच्या धर्तीवर राज्य शासनाने आणलेल्या रमाई आवास योजनेचे काम वित्त विभागाची मंजुरी मिळाली नसल्यामुळे रखडले आहे. यामुळे राज्यातील लाखो नागरिकांना घरकुला पासून वंचित रहावे लागत आहे. सन 2013-14 या पुढील वर्षी 664 कोटी 32 लाख रूपये खर्च करण्यात येऊन एक लाख 73 हजार 591 घरकुले बांधण्याचे उद्दिष्ट आहे. हे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी सामाजिक न्याय विभागाने या योजनेच्या खर्चास मंजुरी मिळण्यासंबंधीचा प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठविला आला असून वित्त विभागाच्या दुर्लक्षपणामुळे या प्रस्तावास अद्यापि मंजुरी मिळाली नाही. यामुळे राज्यातील अनेक मागासवर्गीय इंदिरा आवास योजनेच्या घरकुलापासून वंचित राहणार आहेत. त्याकडे शासनाने लक्ष द्यावे असा माझा औचित्याचा मुद्दा आहे.

....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, राज्यात विशेष करून मुंबई शहर व उप नगरात ठाणे, डोंबिवली येथे रस्त्यावरून जाणाऱ्या मुलींची टिंगल-टवाळी करणे, सार्वजनिक ठिकाणी त्यांच्यावर शेरे मारणे, अत्याचाराचे प्रकरणे घडणे असे प्रकार राज्यात सर्रास होत असून ते प्रामुख्याने रेल्वे स्थानक, बस स्टॉप, रस्ते, मॉल्स, कॉलेजेस, चित्रपटगृहे इत्यादी ठिकाणी होत असल्याचे आढळून येत आहे. मुलींच्या छेडछाडीमुळे राज्यात किती तरी मुलींनी आत्महत्या केल्याचे प्रकार देखील निदर्शनास आले आहेत. नोव्हेंबर 2012 मध्ये प्रसिद्ध झालेल्या राज्य पोलीस गुन्हे अन्वेषण विभागाच्या आकडेवारी नुसार मुंबई आणि राज्यात छेडछाडीच्या प्रकारात वाढ झाली असून त्यात विनयभंग आणि छेडछाडीच्या प्रकारात 80 टक्के वाढ झाल्याचे आढळून आले आहे. अशा या घटनांमुळे राज्यातील महिलांच्या मध्ये व मुलींच्या मनामध्ये निर्माण झालेले भीतीचे व घबराटीचे वातावरण यावर शासनाने तातडीने सदर प्रकरणाची दखल घेऊन यावर आळा घालण्यासाठी तातडीने पाऊल उचलावे असा मी औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

.....

..5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नरेंद्र पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, कृषी उत्पन्न बाजार समिती आणि त्या माध्यमातून अन्य बाजारपेठांमध्ये काम करणाऱ्या माथाडी कामगारांसंबंधी मी बोलणार आहे. महाराष्ट्रात कष्टकरी काम करणाऱ्या कामगारांसाठी माथाडी कामगार कायदा स्थापित झाला. पण कुठे काही अडचण झाली, माथाडी कामगारांच्या युनियन नेत्यांनी चुकीच्या प्रवृत्तीचे काम केले तर राज्य सरकारच्या माध्यमातून सांगितले जाते की, माथाडी कामगार येथून वगळण्यात यावा. मध्यंतरी असे वाचण्यात आले की, कृषि उत्पन्न बाजार समितीमधून माथाडी कामगार कायद्याच वगळण्यात यावा, अशा प्रकारच्या हालचाली पणन विभागात सुरू आहेत. ते आमच्या देखील निदर्शनास आलेले आहे. हा कायदा करण्यासाठी स्व.यशवंतराव चव्हाण, स्व.नरेंद्र तिडके, स्व.वसंतदादा पाटील, माननीय श्री.शरद पवार साहेबांचा फार मोठा वाटा आहे. तेव्हा कष्टकरी कामगारांसाठी तयार केलेला कायदा सहजासहजी रद्द न करता जो चुकतो आहे त्याला शासन करावे. पुण्यामध्ये काही ठिकाणी गोळीबार झाला. मालकांवर गोळीबार झाला. कंत्राटदारावर गोळीबार झाला. पण जेथे गोळीबार होतो तेथील कामगार नेत्याला पकडायला कोणी जात नाही. वाईट प्रवृत्तीची माणसे असतात त्यांना पकडले जात नाही. आज सर्रास म्हटले जाते की, माथाडी कामगारांमध्ये बदल करण्यात यावा. माझी अशी विनंती आहे की, अशा प्रकारचे कोणतेही पाऊल राज्य सरकारने उचल नये.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विशेष उल्लेख

(पुढे सुरू.....

पृ. शी./मु. शी. : आधार कार्ड जलद गतीने मिळणे याबाबत श्रीमती विद्या चव्हाण वि. प स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडते.

"राज्यात रेशन लाभार्थीचे अनुदान थेट बँकेतील त्यांच्या खात्यात जमा करण्याची महत्वाकंक्षी योजना शासनाने आखणे,

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण..

अन्न व नागरी पुरवठा विभागाने थेट अनुदान देण्यासाठी पहिल्या टप्प्यात राज्यातील मुंबई व उपनगर, वर्धा, नंदूरबार, पुणे व अमरावती असे पाच जिल्हे निवडणे, तीन महिन्यांपूर्वी बँकेत खाती उघडण्याची प्रक्रिया सुरु होणे, ज्यामध्ये अमरावती 50 टक्के, नंदूरबार 71 टक्के, पुणे 13 टक्के तर वर्धा येथे 71 टक्के प्रक्रिया पूर्ण झाली असणे, परंतु मुंबईत ही प्रक्रिया अजून सुरु झालेली नसणे, मुंबईतील झोपडपट्टीत राहणाऱ्या 60 टक्के शिधापत्रिका धारकांना रॉकेलची आवश्यकता असणे, आधारकार्ड देण्यासाठी मुंबई व विदर्भात सुरु असलेली केंद्रे त्यांना माहीत नसणे, परिणामी अनुदान प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांच्याजवळ आधारकार्ड नसल्यामुळे सदर रेशनकार्डधारक लाभार्थ्यांवर अनुदान योजनेच्या लाभापासून वंचित राहण्याची आलेली पाळी, मुंबई व उपनगरातील झोपडपट्टीधारकांना व इतरांना रेशन अनुदान मिळण्यासाठी आधारकार्ड मिळण्याची प्रक्रिया जलद गतीने व्हावी अशी मी विशेष उल्लेखाद्वारे शासनास विनंती करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

औचित्याचे मुद्दे

(पुढे सुरु.....)

श्री. विनायक राऊत : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, कालच्या वर्तमानपत्रामध्ये महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागातर्फे एक जाहिरात प्रसिध्द झालेली आहे. राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना अशी ती जाहिरात आहे. जुलै 2012 पासून आठ जिल्ह्यांतील जवळपास 20 हजार कुटुबांनी या योजनेचा लाभ घेतला असे जाहिरातीमध्ये नमूद केलेले आहे. राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना ही अतिशय उपयुक्त अशी योजना आहे. ही योजना सध्या फक्त आठ जिल्ह्यांमध्ये लागू करण्यात आलेली आहे. माझी शासनाला विनंती आहे की, ही योजना महाराष्ट्रातील सर्वच जिल्ह्यांमध्ये आणि विशेषत: विदर्भामध्ये तातडीने लागू करावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, राज्य शासनाने महिलांना विशेष सवलत व सहाय्य करण्याच्या उद्देशाने सध्याच्या प्रसूती रजेचा कालावधी 90 दिवसांवरुन 180 दिवसांपर्यंत वाढविण्याचा निर्णय घेतलेला आहे.

शालेय शिक्षण विभागाने सुध्दा शासन निर्णय निर्गमित करुन प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये काम करणाऱ्या महिला शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना प्रसूती रजा 180 दिवसांपर्यंत वाढविण्याचा आदेश काढला आहे.

आदिवासी विभागाच्या आश्रमशाळांमध्ये काम करणाऱ्या महिलांना अद्यापही या वाढीव प्रसूती योजनेचा लाभ मिळत नाही. आदिवासी विभागाने या संदर्भातील आदेश अद्याप न काढल्यामुळे महिला कर्मचाऱ्यांना हा लाभ मिळू शकत नाही. तेव्हा शासनाने या संदर्भात तातडीने आदेश काढून आदिवासी विभागाच्या आश्रमशाळांमध्ये काम करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांना प्रसूती रजेचा लाभ द्यावा अशी विनंती आहे.

त्याच बरोबर मूल दत्तक घेतलेल्या महिलांना सुध्दा प्रसूती रजा अनुज्ञेय आहे. परंतु त्या संदर्भातील आदेशामध्ये शासनाने अद्याप बदल केलेला नसल्यामुळे त्यांना देखील या योजनेचा लाभ मिळत नाही. तेव्हा मी आपल्यामार्फत शासनाला विनंती करतो की, त्यांनी यामध्ये लक्ष घालावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विधान भवन, नागपूर या वास्तुच्या बांधकाम पायाभरणी शुभारंभास 100 वर्षे पूर्ण झाल्याबद्दल

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी) : सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की, विधान भवन, नागपूर या वास्तुच्या बांधकामाचा (पायाभरणी) शुभारंभ माननीय चार्लेस बॅरॉन हार्डिग्ज ऑफ पेन्सहर्स्ट, व्हाईसराय ॲन्ड गव्हर्नर जनरल ऑफ इंडिया यांच्या शुभहस्ते मंगळवार, दिनांक 17 डिसेंबर, 1912 रोजी झाला. त्यास आज सोमवार, दिनांक 17 डिसेंबर, 2012 रोजी बरोबर 100 वर्षे पूर्ण होत आहेत. सदर इमारत सॅन्ड स्टोन आणि चुना यांचा वापर करुन बांधण्यात आली आहे. विधान भवन, नागपूर इमारत पायाभरणीच्या शताब्दीच्या निमित्ताने इमारतीस विद्युत रोषणाई आणि पुष्प सजावट करण्यात आली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: सदस्यांची अटक व त्यांच्या सुटकेसंबंधी घोषणा

तालिका सभापती : मला वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन सिताबर्डी नागपूर शहर, नागपूर यांच्याकडून कळविण्यात आले आहे की, श्री.विनोद श्रीधर तावडे, माननीय विरोधी पक्ष नेते विधान परिषद,

यानंतर श्री.सरफरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्री. मोहन जोशी)....

व ॲड. आशिष बाबाजी शेलार, वि.प.स. यांना पोलीस स्टेशन, सीताबर्डी नागपूर शहर, नागपूर येथे 18 डिसेंबर 2012 मुंबई पोलीस अधिनियम 1951 च्या कलम 61 अन्वये 17 वाजून 50मिनिटांनी ताब्यात घेऊन त्यांना त्याच दिवशी 18 वाजून 10 मिनिटांनी मुक्त करण्यात आले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचना

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री. विनायक राऊत यांनी "सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तिलारी प्रकल्पग्रस्तांना सरकारी सेवेत सामावून घेण्याबाबत निर्णय घेण्याची आवश्यकता" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य ॲड. अनिल परब यांनी "ठाणे महापालिका हद्दीतील नागरिकांना महापालिकेतर्फे पाणीपुरवठा योग्यप्रकारे होत नसल्याने त्यांच्यामध्ये पसरलेला असंतोष" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, भगवान साळुंखे, नागो पुंडलिक गाणार यांनी "राज्य व राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त शिक्षकांना दोन आगाऊ वेतनवाढी देणे, अशासकीय माध्यमिक शाळांमध्ये शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा आकृतिबंध माध्यमिक शाळा संहितेनुसार करणे, अशा अनेक लाभांपासून राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर हजारो कर्मचारी वंचित असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री भगवान साळुंखे, रामनाथ मोते, नागो पुंडलिक गाणार, चंद्रकांत पाटील, डॉ. रणजित पाटील यांनी "वाढत्या औद्योगिकीकरणाची गरज लक्षात घेऊन औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधून दुसऱ्या व तिसऱ्या सत्रात प्रशिक्षण सुरु करणे व त्यासाठी 1500 निदेशकांच्या नियुक्त्या प्रस्तावित करणे, त्यापैकी 400 जागा कंत्राटी पध्दतीने भरणे, त्यातच सुमारे 150 निदेशकांचा दोन वर्षाचा कालावधी पूर्ण झाल्याचे निमित्त करुन सेवामुक्त करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती ....

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नागो पुंडलिक गाणार, नितीन गडकरी, भगवान साळुंखे, रामनाथ मोते, डॉ. रणजित पाटील यांनी "व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण विभागाच्या नागपूर व अमरावती येथील प्रादेशिक कार्यालयातील चतुर्थ श्रेणी अपंग कर्मचारी वर्षानुवर्षे कंत्राटी पध्दतीवर काम करीत असून अपंग कर्मचाऱ्यांना बढती न मिळणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी "अंबरनाथ (जि. ठाणे) शहरातील यशवंतराव चव्हाण खुले नाटयगृहाच्या मैदानावर अंबरनाथ नगरपालिकेने मंजूर केलेला वाहनतळ उभारण्याचा प्रस्ताव रद्द करुन त्याचे सुशोभिकरण करण्याची आवश्यकता" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, रामनाथ मोते यांनी "राज्यात पंतप्रधान ग्रामसडक योजनेंतर्गत ज्या रस्त्यांच्या कामांना मंजुरी मिळालेल्या रस्त्यांना दुसऱ्या हप्त्याची रक्कम मिळण्याच्या दृष्टीने अपूर्ण कामे तातडीने पूर्ण करण्याची आवश्यकता " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी "राज्यातील होमिओपॅथिक व आयुर्वेदिक डॉक्टरांना ॲलोपॅथीची प्रॅक्टिस करण्याची अनुमती देण्याच्या दृष्टीने उपाय योजना करण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मौजे चांदूरबाजार, जि.अमरावती येथील बेलोरा-बोराळा रस्त्याकरिता अत्यंत अल्प दरात जमीन संपादित करणे

मु. शी. : मौजे चांदूरबाजार, जि.अमरावती येथील बेलोरा-बोराळा रस्त्याकरिता अत्यंत अल्प दरात जमीन संपादित करणे यासंबंधी श्री. जयंत प्र. पाटील,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मौजे चांदूर बाजार तालुक्यातील (जिल्हा अमरावती) बेलोरा - बोराळा रस्त्याच्या बांधकामासाठी २९ शेतकऱ्यांची एकूण ३.५५ हेक्टर आर. जमीन संपादन करणे, जमिनीचे दर निश्चितीबाबत झालेल्या अन्यायाबाबत उप जिल्हाधिकारी (भूसंपादन) (अ व प्र) लाभक्षेत्र क्रमांक २ यांनी दिनांक २१ जुलै, २०१२ रोजी दिशाभूल करणारी माहिती देणे, सदर अहवालात दर निश्चितीबाबत शेतकऱ्यांवर होणारा अन्याय दूर न होणे, कलम ४ ने नोटीसीचे प्रसिध्दीकरण दिनांक ११ जानेवारी, २०१२ रोजी न होता दिनांक ८ फेब्रुवारी, २०११ रोजी होणे, मात्र अहवालात यासंबंधी खोटी माहिती देणे, त्यामुळे शेतकऱ्यांच्या जमीनीला वर्ग ३ करीता प्रति हेक्टरी रुपये २ लाख ५३ हजार ५००/- व वर्ग ४ चे करीता प्रति हेक्टरी रुपये २ लाख ७९ हजार मात्र दर ठरविणे, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगर रचना, अमरावती यांनी त्यांचे दिनांक २७ फेब्रुवारी, २०१२ चे पत्रानुसार प्रारुप आराखड्यात वर्ग ३ करीता (क्षेत्र २.५१ ते ५ हेक्टर पर्यंत) रुपये ११ लाख ९२ हजार प्रति हेक्टरी दर राहील हे स्पष्ट करणे, असे असताना शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी अत्यंत अल्प दर निश्चित करणे, यामुळे शेतकऱ्यांमध्ये अतिशय संताप व्यक्त होत असल्याने शासनाने करावयाची उपाययोजना व केलेली कार्यवाही."

श्री.बाळासाहेब थोरात (महसूल मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मी चांदूरबाजार तालुक्यातील बोराळा गावामध्ये स्वत गेलो होतो. तेथील बेलोरा-बोराळा रस्त्याच्या बांधकामासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्यात आल्या आहेत. त्याकरिता सहाय्यक संचालक, नगर रचना, अमरावती यांनी जमिनीचा दर चुकीचा ठरविला आहे . या गावामध्ये रहिवाशी असलेली श्रीमती उज्वला वसंत महाजन हिने 20 लाख रुपयांना तिची जमीन विकली. तिच्या जमिनीच्या बाजूच्या जमिनीचा दर रेडी रेकनरने 2 लाख रुपये ठरवित आहात हे चुकीचे आहे. मी याकरिता मंत्रीमहोदयांना सुध्दा भेटलो आहे. ते म्हणाले की, याबाबत मी काहीही करु शकत नाही आपण कोर्टामध्ये जावे. हे शेतकरी गरीब असून त्यांना एक वेळ सुध्दा पुरेसे जेवण मिळत नाही. ज्या अधिकाऱ्यांनी हा दर व्यवस्थित ठरविला नाही त्यांची शासन चौकशी करणार आहे काय? अशापध्दतीने गोरगरीब शेतकऱ्यांवर अन्याय करणारा दर जर शासन ठरविणार असेल तर ती गोष्ट बरोबर नाही, याचा फेरविचार शासन करणार आहे काय?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, अस्तित्वात असलेल्या कार्यपध्दतीनुसार उपजिल्हाधिकारी, भूसंपादन यांनी प्रस्ताव तयार केला. माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे 20 लाख रुपये दरासंबंधीचा प्रस्ताव सहाय्यक संचालक, नगर रचना, अमरावती यांना पाठविण्यात आला. याबाबत एक तज्ज्ञ समिती असून त्या समितीने हा दर अवास्तव असल्याचा अभिप्राय व्यक्त केला. त्यामुळे इतका दर आपल्याला देता येणार नाही अशाप्रकारचा निर्णय नगर रचना विभागाच्या सहाय्यक संचालकांनी घेतला. त्यापध्दतीने ॲवॉर्ड डिक्लेअर करण्यात आले आहेत. एकदा ॲवॉर्ड जारी झाल्यानंतर त्यामध्ये कोणतीही दुरुस्ती करता येत नाही. जर काही व्याकरणामध्ये चूक असेल तर किरकोळ दुरुस्ती करता येते याव्यतिरिक्त कोणतीही दुरुस्ती करता येत नाही. त्यामुळे याबाबत न्यायालयामध्ये जाण्याचा पर्याय आपल्याकडे आहे. संबंधित शेतकऱ्यांनी यासंबंधी न्यायालयामध्ये गेल्यास न्यायालयाकडून त्यांना निश्चितपणे न्याय मिळू शकेल.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, माझा माननीय मंत्री महोदयांना स्पेसिफीक प्रश्न आहे की, सहाय्यक संचालकांना जो प्रस्ताव देण्यात आला आहे तो 20 लाखाप्रमाणे महाजनांच्या खरेदीखतावर केला. मग सहाय्यक संचालकांनी असे म्हटले की, हा प्रस्ताव अवास्तव व जास्त दराने करण्यात आला असल्यामुळे त्यांनी तो 2 लाख 53 हजार किंवा 2 लाख 79 हजाराचा केला. ज्यावेळेला महाजनांचा 20 लाखाच्या बाबतीत व्यवहार झाला. त्यावरील जी स्टॅम्प ड्युटी आहे ती प्रशासनाने 20 लाखाप्रमाणे घेतली आहे काय हा पहिला प्रश्न आहे. समजा जर त्यांनी 20 लाख असे अद्यारुत धरुन घेतली असेल तर मग ॲक्वीझिशनची कॉस्ट देताना ती अवास्तव आहे असे म्हणण्याचे कारण काय आहे ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, मूल्याकंन करण्याच्या तीन पध्दती असतात. कलम 4 च्या प्रसिध्दीच्या दिनांकांपूर्वी पाच वर्षाचा खरेदी-विक्रीचा दर पहाणे, रेडीरेकनर नुसार येणारा दर आणि याव्यतिरिक्त संबंधित शेतकऱ्यांना दिलेला दर, यामध्ये जी जमीन ॲक्वायर केली आहे, त्याच्या शेजारील जमीन या दराने गेली आहे. यामुळे बाकी व्यवहार अशा प्रकारे झाल्याचे दिसत नाहीत. जेव्हा पाच वर्षात अशा प्रकारचे व्यवहार झाल्याचे दिसत नाही आणि 81 (आर) चा एकच अशा प्रकारचा व्यवहार दिसतो. त्यावेळी नगररचनाच्या सहाय्यक संचालक यांना असे वाटते की, हा अवास्तव दर दिलेला आहे आणि त्याचा परिणाम म्हणून अशा प्रकारे भूसंपादन करता येणार नाही. मी याठिकाणी स्पष्टपणे सांगतो की, यापेक्षा मला वेगळे उत्तर देता येणार नाही. एकदा अवॉर्ड झाले की, त्यामध्ये आमच्या माध्यमातून कोणतीही दुरुस्ती करता येत नाही. याला एकच पर्याय रहातो आणि तो म्हणजे न्यायालयीन. अशा वेळी संबंधित शेतकरी न्यायालयामध्ये गेल्या नंतर आम्ही आमची बाजू तेथे निश्चितपणे मांडू. त्यावर न्यायालय योग्य तो न्याय देईल.

. . . .2 व्ही-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : मे. टोरँट कंपनीने कोट्यावधी रुपयांचा केलेला अपहार

मु.शी. : मे. टोरँट कंपनीने कोट्यावधी रुपयांचा केलेला अपहार याबाबत सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय ऊर्जा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"महावितरणतर्फे भिवंडी मंडळाचा कार्यभार मे.टोरँट पॉवर कंपनी यांना दिनांक 26 जानेवारी 2007 पासून 10 वर्षाकरिता फ्रेंचाईसी तत्वावर देण्यात येणे, कंपनीने 20 महिन्यांपर्यंत कायमस्वरुपी बंद असलेल्या ग्राहकांचे सरासरी बिलींग करुन अंदाजे 300 करोड रुपये महाराष्ट्र शासनाकडून चुकीच्या पध्दतीने सबसिडी रुपाने घेऊन कोटयावधी रुपयांचा झालेला अपहार. वाढीव बिले व सरकारी अधिकाऱ्यांबरोबर आर्थिक सौदेबाजी होत असल्याबाबत स्थानिक संघटनेने उक्त अपहाराबाबत मा.मुख्यमंत्री, मा.उर्जामंत्री व संबंधित विभाग यांना वारंवार निवेदन देवूनही अद्यापपर्यंत त्यांच्यावर कुठल्याही प्रकारची कारवाई न केल्याचे माहे नोव्हेंबर-2012 च्या सुमारास निदर्शनास येणे, कंपनीशी झालेल्या कराराप्रमाणे ग्राहकांना सुरळीत सेवा देणे व जूनी वीज वितरण प्रणाली बदलणे याचा अंर्तभाव असणे, परंतु सदर प्रणाली अद्याप बदलण्यात न आल्याने 100 पेक्षा जास्त लोकांचा मृत्यू व 100 लोक जखमी झालेले असणे, परिणामी कंपनी संदर्भात जनतेच्या मनात तीव्र असंतोष पसरत असून त्याचा भडका कधीही उफाळून गंभीर प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असणे, मृत्यूमुखी पडलेल्या नागरिकांबाबत मे.टोरँट पॉवर कंपनी यांना जबाबदार धरुन कारवाई करावी व त्यांच्याबरोबर झालेला करार रद्द करण्यासाठी होत असलेली मागणी, शासनाने उच्चस्तरीय चौकशी करुन मे.टोरँट पॉवर कंपनी फ्रेंचाईसी लायसेंन्स रद्द करुन कंपनीवर कडक कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

श्री.राजेश टोपे (ऊर्जा मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी) : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, एखाद्या जनसमस्येवर संपूर्ण शहर, सर्व नेते मंडळी रस्त्यावर येतात याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे भिवंडी मध्ये मे.टोरँट पॉवर कंपनीच्या विरोधात झालेले आंदोलन. मे.टोरँट कंपनीचा असलेला मनमानी कारभार, वाढीव बिले देण्याचे होत असलेले प्रकार, ग्राहकांना सरासरी बिले देऊन 50 कोटी रुपयांचा केलेला घोटाळा. तसेच त्या ठिकाणी जे कर्मचारी पात्र नाहीत अशा कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली आहे. पण त्यातील कितीतरी मरण पावले आहेत. अशा प्रकारे कितीतरी गैरप्रकार, अनियमितता झाल्याचे जनतेने वेळोवेळी शासनाच्या निदर्शनास आणलेले आहे. सदनामध्ये माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटीलसाहेब उपस्थित आहेत आणि त्यांना कल्पना आहे की, ज्यादिवशी मोर्चा होता त्यावेळी भिवंडीमध्ये कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण झाली होती. त्यावेळी माननीय गृहमंत्री महोदयांनी देखील यामध्ये लक्ष घातले होते. त्यावेळी मी देखील तेथील स्थानिक लोकप्रतिनिधींशी बोलून याबाबत पाठपुरावा केला. तसेच माननीय मंत्री महोदयांनी स्थानिक जनतेचे आंदोलन स्थगित करावे यासाठी माननीय मंत्री महोदयांनी देखील आवाहन केले होते आणि ते जनतेने मान्य केले.

सभापती महोदय, आज असा प्रश्न उपस्थित झाला आहे की, या विषयाच्या बाबतीत काहीतरी तोडगा, काहीतरी पाऊल शासन उचलणार आहे की नाही? त्यामुळे माझा माननीय मंत्री महोदयांना स्पेसिफीक असा प्रश्न आहे की, याबाबत एक उच्चस्तरीय चौकशी झाली पाहिजे आणि या चौकशी समितीसमोर सर्व स्थानिक जनप्रतिनिधींना सुनावणीसाठी बोलविण्यात यावे. शासन तशा प्रकारची सुनावणी घेणार आहे काय ? तसेच याबाबत कालमर्यादा ठरविण्यात यावी. या सुनावणी मध्ये जर अनियमितता असल्याचे सिध्द झाले तर मे.टॉरंट पॉवर कंपनीचे कॉन्ट्रॅक्ट शासन रद्द करणार आहे काय, याबाबत माननीय मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी जे सांगितले त्या बाबत बोलावयाचे तर मागच्या काही महिन्यापासून लोकांमध्ये निश्चितपणे असंतोष आहे. त्या ठिकाणी सर्वपक्षीय मोर्चा देखील काढण्यात आला होता. परंतु ही वस्तुस्थिती आहे की, त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात डी.सी.एल.लॉसेस खूप मोठ्या प्रमाणात होते आणि ते जवळजवळ 44.5 टक्के होते. त्यामुळे डिस्ट्रीब्युशन कमर्शिअल लॉसेस 17.32 टक्क्यापर्यंत आलेले आहेत. तसेच तेथील रोहित्रे जळण्याचे प्रमाण 40 वरुन 1.9 वर आलेले आहे.

यानंतर श्री.बरवड . . . .

अशोधित प्रत / मुद्रणेतर नाही

श्री. राजेश टोपे ...

याचा अर्थ अनधिकृत लोड त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर असावयाचा. त्याचबरोबर कलेक्शन इफिशियन्सी हा एक महत्वाचा पॅरामिटर असतो. बिल न भरणे असा प्रकार असतो. कलेक्शन इफिशियन्सी 68 टक्के वरुन 99.02 टक्के झालेली आहे. या सर्व गोष्टी आवश्यक आहेत.

मी हे मान्य करतो की, त्या ठिकाणी 50 कोटी रुपये चुकीच्या पध्दतीने वसूल करण्यात आले होते. परंतु ते iSIs टोरँट कंपनीकडून परत वसूल करण्यात आलेले आहेत. तरी सुध्दा सन्माननीय सदस्यांच्या म्हणण्याप्रमाणे लोकांचे 100 टक्के असे मत आहे की, त्यांचे म्हणणे ऐकून घ्यावे आणि त्यांचे म्हणणे ऐकून घेऊन योग्य ते उपाय करावेत. यासाठी त्यांचे जे म्हणणे आहे त्या अनुषंगाने एखादी समिती गठीत करुन सर्व ग्राहकांना ऐकणे, त्या ठिकाणी अधिकाऱ्यांनाही उपस्थित ठेवणे आणि त्यातून ज्या काही योग्य उपाययोजना करण्यासारख्या असतील त्या करणे अशा पध्दतीची एखादी समिती गठीत केली जाईल आणि त्या पध्दतीने सर्व ग्राहकांना प्रॉपर हिअरींग दिली जाईल आणि हे सर्व काम येत्या एक महिन्याच्या आत केले जाईल.

ॲड. आशिष शेलार : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांनी काय काय गोष्टी गेन केल्या त्याबाबत सांगितले. निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, मेसर्स टोरँट पावर कंपनीला भिवंडी मंडळाचा कार्यभार सुपूर्द केल्यानंतर 31.10.2012 पर्यंत भिवंडी परिसरामध्ये एकूण 136 प्राणांतिक व 59 अप्राणांतिक अपघात झाले आहेत. यात जवळपास 67 टक्के मानवी विद्युत अपघात हे चालू लाईनच्या जवळ झालेले आहेत. माझा प्रश्न असा आहे की, वीज पुरवठा बंद असलेल्या ग्राहकांना देण्यात येणाऱ्या वाढीव बिलाच्या संदर्भात प्रत्यक्षात चौकशी समिती नेमलेली आहे असे निवेदनामध्ये म्हटले आहे. त्या चौकशीचा अहवाल आलेला आहे का आणि त्याचा अहवाल काय आहे ? अपघाताचे व चोरीचे प्रमाण कमी करण्यासाठी असे म्हटले आहे की, भूमिगत वाहिन्या टाकण्याचे काम सुरु आहे. शासनाने आतापर्यंत किती किलोमीटर भूमिगत वाहिनी टाकलेली आहे ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, पहिल्या प्रश्नाचे उत्तर असे आहे की, ई अँड वाय कंपनीची नेमणूक लेखापरीक्षण करण्यासाठी करण्यात आली होती. त्यांचे लेखापरीक्षण झालेले आहे. त्यामध्ये 50.93 कोटी रुपये एवढी रक्कम त्यांनी त्या ठिकाणी वसूल केली होती असे सिध्द झाले. जे डिसकनेक्टेड होते अशा पीडित झालेल्यांकडून, सवलतीचे जे ग्राहक होते त्या ग्राहकांकडून अशा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे ....

पध्दतीची चुकीची वसुली केली होती हे सिध्द झाले. त्यामुळे ते पैसे त्या कंपनीकडून परत वसूल करण्यात आलेले आहेत. जी काही मनुष्यहानी झाली आणि मोठ्या प्रमाणात अपघातही झाले त्या संदर्भात ज्या ठिकाणी दाट वस्ती आहे त्या ठिकाणी वरच्या वाहिनीऐवजी भूमिगत वाहिन्या टाकण्याचे काम मोठ्या प्रमाणावर हाती घेतलेले आहे. त्याच्या प्रत्यक्ष किलोमीटरची माहिती मी सभागृहाच्या पटलावर ठेवीन. परंतु बऱ्याच सुरक्षिततेच्या योजना करण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये रोहित्राचे नूतनीकरण करणे, सुरक्षा कुंपण घालणे, अर्थिंग करणे, नागरिकांना मार्गदर्शन करणे, सार्वजनिक ठिकाणी होर्डींन्ग लावणे अशा पध्दतीचे अनेक सुरक्षिततेचे उपाय करण्यात आलेले आहेत. जे लोक मृत पावले आणि अपघातामध्ये जे जखमी झाले त्यांना इलेक्ट्रीसिटी ॲक्टच्या नियमाप्रमाणे जे काही अनुदान देय आहे ते देण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. 45 मृतांना जी देय रक्कम आहे त्याप्रमाणे प्रती व्यक्ती 2 लाख रुपये रक्कम देण्यात आलेली आहे. अपघात झालेल्या 49 व्यक्तींना नियमाप्रमाणे अनुदान किंवा मोबदला देण्याचे काम निश्चितपणे करण्यात आलेले आहे.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, या ठिकाणी जी लक्षवेधी सूचना उपस्थित करण्यात आलेली आहे त्या सूचनेचा रोख वेगळा आहे. चौकशी अंती एखाद्याने 50 कोटीचा अपहार केला हे जाहीर झाले, आपण मान्य केले, त्यांनी पैसे भरले म्हणून त्यांना परत ते कॉन्ट्रॅक्ट देणे हे कोणत्या कायद्यामध्ये बसते ? सर्वात महत्वाचा प्रश्न असा आहे की, हा लोकरेटा तयार झाला आणि त्यानंतर हे सर्व झालेले आहे. त्यांनी स्वत:हून किंवा सरकारने हे केलेले नाही. टोरँट कंपनीला फ्रेन्चायजी म्हणून दहा वर्षाची मुदत दिली होती त्यामध्ये त्यांनी हा अपहार केलेला आहे आणि यामध्ये इतकी जीवितहानी झालेली आहे. अशा लोकांना परत ते कॉन्ट्रॅक्ट कसे देण्यात आले ? ते सरकारमध्ये कोठेही काम करण्याच्या लायकीचे नाहीत. आपला कायदाच तसे सांगतो. त्यांना जरी कंटीन्यू 10 वर्षे काम दिले असले तरी आता आपण त्याच्या पुढे आलो आहोत. ते कंत्राट रद्द केले पाहिजे. यामध्ये मोठ्या प्रमाणावर मनुष्यहानी झालेली आहे.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप ...

लोकप्रतिनिधींनी लावलेल्या रेट्यामुळे ही गोष्ट निदर्शनास आलेली आहे. या बाबतीत चौकशी करु असे मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे. परंतु प्रश्न हा आहे की, अशा भ्रष्ट कंत्राटदाराला सरकार पाठीशी घालत आहे काय, अशा कंत्राटदारावर शासन काय कारवाई करणार आहे ?

श्री. राजेश टोपे : पावरलूम्सना राज्य शासनाचे अनुदान असते. जेव्हा हे कंत्राट देण्यात आले त्यावेळी ग्राहकांचा डिजिटल डाटा देण्यात आला होता आणि त्यामध्ये काही चुकीच्या गोष्टी होत्या. त्यामुळे तसे बिल लावलेले होते. तक्रारी सुरु झाल्यानंतर त्या तक्रारीची चौकशी करण्यात आली. लेखापरीक्षण अहवाल सादर झाला. या गोष्टी जाणीवपूर्वक झालेल्या आहेत असे दिसून आले नाही. सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी उच्चस्तरीय चौकशी करावी असे सूचविले. याही उपर या कंपनीकडून योग्य सर्व्हिस दिली जात नाही असे वाटत असेल तर त्याबाबतीत योग्य ती कारवाई करण्यात येईल.

श्री. रामनाथ मोते : टोरँट कंपनीकडून शासनाची झालेली फसवणूक आणि 100 पेक्षा अधिक लोकांचा झालेला मृत्यू या विषयावर सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी लक्षवेधी सूचना विचारलेली आहे. मंत्री महोदयांनी सविस्तर माहिती दिली. या टोरँट कंपनीला फ्रांचायजी दिल्यामुळे महावितरण कंपनीचा कसा फायदा झाला हे मंत्री महोदयांनी सांगण्याचा प्रयन केलेला आहे. हे खरे असले तरी 100 पेक्षा अधिक लोकांचा झालेला मृत्यू आपल्याला नजरेआड करुन चालणार नाही. ही अतिशय गंभीर बाब आहे. 100 पैकी 45 लोकांना नुकसान भरपाई दिलेली आहे. केवळ नुकसान भरपाईने हा प्रश्न सुटणार नाही. नुकसान भरपाई ही केवळ मलमपट्टी आहे. तेव्हा 100 लोकांच्या मृत्यूचे कारण काय आहे याची चौकशी होण्याची आवश्यकता आहे. 45 लोकांना मदत दिलेली आहे. उर्वरित लोकांना केव्हा मदत देण्यात येईल, या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्यात येईल काय ?

श्री. राजेश टोपे : अनसेक्युअर पध्दतीमुळे अपघात होतात. फ्रांचायजी देण्यामागचा हेतू काय तर जेथे दाटवस्ती आहे, जेथून अंडरग्राऊंड लाईन जाण्याऐवजी वरुन लाईन गेलेल्या आहेत, रोहित्रांच्या संख्येमध्ये वाढ करणे आवश्यक आहे, काही ठिकाणी आकडे टाकले जातात, कंडक्टर वायरवर जास्त करण्ट ड्रॉ झालेला असतो, अशा गोष्टींमुळे अपघात होत असतात. म्हणून या बाबतीत करेक्टिव्ह मेझर्स घ्यावेत असे टोरँट कंपनीला लेखी सांगितले. 22 केव्हीचे नवीन 46

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे....

फिडर्स वाढविण्यात आाले. 22 केव्हीच्या नवीन 46 लाईन वाढविण्यात आल्या. दोन हजार पेक्षा अधिक रोहित्रे बदलण्यात आली. 24 गुणिले 7 इतकी नवीन कॉल सेंटर्स सुरु करण्यात आली.

नंतर श्री. जुन्नरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे ....

यामध्ये एकंदर 350 एमव्हीची कपॅसिटी वाढविण्यात आली आहे. या ठिकाणी ज्या लोकांचा मृत्यू झालेला आहे त्यांची चौकशी सविस्तरपणे झालेली आहे. या ठिकाणचे अपघात टोरॅन्टो कंपनीमुळे किंवा वितरण कंपनीच्या निष्काळजीपणामुळे झालेले असतील तर कायद्या प्रमाणे आपण भरपाई देत असतो. परंतु स्वत:च्या चुकीने किंवा आकडा टाकत असतांना अपघात होऊन मृत्यू झाला तर त्याची चौकशी करुन निर्णय घेतले जात असतात. जे लोक मृत्युमुखी पडलेले आहेत त्यांना नियमानुसार व कायद्या प्रमाणे मोबदला देण्यात आलेला आहे. ज्यांच्यावर यासंदर्भात अन्याय झालेला आहे असे वाटत असे तर त्यांनी नोडल ऑफिसरकडे तक्रारी दिल्या तर त्या तक्रारींच्या बाबतीत एस.ई. च्या माध्यमातून पुन्हा एकदा चौकशी करता येईल. कुणावर जर अन्याय झाला असेल तर त्यांना न्याय देण्याचे काम निश्चितपणे केले जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी या ठिकाणी जेवढे काही बदल सांगितलेले आहेत ते ॲग्रीमेंटमध्ये आहेत. रोहित्रांमध्ये बदल केला असेल तर ती मेहरबाणी केलेली नाही तर तो ॲग्रीमेंटचा एक पार्ट आहे. 100 माणसे मेल्यानंतर त्यांच्यासंदर्भात ज्या पध्दतीने उत्तर दिले जाते की, आकडे टाकतांना त्यांचा मृत्यू झालेला आहे. मृत्यूचे जे काही कारण असेल त्याची माहिती पोलीस स्टेशनमध्ये नक्कीच असेल. म्हणून संबंधितांवर आपण सदोष मनुष्यवधाचा खटला दाखल करणार आहात काय ? दुसरे असे की, सरकारला 50 कोटी रुपयांना फसविले जाते व सरकार म्हणते की, त्यांनी खूप चांगली कामे केलेली आहेत. खरे म्हणजे हे करण्यासाठीच तुम्ही कंत्राट दिले होते. त्यामुळे हे जे कंत्राट देण्यात आलेले आहे ते चौकशी करुन रद्द केले जाणार आहे काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, या प्रकरणात उच्चस्तरीय समिती गठीत करण्यात येईल, यामध्ये सर्व ग्राहकांचे म्हणणे ऐकून घेण्यात येईल. जे ॲग्रीमेंट झालेले आहे त्याचा जर भंग झाला असेल तर यासंदर्भात निश्चित कारवाई करण्यात येईल.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी सकारात्मक भूमिका घेतल्याबद्दल मी मंत्रीमहोंदयांचे अभिनंदन करतो. या प्रकरणामध्ये जर अनियमितता दिसून आली तर सदर कॉन्ट्रॅक्ट रद्द करण्याची मंत्री महोदयांनी सभागृहात हमी दिलेली आहे. फ्रेन्चाईजी ॲग्रीमेंट देतांना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त.....

जे अन्युलाईज इनपूट रेट ठरवले गेले होते त्यामध्ये फार मोठी डिस्पॅरिटी आहे. औरंगाबाद मध्ये 3.88 पैसे, नागपूरमध्ये 3.36 पैसे, जळगावमध्ये 3.69 पैसे दर ठरविण्यात आलेले आहेत आणि भिवंडीमध्ये फक्त 2.02 पैसे दर ठरविण्यात आले. ही जी डिस्पॅरिटी आहे ती दुरुस्त करुन जर यामध्ये अनियमितता दिसून आली तर त्यावर सुध्दा कारवाई केली जाणार आहे काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, यामध्ये ज्या निविदा काढण्यात आल्या होत्या त्यामध्ये टाटा पॉवर, टोरॅन्टो, क्रॉम्पटन ग्रिव्हज,रिलायन्स कंपनीमधून टोरॅन्टो कंपनी सिलेक्ट झालेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. दत्तसाहेब म्हणत आहेत त्या प्रमाणे चौकशी केली जाईल व यामध्ये जर काही चुकीचे झाले असेल तर त्या बाबत योग्य ती दुरुस्ती करण्यात येईल.

यानंतर श्री.ओटवणेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, भिवंडी मंडळाचा संपूर्ण कारभार मे.टोरँट पॉवर कंपनीकडे हस्तांतरित करण्याबाबत झालेल्या करारानुसार क्लॉज क्र.4 (3) अन्वये टोरँट पॉवर कंपनीने सब कॉन्ट्रॅक्ट देताना मंडळास तीन दिवस आधी कळविणे आवश्यक होते, असे नमूद केले आहे. पण आज पर्यंत अशा प्रकारचा प्रस्ताव विभागास प्राप्त झाला आहे काय ? हा मूळ अटी आणि शर्तींचा भंग आहे. सब कॉन्ट्रॅक्ट करताना टोरँट कंपनीने आपली परवानगी घेतली होती काय ? तशा प्रकारचा प्रस्ताव प्राप्त नसेल तर मूळ अटी आणि शर्तींचा भंग होत नाही काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मी स्पष्टपणे सांगतो की, यामध्ये कॉन्ट्रॅक्टच्या अटी व शर्तीचा भंग झाला असेल तर कॉन्ट्रॅक्टमध्ये ज्या ज्या गोष्टी ठरलेल्या असतील त्यानुसार कारवाई केली जाईल. यामध्ये कुणालाही पाठीशी घालण्याचे कोणतेही कारण नाही.

.....

लक्षवेधी सूचनांसंबंधी

तालिका सभापती : लक्षवेधी क्रमांक 3 पुढे ढकलण्यात आलेली आहे. आता लक्षवेधी सूचना क्रमांक 4 घेण्यात येत आहे. परंतु, सन्माननीय सदस्य श्री.मितेश भांगडिया हे सभागृहात उपस्थित नसल्यामुळे पुढील कामकाज घेण्यात येईल. आजच्या कामकाजपत्रिकेवरील लक्षवेधी सूचना संपलेल्या असल्यामुळे मी आता विशेष उल्लेखाच्या सूचना घेत आहे.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>विशेष उल्लेख</u>

(पुढे सुरू....

पृ. शी./मु. शी. : मौजा मोहा,ता.परळी,जि.बिड येथील शेतकऱ्यांनी केलेली खसखस पिकाची लागवड याबाबत श्री.जयंत प.पाटील वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.जयंत प्र.पाटील (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

मौजे मोहा, ता.परळी, जि.बीड येथील शेतकऱ्यांनी खसखस पिकाची लागवड करणे, सदर 54 शेतकऱ्यांवर माहे मार्च 2012 वा त्या दरम्यान अफूची लागवड केली म्हणून अमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यानुसार अजामीनपात्र गुन्हे दाखल करणे, एखाद्या शेतकऱ्याने ऊसापासून तयार केलेल्या गुळापासून दारू व्यावसायिकांनी दारू तयार करणाऱ्यास व विक्री करणाऱ्यास जबाबदार धरून त्यावर कारवाई करणे, प्रत्यक्षात शेतकऱ्यांवर कारवाई न होणे, याच न्याय तत्त्वाने खस-खस पिकाची लागवड केलेल्या 54 शेतकऱ्यांवरील गुन्हे रद्द करणे, सबब, शासनाचे लक्ष या गंभीर प्रकरणी वेधण्यासाठी व शेतकऱ्यांना न्याय मिळण्यासाठी मी ही विशेष उल्लेखाची सूचना उपस्थित करीत आहे.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : शासनाने पेट्रोल पंपधारकांचे पैसे न दिल्यामुळे पेट्रोल पंपधारकांनी तहसीलदारांना डिझेल पेट्रोल देणे बंद करणे याबाबत श्री.सतीश चव्हाण वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.सतीश चव्हाण (औरंगाबाद पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

राज्यात तहसीलदारांकडे कायदा व सुव्यवस्था, पाणी टंचाई, रोजगार हमी योजना, निवडणुका, विविध प्रकारच्या स्थळ पाहण्या कराव्या लागतात व तालुक्यात फिरावे लागते, पैसै बुडणार नाही म्हणून पेट्रोल पंपचालक डिझेल-पेट्रोल उधारीवर देतात परंतु, गेल्या दोन वर्षापासून शासनाने पेट्रोल पंपधारकाचे पैसे न दिल्याने पेट्रोल पंपधारकांनी डिझेल-पेट्रोल देणे बंद केले आहे. तहसील कार्यालयांना डिझेल खरेदी व कार्यालयीन खर्चासाठी दरवर्षी 1 लक्ष रूपये अनुदान मिळते ते ही वेळेत मिळत नसल्याने तहसीलदारांना अडचणी निर्माण होतात. त्यामुळे औरंगाबाद जिल्ह्यातील सर्व तहसीलदारांनी त्यांच्या गाड्या जिल्हाधिकारी कार्यालयाकडे जमा केल्या आहेत. त्यांच्या अडचणीचा विचार करता तहसीलदार यांना डिझेलसह कार्यालयीन खर्चासाठी अनुदान प्रतिमहा किमान 1,50,000/- देण्याबाबत व वेळेवर देण्याबाबत शासनाने कार्यवाही करावी अशी मी विशेष उल्लेखाद्वारे मागणी करीत आहे.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचे झालेले नुकसान याबाबत श्री.जयवंतराव जाधव वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.जयवंतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

विदर्भातील संत्रा उत्पादकांना खराब हवामानामुळे सलग दुसऱ्या वर्षी कोट्यवधी रूपयांचे आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. दिनांक 15 जून ते 15 जुलै या कालावधीत अपेक्षित पाऊस न झाल्यामुळे तसेच वातावरणातील उष्णता, दमटपणामुळे तर हवेतील शुष्कता कमी झाल्यामुळे या खराब हवामानाचा संत्रा पिकावर प्रतिकूल परिणाम झाला आहे. परिणामी मृग बहरातील संत्रा पिकाला फटका बसला आहे. अकोला येथील पंजाबराव कृषी विद्यापीठाचे संशोधक आणि कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांचा समावेश असलेल्या एका शिष्टमंडळाने संपूर्ण विदर्भातील संत्रा उत्पादक तालुक्यांचा दौरा केल्यानंतर अंदाजे 85 ते 90 टक्के संत्रापिकाचे नुकसान झाल्याबाबत शासनास अहवाल सादर केला आहे. उन्हाळ्यातील वाढत्या तापमानामुळे विदर्भातील संत्रा उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. कृषी विभागाने शेतकऱ्यांना संरक्षण देण्यासाठी फळपीक विमा योजना सुरू केली आहे. यासाठी ॲग्रीकल्चरल इन्श्युरन्स कंपनी ऑफ इंडिया या कंपनीचे सहाय्य घेण्यात आले. या योजनेसाठी संत्रा उत्पादकांकडून प्रती हेक्टरी एक हजार सहाशे रूपये घेण्यात येतात. विमा योजनेनुसार तीन दिवसांचे तापमान 40 अंश सेल्सीअस किंवा त्यापेक्षा जास्त राहिले तर प्रति हेक्टरी 24 हजार रूपये भरपाई मिळते. शेतकऱ्यांनी पोटाला चिमटा काढून बँकाकडे वेळेवर विमा हप्ते भरले. परंतु बँकांनी विमा कंपनीकडे पैसे वर्ग न केल्यामुळे नुकसान भरपाई पासून शेतकरी वंचित राहिले. बँकांच्या या कारभाराबद्दल शासनाने कडक कारवाई करावी तसेच ज्या संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले त्यांना तातडीने आर्थिक मदत मिळावी अशी मागणी मी या विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे करीत आहे.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : सांगली महापालिका क्षेत्रातील भूखंडाच्या नोंदी तातडीने करण्याबाबत श्री.रमेश शेंडगे वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

सांगली महापालिका क्षेत्रात विविध नागरी वस्त्या विकासासाठी भूखंड आहेत. परंतु, सांगली शहरात सिटी सर्व्हे कार्यालय होण्यापूर्वी अनेक जागाची नोंद तलाठी कार्यालयाकडे होती.

यानंतर श्री.अजित....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे...

त्यानुसार सदर नोंदी महापालिकेत होणे आवश्यक होते व तसेच सिटी सर्व्हे कार्यालय झाल्यानंतर सदर भूखंडाच्या नोंदी महापालिका आणि तलाठी कार्यालयाकडून सिटी सर्व्हे कार्यालयात होणे आवश्यक होते. तथापि, नगरपालिका व महापालिका प्रशासनाकडून होत असलेले दुर्लक्ष, परिणामी अनेक भूखंडावर अतिक्रमणे होऊन अब्जावधीची मालमत्ता धोक्यात जाण्याचा निर्माण झालेला धोका या बाबी विचारात घेऊन सांगली महापालिका क्षेत्रातील भूखंडाच्या नोंदी तातडीने करण्यात याव्यात अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : स्त्री अत्याचाराच्या गुन्ह्यात झालेली वाढ याबाबत श्रीमती विद्या चव्हाण, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडते.

सभापती महोदय, ठाणे जिल्ह्यातील डोंबिवली येथे मध्यमवर्गीय वसाहतीमध्ये पाच मुले एका मुलीची छेड काढत असताना त्या मुलीसह असलेल्या श्री.संतोष विचिवरा याने त्या मुलांना रोखले असता त्या पाच मुलांनी त्या मुलीवर प्राणघातक हल्ला करुन तिचा खून करणे. अशाच प्रकारची घटना ऑक्टोबर 2011 मध्ये घडणे. वांद्रे येथे स्पॅनिश मुलीवर बलात्कार करणारा गुंड 35 वेळा जामिनावर सुटलेला असणे, मुंबईत महिलांवरील अत्याचाराच्या गुन्ह्यात वाढ होणे, यामध्ये अल्पवयीन मुलींवर बलात्कार, लैगिंक अत्याचार, छेडखानी अशा गुन्ह्यांमध्ये वाढ होणे, छेडखानी रोखण्यासाठी पोलिसांची विशेष पथके निर्माण करण्याची घोषणा होऊनही त्या दृष्टीने कोणतेही पाऊल न उचलणे जाणे. यामुळे मुंबई, ठाणे व पुणे या सारख्या शहरांतील मुलींमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झालेले आहे. ते रोखण्यासाठी शासनाने तातडीने कार्यवाही करावी अशी विनंती मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.जयवंतराव जाधव)

पृ. शी./मु. शी. : सोलापूर जिल्ह्यात राजीव गांधी जीवनदायी योजनेचा लाभ न मिळणे या बाबत श्री.दीपक साळुंखे, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.दीपक साळुंखे (सोलापूर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, राज्य शासनाने ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांसाठी राजीव गांधी जीवनदायी अशी अत्यंत महत्वाची योजना राज्यात सुरु केली आहे. या योजनेमुळे राज्यातील नागरिकांना मोठ्या प्रमाणावर लाभ झाल्याचे आढळून आले आहे. सदर योजना ही सोलापूर जिल्ह्यात सुरु असल्याने सोलापूर जिल्ह्यातील अनेक रुग्णालयांचा त्यामध्ये समावेश आहे. माहे ऑक्टोबर, 2012 पासून राजीव गांधी जीवनदायी योजनेंतर्गत ग्रामीण व शहरी भागातील रुग्णालयात रुग्ण गेले असता त्यांना राजीव गांधी जीवनदायी योजनेच्या सुविधा दिल्या जात नसून रुग्णांवर वेळच्या वेळी औषधोपचार केले जात नाहीत. सोलापूर शहरातील अनेक रुग्णांच्या गंभीर तक्रारी असणे, उलट त्यांना दुसऱ्या रुग्णालयात जाण्यास सांगण्यात येणे, तसेच रुग्णालयात दाखल झालेल्या रुग्णांकडे सतत पैशाची मागणी करण्यात येणे, त्यामुळे रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांमध्ये शासनाप्रती असंतोषाची भावना निर्माण झालेली आहे. तेव्हा सदर प्रकरणी शासनाने तातडीने चौकशी करुन तेथील रुग्णांना न्याय देण्यासाठी आपल्या कामात कुचराई करणाऱ्या डॉक्टरांवर त्वरित कार्यवाही करावी अशी विनंती मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : पुणे शहरात मोठ्या प्रमाणावर होत असलेली वाहतुकीची कोंडी या बाबत श्री. मोहन जोशी, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. मोहन जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

सभापती महोदय, पुणे शहर हे राज्यातील मुंबई शहरानंतरचे दुसरे मोठे महानगर असून त्याची वाढ झपाट्याने होत आहे. पुणे पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील लोकसंख्या 60 लाख असून ते शैक्षणिक, ऐतिहासिक, औद्योगिक व आय.टी.क्षेत्रात जागतिक पातळीवर प्रसिध्द होत असणे, शहरामध्ये आज 31 लाखांपेक्षा अधिक संख्येने वाहने असून दररोज 500 नवीन वाहनांची त्यात भर पडत आहे. पुणे शहर वाहतूक सुधारणा प्रकल्प 2011 याची तत्काळ प्रभावी अंमलबजावणी करण्याची आवश्यकता आहे. पुणे येथे नवीन उपनगरे तयार होत असून शहरातील लोकसंख्येची घनता वाढत आहे. परंतु रस्त्यांच्या मर्यादित क्षेत्रावर वाहन संख्येच्या घनतेमुळे श्हरातील वाहतूक अस्ताव्यस्त होत आहे. ट्रॅफिकॉप ही प्रणाली पुणे शहरात प्रायोगिक तत्वावर अत्यंत यशस्वी झाल्यामुळे पूर्ण पुणे शहराकरिता कायम स्वरुपी राबविण्याकरिता शासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव शासनाकडे पाठवूनही मागील तीन वर्षापासून शासनाने ट्रॅफिकॉप प्रणाली लागू करण्याचा विचार केलेला नाही.

सभापती महोदय, वाहतूक नियम प्रभावीपणे होण्यासाठी 40 स्पीडगन व टिंटमीटर आणि 411 वॉकी-टॉकी देण्यास शासनाने अद्याप मान्यता दिलेली नाही. तसेच पुणे पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये वाहतुकीच्या बाबतीत गोडबोले समितीच्या अहवालातील शिफारशींवर आधारलेल्या पुणे शहर व वाहतूक सुधारणा प्रकल्पास राज्य शासनाची अद्याप मंजुरी मिळालेली नाही. पुणे वाहतूक शाखेकडे असलेली वाहने अपुरी असून अधिकची 40 जीप, 5 लाईट व्हॅन, 154 मोटरसायकल, 1 कॅरिअर, 2 ट्रक आणि 1 बस मिळण्याकरिता सन 2009 पासून वारंवार मागणी करुनही अद्याप शासनाने त्याची पूर्तता केलेली नाही. पुणे वाहतूक शाखेकरिता अभियंत्यांची अत्यंत आवश्यकता असून वाहतूक अभियांत्रिकीचे ज्ञान असलेल्या अभियंत्याचे पद निर्माण करण्याच्या प्रस्तावासही शासनाने अद्याप मान्यता दिलेली नाही.

यानंतर श्री.सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोहन जोशी...

वाहतूक विभागाकरिता आवश्यक असणाऱ्या जागांची तरतूद राज्य शासनाने अद्याप केलेली नाही. परिणामी पुणे शहरातील वाहतुकीचा पुरता बोजवारा उडालेला आहे. बँगलोर, कलकत्ता,चेन्नई, दिल्ली व हैद्राबाद या महानगरामध्ये वाहतुकीशी संबंधित सिग्नल, रोड मार्कींग, सूचना फलक, सर्वेलन्स कॅमेरे या व अशा अनेक साधन सामुग्रीकरिता शासनाने निधी उपलब्ध करुन दिला आहे. महाराष्ट्रात मात्र अशी कामे स्थानिक स्वराज्य संस्थांकडे सोपविण्यात आली आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांवर असलेल्या मर्यादा व त्यांच्याकडून योग्य प्राधान्यक्रम दिले जात नसल्यामुळे असे प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी पाठविले आहेत. शहराभोवती रिंगरोड तयार करणे, नदी किनारी नवीन रस्त्यांची बांधणी करणे, वाहतूक विभागकरिता आवश्यक असणाऱ्या जागांची तरतूद करणे, खाजगी प्रवासी बसेसकरिता थांबे, एस.टी. बस स्थानके शहराच्या सीमेवर स्थलांतर करणे, पी.एम.पी.एम.एल. बस स्थानके व डेपोकरिता जागा देणे, मॉल कमर्शिअल इमारतीकरिता पार्कींग नियोजनाचे नियम करणे, ट्रक टर्मिनलकरिता, गोडाऊनकरिता जागा देणे, असे अनेक प्रस्ताव शासन दरबारी प्रलंबित आहेत. या प्रकरणी जनतेत पसरलेली तीव्र नाराजीची भावना व यासंदर्भात शासनाने तातडीने कारवाई करावी अशी मागणी मी या विशेष उल्लेखाव्दारे करीत आहे."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : मुंबईमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारणीच्या कामाला गती देणे याबाबत श्री. संजय दत्त, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"दादर (मुंबई) येथील इंदू मिलची साडे बारा एकर जागा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठी राज्य शासनाने विशेषत: राज्याचे मुख्यमंत्री आदरणीय श्री. पृथ्वीराजजी चव्हाण यांनी पाठपुरावा करुन दिल्याबद्दल मी त्यांचा आणि राज्य शासनाचा प्रथमत: आभारी आहे. महाराष्ट्र राज्याला शौर्य आणि ज्ञानाचा अनमोल वारसा देणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती शिवाजी महाराज या दोन्ही महापुरुषांची स्मारके अवघ्या राष्ट्राला प्रेरणा देणारी आहेत. देश समाज घडविणाऱ्या इतिहास रचणाऱ्या राष्ट्रीय नेत्याच्या स्मारकाची उभारणी ही पुढील पिढयांना मार्ग दाखविणारी आहे. म्हणून पिढयान् पिढयांपासून जगभरात अशी स्मारके उभारली जात असल्याचे आपण पहात आहोत. गेल्या अनेक वर्षापासून छत्रपती शिवाजी महाराज यांचे समुद्रातील बहुचर्चित स्मारक कागदावरच आहे. छत्रपतींच्या स्मारकासंदर्भात जागा निश्चित करण्यापासून त्यांच्या स्वरुपाबद्दल सुरु असलेला गोंधळ तसाच प्रलंबित आहे. तेव्हा राज्य शासनाने छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक तातडीने मार्गी लावण्यासाठी व सदरील स्मारकाला गती व वेग देण्यासाठी तातडीने पावले उचलावीत. अशा या अतिशय महत्वाच्या विषयावर मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : डेंग्यू जंतूनाशक औषधांचा व लसींचा विपुल प्रमाणात पुरवठा करणे याबाबत श्री. रमेश शेंडगे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"मुंबईमध्ये डेग्यू या रोगाची 960 जणांना लागण होऊन त्यामध्ये 7 जणांचा मृत्यू होणे, राज्यामध्ये आतापर्यंत 73 जणांचा बळी जाणे, याशिवाय राज्याच्या अनेक भागात डेंग्यूसदृश रोगाची लागण होणे,डेंग्यूच्या विषाणूचे डीएन-2 विषाणू हे अधिक घातक असणे, डेग्यू रोगाचे जंतू मोठया प्रमाणावर घातक असल्याने राज्यात सर्वत्र विपुल प्रमाणात डेंग्यू जंतूनाशक औषधांचा व लसींचा पुरवठा करण्याची आवश्यकता . डेंग्यू हा भीषण आजार असल्यामुळे शासनामार्फत सर्वत्र डेंग्यू प्रतिबंधक उपाय योजना करण्यात यावी. अशी शिफारस या विशेष उल्लेखाव्दारे मी करीत आहे".

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: सन 2012-2013 च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा

तालिका सभापती : सन्माननीय सदस्यांना हे माहीतच असेल की पुरवणी मागण्यांवरील चर्चेसाठी दोन दिवस म्हणजे आज आणि उद्या मंगळवार, दि.18.12.2012 हे दिलेले आहेत. आज कार्यक्रम पत्रिकेवर दाखविलेल्या मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा व्हावयाची आहे. पुरवणी मागण्या आणि त्याखालील बाबी यासंबंधीची माहिती सदस्यांना पत्रक भाग दोन व्दारे वेगळी प्रसृत करण्यात आली आहे. प्रत्येक सदस्याने भाषण करताना बाब क्रमांक आणि पूरक विवरणपत्राचा पृष्ठ क्रमांक सांगण्याची कृपा करावी. ही चर्चा मंत्रीनिहाय होत असल्याने संबंधित मंत्र्यांच्या सर्व विभागांबाबत सदस्यांनी बोलावे. त्यानंतर मंत्रीमहोदयांना एकदम उत्तर देणे सुलभ होईल. चर्चा संबंधित बाबी पुरतीच मर्यादित असून मूळ मागणीवर चर्चा करता येणार नाही, हे सदस्यांना विदितच आहे.

कार्यक्रम पत्रिकेवर दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पूरक मागण्यांवरील चर्चा व उत्तर शक्यतोवर आजच पूर्ण करावयाचे आहे, हे सदस्यांनी कृपया ध्यानात घ्यावे. अन्यथा आज राहिलेल्या पूरक मागण्या व मंगळवार, दिनांक 18.12.2012 करिता असलेल्या सर्व मागण्यांवरील चर्चा मंगळवार, दिनांक 18.12.2012 रोजी पूर्ण करावी लागेल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सभागृहामध्ये पुरवणी मागण्यांवर चर्चा करीत असतांना सर्व सन्माननीय मंत्री सभागृहात उपस्थित राहणे आवश्यक आहेत, तसे ते उपस्थित आहेत काय, सन्माननीय मुख्यमंत्र्यांच्या वतीने मंत्री उपस्थित आहेत काय, आम्हाला होलसेलमध्ये मंत्री नको. उद्योग मंत्री, सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्यावतीने कोण उपस्थित आहेत?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, या सभागृहाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी "होलसेल मंत्री" असा शब्दप्रयोग केला आहे. तेव्हा त्याचा अर्थ काय ते सांगावे.

तालिका सभापती : ते शब्द कार्यवाहीतून वगळण्यात येतील.

श्री. दिवाकर रावते :: सभापती महोदय, त्या शब्दाचा अर्थ आपण समजून घ्यावा. आपण मघाशी सर्व माननीय सदस्यांकरिता सूचना वाचून दाखविल्या. त्यामध्ये सर्व माननीय सदस्यांनी बाब क्रमांक आणि मागणी क्रमांक वाचावे, मूळ मागणीवर बोलू नये इत्यादी सांगितले. त्यामुळे संबंधित मागणीबाबत मंत्रीमहोदयांनी उत्तर दिले पाहिजे. जर मंत्री सभागृहात नसतील तर संबंधित राज्यमंत्र्यांनी उत्तर दिले पाहिजे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

याठिकाणी मागण्यांवरील चर्चेच्या वेळी माननीय मंत्री महोदयांना जर उपस्थित रहाणे शक्य नसेल तर निदान त्या विभागाचे माननीय राज्यमंत्री तरी येथे उपस्थित असले पाहिजेत. आज याठिकाणी 13 विभागांच्या संदर्भातील पुरवणी मागण्यांवर चर्चा होणार आहे. अशा वेळी 13 विभागाच्या संबंधात चर्चा होत असताना त्याला कोणते माननीय मंत्री महोदय उत्तर देणार आहेत हे आम्हाला समजले पाहिजे.

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी) : ठीक आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेते आता सभागृहात उपस्थित नाहीत. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी आपले भाषण सुरु करावे.

. . . .3 सी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.श्री.सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, पान क्र.203, बाब क्र.23 नियोजन विभाग, बांधकाम . . . .

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते यांनी चर्चा सुरु करावयास पाहिजे.

तालिका सभापती : मी सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोद तावडे यांचे नाव घेतले होते पण ते आता सदनामध्ये उपस्थित नाहीत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, महसूल विभागाचे मंत्री महोदय उपस्थित आहेत काय ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, मी उपस्थित आहे.

श्री.दिवाकर रावते (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, बाब क्र.33, पान क्र.28 बाबत मला बोलावयाचे आहे. ही बाब नव्याने निर्माण झालेल्या तीनही विभागीय कार्यालयातील अधिकारी आणि महसूल नोंदणीच्या संदर्भातील आहे.आपल्या राज्याला प्रामुख्याने मुद्रांक शुल्काच्या माध्यमातून महसूल मिळतो. आता नवीन मुद्रांक महानिरीक्षक आलेले आहेत आणि त्यांनी काही बदल केला आहे. नवीन प्रणाली नुसार काही बदल करणे आवश्यक असतो ते नाकारता येत नाही. ते मान्य करावे लागते. किंबहुना त्यामध्ये गतीमानता आणण्यासाठी अजूनही काही करावे लागेल. पण मुद्रांक शुल्क नोंदणी जेवढी जास्त प्रमाणात होईल तेवढा महसूलही वाढतो आणि तसे ते लवकरात लवकर होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, याबाबतीत मी अनेक वेळा सदनामध्ये सूचना मांडल्या असून त्यानुसार जास्तीतजास्त नोंदणी साठी दोन वेळा कार्यालये सुरु ठेवावीत असा विचार देखील मला मांडावयाचा आहे आणि तो अभिनंदनीय आहे. सध्या पुण्याचे जे नोंदणी महानिरीक्षक आहेत त्यांनी एक ग्रास पध्दत सुरु केली आहे.त्यामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की,"बँक ऑफ बडोदा, बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ महाराष्ट्र, कॅनरा बँक,देना बँक, आय.डी.बी.आय.बँक, इंडियन ओव्हरसीज बँक, पंजाब नॅशनल बँक, स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, युनिअन बँक ऑफ इंडिया आणि स्टेट बँक ऑफ इंदौर इ.बँका निवडण्यात आल्या आहेत." जर मला नोंदणी शुल्क, दस्तऐवज नोंदवावयाचे असतील तर . . .

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, मला याबाबत खुलासा करावयाचा आहे बाब क्र.33 बाबत सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेब बोलत आहेत. परंतु तीन नवीन उप विभागीय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके . . . .

कार्यालये गडचिरोली जिल्ह्यामध्ये आहेत ती महसूल उप विभागीय कार्यालये आहेत. ती मुद्रांक शुल्क कार्यालये नाहीत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मूळ बाबीमध्ये कार्यालय असा शब्द आला म्हणून मी कार्यालयाच्या पध्दतीबाबत बोलत आहे. तुम्हाला प्रमोशन का मिळत नाही? आमचा आग्रह आहे की, बीडला प्रमोशन द्यावे. मग मी याबाबतीत भाषण करु की नको. जर तसे करावयाचे नसेल तर मी दुसऱ्या बाबीसंबंधात बोलतो. मी माझ्या भाषणाला सुरुवात करताना असे सांगितले की, 33 क्रमांका वरील बाब काय आहे तर नव्याने निर्माण झालेल्या तीनही विभागीय कार्यालयातील अधिकारी आणि महसूल नोंदणीच्या संदर्भातील आहे. तेव्हा कार्यालयीन नियुक्त्या आणि कार्यालयाचे काम कसे करणार आहात? त्यामुळे त्यासंबंधातील कार्यपध्दतीवर मी बोलत आहे. हे चालेल काय ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, होय.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, याठिकाणी खुलासा करण्याची आवश्यकता भासली म्हणजे काहीतरी गडबड आहे. मी बाब क्रमांक बरोबर सांगितला होता. माननीय मंत्री महोदयांनी जे सांगितले ते गडचिरोलीच्या बाबतीत असेल किंवा इतर ठिकाणी असेल पण मुद्रांक शुल्क नोंदणीच्या कार्यपध्दती बाबत मी बोलत आहे आणि अशा प्रकारे जर सदनामध्ये सूचना येत असतील तर आपण त्याचे स्वागत केले पाहिजे. माझ्याकडून काही चुका झाल्या असतील तर मी त्या सुधारल्या आहेत. मी एक खुलासा करतो जेणेकरुन आपल्याकडे भविष्यामध्ये चुका व्हावयास नकोत.

सभापती महोदय, मी मागच्या वेळी देखील एक बाब मांडली होती की, मुंबई मुद्रांक शुल्क कार्यालयामध्ये कर्मचाऱ्यांच्या ऐवजी दलाल बसतात.

यानंतर श्री.बरवड . . . .

अशुधारित प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

ते टेबल घेऊन अधिकृतपणे कार्यालयात बसतात. या गोष्टींचा उल्लेख मी नावासहीत या सभागृहामध्ये केला होता. ते दलाल सर्व सरकारी दस्तऐवज अधिकृतपणे हाताळतात. हे मी सांगत असताना तत्कालीन महसूल मंत्री महोदय श्री. नारायण राणे हे आवेशात उठले आणि त्यांनी सांगितले की, असे काही असेल तर ते मी चालू देणार नाही. दुस-या दिवशी कारवाई झाली. सर्व टेबल्स भराभर बाहेर गेली. आता पुन्हा तिकडे तीच परिस्थिती आहे. मी ज्या गोष्टी सभागृहामध्ये सांगितलेल्या होत्या त्याबाबतीत दुरुस्ती झालेली नाही. मुंबईमधील कार्यालयामध्ये दलाल पुन्हा दस्तऐवज हाताळू लागले आहेत. भाड्याच्या जागेच्या संदर्भात मी या ठिकाणी विषय उपस्थित केलेला होता. त्या जागा दोन-तीन वर्षे पडून होत्या. महसूल खात्यामध्ये चाललेल्या अनागोंदी कारभाराबाबत मी सांगत आहे. अशा खात्याच्या मंत्री महोदयांची प्रतिष्ठा राहाण्याकरिता त्या खात्यामध्ये सुधारणा करण्याचा त्यांनी प्रयत्न करावा.

सभापती महोदय, मी ग्रासपध्दतीवर बोलत होतो. मी बँकांची देखील नावे सांगितली. ग्रासपध्दतीनुसार तुम्हा आम्हाला दस्तऐवजाची नोंदणी करावयाची असेल तर मी माझ्या बँकेतून ग्रासपध्दतीमध्ये सांगितलेल्या बँकांच्या खात्यामध्ये पैसे ट्रान्सफर करावयाचे, त्या बँकेने पैसे दिल्याची पोच माझ्या बँकेला दिल्यानंतर ती बँक मला सर्टिफिकेट देईल, ते सर्टिफिकेट घेऊन मी नोंदणी करणा-या कार्यालयात जायचे, ते पुन्हा पैसे भरले आहेत की नाहीत हे ऑन लाईन वरुन तपासतील आणि त्यानंतर ते माझ्या दस्तऐवजाची नोंद करतील. आधीची पध्दत बरी होती असे म्हणावेसे वाटते. पूर्वी दस्तऐवज तपासून झाले की, शासनाच्या नावाने बँकड्राफ्ट काढावा लागत असे. तो बँकड्राफ्ट स्वीकारला जाऊन दस्तऐवजाची नोंदणी होत असे. ही नोंद होण्यासाठी 10-15 मिनिटे लागत असत. परंतु आता नवीन महानिरीक्षकांनी ही ग्रास पध्दत आणलेली आहे. आता दंडाचे शुल्कही त्याच पध्दतीने स्वीकारण्यास सुरुवात केली आहे.

सभापती महोदय, दस्तऐवजांची नोंदणी करण्याची वेळ सकाळी 10 ते सायंकाळी 6.00 वाजेपर्यंत आहे. दस्तऐवजांच्या नोंदणीसाठी जास्त गर्दी असते आणि लोकांचे दस्तऐवज रोजच्या रोज नोंदणी करुन घेता यावेत म्हणून काही ठिकाणी कार्यालये सकाळी 7.00 ते दुपारी 2.00 आणि दुपारी 2.00 ते रात्री 9.00 अशी सुरु करण्यात आली. आपण वेळेमध्ये काही सुधारणा केली तर युनियनचे अध्यक्ष श्री. र.ग.कर्णिक आणि त्यांचे पदाधिकारी येतात आणि महिलांना रात्रीची वेळ

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

सोईची नाही हे सांगतात. महिलांनी नियमाप्रमाणे सायंकाळी 5.30 वाजेपर्यंन्त डयुटी केली पाहिजे. असे असताना महिलांनी रात्री 9.00 वाजेपर्यन्त डयुटी करावी का, असा प्रश्न निर्माण होतो. महिलांच्या डयुट्या ह्या सर्व्हिस रुल्स ॲण्ड रेग्युलेशन्स प्रमाणे आहेत काय ? काहीही असले तरी या कार्यालयाच्या बाबतीत कोणी तक्रार करणार नाही. कारण ती टेबल्स अशी आहेत की खूप महात्मा गांधी जमा होतात. त्यामुळे त्या कार्यालयात महिलांना 10 वाजेपर्यन्त बसविले तरी कोणी तक्रार करणार नाही. आमच्या भगिनींना जास्त काम करावे लागते याबाबत कोणी तक्रार करायला येत नाही. तेव्हा महिलांची डयुटी रात्री 9.00 वाजेपर्यन्त ठेवणार की नाही याबाबतीत माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

2001साली नोंदणीसाठी प्रत्येक पानाचे 5 रुपये घेतले जात होते.

...नंतर श्री. जुन्नरे...

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

परंतु आता संगणीकरणाचे काम झाल्यानंतर सरसकट 20 रुपये फी घेतली जाते. व हे 20 रुपये शासनाच्या कोषागारात जमा करावयाचे असतात. यासाठी आपण बीओटी तत्वावर जे काम केलेले आहे त्या बीओटी तत्वामुळे प्रत्येकाच्या मागे 12.5 रुपये दिले जातात व त्यामध्ये केवळ 7.50 रुपयेच जमा होत असतात. 7.50 रुपयांप्रमाणे जमा होणारे पैसे कोणत्या खात्यामध्ये जमा केले जातात ? हे जमा पैसे आपण कशाचे दाखवता ? हे पैसे तुमचे नाहीत. अकाऊंटमध्ये एक रुपयाची जरी हेराफेरी झाली तर त्या कारकुनाला घाम फुटतो. तो कारकून रात्री 12.00 वाजेपर्यंत टोटल मारत बसत असतो. एक रुपया कोठे गेला हे जोपर्यंत समजत नाही तोपर्यंत तो घरी जाऊ शकत नाही, नाही तर त्याला घरी जाण्याची पाळी येते. अशा वेळी जनतेचे 7.50 रुपये या प्रमाणे जे लाखो रुपये जमा होतात ते कोठे जातात ? या पैशाचे मग काय करता ? खरे म्हणजे यातून जनतेची मोठया प्रमाणात लूट सुरु आहे. हे 7.50 रुपये महसूलामध्ये कोठे दाखवता ?

सभापती महोदय, नोंदणीची एक नवीन आय सरिता सुरु करण्यात आलेली आहे. या ठिकाणच्या कर्मचाऱ्यांना मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. ही आय सरिता कर्मचाऱ्यांना त्रासदायक झाल्यामुळे त्या बाबतीत तक्रार झाली. आदरणीय मुख्यमंत्र्यांच्या आधिपत्याखाली असलेले नियोजन खात्याचे सन्माननीय सचिव श्री. बक्षी साहेब हे 12 नोव्हेंबर, 2012 रोजी मुंबई उपनगर, जिल्हा कुर्ला येथील नोंदणी क्रमांक 1 मध्ये गेले होते. तसेच उच्च न्यायालय व स्टॉक होल्डींग कॉर्पोरेशन इंडिया लिमिटेड यांच्यामधील लिव्ह लायसन्स आणि दस्त नोंदणी स्टॉक होल्डींगच्या अधिकाऱ्यांनी सकाळी 10.00 ते 4.30 वाजेपर्यंत बसून याचे काम कशा प्रकारे चालते याची पाहणी केली. या मध्ये वापरण्यात येणारे सर्व्हर दुपारी 12 ते 1.15 आणि सायंकाळी 4 ते 5.30 च्या दरम्यान लोड आल्यामुळे अत्यंत धिम्यागतीने चालतात. मला अगोदर दस्त ऐवज नोंदण्यासाठी 10 मिनिटांचा वेळ लागत होता तो या पध्दतीत 45 मिनिटे झाला आहे. आपण नवीन योजना जास्तीत जास्त कामे व्हावीत, जास्तीत जास्त नोंदणी शुल्क जमा व्हावे यासाठी आणत असतो. परंतु त्या अधिकाऱ्यांनी आपल्या अहवालात नोंद केली की, ही जी आय सरिता आणलेली आहे ती आजच्या घडीला अयोग्य पध्दतीने काम करीत आहे. अशा प्रकारचा अहवाल बक्षी साहेबांनी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

लिहिला, उच्च न्यायालयाच्या स्टॉक होल्डींगच्या अधिकाऱ्यांनी सुध्दा दिला. त्यामुळे यासंदर्भात शासनाने काय विचार केला हे जाणून घेण्यामध्ये मी उत्सूक आहे.

धिम्या गतीने कार्यरत असलेल्या आय सरितेमुळे बांद्रा-कुर्ला बोरिवली जिल्हयातील दस्तक फिड करुन आणण्याचे सक्तीचे केले गेले. कायद्यामध्ये अशा प्रकारची सक्ती करण्याची तरतूद नसतांनाही तुमच्या अधिकाऱ्यांनी कोणत्या नियमान्वये ही सक्ती केली ? जनतेला सोई-सुविधा द्यावयाची की, त्यांची अडवणूक करायची हा प्रश्न येथे निर्माण झालेला आहे. कायद्यात तरतूद नसतांना तुम्ही जे जबरदस्तीने करावयास लावत आहात ते अयोग्य आहे.

सभापती महोदय, आय सरितेचे जे सॉफ्टवेअर तयार करण्यात आलेले आहे त्यामध्ये असंख्य त्रुटी आहेत. नोंदणी करतांना एकाची नोंदणी होते तर दुसऱ्याची होत नाही.

यानंतर श्री. ओटवणेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

मी ज्यावेळी क्षतिपूर्तीबंध नोंदणी करण्यास जातो त्यावेळी बंधपत्र लिहून देणाऱ्याचे नाव सूची-2 मध्ये येते व ज्याला बंधपत्र लिहून दिले आहे त्याचे नाव सूची-2 मध्ये येतच नाही. माझ्या मतानुसार यात दोन्ही नावे आली पाहिजेत. विश्वस्त संस्था नोंदवायला गेलो तर विश्वस्त संस्थेचे नाव नोंदणीमध्ये येते. पण विश्वस्तांची नावे नोंदणीमध्ये जात नाहीत. लिव्ह लायसेन्सच्या बाबतीत जेव्हा दस्तऐवज डिपॉझिट करतो त्यामध्ये डिपॉझिटचा उल्लेखच येत नाही. भाड्याच्या बाबतीत सुद्धा अशी विक्षिप्तता झालेली आहे. ते येत नसल्यामुळे काय करावे लागते ? अंगठ्याचा ठसा शाईने घ्यावा लागतो. आपली आज्ञावली व्यवस्थित असती तर अंगठ्याचा ठसा शाईने घेण्याची पाळी आली नसती. पण अंगठ्याची नोंद आपल्या आज्ञावलीमध्ये येत नाही. बँकेतील मॉर्गेज डीड, गहाण खत असते त्यात लिहून देणारा आणि घेणारा यांचे नाव सूची-2 मध्ये उलटसुलट यायला लागले आहे. हे जी पद्धती आज्ञावलीद्वारे आणली आहे ती मूळातच अत्यंत अयोग्य पद्धतीची आहे. त्यामुळे नोंदणी करण्यास ती आपल्याला मदत करीत नाही.

आता जी बाब मी मांडत आहे ती अत्यंत गंभीर आहे. आज्ञावलीसंबंधात शासनाने कार्यपद्धती निर्माण केली आहे. आज्ञावली विकसित करताना आणि केल्यानंतर प्रशस्तीपत्र घ्यावे लागते. त्या आज्ञावलीचे सिक्युरिटी ऑडिट करून घ्यावे लागते. ते केले असेल तरच आज्ञवली वापरता येते. आय-सरिता ही आज्ञावली सिक्युरिटी ऑडिट न करता वापरण्यास आपल्या कार्यालयाने सुरूवात केली आहे हे मी येथे अधिकृतरित्या नमूद करीत आहे. आपण ऑडिट केले असेल तर मला सांगावे. आपण जर हो म्हणाल तर मला हक्कभंग दाखल करण्याची आपण संधी उपलब्ध करून द्याल. ऑडिट नसताना देखील आपण आज्ञावली कसे काय स्वीकृत केली आहे ? केवळ प्रमुखाचे आदेश म्हणून आज्ञावली घेण्यात आली आहे ? महानिरीक्षकांनी कायद्याच्या तरतुदी खुंटीला बांधून काम सुरू ठेवलेले आहे. हम करोसे कायदा या प्रमाणे काम सुरू असल्याचे

दिसते. या चुकीच्या आज्ञवलीमुळे कर्मचाऱ्यांना देखील फार त्रास होत आहे. नोंदणीच्या माध्यमातूनच हे कर्मचारी सर्वात जास्त महसूल महाराष्ट्राला आणून देत असतात. कर्मचाऱ्यांना जाच होईल अशा प्रकारची पद्धती कशासाठी निर्माण केल्या आहेत, असा प्रश्न मी या माध्यमातून उपस्थित करीत आहे. प्रश्न योग्य असेल तर माननीय मंत्र्यांनी अवश्य उत्तर द्यावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

यानंतर सहकार विभागाशी संबंधित एक छोटी बाब आहे. ती माझ्या दृष्टीने गंभीर आहे. माझ्याकडे एका शेतकऱ्याचे पत्र आहे. ते पत्र आमचे आदरणीय श्री.उद्धवजी ठाकरे यांना आले होते. ते त्यांनी माझ्याकडे दिले होते. श्री.सुभाष चंद्रजी चव्हाण राहणार कारंजी, ता.केळापूर, जिल्हा यवतमाळ येथील शेतकऱ्याचे हे पत्र आहे. आमचे मंत्रिमहोदय देखील तेथीलच आहेत. या शेतकऱ्याने 10-12 वर्षापूर्वी ट्रॅक्टर घेतला होता. तेव्हा विदर्भातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे चित्र देखील समोर आले होते. त्याचे कर्ज फेडायचे राहून गेले. त्याची कोरडवाहू जमीन जंगलाला लागून आहे. त्याने जे पेरले होते त्याची नासधूस वन्यप्राण्यांनी केली. असे असताना देखील त्याला कर्ज माफी मिळाली नाही.

कर्जमाफीचा जो निधी आला त्यातील 72 टक्के निधी पश्चिम महाराष्ट्रात गेला. आमचा मराठवाडा आणि विदर्भ कोरडाच राहीला. 72000 कोटी रूपये ही देशातील शेतकऱ्यांच्या कर्ज माफीसाठी दिले. असे असताना येथे उल्लेख केला जातो की, कर्ज माफीसाठी 72000 कोटी रूपये दिले. तो निधी संपूर्ण देशासाठी होता. आपल्या राज्याला फक्त सात हजार कोटीच रूपये मिळाले. आपल्या राज्याला 72000 कोटी रूपये मिळाले याचा उल्लेख परवाच कोणी तरी येथे केला होता. त्यातील 7 हजार कोटी आपल्या राज्याच्या वाट्याला आलेत व त्यातील 72 टक्के निधी पश्चिम महाराष्ट्रात गेला. त्याचे दु:ख नाही. आबांना सुद्धा 4-5 लाख रूपयांची कर्ज माफी मिळाली. पण या शेतकऱ्याला कर्ज माफी मिळाली नाही. याची तक्रार अशी आहे की, कर्जातून वगळण्याकरिता त्याला बँकेने नाकारले. कर्जमाफी विषय आम्ही कधी तरी सभागृहात घेणार आहोत. कारण हा गंभीर विषय आहे. हा विषय एवढा गंभीर आहे की, त्यामुळे कदाचित आमच्या माननीय सहकार मंत्र्यांना पद सोडावे लागेल. हा विषय व्यवस्थित मांडला गेला पाहिजे.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

पण तो व्यवस्थित मांडला गेला पाहिजे, त्याकरिता मी थांबलेलो आहे. मी आपणास सांगितले होते की, पुढील अधिवेशन हे आपल्याकरिता असेल, पण या अधिवेशाचा कालावधी थोडा आहे. कदाचित अर्थसंकल्पीय अधिवेशनात कर्जमाफीचा मी मुद्दा मांडेन.

सभापती महोदय, माननीय पंतप्रधानांनी कर्जमाफीची घोषणा जाहीर करताना सांगितले होते की, याचे नियंत्रण पंतप्रधान कार्यालयात राहील. सुदैवाने यावर नियंत्रण करण्याची जबाबदारी पंतप्रधान कार्यालयाचे मंत्री असलेले माननीय श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकडे होती आणि आज ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून येथे आलेले आहेत. राष्ट्रीय सिंचनाच्या प्रकल्पा संदर्भात मी येथे मुद्दा मांडला होता. या प्रकल्पासाठी केंद्र सरकारने निधी दिला असेल आणि त्यामध्ये काही गैरव्यवहार झाला असेल तर त्याची चौकशी केंद्र सरकार करेल. या प्रकरणामध्ये केंद्र सरकारने चौकशी लावलेली आहे त्याचा आपल्याशी काही संबंधी नाही. ती चौकशी माननीय मुख्यमंत्री महोदयांनी लावली असे मी म्हणणार नाही कारण तो केंद्र सरकारचा विषय आहे. आज एसआयटी आहे, केंद्र सरकारची चौकशी आहे, न्यायालय आहे, पाहू काय होते ते ? तेव्हा कर्जमाफी हा विषय गंभीर आहे. एका शेतकऱ्याचा आक्रोश मी या निमित्ताने मांडलेला आहे. आज आपणास त्याचे उत्तर देता येणार नाही. आपण हे प्रकरण अवश्य तपसावे अशी मी विनंती करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, चुकीचे रेकॉडवर राहू नये म्हणून सांगू इच्छितो की, कारण तो विषय गंभीर आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगितले की, केंद्र सरकारने 72 हजार कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले, ही गोष्ट खरी आहे आणि त्यातील काही निधी आपल्या राज्याला मिळाला. परंतु या राज्य सरकारने शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी 8 हजार कोटी रुपयांची तरतूद केली हे आपणास विसरता येणार नाही एवढेच मला सांगावयाचे आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी सन 2012-2013 च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा करण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 5, पृष्ठ क्रमांक 6- सामान्य प्रशासन विभाग, या ठिकाणी माननीय मुख्यमंत्री उपस्थित आहेत. नागपूर शहराला उप राजधानीचा दर्जा आहे. या उप राजधानीमध्ये दरवर्षी अधिवेशन घेण्यात येते. जेव्हा विदर्भ महाराष्ट्रामध्ये समाविष्ट झाला त्यावेळी विदर्भाला आश्वासन देण्यात आले होते की, दरवर्षी किमान 30 दिवसांचे अधिवेशन होईल आणि या 30 दिवसांमध्ये संपूर्ण शासन विदर्भामध्ये येईल. विदर्भातील माणसे गरीब आहेत त्यांना मुंबईला येणे परवडणारे नाही, परंतु नागपूरमध्ये अधिवेशन घेतल्यामुळे त्यांचे वर्षभरातील प्रश्न नागपूरमध्ये सोडविता येतील असेही आश्वासन विर्दभातील जनतेला देण्यात आले होते. परंतु आज त्यांची फसवणूक होत आहे असे मला वाटते. कारण आपण फक्त दोन आठवडे अधिवेशन घेतो. आपण फक्त येथे सुट्टीचा उपभोग घेण्यासाठी येतो की काय अशाप्रकारची शंका माझ्या मनात येते.

सभापती महोदय, या अधिवेशनासाठी जवळपास 150 ते 200 कोटी रुपये खर्च होतो. हा ऑफिशिअली खर्च आहे. अन ऑफिशिअली खर्च वेगळा आहे त्यामध्ये गाड्यांची तरतूद आणि इतर बाबी आहेत, हा सर्व खर्च जवळपास 400 कोटी रुपयांपर्यंत जातो असे मला वाटते. परंतु इतक्या मोठ्या प्रमाणावर खर्च होऊनही विदर्भातील जनतेच्या हाती काही पडत असेल असे मला वाटत नाही. तेव्हा विदर्भातील जनतेला न्याय द्यायचा असेल, तेथील प्रश्न सोडवावयाचे असतील तर हे अधिवेशन किमान 30 दिवस चालले पाहिजे आणि संपूर्ण शासन 30 दिवस येथे आले पाहिजे, तरच या अधिवेशनाचा उपयोग होईल आणि हा महाराष्ट्र अखंड राहील असे मला वाटते महाराष्ट्रासाठी ज्या 105 लोकांनी बलिदान दिलेले आहे, आपले रक्त सांडलेले आहे याची जाणीव ठेवून नागपूर येथील अधिवेशन कसे जास्त दिवस होईल याचा विचार शासनाने करावा अशी विनंती आहे.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री उच्च विद्याविभूषित आहेत. त्यांचा बँकींग क्षेत्रातील अभ्यास अतिशय चांगला आहे. त्यांचा अर्थशास्त्राचा अभ्यास चांगला आहे.

यानंतर श्री.सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील....

सभापती महोदय, राष्ट्रकुल संसदीय अभ्यास वर्गामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केलेले विचार ऐकून मी खूप प्रभावित झालो. त्यांनी कोणतेही कागद हातामध्ये न घेता आकडेवारी सांगितली. त्यावरुन अशाप्रकारचा अर्थशास्त्र समजावून सांगणारा मुख्यमंत्री मी पहिल्यांदा पाहिला त्याबद्दल मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो.

सभापती महोदय, या राज्य सरकारचा प्रशासकीय खर्च 81 टक्के असून तो कर्मचाऱ्यांच्या पगारावर होत आहे आणि राहिलेला 19 टक्के खर्च हा विकास कामावर होत आहे. यापूर्वी प्रशासकीय खर्च 65 टक्के होत होता, त्यानंतर तो 70 टक्के झाला, त्यानंतर 75 टक्के झाला आणि आता सहाव्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीनंतर तो 81 टक्क्यावर जाऊन पोहोचला आहे. यानंतर ज्यावेळी सातवा वेतन आयोग राज्यामध्ये येईल त्यावेळी विकासाच्या कामासाठी पैसेच शिल्लक राहणार नाहीत. याकरिता माझी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती आहे की, आपण नेहमी ऐतिहासिक निर्णय घेत असता. आज देखील आपण एस.आय.टी. बाबत घेतलेला निर्णय दूरदर्शनवर पाहिल्यानंतर या राज्यातील शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने कुणी तरी न्याय देणारा आहे हे आपण दाखवून दिले आहे त्याबद्दल मी आपले जरुर अभिनंदन करतो. याबरोबर माननीय मुख्यमंत्र्यांना मला सूचना करावयाची आहे की, प्रशासनावरील खर्च कसा कमी करता येईल यामध्ये आपण लक्ष घातले पाहिजे. मी गेली 12 वर्षे पुरवणी मागण्यांवर भाषण करतांना मॅन पॉवर कमी करण्याबाबत सातत्याने मागणी करीत आलो आहे. तरीदेखील आपण मॅनपॉवर कमी करु शकलो नाही. राज्य शासनाच्या कार्यालयांमध्ये संगणकीकरण झाले तरी त्याचा फायदा कुठेही झालेला मला दिसला नाही तो आपल्या कारकिर्दीमध्ये व्हावा अशी माझी आपणास मनापासून विनंती आहे. संगणकीकरण करण्यात आल्यानंतर त्या विभागातील मॅनपॉवर आपण कमी केली पाहिजे.

मी या सभागृहामध्ये अनेक वेळा सांगितले आहे की, माझ्या रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा मी चेअरमन असून माझ्या या बँकेमध्ये सुरुवातीला 1400 कर्मचारी होते तर आज फक्त 200 कर्मचारी काम करीत आहेत. एक मॉडेल बँक म्हणून माझ्या बँकेची पाहणी करण्याकरिता नाबार्डच्या 40 अधिकाऱ्यांची एक टीम आज अलिबागमध्ये ठाण मांडून बसली आहे. या बॅकेमधील मॅनपॉवर कशी कमी केली व बॅकेचा प्रॉफिट कसा वाढविला याचा ते अभ्यास करीत आहेत. माननीय मुख्यमंत्री हे कॉम्प्युटरमधील अभ्यासू असून त्यांनी परदेशामध्ये शिक्षण घेतले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील....

आहे. त्यामुळे आपल्या कारकिर्दीमध्ये प्रशासनामधील मॅनपॉवर कमी करण्याची सुरुवात झाली पाहिजे अशी या निमित्ताने मी मागणी करतो. जेणेकरुन राज्याच्या विकास कामावरील 19 टक्के हिस्सा वाढवून तो 40 टक्क्यापर्यंत कसा नेता येईल या दृष्टीने आपण हे काम करु शकता असे मला वाटते.

सभापती महोदय, गृह विभागाच्या बाब क्रमांक 25 व पान क्रमांक 18 च्या संदर्भात सांगू इच्छितो की, राज्यामध्ये विरोधी पक्षाच्या कार्यकर्त्यांवर खोटे गुन्हे दाखल करणारा पोलीस स्टेशन हा एक अड्डा निर्माण होऊ पहात आहे. त्या पोलीस स्टेशनच्या नावाची पाटी काढून त्या ठिकाणी राष्ट्रवादी पार्टीचे पोलीस स्टेशन अशी पाटी लावण्याची गरज निर्माण झाली आहे असे मला वाटते. सभापती महोदय, मी कधीही पोलीस स्टेशनला फोन करीत नाही. माझ्या आयुष्यात मी कधीही इन्सपेक्टरला फोन केला नाही तर वेळ आल्यानंतर मी एस.पी. बरोबर फोनवर बोलतो. पोलीस अधिकारी फोनवर जर उध्दटपणे बोलला तर ते मला सहन होत नसल्यामुळे मी फोन करुन बोलत नाही.

सभापती महोदय, मी आज या ठिकाणी घडलेले दोन किस्से सांगणार आहे. विदर्भातील वाशिम पंचायत समिती ही माझ्या शेतकरी कामगार पक्षाच्या ताब्यात आहे. तेथील जिल्हा चिटणीसांवर खोटा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राज्यामध्ये पोलीस स्टेशनमध्ये एखाद्या व्यक्तीविरुध्द 353 आणि 307 ही दोन कलमे लावून त्याला तीन महिन्यापर्यंत जामीन द्यावयाचा नाही अशाप्रकारचे सूत्र पोलिसांनी स्वीकारले आहे. मंगळसूत्र, अंगठी चोरीला गेल्याचा गुन्हा दाखल करुन पोलीस कारवाई करण्याचे वातावरण या राज्यामध्ये निर्माण करण्यात आले आहे. सभापती महोदय, अलिबागमध्ये समाज कल्याण समितीचा माझ्या पक्षाचा एक मागासवर्गीय सभापती स्वत: एक बिझनेसमन असून त्याचे नाव श्री. दिलीप भोईर आहे. ज्या सभापतीने नामनिर्देशन पत्रामध्ये स्वत:ची मालमत्ता साडे तीन कोटी असल्याचे जाहीर केले आहे, तो स्वत: व्यवसाय करीत आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील . . . .

मी स्वत: व्यवसाय करतो. स्वत:ची त्याची बरीच मालमत्ता आहे. त्या व्यक्तीने एक मंगळसूत्र चोरले म्हणून त्याच्यावर खोटी फिर्याद दाखल केली. पहिल्यांदा 326 अंतर्गत फिर्याद दाखल केली होती. त्यानंतर तीन दिवसांनी ती बदलण्यात आली. माननीय पालक मंत्री महोदयांनी फोन केला आणि मग ती फिर्याद बदलली गेली. मात्र तो माणूस तीन महिने जेलमध्ये आहे.

सभापती महोदय, मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, अशा पध्दतीने राज्य करुन चालणार नाही. आम्हाला रस्त्यावर येऊन तुम्हाला जाब विचारावा लागेल. हा प्रश्न आमचा नाही तर काँग्रेसचा आहे. नांदेडवाले भांडत होते. तुम्ही राज्य मंत्री म्हणून पाहू नका. याठिकाणी समान न्याय मिळाला पाहिजे. जो माणूस स्वत: पदाधिकारी आहे, मागासवर्गीय आहे तो माणूस 200 रुपयाचे मंगळसूत्र चोरणार आहे काय ? मी तेथील एस.पी.यांच्याशी बोललो. ते नवीन आहेत. ते मला म्हणाले की, तुम्ही जोरामध्ये बोलत आहात. मी त्यांना सांगितले की, मी नेहमीच जोरात बोलतो. मी पैसे घेत नाही आणि देत नाही म्हणून जोरात बोलतो. त्यामुळे याबाबत गृह विभागामार्फत न्याय मिळाला पाहिजे अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, बाब क्र.164, पान क्र.152 ग्रामीण विकासाच्या बाबतीत बोलावयाचे आहे. या सभागृहाचे एक वैशिष्ट्य आहे की, याठिकाणी आम्ही उपस्थित केलेल्या प्रश्नांची माननीय मंत्री महोदय उत्तरे देतात. मग विशेष उल्लेख असेल किंवा प्रश्न असेल त्याची उत्तरे मिळतात. पण मागण्यांच्या बाबतीत चर्चा केल्यानंतर आम्हाला त्याबाबत उत्तर मिळत नाही. या बाबत चर्चा होत असताना माननीय मंत्री महोदय ते गंभीरपणे ऐकत असतात असे मला वाटत नाही. एक प्रकारे उरकावयाचे म्हणून ते उरकले जाते अशी स्थिती आहे. त्यामुळे मागण्यांवरील चर्चेबाबत देखील उत्तरे मिळाली पाहिजेत.

सभापती महोदय, मागच्या वेळी मी मागण्यांवरील चर्चेमध्ये बोलत असताना थळ ग्राम पंचायतीच्या बाबतीत माझ्या तालुक्यातील प्रश्नाबाबत विचारले होते. त्यावेळी माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिले होते की, सर्व कागदपत्रांची पूर्तता झाली आहे. परंतु मी सही करीत नाही. जर माननीय राज्यमंत्र्यांना अधिकार नसेल तर त्यांनी उत्तर देऊ नये. पूर्तता झाल्यानंतर सुध्दा जर तेथे तुमच्या पक्षाला बाधा होईल म्हणून सही करीत नसाल तर त्यापध्दतीने काम होणार नाही. आम्ही कोर्टा मध्ये गेलो तर आम्हाला न्याय मिळेल. पण कोर्टामध्ये जाण्यासाठी दोन लाख रुपये लागतात आणि आमच्यासारख्या गरीब माणसाने दोन लाख रुपये कुठून आणावयाचे ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील . . . .

अनेक सन्माननीय सदस्य (खाली बसून) : अशी गरिबी सगळयांना मिळो.

(अनेक सन्माननीय सदस्य खाली बसून बोलतात.)

श्री.जयंत प्र.पाटील : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, तुम्ही येऊन पहावे. आम्ही कोणत्याही घोटाळ्यामध्ये पैसे घेतलेले नाहीत हे तुम्हाला माहिती आहे. कारण् तुम्ही माझ्या बरोबर काम केलेले आहे. पण जरी पैसे असले तरी ते कोर्टामध्ये किती घालवावयाचे हा मुद्दा आहे. कारण आमचा एक पाय सतत कोर्टामध्ये असतो. सन्माननीय सदस्य श्री.विजय सावंत यांना मीच निवडून आणले, तुम्ही त्यांना विचारावे. त्यांनी माझ्याबरोबर काम केले आहे. साडेतीन लाख रुपयामध्ये विधान परिषदेचे आमदार म्हणून निवडून आणण्याचे काम शेकापच करु शकतो. याठिकाणी अशा पध्दतीचे काम असेल . . . .

श्री.किरण पावसकर (खाली बसून) : सन्माननीय सदस्य पुरवणी मागण्यांवर बोलत आहेत काय?

श्री.जयंत प्र.पाटील : या सभागृहामध्ये मागण्यांवर आणि बिलावर आपण कितीही वेळ आणि कसेही बोलू शकतो.

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी) : सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी भाषण सुरु करावे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी निश्चितपणे सांगतो की, याबाबत न्याय मिळाला पाहिजे. ग्रामीण विकासाच्या बाबतीत एक गंभीर प्रश्न आहे आणि काँग्रेसच्या सन्माननीय सदस्यांनी ते ऐकावयास पाहिजे. आज आपण स्व.यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दी वर्ष साजरे करीत आहोत, ज्यांनी सत्तेचे विकेंद्रीकरण करुन त्यांनी जिल्हा परिषदा स्थापन केल्या. तेथे सध्या केंद्रीकरण सुरु आहे.

यानंतर श्री.मा.शिगम . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील....

सभापती महोदय, ग्रामविकासाचा निधी जिल्हा परिषदांना वर्ग करावयास पाहिजे. विकासकामे निवडण्याचे अधिकार जिल्हा परिषदेच्या बॉडीला दिले पाहिजेत. कोणत्या गावचा रस्ता करावयाचा याची लिस्ट मंत्री महोदय करीत असतील तर ते बरोबर नाही. जिल्हा परिषदेचा निधी जिल्हा परिषदेला थेट मिळाला पाहिजे. आपण जिल्हा परिषदेचे अधिकार स्वत:कडे घेता कामा नये.

बाब क्रमांक 156, पान क्रमांक 145. सभापती महोदय, इंडिया बुल कंपनीला अलिबागमध्ये रिझर्व्हेशन ठेवले होते. आम्ही भांडून ते रद्द केले. त्यास 1 वर्ष होऊनही अद्याप त्यासंबंधीचे नोटिफिकेशन काढण्यात आलेले नाही. त्यामुळे शेतक-यांना घर बांधता येत नाही, घर दुरुस्त करता येत नाही. या संदर्भात मी मंत्रीमहोदयांना दोन-तीन वेळा भेटलो आहे. अद्याप नोटिफिकेशन निघालेले नाही. तेव्हा हे अधिवेशन संपण्याच्या आत ते नोटिफिकेशन जारी करावे अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, सन 2012-2013च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाने दिनांक 26 नोव्हेंबर रोजी एक शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. त्या शासन निर्णयाचे अत्यंत गंभीर स्वरुप लक्षात आलेले आहे. बिलप्रणालीचा सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग, वन विभाग या विभागाच्या अधिका-यांनी गैरवापर केला असे माननीय मंत्री महोदय श्री. जयंत पाटील यांनी सांगितले. धनादेशावर चुकीचे क्रमांक टाकून अर्थसंकल्पीय तरतुदी पेक्षा अधिक रकमेचे धनादेश काढण्यात आले असे शासन निर्णयात म्हटलेले आहे. राज्य शासनाने या बाबतीत स्टेट बँक ऑफ इंडिया आणि स्टेट बँक ऑफ हैद्राबादला सूचना दिलेल्या आहेत की, यापुढे बँकानी पतमर्यादेपर्यंतच खर्च करण्याची परवानगी द्यावी. सभापती महोदय, हा किती अविश्वास आहे. जलसंपदा खात्याचा व्यवहार कसा आहे हे आता एसआयटीमध्ये समजून येईल. इतर विभाग देखील असे करतात. त्यामुळे त्यावर माननीय अर्थमंत्र्यांना चाप बसवावा लागतो. इतका अविश्वास विभागावर असल्यामुळे वित्त विभागाला अशा प्रकारचा जी.आर. काढावा लागणे ही बाब शासनाला भूषणावह नाही. आर्थिक शिस्त राज्यामध्ये आहे की, बेशिस्तीने वागणा-यांना शिस्तीचा बडगा दाखविण्याचा प्रयत्न या शासन निर्णयातून होत आहे हे काही समजत नाही. बिलप्रणालीचा गैरवापर करुन अंदाजपत्रकाचे जे धनादेश काढलेले आहेत त्याबाबतची तपशीलवार माहिती मंत्री महोदयांनी द्यावी. यामुळे खरे खोटे सदनाला समजू शकेल. माननीय मंत्री महोदय श्री. छगन भुजबळ आणि माननीय मंत्री महोदय डॉ. पतंगराव कदम हे नियमाप्रमाणे चालतात हे आम्हाला माहीत आहे. या मंत्री महोदयांची खाती बेशिस्तीने कारभार करीत आहेत हे कोणी तरी दाखविण्याचा प्रयत्न करीत नाही ना असा देखील प्रश्न पडतो. म्हणून यासंदर्भातील वस्तुस्थिती सभागृहाला कळणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री महोदय सभागृहामध्ये उपस्थित आहेत. बाब क्रमांक 7 आणि 37च्या संदर्भात बोलत असताना मी विचारु इच्छितो की, हे "आदर्श" प्रकरण केव्हा गुंडाळण्यात येणार आहे ? गुंडाळणार म्हणजे या प्रकरणाची चौकशी केव्हा पूर्ण करणार ? या बातीत माननीय मुख्यमंत्र्यांनी काही तरी सांगितले पाहिजे. माननीय मुख्यमंत्री महोदय दिल्लीहून मुंबईत आले की आदर्श प्रकरणाची आठवण होत असते. जस्टीस डिलेड इज जस्टीस डिनाईड. म्हणून हे आदर्श प्रकरण ठरावीक कालमर्यादेमध्ये निकाली काढले पाहिजे.

...नंतर श्री. गिते...

अशोधित प्रत / शीघ्रलिपी नोंद

श्री.विनोद तावडे...

याबाबतचा निर्णय लवकर फायनल होणार नसेल तर जनता आम्हाला सातत्याने तोच प्रश्न विचारीत राहतील.

महोदय,सभागृहात एस.आय.टी.ची घोषणा नुकतीच झाली, त्या घोषणेचे देखील आदर्श सारखेच होणार काय अशा प्रकारची विचारणा लगेचच लोकांकडून होऊ लागली आहे. सभागृहात ही घोषणा होऊन फक्त तीन मिनिटे झाली आहेत आणि लोकांकडून लागलीच अशा प्रकारची विचारणा होऊ लागली. माननीय मुख्यमंत्री महोदय, आपल्या व्यवहार्यतेच्या सिस्टीमचा प्रश्न निर्माण झालेला आहे. आदर्शच्या बाबतीत परवा डिफेन्स विभागाने स्टेटमेंट केले की, ती जमीन आमचीच आहे. यासंदर्भातील आयोगाने जो अहवाल दिला आहे, तो अहवाल केंद्रीय संरक्षण मंत्री ॲन्थोनी यांनी नाकारला. त्यांनी या संदर्भात न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. आदर्शच्या प्रकारात मोठया प्रमाणात कन्फ्यूजन निर्माण झालेले आहे. म्हणून आदर्शच्या निर्णयाच्या बाबतीत काही तरी डेड लाईन ठरवून त्या बाबतची माहिती राज्यातील जनतेला मिळाली तर बरे होईल.

सभापती महोदय, पत्रकार कल्याण निधीच्या बाबतीत सांगू इच्छितो की, पत्रकारावर होत असलेले हल्ले यासंदर्भातील एक विधेयक आपल्याकडे प्रलंबित आहे. मला काही पत्रकार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, विरोधी पक्षातील गट नेतेच या विधेयकाला विरोध करीत आहेत. मी माननीय श्री.दिवाकर रावते यांना विचारले की, या बाबतीत तुम्ही काही बोलला आहात काय, तर त्यांनी सांगितले की, मी या संदर्भात काहीही बोललेलो नाही. या बाबतीत आमची बैठकही झाली नाही असेही त्यांनी मला सांगितले. मी पत्रकार मित्रांबरोबर अतिशय मोकळेपणाने बोललो. ॲक्रेडिशनच्या पत्रकाराबाबतीत आमचे काही म्हणणे नाही. परंतु आता कंत्राट पध्दतीने पत्रकार नेमले जाऊ लागल्यामुळे ॲक्रेडिशनचे पत्रकार आता राहिलेले नाहीत. आता नवीन फॉर्मेट येईल काय याची मला माहिती नाही. परंतु जे जेन्युअन पत्रकार आहेत, त्यांच्या विषयी आम्हाला खूप जाणीव व आस्था आहे. कार्ड घेतलेले पत्रकार आहेत, त्यांनी मला सांगितले की, त्या विधेयकात त्यांच्या बाबतीत देखील काही प्रोव्हीजन करण्यात आलेली आहे. 1975 नंतर पत्रकारांवरील हल्ल्यामध्ये 12 पत्रकारांचा मृत्यू झाला याची आपणा सर्वांना माहिती आहे. गेल्या तीन वर्षाच्या कालावधीत 232 पत्रकारांवर हल्ले झालेले आहेत. या वर्षी नोव्हेंबर, 2012 मध्ये 59 पत्रकारांवर हल्ले झालेले आहेत. हल्ले झालेल्या पत्रकारांची यादी बघितली तर अतिशय सिनियर

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

पत्रकारांवर मोठया प्रमाणात हल्ले झालेले दिसून येतात.

सभापती महोदय, जे.डी. प्रकरणाबाबत मी मागच्या वेळी सभागृहात बोललो. या प्रकरणासंदर्भात मी जे मत मांडले होते ते मत हायकोर्टाने मान्य केले. त्यात जिग्ना व्होरा हिला बरेच दिवस अडकविले होते. नंतर तिला बाहेर सोडण्यात आले. पत्रकारांच्या सरंक्षणासंबंधीचे जे विधेयक आहे, त्याबाबतच्या सद्य:स्थितीची माहिती माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहाला द्यावी, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, अभिलेखाचे जतन या विषयाच्या बाबतीत मला एकच मुद्दा उपस्थित करावयाचा आहे. भारतीय स्वातंत्र्य लढयातील हुतात्मा भाई कोतवाल यांची जन्मशताब्दी वर्षाची सांगता दिनांक 1 डिसेंबर, 2012 रोजी झाली. भाई कोतवाल हे माथेरानचे मूळ निवासी आहेत. त्यांची स्वातंत्र्य लढयात महत्वाची भूमिका राहिली आहे. नाभिक समाजातील एक नेतृत्व या स्वातंत्र्य लढयात होते. त्यांच्या जन्मशताब्दी वर्ष सोहळा साजरा करण्यासाठी शासनाने 1 कोटी रुपयांचा निधी मंजूर केला होता. डॉ.पतंगरावजी कदम साहेब, त्यांचे जन्मशताब्दी वर्ष संपले, परंतु शासनाकडून सदर सोहळा साजरा करण्यासाठी तरतूदच केली नाही. अशा कामांसाठी जर तरतूद द्यावयाची नाही तर अशा प्रकारच्या घोषणा शासनाकडून का केल्या जातात ?

महोदय,यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दी वर्षासाठी 100 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे, त्यातील किती तरतूद खर्च झाली आहे ते आपण पहावे. पुणे येथील जनता सांगत होती की, यासाठीची तरतूद खर्चच झाली नाही. शासनाकडून फक्त घोषणा केल्या जातात, परंतु त्यासाठी तरतूद उपलब्ध करुन दिली जात नाही. अशा प्रकारचे सोहळे करण्यामागे आपल्या प्रामाणिक भावना असतात. भाई कोतवालांचा जन्मशताब्दी सोहळा करण्यासाठी तरतूद केली नसल्यामुळे शासनाकडून राष्ट्रीय पुरुषांचा हा एक प्रकारे अवमानच केला गेला आहे असे आम्हाला वाटते. भाई कोतवालांचा जन्मशताब्दी वर्ष सोहळा साजरा करण्यासाठी 1 कोटी रुपयांची तरतूद जरी शासनाकडून केली गेली नसेल तरी यापुढच्या काळात त्यांच्यासाठी काही तरी करावे अशी अपेक्षा आहे. राष्ट्रीय लढयामध्ये हुतात्मा झालेल्यांचा अशा प्रकारे अवमान होणे ही बाब अतिशय खेदजनक आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

सभापती महोदय, गृह विभागाची बाब क्रमांक 16 व 17 ही पोलीस खबऱ्यांना पैसे देण्याबाबतची आहे. खबरे हे पोलिसांना बातम्या देतात, परंतु संबंधित पोलीस स्टेशनकडून काही ॲक्शन घेतली जाते काय, हा एक संशोधनाचा विषय आहे. आझाद मैदान येथे घटना घडली. ती घटना संपूर्ण देशातच नव्हे तर जगात गाजली. या बाबतची माहिती त्या त्या ठिकाणच्या खबऱ्यांनी पोलिसांकडे पाठविली होती.

यानंतर श्री. जुन्नरे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

सभापती महोदय, खबऱ्यांनी आझाद मैदानाची सर्व माहिती दिलेली असतांना सुध्दा अधिकाऱ्यांनी काहीच कारवाई केली नाही. आझाद मैदानावर आमच्या महिला भगिनींवर विनयभंगाचा प्रकार ओढवला गेला. या ठिकाणी 1500 लोक येणार होते परंतु त्या ठिकाणी प्रत्यक्षात 50,000 च्यावर लोक आले. किती लोक येणार आहेत हे सांगितले गेले होते. मला तर एका आयपीएस अधिकाऱ्याने सांगितले होते की, कमिशनरांनी सांगितले होते की, "देख बाबा, दलित मुस्लिमों पर हाथ नहीं उठाना, नहीं तो लफड़ा होता है. इसलिए उसको आप जरा पॉलिटिकली संभालो." अशा प्रकारची तुमची मानसिकता असेल तर खबऱ्यांवर आपण जो खर्च करतो त्याचा उपयोग तरी काय ? "उड़ान पंखों में नहीं होती, हौसलों में होती है." राजकीय नेतृत्वाला हा प्रकार आवडतो असे अधिकारी सांगतात. खबऱ्यांनी माहिती दिल्यानंतर जर कारवाई होत नसेल तर त्याचा काय उपयोग ? वांद्रयातील श्रीमती यास्मिन शेख या महिलेने आझाद मैदानावर असा असा प्रकार होईल याची माहिती दिल्यानंतर सुध्दा तिला लेखी माहिती देण्यास सांगितले असता या महिलेने लेखी माहिती दिली तरी सुध्दा त्यावर ॲक्शन घेतली गेली नाही. मला असे वाटते एका अर्थाने खबऱ्याना जे पैसे दिले जातात त्याचा अपव्यय होतो आहे. खरे म्हणजे हे पैसे अधिकाऱ्यांची मानसिकता विकसित करण्यासाठी दिले पाहिजे. प्रत्येक खात्यामध्ये अधिक तत्परतेने काम करणारे लोक असतात परंतु त्यांचे खच्चीकरण करणेही चालू असते. रोगापेक्षा औषध जहाल अशी काही वेळेला कृती होते.

सभापती महोदय, पालघरच्या प्रकरणात त्या मुलींना अटक करणे चुकीचे होते परंतु या मुलींना अटक झाल्यानंतर दिल्लीतून जस्टीस काडजू साहेबांचे स्टेटमेंट आले होते. डिजीटल मीडिया इतका फास्ट झाला आहे की, हे कोठे तरी मॅनेज होते? या मुलींच्या संदर्भात कोणी तक्रार केली असती व त्यांनतर शहानिशा करण्यासाठी या मुलींना बोलावले असते तर ठीक होते. या मुली जनतेमध्ये जाणीवपूर्वक भेदभाव पसरविणाऱ्या नव्हत्या त्यामुळे त्यांना त्वरित सोडून द्यावयास पाहिजे होते. ही चूक झाल्यानंतर ठाण्याच्या ॲडीशनल रेसिडेंशिअल एस.पी.वर कारवाई होतच नाही. यामधून आपण काही अधिकाऱ्यांचे खच्चीकरण करीत आहात काय ? काडजू साहेबांचे परवा स्टेटमेंट आले होते की, भारतातील 90 टक्के जनता मूर्ख आहे. ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

पालघरची माहिती मुंबईत येण्याच्या अगोदर दिल्लीत पोहचते. दिल्लीतील माहिती दुसऱ्या दिवशीच्या वर्तमानपत्रात माननीय मुख्यमंत्र्यांच्या पत्रासह येते. यामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांना गर्भित इशारा देणारे हे पत्र होते. मला यामध्ये काही योगायोग वाटत नाही. पॉलिटीकल लीडरशिप हे राज्य चालविणार आहे की, मीडियातील काही ठराविक लोक चालविणार आहेत ? त्यामुळे याचा आपल्याला केव्हा तरी निर्णय करावा लागणार आहे. या प्रकरणात ज्या अधिकाऱ्याकडून चूक झाली होती त्या अधिकाऱ्याला आपण समज देऊ शकलो असतो. परंतु याचा दिल्लीतील चाणक्यांनी गुजरातच्या निवडणुकीशी संबंध लावला अशी चर्चा त्यावेळी झाली होती. चांगल्या एस.पी.वर अशा प्रकारची ॲक्शन घेणे योग्य नाही. त्या एस.पी.ना आपण केवळ समज दिली असती तरी चालले असते. परंतु आझाद मैदानाच्या बाबतीत ॲक्शन घेतली नाही मागे पालघरच्या घटनेच्या बाबतीत ॲक्शन घेतली हे योग्य नाही.

सभापती महोदय, मला आठवते की, मागे एकदा मेडीकलचे विद्यार्थी राजभवनमध्ये घुसले होते तेव्हा त्यांच्यावर लाठीचार्ज करण्यात आला होता. या विषयावर नंतर जी टिका टिपणी झाली होती त्यानंतर कोणत्याही मोर्चावर पोलीस अनेक वर्ष लाठी ऊगारण्यास धजावत नव्हते. या सर्व कृतीतून आपण पोलिसांचे मानसिक खच्चीकरण करीत आहोत काय याबाबत विचार करावा लागणार आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 26 मध्ये मालवाहू ट्रकने यात्रेकरुंना धडक देणे असा विषय आहे. मालवाहू ट्रक दुप्पट लोड नेत असतात. एक्स्ट्रा लोडच्या भ्रष्टाचाराचे कुरण परिवहन खात्यामध्ये आहे. ते कोठे तरी थांबले पाहिजे. खापरखेडा शहरातील उप मार्गावर ओव्हर लोडचे फोटो आलेले आहेत, अनेक फ ोटो सुध्दा याबाबत आलेले आहेत. ओव्हरलोड ट्रकच्या मागील भागावर लाईट लावलेले नसतात. ट्रकच्या संदर्भात एक मोठे रॅकेट आहे. ज्या ट्रकचालकांजवळ कार्ड असतात त्यांना सोडले जाते त्यामुळे

यानंतर श्री.ओटवणेकर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

या विषयाबाबत कारवाई होणे मला अपेक्षित आहे.

आता सभागृहात माननीय गृह राज्यमंत्री उपस्थित आहेत. नवी मुंबइेतील नेरुळ येथे डी.वाय.पाटील स्टेडियमवर आयपीएलचे सामने होतात. या सामन्यांसबंधातील माहिती मी माहितीच्या अधिकारान्वये काढली. सन 2010 करिता 6 कोटी 23 लाख रूपयाचे शुल्क होते. सन 2011 करिता 4 कोटी 72 लाख रूपये असे मिळून 10 कोटी 95 लाख रूपये शासनाला शुल्का पोटी येणे बाकी आहे. यापैकी 47 लाख 53 हजार रूपये शासनाकडे जमा झालेले आहेत. पैसे नाहीत, कर्जबाजारी आहोत असे आपण म्हणतो. मात्र आयपीएलवाले प्रचंड पैसे कमवितात. ते पैसे कमवत नाहीत असे नाही. गृह खात्याचे त्यांच्या कडून सव्वा दहा कोटी रूपये येणे आहे. आपण त्यांना फुकट पोलीस संरक्षण देतो का ? मग एकदा आपण म्हणावे की, आम्ही फुकट पोलीस संरक्षण देतो आणि जाऊ द्यावे. आपल्याला शुल्काचे पैसे येत नसतील तर त्याची वसुली केली पाहिजे. तो आपला महसूल आहे. त्याची आकारणी आपण करीत नाही. याचे उत्तर मला मिळेल अशी मी आशा करतो.

यानंतर मी बाब क्रमांक 49 वर बोलणार आहे. वनातील आगीसाठी आधुनिक प्रतिबंध प्रकल्पासाठी वनविकास महामंडळास प्रतिपूर्ती करण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. कोकणात मार्च-एप्रिलच्या महिन्यात मोठ्या प्रमाणावर फळबागांना आगी लागतात. या आगींचा आपण एफआयआर नोंदवून घेतला पाहिजे. ही बाब तीन वर्षापूर्वी सभागृहात मान्य झाली होती. पण त्याची कार्यवाही अद्यापि सुरू झालेली नाही. आगीमुळे नुकसान झाल्यामुळे शेतकऱ्याचे उदरनिर्वाहाचे साधन निघून जाते. त्यामुळे त्याला नुकसान भरपाई देण्याची योजना यातून व्हावी अशी कोकणातील माणसाची स्वाभाविक अशी अपेक्षा आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 51 वर मी बोलणार आहे. मी श्रीगोंदा-कर्जत-नेवासा येथील गावांमध्ये गेलो होतो. त्यावेळी माळढोक अभयारण्याचा विषय उपस्थित करण्यात आला होता. तेथे अभयारण्य घोषित केल्यामुळे सर्व बांधकाम व व्यवहार ठप्प आहेत. त्यामुळे लोक हवालदिल झाले आहेत. अनेकांचे असे म्हणणे आहे की, तेथे माळढोक पक्षी येतच नाही. तेथे खरेच तो पक्षी येतो काय ? हे 6800 चौ.मीटरचे क्षेत्र आहे. ते आपण कमी करून 1221 चौरस मीटर करावे असा अहवाल समितीने दिलेला आहे. त्यासंबंधातील घोषणा आपण करणार आहात काय ? आज येथील नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणावर असंतोष आहे. यासंबंधी देखील माननीय मंत्री महोदयांनी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभागृहाला आश्वस्त करावे अशी सूचना मी या निमित्ताने करीत आहे.

..2

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

यानंतर मी बाब क्रमांक 258 वर बोलणार आहे. शासकीय दंत महाविद्यालयामध्ये नवीन पदे निर्माण करावयाची आहेत. त्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. ग्रॅज्युएट नर्सेस टिचर असोसिएशनने आपल्याकडे वारंवार मागणी केली आहे. त्यांचे शिष्टमंडळ मंत्रिमहोदयांना भेटले तेव्हा त्यांना सांगण्यात आले की, आपण निदर्शने करावीत. जोर लावून आंदोलन करा. रस्त्यावर गाड्या अडवा. त्याशिवाय आमच्या खात्याकडे पैसे येणार नाहीत. असे सरकारकडूनच सांगितले जाते.

माझ्या खात्याकडे दुर्लक्ष होत आहे, पदांना मान्यता असते, पण भरण्यास अनुमती देण्यात येत नाही. कारण पैसे नाही. आमच्या खात्याला पैसे दिले जात नाही. रस्त्यावर उतरून जोरदार आंदोलन करा असे मंत्रिमहोदय सांगायला लागले. माननीय वित्त मंत्री त्यांचे काहीच ऐकत नाही. त्यामुळे ते म्हणाले की, आंदोलन करा. नशिब 4-5 दगड फेका त्या शिवाय हे ऐकणार नाहीत असे त्यांनी सांगितले नाही. मी हे अतिशय जबाबदारीने बोलत आहे. जी पदे मंजूर आहेत ती पदे भरण्यासाठी लागणारा निधी आपण देणार आहात काय ? नागपूर आणि मुंबई येथेच शासनाचे नर्सिंग कॉलेज आहे. तेथे ॲडिशनल स्टाफ देणे गरजेचे असताना तो आपण दिला नाही. ग्रामीण भागामध्ये प्रॅक्टीकलला जाण्यासाठी वाहनाची आवश्यकता असते. ते त्यांना उपलब्ध होत नाही. त्यामुळे ते रूग्णवाहिकेमधून जातात. त्यामुळे ज्या कामासाठी रूग्णवाहिका घेतलेली असते त्याचा वापर त्या कामासाठी होत नाही.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे..

हे वारंवार मांडून सुध्दा काही कार्यवाही होत नाही. माननीय मंत्री महोदयांकडे या सर्व बाबी सांगितल्यानंतर ते सांगतात की,या सर्व गोष्टी मिळण्यासाठी आपण आंदोलने करा, जोर लावा तरच निधी मिळेल. अशी सांगण्याची वेळ माननीय मंत्रिमहोदयांवर येत असेल तर परिस्थिती अतिशय दयनीय आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, बाब क्रमांक 296, पृष्ठ क्रमांक 249, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, पुणे येथे अभिनव कला महाविद्यालय आहे. तेथे काही इश्यू सुरु असल्यामुळे तेथील सर्वांचा पगार प्राचार्य आणि सचिवांच्या सहीने होतो. सचिवांना त्या प्राचार्यांना काढायचे आहे म्हणून ते सही करीत नाही त्यामुळे प्राध्यापकांचे चार-चार महिने पगार झालेले नाहीत. गेले सहा महिने मी या गोष्टीचा पाठपुरावा करीत आहे. पुणे येथे विधिमंडळाचा अमृत महोत्सव कार्यक्रम झाला त्यावेळी सन्माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्री श्री.राजेश टोपे यांची मी प्राध्यापकांबरोबर भेट घेतली. त्यावेळी मंत्री महोदयांनी सांगितले होते की, प्राध्यापकांचे पगार देण्याचे सांगण्यात येईल. परंतु तशी कार्यवाही झालेली नाही. प्राध्यापकांचा चार-चार महिने पगार मिळत नसेल तर त्यांचा संसार चालणार कसा ? आपणास हा विषय माहीत आहे. माननीय मंत्रिमहोदयांना सांगितले की, आपल्याकडे जी नोंद आहे त्याप्रमाणे प्राध्यापकांचा पगार काढण्यात येत आहे. या बाबतीत चॅरिटी कमिशनर यांना जो काही निर्णय द्यावयाचा असेल तो ते देतील, परंतु तोपर्यंत प्राध्यापकांना पगार दिला पाहिजे. प्राध्यापकांच्या पगाराचे पैसे जमा आहेत परंतु सचिव सही करीत नसल्यामुळे त्यांना पगार मिळत नाही. तेव्हा माननीय मंत्री महोदयांनी आजच्या आज या बाबतीत निर्णय जाहीर करावा अशी विनंती आहे.

सभापती महोदय, मी पुन्हा एकदा सांगतो की, मी सुरुवातीला जो मुद्दा मांडला त्याबाबत माननीय मुख्यमंत्री महोदयांनी लक्ष घालावे. वाटल्यास आम्ही वेगळ्या माध्यमातून चर्चा उपस्थित करु शकतो. तेव्हा मी उपस्थित केलेल्या मुद्याची माहिती जरुर मिळावी अशी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी): अद्याप अनेक सन्माननीय सदस्यांना या पुरवणी मागण्यांवर बोलायचे आहे. तेव्हा माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, सन्माननीय सदस्यांनी आपले विचार अतिशय थोडक्यात मांडावेत. कारण आपल्याला आजच्या कार्यक्रमपत्रिकेत दर्शविलेल्या सर्व विभागांवरील चर्चा माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरासह पूर्ण करावयाची आहे. तेव्हा सर्वांनी सहकार्य करावे अशी पुन्हा एकदा विनंती आहे. आता सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी त्यांच्या भाषणास सुरुवात करावी.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2012-2013 च्या पुरवणी मागण्यांना पाठिंबा देण्यासाठी आणि त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 5,बाब क्रमांक 2, सामान्य प्रशासन विभाग,शासकीय निवासस्थानांची सजावट, दुरुस्ती व देखभाल यासाठी ही मागणी आहे. कोकण किनारपट्टीवर अतिशय सुंदर अशी शासकीय निवासस्थाने आहेत. आपणास उदाहरण सांगावयाचे झाल्यास मालवण येथील आरसे महल, अलिबागच्या समुद्र किनाऱ्यावरील तुषार आणि वेंगुर्ला येथील "सागर" ही सर्व शासकीय निवासस्थाने अतिशय सुंदर आहेत. ही निवासस्थाने इंग्रजांच्या कालखंडात बांधलेली आहेत. माझी मागणी आहे की, कोकणातील किनारपट्टीवरील सर्व शासकीय निवासस्थांना पायाभूत सुविधा देऊन, पर्यटनाच्या माध्यमातून जास्तीत जास्त निधीची उपलब्धता करुन द्यावी.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 203 सार्वजनिक बांधकाम विभाग, राष्ट्रीय महापुरुषांची स्मारके आणि पुतळे यासाठी ही मागणी आहे. लोकशाही आघाडीच्या संयुक्त जाहीर नाम्यात आश्वासित केल्याप्रमाणे माननीय मुख्यमंत्री महोदयांकडून न्याय मिळालेला आहे आणि त्याचे माननीय विरोधी पक्षाच्या नेत्यांनी देखील अभिनंदन केलेले आहे. मी या निमित्ताने एवढीच विनंती करतो की, या कार्याचा शुभारंभ म्हणून 100 कोटी रुपयांची तरतूद करण्यात यावी अशी विनंती आहे.

सभापती महोदय,पृष्ठ क्रमांक 63, बाब क्रमांक 84,नगर विकास विभाग, महानगरपालिकेला सहाय्य यासाठी ही मागणी आहे. इंग्रजांच्या काळापासून मुंबई शहरात हजारो विहिरी होत्या. त्यातील 3 हजार 20 विहिरी बंद असल्याच्या आढळून आल्या. त्यापैकी 971 विहिरींची महानगरपालिकेने दुरुस्ती केलेली आहे. मुंबईकरांना पाण्याची समस्या नेहमीच भेडसावत असते. ही बाब ध्यानात घेता मुंबईतील बुजलेल्या विहिरी दुरुस्त करण्यासाठी शासनाने महानगरपालिकेला आर्थिक सहाय्य करावे अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, नियोजन विभाग, पृष्ठ क्रमांक 188, बाब क्रमांक 198, पर्यटन केंद्र, महाराष्ट्र राज्य पर्यटन महामंडळाचे एक सुंदर भवन मुंबई शहरामध्ये असावे अशी मागणी आहे. नियोजन विभागामध्ये पर्यटनाचा एक भाग आहे.

यानंतर श्री.सरफरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण....

सभापती महोदय, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडे जवळ जवळ 27 ते 28 कोटींचा निधी उपलब्ध आहे. त्या करिता त्यांनी एमएमआरडीएची जागा देखील मागितली आहे. मरीन ड्राईव्ह येथील तारापोर मत्स्यालयाबरोबर त्यांचा करार सुरु आहे. जगातून आणि भारतातून जे पर्यटक आपल्या मुंबई शहरामध्ये येतात त्यांच्याकरिता एक पर्यटक इमारत बांधण्यात यावी यासाठी शासनाकडून जागा देण्यात यावी व त्या इमारतीच्या बांधकामाकरिता पुरेशा निधीची उपलब्धता करुन देण्यात यावी एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभागाच्या बाब क्रमांक 5 व पृष्ठ क्रमांक 6 मध्ये मतदार यादीतील विशेष पुनर्निरीक्षणाच्या मानधनावरील खर्च भागविण्याकरिता तरतूद करणे या करिता 20 कोटींची पूरक मागणी करण्यात आली आहे.

सभापती महोदय, मतदार याद्यांच्या पुनर्निरीक्षणाचे काम करीत असतांना त्यामध्ये अनेक त्रुटी आढळून आल्या आहेत. निवडणुकीचे दिवस आल्यानंतर त्याबाबत वर्तमानपत्रामध्ये छापून येते. काही व्ही.आय.पी. किंवा नाटक, सिनेमातील सेलिब्रिटीज मतदार यादीत नाव नसल्यामुळे मला मतदान करता आले नाही असे चॅनेलवर सांगतात. त्याबाबत मला आलेला अनुभव असा आहे की, माझा घरचा पत्ता बदलण्याबाबत दादर येथील कार्यालयामध्ये जाऊन कागदपत्रे सादर केल्यानंतर सहा महिने होऊन गेले आहेत. त्याबाबत असे दिसून आले आहे की, नाव व पत्ता बदलणारे संगणकातील सॉफ्टवेअर अशाप्रकारचे करण्यात आले आहे की, आपण जर रस्त्याचे नाव बदलले तर संपूर्ण वॉर्ड बदलला जातो. याबाबत तेथील अधिकाऱ्यांशी मी चर्चा केली, जिल्हाधिकाऱ्यांना देखील जाऊन भेटलो. सदर सॉफ्टवेअर अपग्रेड करण्याची आज गरज आहे. आमच्या मनात शंका येते की, त्या सॉफ्टवेअरवर अधिकारी व कर्मचारी योग्य प्रकारे काम करीत नाहीत. परंतु प्रकार तसा नसून मी वेगवेगळया दोन-तीन केसेस पाहिल्या आहेत. उदा. माझे नाव एका वॉर्डमध्ये दाखविण्यात आले आहे तर मी आणि माझी पत्नी एकाच इमारतीत, एकाच घरात रहात असतांना तिचे दुसऱ्या वॉर्डामध्ये नाव दाखविण्यात आले आहे. त्याचप्रमाणे त्या माहितीमध्ये फोटो आणि इमारतीचे नाव सुध्दा वेगळे दाखविण्यात आले आहे. मी पूर्वी अंधेरीला रहात असतांना तेथील माझा क्रमांक आणि माहिती आणून दिल्यानंतर नवीन विभागाच्या यादीमध्ये आलेले क्रमांक हे टॅली होणे आवश्यक आहेत. निवडणुका जाहीर झाल्यानंतर मतदार यादी प्रसिध्द करण्यापूर्वी सॉफ्टवेअरमध्ये असलेली त्रुटी नाहीशी करुन ते अपग्रेड करण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, आपण कर्मचाऱ्यांवर वेगवेगळया पध्दतीने आरोप आणि प्रत्यारोप करीत असतो. परंतु त्याच्या खोलात जाऊन तपासले तर एकाच विभागात नाही तर अनेक विभागामध्ये अशाप्रकारच्या तक्रारी आपल्याला दिसून येत आहेत. लोकांचा मतदानाचा अधिकार प्रत्येकाला मिळाला पाहिजे या करिता तातडीने सॉफ्टवेअर अपग्रेड करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 5 आणि बाब क्र. 2 वर मुंबई, पुणे व नागपूर येथील माननीय राज्यपालांच्या निवासस्थानाची देखभाल, दुरुस्ती व सजावट करण्यासाठी 6 कोटी 80

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर....

लाखाची मागणी करण्यात आली आहे. राज्यात अनेक शासकीय निवासस्थाने आज दुरुस्तीला आलेली आहेत. माननीय राज्यपालांच्या निवासस्थानाबरोबर या शासकीय निवासस्थानांची सुध्दा देखभाल व दुरुस्ती करण्याची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे मुंबई व नागपूर येथील आमदार निवासस्थानांची सुध्दा डागडुजी करण्याची आवश्यकता आहे. मला वाटते की, मुंबईच्या मनोरा आमदार निवासस्थान इमारतीची सुध्दा तशीच परिस्थिती झाली आहे. त्या इमारतीची दुरुस्ती करण्याकरिता नवीन काहीतरी प्लॅन करण्यात येणार असल्याचे म्हटले जाते. तो नवीन प्लॅन करण्यापूर्वी त्या इमारतीमधील निवासस्थानांची सुध्दा देखभाल व दुरुस्ती करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, राज्य शासनाला दरवर्षी हजारो कोटी रुपयांचा महसूल मिळवून देणारी शहरातील उपनिबंधकांच्या कार्यालयांची अवस्था देखील बिकट आहे. त्या ठिकाणी सुविधांचा अभाव आहे, टॉयलेट स्वच्छ नाहीत, संगणकीकरण करण्यात आले आहे परंतु तेथील अे.सी. चालत नाहीत. लोकांच्या प्रॉपर्टीचे रजिस्ट्रेशन केल्यानंतर त्यामधून शासनाकडे निधी जमा करण्याचे काम ते करीत आहेत परंतु त्यांच्या कार्यालयांची अवस्था पाहिल्यानंतर ते आज कोणत्या परिस्थितीमध्ये काम करीत आहेत? उदा. कोल्हापूर येथील मुद्रांक शुल्क कार्यालय पहा, इचलकरंजी, शाहूवाडी, गगनबावडा, गडहिंग्लज ही कार्यालये भाडे तत्वावर घेण्यात आलेल्या इमारतीमध्ये सुरु आहेत. शासनाच्या तिजोरीमध्ये नेहमी महसूलाची भर घालणाऱ्या या कर्मचाऱ्यांना त्यांच्या कार्यालयामध्ये अतिरिक्त सुविधा देण्यासाठी आपण 6 कोटी 80 लाखाची मागणी करीत असतांना त्यामध्ये आणखी जास्तीची तरतूद करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, बाब क्र. 273 व पृष्ठ क्रमांक 320 मध्ये मराठी भाषा विभागासंबंधी मागणी करण्यात आली आहे. या ठिकाणी मराठी वाड़मयातील उत्कृष्ट साहित्य निर्मितीसाठी 41 लाख रुपयांची मागणी करण्यात आली आहे. माननीय ज्येष्ठसदस्य श्री. दिवाकर रावते साहेब ही रक्कम फार कमी असल्याचे आपण देखील सांगू शकाल.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखापाठी नाही

मराठी भाषा विभाग सक्षम करण्यात आल्यास तिकडे राजकारण करणाऱ्यांची तोंडे बंद होऊ शकतील असे मला वाटते. या संबंधी शासनाने 41 लक्ष रुपये खर्च जास्त केल्यास मराठी भाषा विभाग जास्त सक्षम होऊन त्याचा प्रचार व प्रसार वाढण्यास मदत होऊ शकेल.

सभापती महोदय, पान क्रमांक 15 वर गृह विभागाच्या बाब क्रमांक 16, 17 व 18 संबंधी मी माझे विचार व्यक्त करणार आहे. या बाबींच्या संदर्भात माननीय विरोधी पक्षनेते यांनी त्यांच्या भाषणात असा उल्लेख केला होता की, खबऱ्यांच्या तरतुदीसाठी 2 कोटी 10 लक्ष रुपयांची तरतूद केली आहे. खबऱ्यांची संख्या वाढ केल्यास त्यांच्याकडून पोलिसांना खबरी मिळण्यास मदत होते या बद्दल कोणाचेही दुमत नाही. लोकसंख्या तसेच पोलिसांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढत असल्यामुळे, खबऱ्यांची संख्या वाढवून त्यासाठी निधीत वाढ करणे आवश्यक आहे.

मी गृह विभागासंबंधी एक बाब आवर्जून सांगू इच्छितो की, पालघरच्या घटनेसंबधी अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्यात आली. त्याच प्रमाणे सायबर गुन्ह्यांच्या बाबतीत गृह विभागाकडून स्पष्टपणे सांगितले जात आहे की, केंद्र शासनाकडून हा कायदा तयार होणे आवश्यक आहे. सायबर प्रकरणातील गुन्हेगारांना चाप लावावयाचा असल्यास त्यासाठी कठोर शिक्षेची तरतूद करणे आवश्यक आहे.

असीम त्रिवेदी हा काही महान चित्रकार नाही. परंतु त्यांनी चित्रे काढून भारत मातेच्या प्रतिक असलेल्या "संसद" तसेच "अशोक स्तंभ" यांची विटंबना केली आहे. अशा परिस्थितीत असीम त्रिवेदी यांचा धिक्कार करण्याऐवजी तो स्वातंत्र्य अभिव्यक्ती होऊन, स्वातंत्र्य लढ्याचा एक शिलेदार झाला. असीम त्रिवेदींच्या संदर्भात मीडियाचा हात असेल, त्यात प्रिंट किंवा इलेक्ट्रॉनिक मीडिया असेल. संसेदला "कमोड" दाखविले गेले. अशा प्रकारच्या त्यांच्या विकृतीसाठी त्यांच्या विरुध्द कारवाई करण्यासाठी अधिकारी देखील धास्तावले आहेत. अधिकाऱ्यांना असे वाटते की, आम्ही त्यांच्या विरुध्द कारवाई केल्यानंतर आम्हाला काही त्रास होईल का ? या घटनेसारखा आपण पालघरच्या घटनेचा दुसरा प्रकार पाहिला. पालघर प्रकरणी चूक होऊन त्या संबंधी दोन मुलींना अटक करण्यात आली असावी.

मी सदनासमोर आणखी एक किस्सा सांगतो. एअर इंडियातील दोन कर्मचाऱ्यांनी दोन वर्षांपासून सातत्याने आपल्या फेस बुकवर देशातील कोणत्याही नेत्यांचे नाव सोडले नाही. ते जरुर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर...

एखाद्या पक्षासाठी काम करीत असतील. दोन वर्षांपासून त्यांच्याकडून या गोष्टी सातत्याने सुरु होत्या. या संदर्भात त्यांनी असे स्टेटमेंट केले होते की, "पार्लियामेंटरी यांना फक्त गोळ्या घालून चालणार नाही, त्यांना बॉम्बने उडविले पाहिजे." मी या प्रकरणाची फाईल घेऊन माननीय गृह मंत्र्यांची भेट घेतली होती. दोन वर्षांच्या कालावधीत त्यांनी आपल्या फेसबुकवर देशातील प्रत्येक मंत्र्यांची नावे घेऊन त्यांना कोणतीही शिवी देण्याचे सोडले नाही, मी त्या संबंधी सदनात उल्लेख करु शकत नाही. त्यांनी एकही शिवी सोडली नव्हती असा हा प्रकार होता. आपल्या कडे एका मंत्र्यांच्या मुलाने फक्त मीडियासाठी मधले बोट दाखविले असता त्यांना या संबंधी माफी मागावी लागली. आपल्या झेंड्यावर तशा प्रकारचे बोट दाखविण्यात आले, या नंतर त्या दोघांना अटक करण्यात आली, ते 14 दिवस जेलमध्ये राहिले. ज्यावेळी पालघर गुन्हा उघड झाला व दोन्ही अधिकाऱ्यांची बदली झाल्यानंतर एअर इंडियाच्या दोन्ही कर्मचाऱ्यांनी मीडियाला बरोबर घेऊन अशा प्रकारचे वातावरण तयार केले की, आमच्या विरुध्द ज्या अधिकाऱ्यांनी कारवाई केली आहे, त्या अधिकाऱ्यांविरुध्द देखील कारवाई झाली पाहिजे. मला असे वाटते की, सायबर गुन्ह्यांच्या बाबतीत शासनाने लक्ष न दिल्यास मानसिकता बदलत जाऊन "रोग" म्हणून ही बाब वाढतच जाईल. या रोगावर काही तरी उपाय करणे अत्यावश्यक आहे. आपण अभिव्यक्ती स्वातंत्र म्हणून थांबता कामा नये. या कायद्यात काही तरी सुधारणा करणे अत्यावश्यक आहे. या संबंधी सायबर गुन्हे पोलीस स्टेशन बांद्रा येथे आहे ते अधिक सक्षम करणे आवश्यक आहे.

सदनात माननीय मुख्यमंत्री उपस्थित आहेत. मी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती करतो की, सायबर गुन्ह्यातील आरोपींना आणखी कडक शासन होण्यासाठी आपण केंद्र शासनासमवेत बोलण्याची गरज आहे.

यानंतर श्री.मा.शिगम....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. किरण पावसकर...

असीम त्रिवेदी असेल किंवा त्याच्या सारखे आणखी लोक असतील, ही संख्या अशाच पध्दतीने वाढत जाईल आणि ही विकृती वाढल्यानंतर त्यावर बोलण्यात अर्थ राहाणार नाही.

पान क्रमांक 18, बाब क्रमांक 25. महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळांच्या बस स्थानकांच्या आधुनिकीकरणासाठी 7 कोटीची पूरक मागणी केलेली आहे. कोकणातील अनेक बसस्थानकांवर पाणी, स्वच्छता, प्रसाधनगृहे या गोष्टींची कमतरता दिसून येते. खासदार सुप्रियाताई सुळे आणि राज्याचे माननीय उपमुख्यमंत्री श्री अजितदादा पवार यांचे मी अभिनंदन करतो. बसस्थानकावर महिलांसाठी असलेली प्रसाधनगृहे आणि त्यांची अवस्था कशी असते हे प्रत्येकालाच माहीत आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या एका कार्यक्रमामध्ये या बसस्थानकावरील प्रसाधनगृहांच्या बाबतीत चर्चा करुन आमदारांनी आपल्या आमदार फंडातून 20 लाखापर्यंतचा निधी या बसस्थानकावरील प्रसाधनगृहे आणि सोईसुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी खर्च करावा असे राष्ट्रवादी पक्षाच्या आमदारांना सांगण्यात आले. ही बाब खरोखर अभिनंदनीय आहे. इतर पक्षाच्या ही बाब लक्षात आलेली नाही. सरकारकडून त्या कामासाठी निधी घेणे ही बाब वेगळी. परंतु आमदार फंडामध्ये उपलब्ध असलेल्या निधीतून बस स्थानकावरील प्रसाधनगृहे चांगली करण्यासाठी हा निधी वापरावा हे खासदार सुप्रियाताई सुळे आणि माननीय उपमुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांनी सांगितल्यामुळे मी त्यांचे अभिनंदन करतो आणि माझे भाषण संपवितो.

--

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन 2012-2013च्या पुरवणी मागण्यावरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

बाब क्रमांक 287, पान क्रमांक 245, उच्च व तंत्र शिक्षण विभाग. शिवाजी विद्यापीठाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त 50 कोटी रु. व विविध अभ्यास केन्द्रांसाठी 20 कोटी रु. असे एकूण 70 कोटी रुपये देण्याचे मान्य केलेले आहे. दिनांक 18 नोव्हेंबर 2012 रोजी हे सुवर्ण महोत्सवी वर्ष संपलेले आहे. याच वर्षात ही रक्कम प्राप्त झाली पाहिजे होती. या पुरवणी मागणीद्वारे फक्त 3 कोटी रुपयाची तरतूद केलेली आहे. मी या निमित्ताने विनंती करतो की शिवाजी विद्यापीठाचे जे 70 कोटी रुपयाचे देणे आहे ते देण्यासाठी केलेल्या तरतुदीमध्ये वाढ केली तर विद्यापीठाला दिलासा दिल्यासारखे होईल.

बाब क्रमांक 289, पान क्रमांक 245, मान्यताप्राप्त अशासकीय कला, विज्ञान, वाणिज्य व विधी महाविद्यालयांच्या शिक्षक व शिक्षकेतरांच्या वेतनावरील खर्चापोटी 200 कोटीची पूरक मागणी करण्यात आलेली आहे. ही तरतूद लक्षणीय स्वरुपाची आहे. यावरुन असे वाटते की, शासन कायम विनाअनुदानित तत्वावरील कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयांना अनुदानावर आणण्यासाठी तदर्थ तरतूद केली असावी. याबाबतीत खरे स्वरुप काय आहे ते नियोजनात स्पष्ट व्हावे.

बाब क्रमांक 291, पान क्रमांक 247, शासकीय तंत्र माध्यमिक शाळांसाठी प्रशासकीय खर्च भागविण्यासाठी दीड कोटी रुपयाची वाढीव तरतुदीची मागणी करण्यात आलेली आहे. यामध्ये वीज, दूरध्वनी, पाणी व कंत्राटी सेवांचा समावेश केलेला आहे. मात्र या तंत्र शाळांतील कार्यशाळा, प्रयोग शाळांतील साधनसामग्री कालबाह्य झालेली असून ती दुरुस्तीच्या पलीकडे गेलेली आहे. त्यासाठी तरतूद करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी तरतूद करता आली तर ती जरुर करावी.

बाब क्रमांक 297, पान क्रमांक 239, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या प्रशासकीय वाढीव खर्चापोटी 17 कोटी रुपयाची मागणी सादर झालेली आहे. वास्तविक पाहता आपण राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये दुसरी आणि तिसरी पाळी चालू केलेली आहे. कुशल कामगारांची संख्या वाढविण्यासाठी प्रवेशाची संख्या देखील दुप्पट केलेली आहे. त्यासाठी 1500 निरीक्षकांची नेमणूक निर्धारित केलेली असून प्रत्यक्षात 400 निरीक्षकांची नेमणूक केलेली असून त्यापैकी 200 निरीक्षकांची सेवा संपुष्टात आणलेली आहे. त्यांना पुन्हा सेवेत हजर करुन घेऊन 1500 निरीक्षकांच्या नेमणुका करणे आवश्यक आहे. कारण आता सेवेत असलेल्या सर्व निरीक्षकांवर कामाचा प्रचंड ताण वाढलेला आहे. त्यांनाही न्याय देण्याची गरज आहे.

...नंतर श्री. गिते...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखी नोंद

श्री.भगवान साळुंखे...

सभापती महोदय, खाजगी शिक्षण संस्थामार्फत औद्योगिक प्रशिक्षण संस्था मोठया प्रमाणात आहेत. त्यानाही शासनाने अनुदान देण्याचे मान्य केले आहे. यावेळी त्यासाठी तरतूद केली असती तर पुढील वर्षाच्या अर्थसंकल्पात शासनास वाढीव तरतूद करता आली असती. तरी देखील या संस्थांना अनुदान देण्यासाठी तरतूद करण्यात यावी अशा प्रकारची विनंती करतो आणि आपण मला बोलण्याची संधी उपलब्ध करुन दिली त्याबद्दल आभार मानतो आणि माझे मनोगत पूर्ण करतो.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, पान क्रमांक 158, बाब क्रमांक 180 ही अन्न व नागरी पुरवठा विभागाची आहे. या विषयाच्या बाबतीत मी माझे विचार प्रथम मांडणार आहे. अन्नधान्य साठविण्यासाठी गोडऊन्स बांधणे यासाठी शासनाने 25 हजार कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. गोडाऊन बांधकामावर एवढी प्रचंड तरतूद खर्च केली जात असतानाही अन्न व नागरी पुरवठा विभागाचे अन्नधान्य उघडयावर का राहते, ते पाण्याने भिजून खराब का होते, याचा खुलासा माननीय मंत्री महोदयांनी या निमित्ताने सभागृहात करावा अशी मी मागणी करते.

सभापती महोदय, मुंबई शहर हे कष्टकरी आणि गरिबांचे आहे असे मी मानते. या शहरात स्वस्त धान्य दुकानातील धान्य खाणारी लोकसंख्या मोठी आहे. आज रेशनिंग कार्यालयात गेलात तर तेथे दलालांचा सुळसुळाट झालेला आहे. रेशन कार्ड उपलब्ध करुन देण्यासाठी रेशनकार्ड धारकास तीन-तीन महिन्यांचा कालावधी रेशनिंग अधिकाऱ्यांकडून दिला जातो. रेशन कार्ड मिळाले तर रेशन दुकानावर धान्य मिळेल याची कोणालाही गॅरंटी नसते. मी मुंबईचे फुड आणि सिव्हील सप्लायचे प्रमुख कंट्रोलर ऑफ रेशनिंग यांच्या समवेत बैठक घेऊनही या विषयावर चर्चा केली. सचिव, अन्न व नागरी पुरवठा यांना देखील पत्र लिहिले. परंतु सचिव, अन्न व नागरी पुरवठा यांच्याकडून मला अजून पर्यंत उत्तर आलेले नाही. तसेच त्यांनी चर्चेला सुध्दा बोलाविले नाही. श्रीमंतांना जग ओळखत असते, परंतु ज्यांचे पोट रेशन दुकानावर अवलंबून आहे, त्या लोकांना रेशन दुकानावरील धान्यच खावे लागते. ही बाब कदाचित अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांना माहिती नसावी असे मला वाटते. सभापती महोदय, अन्न व नागरी पुरवठा हा माझा जिव्हाळयाचा विषय आहे. .

श्री.दिवाकर रावते : तुमच्या विभागातील रेशनिंग समितीवर तुम्हाला घेतलेले नाही काय ?

श्रीमती अलका देसाई : मला रेशनिंग कमिटीवर घेतलेले आहे. त्या समितीमध्ये सगळा आनंदच आहे. या गोष्टींमध्ये अन्न व नागरी पुरवठा विभागाचे सचिव लक्ष घालणार नसतील, माननीय मंत्री महोदय यामध्ये लक्ष घालणार नसतील, मुंबईचे कंट्रोलर ऑफ रेशनिंग यामध्ये लक्ष घालणार नसतील तर ही गोडाऊन्स कोणासाठी बांधावयाची व त्यासाठी एवढया मोठया रकमेची तरतूद कशासाठी करावयाची असा माझा मूळ प्रश्न आहे. या बाबतीत देखील माननीय अन्न व नागरी पुंरवठा मंत्र्यांनी खुलासा करावा.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई...

सभापती महोदय, रेशन दुकानांमध्ये गरीब लोक जातात, त्यांना रॉकेल मिळत नाही. रॉकेल मिळाले तर गहू मिळत नाही. गहू मिळाला तर तांदूळ मिळत नाही अशा प्रकारचे वातावरण मुंबई शहरात रेशनिंगच्या बाबतीत निर्माण झालेले आहे. गरिबांना दोन-दोन महिने तांदूळ मिळत नाही. पाच किलो तांदूळ मिळाला तर त्याची अंघोळ झाली असे मी म्हणेन. स्वस्त धान्य दुकानांची अशी अवस्था असेल तर गरिबांनी काय खावे ही देखील एक मोठी समस्या आहे.

सभापती महोदय, केंद्र शासन या संदर्भात सबसिडी देते. केंद्र शासनाकडून किती सबसिडी दिली जाते ही माहिती देण्याचे औदार्य विभागाच्या अधिकाऱ्यांकडून दाखविले जात नाही. मुंबई शहरात रेशनिंगची व्यवस्था बरोबर नाही या गोष्टीस कोण जबाबदार आहे? आमच्याकडून जी माहिती विचारली जाते, ती देण्यास अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांकडून शेंडी लावली जाते.

सभापती महोदय, मुंबईतील कांदिवली येथील रहिवाश्यांनी रेशनिंग मिळत नाही म्हणून मोठे जन आंदोलन केले. या बाबतीत मोठया प्रमाणात महिला रस्त्यावर उतरल्या. कधी कधी इलेक्ट्रॉनिक मीडिया चांगली बाब लोकांच्या निदर्शनास आणून कधी कधी अत्यंत वाईट दाखवत असतात हेही तितकेच खरे आहे. इलेक्ट्रॉनिक मिडियाने जन आंदोलनातील महिलांच्या मुलाखती घेतल्या, त्या सामान्य घरातील होत्या.

यानंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई .....

त्या काही हायफाय घरातील महिला नव्हत्या. त्यांनी सांगितले की, आम्हाला 2-2 महिने रेशन मिळत नाही. त्यामुळे शासनाने याबाबतीत जबाब देणे गरजेचे आहे.

मुंबई शहर हे जसे कष्टकऱ्यांचे आहे तसेच सोलापूर शहर सुध्दा बीडी कामगारांचे आहे. मी सोलापूरमधील काही लोकांच्या मुलाखती घेतल्या आहेत. सोलापूर जिल्हयामध्ये सुध्दा तीच अवस्था आहे. आपण केवळ गोडाऊन बांधूनच थांबणार आहात की, कष्टकऱ्यांना अन्नधान्य देणार आहात ? धान्य देणार असाल तर कधी देणार ? त्यामुळे यासंदर्भात कंट्रोलर ऑफ रेशनिंग अधिकारी तसेच विभागाच्या सेक्रेटरींना सुध्दा बोलावून समज देण्याची आवश्यकता आहे. एक आमदार या विषयाच्या संदर्भात तुम्हाला पत्र लिहितो, चर्चा करतो त्याबद्दल तुम्हाला काहीच वाटत नाही काय ? या शहराबद्दल तुमची जर एवढी अनास्था असेल तर आम्हाला पूर्वीचे शस्त्र बाहेर काढावे लागेल व आम्ही काय करु शकतो हे तुम्हाला भर रस्त्यात घेराव घालून दाखवून द्यावे लागेल आणि हा माझ्यासमोर शेवटचा पर्याय असेल हे मी येथे सांगू इच्छिते. मग म्हणू नका की, काँग्रेस पक्षात असून सुध्दा तुम्ही घेराव कसा घातला ? हे असे प्रकार यापुढे चालणार नाहीत. मी ज्या विचारामध्ये मोठी झाले, मी ज्या वातावरणात मोठी झाले ते वातावरण मला कधीही बदलू देणार नाही. आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानते व माझे दोन शब्द येथेच संपवते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) :सभापती महोदय, पान क्रमांक 5, बाब क्रमांक 2 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी मतदार यादीतील घोटाळयाची माहिती सांगितलेली आहे. त्यांनी जी परिस्थिती सांगितली तीच परिस्थिती माझ्याही बाबतीत आहे. पत्ता बदलल्याची माहिती दिल्यानंतर सुध्दा त्याची नोंद मतदार यादीमध्ये झालेली नाही.

सभापती महोदय, आधार कार्डच्या बाबतीत सुध्दा तशीच परिस्थिती आहे. आधार कार्डची मोहीम आपल्याला अजून मोठया प्रमाणात राबविण्याची आवश्यकता आहे. अनेक लोकांनी अजूनही आधार कार्ड काढलेले नाही. अनेक लोक आधार कार्डपासून वंचित आहेत. अनेक लोकांना आधार कार्डचे ज्ञान सुध्दा नाही.

सभापती महोदय, बाब क्रमांक 46, पान क्रमांक 34 वरील महसूल विभागावर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. रेती उत्खननाच्या संदर्भात या सभागृहात बऱ्याच वेळा चर्चा झालेली आहे. सक्शन पंप लावून रेती काढावी की, काढू नये ? वैतरणा विरार या भागातील तहसीलदार आपले म्हणणे अजून पर्यंत ऐकत नाहीत. त्या ठिकाणी अजूनही सर्रासपणे सक्शन पंप लावून रेती काढली जात आहे. जसे रेती काढण्याचे काम सुरु आहे तसे जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये मग ते वांद्रयाचे कार्यालय असो की, मुंबईचे कार्यालय असो. तेथे एस्कॅव्हेशनचा प्रचंड रेट चालू आहे. 5 हजार ते 50 हजार रुपये प्रत्येक परमिशनसाठी शिपाई घेत आहेत. कोण कोण पैसे घेत आहेत याची मी आपल्याला नावे सुध्दा देण्यास तयार आहे. एस्कॅव्हेशनसाठी वरचे अधिकारी पैसे घेत नाहीत परंतु खालचा जो वर्ग आहे, जो नकाशा तयार करतो, किती घनमिटर उत्खनन करावयाचे आहे ते सांगतो, किंवा किती पैसे भरावयाचे आहे याचे बिल काढतो ते लोक पैसे घेत आहेत. पैसे भरण्यासाठी तहसीलदार कार्यालयात गेलो तर तिकडेही पैसे मागितले जातात. अशा प्रकारचा भ्रष्टाचार महसूल विभागात मोठया प्रमाणात सुरु आहे. माननीय मंत्री महोदय या ठिकाणी उपस्थित आहेत त्यामुळे त्यांनी या बाबीकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, पान क्रमांक 6, बाब क्रमांक 5 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. हा विषय माननीय मुख्यमंत्र्यांचा आहे. आम्हाला अशी माहिती मिळाली होती की, एमएमआरडीएच्या संदर्भात श्वेत पत्रिका काढली जाणार आहे. एमएमआरडीएवरील श्वेत पत्रिका कधी काढली जाईल याची माहिती नाही. परंतु यासंदर्भात श्वेत पत्रिका काढली जाणार असेल तर त्याची माहिती सभागृहाला मिळण्याची आवश्यकता आहे. ..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत.....

सभापती महोदय, स्कायवॉक हा मोठा संशोधनाचा विषय आहे. स्कायवॉकचा उपयोग किती लोक करतात व त्यावर किती कोटी रुपये खर्च झाले आहेत याची माहिती मिळण्याची आवश्यकता आहे. बांद्रा स्कायवॉकमध्ये प्रचंड घोटाळा झालेला आहे. हा स्कायवॉक आज निरुपयोगी ठरलेला आहे. या स्कायवॉकचा उपयोग लोक करीत नसून लोक रस्त्यानेच जातात व ट्रॅफिकची अडवणूक करतात त्यामुळे याबाबतीत चौकशी होण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री. ओटवणेकर .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

सभापती महोदय, मी गृह विभागाच्या बाब क्र.25 बोलणार आहे. आपल्या परवानगीने इंग्रजी वृत्तपत्रामध्ये आलेली बातमी वाचून दाखविणार आहे. आता सभागृहात गृह खात्याचे मंत्री उपस्थित नाहीत. हा विषय महत्वाचा आहे. 15 डिसेंबरच्या इंग्रजी वर्तमानपत्रात म्हटले आहे की, "Four terrorists entered India, through Sea." मग हा किनारा मुंबईचा होता की, गुजरातचा होता हा भाग वेगळा. चार अतिरेकी भारतात शिरले होते. आपण नेहमी कोस्टल सिक्युरिटीचा विचार करतो. त्यांनी म्हटले आहे की मंजूर मनुष्यबळ 2625 आहे. आज यलो गेट भागामध्ये किती शॉर्ट फॉल्स आहेत ? आज 600 लोकांचा शॉर्ट फॉल्स आहे. 67 सब इन्स्पेक्टर सँक्शन्स झालेले आहेत. पण ही सर्व पदे रिक्त आहेत. येलो गेटमध्ये 57 सब इन्स्पेक्टर्स पाहिजे होते त्यापैकी फक्त 4 तेथे आहेत. यातील अनेक अधिकारी हे शारीरिक दृष्ट्या अपात्र आहेत. मुंबईच्या कोस्टल झोन मध्ये 27 पोलीस ठाणी पाहिजे होती. शिवाजी नगर, गोंवंडी, ट्रॉम्बे, धारावी, अशा अनेक ठिकाणी कोस्टल पोलीस ठाणी आवश्यक होती. पण येथे एकही सागरी पोलीस ठाणे नाही. भाऊच्या धक्क्यावर, बधवार पार्कवर सागरी पोलीस ठाणे पाहिजे होते. एवढेच नव्हे तर मॉक ड्रिलची अपेक्षा होती, असे अहवालात म्हटले होते. पण मॉक ड्रिल देखील झाले नाही. याबाबत राज्य शासनाकडून निवेदन होणे अपेक्षित होते. सभागृह सुरू आहे. पण दुर्दैवाने यावर कोणतेही निवेदन झालेले नाही. माझी आपल्याला विनंती आहे की, लोकांना जागृत करून यातील खरी परिस्थिती काय आहे हे कळले पाहिजे. हा जो सल्ला आहे तो बरोबर आहे किंवा नाही याबाबत लोकांना ज्ञात करावे.

विनयभंग, बलात्कार, छेडछाड यांचे प्रकार आता वाढत चालले आहेत. स्त्रियांच्या छेडछाडीसंबंधात एक वेगळा कायदा अस्तित्त्वात आला पाहिजे. अंध, अपंग मुलीवर बलात्कार केला तर त्याला वेगळा मापदंड लावण्याची आवश्यकता आहे. आखाती देशामध्ये संबंधित माणसाला नपुंसक करतात तशा प्रकारच्या कायद्याची आज येथे गरज आहे, तरच बलात्कार करणाऱ्याला भीती वाटेल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

सभापती महोदय, मी आदिवासी विभागाच्या बाब क्रमांक 262 वर बोलणार आहे. विक्रमगड आयटीआय मध्ये साहित्य साधनांच्या खरेदीमध्ये 68 लाखाचा भ्रष्टाचार झाल्याची स्ट्रीप कालपासून ABP माझा ही वाहिनी सतत दाखवत आहे. मी त्या आयटीआयला भेट दिलेली आहे. तेथे उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे तंत्र निकेतन आहे. त्या तंत्र निकेतनामध्ये काहीही नाही. ते तंत्रनिकेतन आदिवासी विद्यार्थ्यांसाठी आहे. विक्रमगड, मोखाडा, जव्हार येथील एकही आदिवासी तेथे नाही. खरे म्हणजे तेथे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री व आदिवासी मंत्री यांनी भेट दिली पाहिजे. हा प्रश्न माननीय मंत्री श्री.गावित यांच्या भागातील आहे. तो त्यांना माहीत आहे. आज शिक्षक नाही, संगणक नाही. पण तेथे आय.टी.सेक्शन आहे. या आयटीआयमध्ये खरोखर भ्रष्टाचार झाला आहे काय, याचा खुलासा शासनाने करावा.

सभापती महोदय, आदिवासी विभागामध्ये सहा हजार कोटींचा भ्रष्टाचार झाला असल्याचे निवेदन आम्ही राज्यपाल महोदयांना दिले होते. आम्ही माननीय राज्यपाल महोदयांकडे जी काही मागणी केली होती त्याचे अजूनही उत्तर आम्हाला मिळालेले नाही. या विभागामध्ये खरोखर सहा हजार कोटींचा भ्रष्टाचार आहे काय ? यात काय काय आहे ? यात मॅटस् आहेत, लिक्विड प्रोटीन आहे. मी येथे फक्त एकच मुद्दा मांडणार आहे.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.....

सभापती महोदय, काही वर्षापूर्वी लिक्विड प्रोटीनचा विषय या सभागृहात गाजला होता. त्यावेळी श्री.हर्षवर्धन पाटील हे महिला व बाल कल्याण विभागाचे मंत्री होते. त्या लिक्विड प्रोटीनची कधी एफडीआयकडे तपासणी केली आहे काय ? लिक्विड प्रोटीनमध्ये किती प्रोटीन आहेत याची आपणास माहिती आहे काय ? शिक्षण विभाग, आदिवासी विभाग, सामाजिक न्याय विभाग आणि महिला व बाल कल्याण विभाग या चार विभागांमार्फत लिक्विड प्रोटीनची खरेदी करण्यात येते. परंतु या लिक्विड प्रोटीनेमध्ये खरोखरच प्रोटीन असते काय ? हे लिक्विड प्रोटीन बालकांना पाजून त्यांचे प्रोटीन वाढेल, त्यांचा उष्मांक वाढेल अशी आपण येथे घोषणा करतो. परंतु तसे काही होत नाही तेव्हा या गोष्टीची चौकशी होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, जे.जे.रुग्णालयासाठी 600 कोटी रुपये देण्यात आले. नागपूरच्या मेयो रुग्णालयाची आज काय अवस्था आहे. मेयो रुग्णालयाच्या संदर्भात आपल्या दालनात देखील बैठक झाली होती. त्या मेयो रुग्णालयातील लेडीज हॉस्टेल सोडल्यास एक पैसाही खर्च करण्यात आलेला नाही. अजूनही ते ट्रायपार्टी ॲग्रीमेंट आहे. पर्यायी जागा देण्याबाबत कोणत्याही प्रकारची सुस्पष्टता नाही.

सभापती महोदय, मुंबईतील जे.जे. रुग्णालयामध्ये सिध्दीकी नावाचे युरॉलॉजी डॉक्टर आहेत. त्यांच्यावर ॲसीबीची चौकशी सुरु आहे. त्यांनी 100 व्हॅटचे लेझर मशीन खरेदी करण्याऐवजी 50 व्हॅटचे खरेदी केले. 50 व्हॅटचे लेझर मशीन असेल तर त्यातून फक्त किडनी स्टोन कट होतो. परंतु 100 व्हॅटचे खरेदी केले असते तर प्रोस्टेड आणि किडनी या दोघांवर ते काम करु शकते. तेव्हा डॉ.सिध्दीकी यांनी 100 व्हॅटचे लेझर मशीनची खरेदी का केली नाही याची चौकशी झाली पाहिजे.

सभापती महोदय, रबर ग्लोव्हज दरपत्रकाप्रमाणे खरेदी करण्यात येत नाही. रबर ग्लोव्हज ज्या चार कंपन्यांकडून खरेदी करण्यात येते होते त्या चार कंपन्यांना ब्लॅकलिस्ट करण्यात आलले आहे. परंतु जी कंपनी पात्र होती पण त्या कंपनीने व्हॅट भरला नाही म्हणून त्या कंपनीला बाद करुन ब्लॅकलिस्ट केलेल्या चार कंपन्यांना पुन्हा रेसमध्ये आणून त्यांना ठेका दिलेला आहे. तेव्हा याची चौकशी करावी अशी विनंती करुन मी माझे भाषण पूर्ण करतो.

------ ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापती स्थानी तालिका सभापती श्री.जयवंतराव जाधव)

श्री.प्रकाश बिनसाळे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 15 , बाब क्रमांक 16, गृह विभाग, या ठिकाणी अनेकवेळा गृह विभागावर चर्चा झालेली आहे. त्या चर्चेच्या दरम्यान गुप्तवार्ता विभागावर चर्चा झालेली आहे. आपणास खबऱ्यांचे नेटवर्क अधिक मजबूत केले पाहिजे आणि त्यातून जी माहिती मिळेल ज्या आधारे कारवाई करावी अशाप्रकारची मागणी देखील या ठिकाणी सातत्याने करण्यात आलेली आहे. त्या मागणीच्या अनुषंगाने गृह विभागाने एक चांगला निर्णय घेतलेला आहे. परंतु त्यावर माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी टीका केलेली आहे. एखादा निर्णय चुकला किंवा जी माहिती प्राप्त झाली आणि त्यावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही झाली नाही तर याचा अर्थ ती सिस्टीम खराब आहे असा होत नाही. काही अधिकारी चुकीचे वागत असतील तर त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई केली पाहिजे. परंतु शासन जे काही निर्णय घेते ते मागणीच्या अनुषंगाने घेते. सभागृहात ज्या चर्चा होतात त्या अनुषंगाने घेत. या निर्णयाचे आपण स्वागत केले पाहिजे. माझी या निमित्ताने सूचना आहे की, खबऱ्यांचे नेटवर्क पोलीस स्टेशनमध्ये न ठेवता त्याचे एकाच ठिकाणी सेन्ट्रलायझेशन झाले पाहिजे.

यानंतर श्री.सरफरे..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे...

वेगवेगळया ठिकाणाहून ज्या बातम्या येतात त्या एकाच ठिकाणी आल्या पाहिजेत आणि त्यांचे पृथक्करण करुन पुढील कारवाई केली पाहिजे. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितल्याप्रमाणे पोलीस खात्याला एखादी खबर मिळाल्यानंतर त्यावर कारवाई करण्यासाठी सेट्रलाईज मॉनिटरींग सिस्टीम निर्माण करणारी यंत्रणा पोलीस हेडक्वॉर्टरमध्ये केली तर त्यामुळे मुंबई शहर आणि राज्यामध्ये घडत असलेल्या घटनांना पायबंद घालणे सोपे होईल असे मला वाटते.

सभापती महोदय, बाब क्रमांक 29 आणि पृष्ठ क्रमांक 19 मध्ये सागर धूप प्रतिबंधक बंधारे बांधण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. मुंबई शहरामध्ये आणि शहरालगत रायगड आणि अलिबाग तालुक्यांमध्ये अनेक सागरी बंधाऱ्यांची कामे धीम्या गतीने होत आहेत. त्यांचे बांधकाम तुकडया-तुकडयांनी केले जात आहे. मुंबईमध्ये धूप प्रतिबंधक बंधारे बांधण्यात आले आहेत. त्यामध्ये वरळीच्या काही भागात बंधारे बांधल्यानंतर नेपीयन्सी रोडच्या भागात बंधारे बांधून मधला भाग तसाच रिकामा ठेवला जातो. म्हणजे अर्धा कि.मी. मध्ये बांधकाम केल्यानंतर 1 कि.मी. अंतरामध्ये काहीच बांधकाम नसते त्यानंतर पुन्हा अर्धा कि.मी. बांधकाम करुन पुढील 1कि.मी. चा भाग तसाच मोकळा सोडला जातो. तसे न करता एक टोक घेऊन दुसऱ्या टोकापर्यंत एकाच स्ट्रेचमध्ये पूर्णपणे बंधारे बांधले तर त्यामधून धूप थांबण्यास मदत होईल. त्यामुळे या कामाचे आपण नियोजन करीत असतांना त्यामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. तसेच आपण हे काम हातात घेतल्यानंतर ते पूर्ण केले पाहिजे अशी मी सूचना करु इच्छितो. अशाप्रकारे अर्धवट स्वरुपात बंधारे बांधण्यात आले आहेत त्या ठिकाणी अग्रक्रमाने बंधारे बांधण्याची कामे हाती घेऊन ती पूर्ण केली तर कमीत कमी एक तरी काम पूर्ण केल्याचा फायदा त्या भागातील नागरिकांना निश्चितपणे होईल.

सभापती महोदय, बाब क्रमांक 88 व पृष्ठ क्रमांक 77 मध्ये मुंबईतील इमारत दुरुस्ती व पुर्नबांधणी संबंधी मागणी करण्यात आली आहे. माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी त्यासंबंधी या ठिकाणी उल्लेख केला आहे. शहरामध्ये जुन्या झालेल्या इमारतींना हेरिटेज इमारती म्हणून समजले जाते त्यांच्या दुरुस्ती करिता 15 कोटींची तरतूद करण्यात आली आहे. या हेरिटेज इमारतीमध्ये मुंबईच्या मॅजेस्टिक आमदार निवास या इमारतीचा समावेश असण्याची शक्यता आहे. त्याचप्रमाणे ओल्ड कस्टम हाऊसच्या इमारतींचा समावेश असल्याची चर्चा ऐकायला मिळते. त्या ठिकाणी मुद्रांक शुल्क कार्यालय असून त्या कार्यालयामध्ये रोज लाखो लोक मुद्रांक शुल्क

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे....

भरण्यासाठी येतात. त्या कार्यालयामधून शासनाला रोज कोटयवधी रुपयांचा महसूल मिळतो. एखादा मोठा फ्लॅट रजिस्टर करावयाचा असेल तर त्यासाठी 25 ते 50 लाख रुपयापर्यंत स्टॅम्प डयुटी भरण्यासाठी लोक येतात. परंतु त्या लोकांना बसण्याकरिता शेड बांधण्यात आलेली नाही त्यामुळे त्यांना उन्हामध्ये उभे रहावे लागते, स्वच्छ शौचालयाची व्यवस्था करण्यात आलेली नाही. या कामांची सांगड दुरुस्तीच्या कामांशी घालू नये असे मला सुचवावयाचे आहे. या तातडीच्या गरजा समजून त्या लवकरात लवकर पूर्ण करणे अत्यंत आवश्यक आहे.

सभापती महोदय, बंदर खात्यासंबंधी आणखी एक मुद्दा मला याठिकाणी मांडावयाचा असून तो सागर धूप प्रतिबंधक बंधाऱ्याच्या पूरक मागणीशी संबंधित आहे. ज्यावेळी मांडवा येथील जेटीचे उदघाटन करण्यासाठी माननीय मंत्री श्री. नारायण राणे साहेब त्या ठिकाणी गेले होते. त्यावेळी मी देखील त्यांच्याबरोबर होतो. त्या जेटीमधून उतरतांना अनेक प्रकारच्या अडचणींना सामोरे जावे लागते. विशेषत: स्त्रियांना आणि वृध्दांना धक्क्यावरुन उतरणे आणि चढणे अतिशय क्लिष्ट व धोकादायक आहे. त्या ठिकाणी अनेक वृध्द पाण्यामध्ये पडल्याच्या, त्यांचे सामान पाण्यामध्ये पडल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. ज्या नवीन जेटी बांधण्यात आल्या आहेत त्यामध्ये अनेक प्रकारच्या त्रुटी आहेत. एखादी लहान बोट त्या धक्क्याला लावावयाची असेल तर ती निश्चितपणे त्या धक्क्याला आपटते.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे . . . .

अशा पध्दतीने त्यामध्ये दोष आहेत ते लवकरात लवकर काढणे गरजेचे आहे. त्यावेळी माननीय मंत्री महोदयांनी तेथेच संबंधितांना सांगितले की, याठिकाणी ज्या काही अडचणी आहेत त्या दूर केल्या पाहिजेत. यासाठी फ्लोटींगची जे.टी.ची सिस्टीम असते, ती सिस्टीम लावण्याच्या बाबतीत माननीय मंत्री महोदयांनी आदेश दिले आहेत. परंतु त्याची अंमलबजावणी झाल्याचे कुठे दिसत नाही. तसेच पुरवणी मागण्यांमध्येही त्याचा कुठे उल्लेख नाही. मागच्या सिझनमध्ये झालेली ही घटना आहे. एक सिझन संपून दुसरा सिझनही संपत आला आहे. याबाबतीत जर तातडीने उपाय योजना केली तर बरे होईल. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

---

3 डब्ल्यू-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: सांगली जिल्ह्यातील सागरेश्वर अभयारण्याचे
नाव बदलण्याबाबत.

मु.शी.: सांगली जिल्ह्यातील सागरेश्वर अभयारण्याचे
नाव बदलण्याबाबत माननीय वने मंत्र्यांचे निवेदन

डॉ.पतंगराव कदम (वने मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

. . . .3 डब्ल्यू-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: सन 2012-2013 च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा

(चर्चा पुढे सुरु)

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, याठिकाणी ज्या पुरवणी मागण्या मांडण्यात आल्या आहेत त्याबाबत मी माझे विचार मांडण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय,मी नगरविकास विभाग पान क्र.62,63 बाब क्र. 80,81,82,83 बाबत बोलणार आहे. याठिकाणी नगरपालिका व महानगरपालिकांचे सक्षमीकरण करण्यासाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे. परंतु नगरपालिकांच्या, नगरपरिषदांच्या, महानगरपालिकांच्या ज्या माध्यमिक शाळा आहेत त्यांच्यासाठी वेतन आयोगाच्या संदर्भात शासनाने अद्यापही कोणताही निर्णय घेतलेला नाही. राज्यातील सर्व विभागाला म्हणजे प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, तसेच नगरपालिकांचा, महानगरपालिकांचा प्राथमिक विभाग याबाबत सांगावयाचे तर खरे म्हणजे ज्यांना पाचवा वेतन आयोग लागू होता, त्या सगळयांना सहावा वेतन आयोग लागू करण्याच्या बाबतीत शासनाने धोरणात्मक निर्णय घेतलेला असताना ज्या माध्यमिक शाळा आहेत त्यांना अद्यापही जुन्या वेतनश्रेणी प्रमाणेच वेतन मिळते. मी याबाबत शासनाबरोबर 16 वेळा चर्चा केली आहे, पत्रे दिली आहेत. मागच्या अधिवेशनामध्ये पुरवणी मागण्यांवर चर्चा करताना, बजेटवर चर्चा करताना देखील उल्लेख केला आहे. त्यावेळी सन्माननीय मंत्री श्री.भास्करराव जाधवसाहेब यांनी देखील मला आश्वासन दिले होते की, हा विषय मार्गी लावण्यात येईल. पण नगरविकास विभागाचे म्हणणे आहे की, याबाबत शालेय शिक्षण विभागाने जी.आर.काढावा. शालेय शिक्षण विभागाचे म्हणणे आहे की, नगरविकास विभागाने जी.आर.काढावा. अशा प्रकारे या दोघांच्या वादामध्ये हा विषय प्रलंबित राहिला आहे. याबाबत शासनाने तातडीने निर्णय घ्यावा.

सभापती महोदय, बाब क्र.320-321 बाबत सांगावयाचे तर मराठी भाषेबाबत अनेक सन्माननीय सदस्यांनी चर्चा केलेली आहे. मराठी भाषेला प्रोत्साहन देण्यासाठी सीमा भागाकरता देखील निधीची तरतूद करण्यात आली आहे. राज्य शासनाने मराठी विभाग सुरु केलेला आहे. त्याचे सक्षमीकरण करण्यासाठी, तो बळकट करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. तसेच यासाठी लागणाऱ्या निधीची, जागेची आवश्यकता आहे. तसेच यासाठी अधिकाऱ्यांची, कर्मचाऱ्यांची नियुक्ती होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, बाब क्र.180, पान क्र.159 अन्न व नागरी पुरवठा विभागाबाबत सांगावयाचे तर उल्हासनगर हे महानगरपालिका क्षेत्र आहे. तेथे पाच विभाग आहेत. त्याठिकाणी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

एक,दोन व तीन साठी एक विभाग आहे आणि चार व पाच साठी वेगळे कार्यालय आहे. याठिकाणी शासनाची फार मोठ्या प्रमाणात जागा उपलब्ध असताना त्याचा सदुपयोग केला जात नाही. मध्यंतरी या जागेच्या विकासासाठी शासनाने काही निधी देखील मंजूर केला आहे. परंतु अद्यापही सार्वजनिक बांधकाम विभागाकडून त्या निधीचा उपयोग करण्यात आलेला नाही.

यानंतर श्री.बरवड . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ....

त्या कार्यालयाची दुरुस्ती झाली नाही. त्या कार्यालयाची दुरुस्ती हा एक भाग आहे. त्या कार्यालयाची दुरवस्था झालेली आहे. त्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही. लोकांना उन्हामध्ये उभे राहावे लागते. लोकांना उभे राहण्यास जागा नाही. दररोज साधारणत: 150 ते 200 नागरिक त्या कार्यालयामध्ये येत असतात. त्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची सुध्दा व्यवस्था नाही, स्वच्छतागृहाची व्यवस्था नाही. त्या कार्यालयामध्ये बसण्याची व्यवस्था नाही. त्या ठिकाणी आमच्या दक्षता समितीच्या बैठका होतात. गोठ्यामध्ये तरी चांगली जागा असते अशा प्रकारची वाईट अवस्था आहे. त्या ठिकाणी दोन आमदार येऊन बसतात आणि बैठक घेतात. त्या ठिकाणी अत्यंत दयनीय अवस्था झालेली आहे.या संदर्भामध्ये तातडीने सुधारणा करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, यानंतर मी आदिवासी विकास विभागाच्या पृष्ठ क्रमांक 230 वरील बाब क्रमांक 260, 261 आणि 262 च्या बाबतीत बोलणार आहे. आदिवासी विकास विभागाकडून ज्या शाळांना अनुदान मिळते ते अनुदान आदिवासी विकास विभागाने वेगवेगळ्या प्रकारच्या अटी लादल्यामुळे, अनावश्यक पूर्तता करण्याचे आदेश दिल्यामुळे अनेक शाळा आज आदिवासी विभागामध्ये कार्यरत असूनही अनुदानापासून वंचित आहेत. खरे म्हणजे विद्यार्थी संख्येच्या बाबतीत शालेय शिक्षण विभाग तपासणी करते. ती शाळा किंवा त्या शाळेतील काही तुकड्या अनुदानास पात्र आहेत की नाही हे शालेय शिक्षण विभाग ठरविते. निकषानुसार पात्र असेल तर ते तसे घोषित करतात आणि शासनाकडे प्रस्ताव पाठवितात. त्याला शासनाकडून मान्यता मिळते. त्यानंतर पुन्हा आदिवासी विभागाकडून वेगवेगळ्या प्रकारच्या अटी लादल्या जातात. मुलांचे फोटो पाहिजेत, त्यांचा उत्पन्नाचा दाखला पाहिजे, रेशन कार्डची झेरॉक्स पाहिजे इतकेच नव्हे तर त्या आदिवासी शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या हाताच्या बोटांचे ठसे जर मंत्रालयामध्ये पोहोचले तरच त्या शाळेला अनुदान मिळेल असा एक विचित्र प्रकार या ठिकाणी सुरु आहे. त्यामुळे तुकड्यांना अनुदान मिळत नाही. अनुदानास पात्र असल्याबद्दल शासनाने मंजुरी दिलेली आहे तरी सुध्दा आदिवासी विकास विभागाच्या या जाचक अटींमुळे त्या शाळेला अनुदान मिळत नाही किंवा त्या शाळेतील तुकड्यांना अनुदान मिळत नाही. आदरणीय मंत्री महोदयांनी या संदर्भामध्ये दखल घेण्याची आवश्यकता आहे.

माननीय मंत्री श्री. बबनराव पाचपुते साहेबांनी मागच्या अधिवेशनामध्ये आश्वासन देताना सांगितले होते की, शिक्षक वेळेवर येतात की नाही याची एकदा आम्हाला इलेक्ट्रॉनिक माध्यमातून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते .....

व्यवस्था करु द्या. आता आपल्याकडे ती व्यवस्था झालेली आहे. त्यामुळे माननीय मंत्री महोदयांनी वेळ बदलण्याच्या संदर्भात जे आश्वासन दिले होते त्याप्रमाणे वेळेमध्ये नक्की बदल करावा. साधारणपणे एक तासाचा जरी फरक केला तरी आपण दिलेले जे आश्वासन आहे त्याची पूर्तता होईल. आमची मागणी 11.00 वाजताची वेळ ठेवावी अशी आहे. आपण 11.00 वाजता ठेऊ नका. पण शाळा किमान 10.00 वाजता तरी सुरु करावी. शाळेच्या वेळेमध्ये बदल करण्याची अनेक वर्षापासूनची मागणी आहे त्याचा विचार करावा.

सभापती महोदय, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या पृष्ठ क्रमांक 245 ते 251 वरील बाब क्रमांक 287 ते 301 संदर्भात मी बोलणार आहे. उच्च व तंत्रशिक्षण विभागाने अनेक महाविद्यालयांना आणि महाविद्यालयातील तुकड्यांना अनुदानास पात्र ठरविले. 25 टक्के, 75 टक्के, 100 टक्के अनुदानास पात्र झाल्याचे घोषित केले पण गेल्या 7 वर्षामध्ये त्या महाविद्यालयांना एक नया पैसाही मिळालेला नाही. 100 टक्के अनुदानास पात्र, अनुदान मंजूर झालेले आहे पण या महाविद्यालयांना एक नया पैसाही मिळत नाही. त्यामुळे शासनाने त्या संदर्भात तातडीने दखल घ्यावी.

सभापती महोदय, विक्रमगड हा आदिवासी भाग आहे. उच्च माध्यमिक शिक्षणाच्या संदर्भात विक्रमगड तालुक्यामध्ये औंदे या ठिकाणी आदिवासी विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी एक अत्यंत चांगले महाविद्यालय सुरु झाले. परंतु संस्था चालकांनी अत्यंत अयोग्य पध्दतीने, गैरमार्गाने हे महाविद्यालय सुरु ठेवलेले आहे. त्या ठिकाणी अनेक भानगडी आहेत, गैरप्रकार आहेत, गैरव्यवहार आहेत. ते महाविद्यालय बंद पडण्याच्या मार्गावर आहे. त्या आदिवासी भागातील विद्यार्थ्यांची उच्च शिक्षणाची गैरसोय होऊ नये म्हणून त्याची चौकेशी झाली. त्याचा अहवाल विद्यापीठाकडे आहे. शासन सुध्दा हे महाविद्यालय बंद करण्याच्या तयारीत आहे. शासनाची तशी मानसिकता झालेली आहे. पण असे न करता, त्या आदिवासी विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणापासून वंचित न ठेवता ते महाविद्यालय दुसऱ्या संस्थेला द्यावे. ते 100 टक्के अनुदानित महाविद्यालय आहे. त्या ठिकाणी जर गैरप्रकार होत असतील तर दुसऱ्या चांगल्या संस्थेला ते महाविद्यालय देऊन या आदिवासी विद्यार्थ्यांची उच्च शिक्षणाची गैरसोय होऊ देऊ नका. पण त्या बाबतीत शासनाने तातडीने निर्णय घ्यावयास पाहिजे. जर हे महाविद्यालय खरोखर योग्य त्या पध्दतीने चालवित नसतील तर त्याची पर्यायी व्यवस्था होण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते...

सभापती महोदय, मी शेवटचा मुद्दा मांडतो. शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांना पूर्वी 180 दिवसाचे अर्जित रजेचे रोखीकरण मिळत होते. ते नंतर 240 दिवसांचे करण्यात आले. आता ही मर्यादा 300 दिवसापर्यंत वाढविण्यात आली. तंत्र आणि उच्च शिक्षण विभागाचे म्हणणे असे की, हा वित्त विभागाचा आदेश आम्हाला लागू नाही. माहितीच्या अधिकारामध्ये त्यांनी मला अशी माहिती दिली की, अशा प्रकारचा आदेश उच्च आणि तंत्र शिक्षण विभागाकडे नसल्यामुळे हा आदेश आम्हाला बंधनकारक नाही. परिणामी सेवानिवृत्त होणा-या शिक्षकेतर कर्मचा-यांना फक्त 240 दिवसांचे रोखीकरण मिळते. त्यांना 300 दिवसांचे रोखीकरण मिळत नाही. अन्य सर्व विभागामध्ये 300 दिवसांचे रोखीकरण मिळते. शासन निर्णय सर्व विभागांना लागू आहे. तेव्हा याबाबतीत निर्णय होण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, तंत्र माध्यमिक शाळांमध्ये जे कर्मचारी अतिरिक्त झालेले आहेत त्यांना पदावनत करण्यात येत आहे. लिपिकाचे पद अतिरिक्त ठरले तर त्या पदावर जो माणूस काम करीत होता त्याला कृपा करुन पदावनत करु नका. लिपिकाचे ते पद अतिरिक्त ठरत असेल तर ते पद नव्याने भरण्यास परवानगी देऊ नका. परंतु त्या कर्मचा-याला चतुर्थश्रेणी कर्मचारी, शिपाई पदावर पदावनत करु नका. म्हणजे जो लिपिकाचे काम करीत होता तो उद्या झाडू मारण्याचे, घंटा वाजविण्याचे, प्रसाधनगृहे स्वच्छ करण्याचे काम करणार असेल तर ते योग्य होणार नाही. अतिरिक्त शिक्षकाला निवृत्त होईपर्यन्त त्या पदावर राहू द्यावे. तो निवृत्त झाल्यानंतर ते पद भरण्यास परवानगी देऊ नका. परंतु आता या अतिरिक्त कर्मचा-यांना पदावनत करु नका, त्यांना निम्न वेतनश्रेणीमध्ये आणू नका अशी विनंती मी उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री महोदयांना करतो. सभापती महोदय, आपण मला बोलण्यासाठी परवानगी दिली त्याबद्दल आपले आभार मानून मी माझे भाषण संपवितो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोहन जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2012-2013च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये सहभागी होण्यासाठी मी उभा आहे.

वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, बाब क्रमांक 254, पुणे शहरातील ससून रुग्णालयात यंत्रसामग्री खरेदी करण्यासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा अशी मी मागणी करीत आहे.

नियोजन विभाग, बाब क्रमांक 41, पुणे जिल्ह्यातील दलित वस्त्यांसाठी इंदिरा आवास योजनेसाठी निधीची तरतूद करण्यात आलेली नाही. ही तरतूद करण्यात यावी.

बाब क्रमांक 185, पान क्रमांक 166. विशेष मागासप्रवर्ग विद्यार्थ्यांसाठी मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीसाठी अतिरिक्त तरतूद करण्यात आलेली आहे. ही मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती मागील दोन वर्षापासून प्रलंबित असून शिष्यवृत्तीसाठीचे अनुदान वाढविण्यात यावे व संबंधित विद्यार्थ्यांच्या बँक अकौण्टमध्ये ते जमा करण्यात यावे अशी मी मागणी करीत आहे.

ग्रामविकास विभाग, बाब क्रमांक 179 अंतर्गत पुणे जिल्हयातील यात्रास्थळांच्या विकासासाठी तरतूद करण्यात आलेली नाही. तरी भीमाशंकर व अष्टविनायक या यात्रास्थळांच्या विकासासाठी तरतूद करण्यात यावी अशी मी मागणी करीत आहे.

विधी व न्याय विभाग, बाब क्रमांक 142. पुणे शहरातील सरकारी वकिलांच्या कार्यालयामध्ये संगणक, मुद्रक व इतर खर्चासाठी तरतूद करण्यात आलेली नाही, ती करण्यात यावी.

नगरविकास विभाग, बाब क्रमांक 80. पुणे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये नव्याने 28 गावे समाविष्ट करण्याचा निर्णय शासनाने 11 ऑक्टोबर रोजी घेतलेला आहे. वाढत्या नागरिकरणामुळे पुणे शहराची वाढ गेल्या दोन वर्षामध्ये मोठया प्रमाणावर झालेली आहे. 1991मध्ये पुण्याची लोकसंख्या 13 लाख होती. आता 40 लाखापेक्षा जास्त लोकसंख्या झालेली आहे. पिंपरी-चिंचवड व कॅण्टोन्मेण्ट बोर्ड धरुन ही लोकसंख्या 60 लाखापेक्षा अधिक झालेली आहे. दोन्ही महापालिकांना लागून असलेली ही गावे तांत्रिकदृष्टया पालिकेच्या हद्दीत नसली तरी नोकरी आणि शिक्षण आणि व्यवसाय या कारणासाठी या भागातील 70 टक्के लोक हे पुणे शहरात जाऊन येऊन असतात. या गावामध्ये विविध योजना राबविण्यासाठी पालिकेने प्रोत्साहन दिले पाहिजे. जेणेकरुन जमिनीच्या आरक्षणाचा फटका कुणा एकाला बसणार नाही हे पाहिले पाहिजे.

प्रा. सुरेश नवले : पुरवणी मागण्यावर बोलताना सन्माननीय सदस्यांना भाषण वाचून दाखवित येत नाही असा माझा हरकतीचा मुद्दा आहे.

...नंतर श्री. गिते...

अशुद्धीत प्रत / अशुद्धीपत्रक नाही

श्री. मोहन जोशी : सभापती महोदय, प्रा.सुरेश नवले यांनी हरकतीचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, प्रत्येक विभागाची वेगवेगळी बाब असते व त्यास क्रमांक दिलेला असतो. ती बाब वाचून दाखविल्याशिवाय या सभागृहात बोलताच येणार नाही.

श्री. विनोद तावडे : आता ओपन बुक सिस्टीम यावयास लागली आहे, आता पाठांतराचे दिवस गेले. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. मोहन जोशी हे ओपन बुक सिस्टीममध्ये काम करीत आहेत. पुणे शहर हे विद्येचे माहेर घर आहे. ते तेथून सुरुवात करीत आहेत.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, राज्य सरकारवर जनतेच्या सोयी-सुविधासाठीचा मोठा ताण पडलेला आहे. पुणे महानगरपालिका क्षेत्रात 28 गावांचा समावेश करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. त्या गावातील लोकांना सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी हजारो-कोटी रुपयांचा निधी लागणार आहे. पुणे महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती नाजूक असून त्यांच्याकडे उपलब्ध होणारा निधी पाहिला तर त्या 28 गावातील लोकांना सोयी-सुविधांसाठी पुरेसा होणार नाही. या 28 गावातील लोकांना सोयी-सुविधा पुरविण्यासाठी या पुरवणी मागण्यांमध्ये काही प्रमाणात तरतूद करण्यास सुरुवात करावी. येत्या अर्थसंकल्पात या 28 गावातील लोकांना सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी 1 हजार कोटी रुपयांची तरतूद करावी अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, गृह विभागाच्या बाब क्रमांक 17 च्या अनुषंगाने मी माझे मत व्यक्त करीत आहे. वाहतूक पोलिसांसाठी औंध येथे नवीन प्रशासकीय इमारत बांधण्याचा प्रस्ताव पुणे वाहतूक विभागाने शासनाकडे पाठविला आहे. या प्रशासकीय इमारतींची एकूण किंमत 7 कोटी रुपये एवढी आहे. परंतु पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून या इमारतीच्या कामासाठी 25 ते 50 लाख रुपयांपर्यंतची तरतूद करावी अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे.

सभापती महोदय, आपण मला पुरवण्या मागण्यावरील चर्चेस सहभागी होण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानतो आणि माझे मनोगत पूर्ण करतो.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवर आपण मला बोलण्यासाठी परवानगी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानतो.

सभापती महोदय, चार विभागांच्या संदर्भात मी थोडक्यात माझे विचार मांडणार असून त्या निमित्ताने काही सूचना करणार आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 18, पृष्ठ क्रमांक 15 ही गृह विभागाची बाब आहे. गुन्हे अन्वेषण दक्षता विभागासंदर्भात काही तरतुंदी प्रपोज करण्यात आल्या आहेत. मी ज्या विभागातून येतो. सन्माननीय उद्योग मंत्री श्री.नारायण राणे हे देखील आमच्याच विभागात राहतात. आमच्या विभागात एवढे मोठे मंत्री आणि माजी मुख्यमंत्री राहतात ही भूषणावह गोष्ट आहे. त्याच विभागातील खार पोलीस स्टेशनमध्ये असलेले गुप्तवार्ता आणि क्राईम ऑफीस हे अनधिकृत रित्या बांधले गेलेले आहे. एस.व्ही.रोडवर खार पोलीस स्टेशन आहे, ती जागा मुंबई महानगरपालिकेस लीजवर मिळालेली आहे. त्या जागेवर डिस्पेन्सरीचे आरक्षण आहे. त्या ठिकाणी मागच्या बाजूला कस्टडी बांधली ती सुध्दा अनधिकृत आहे. तेथे क्राईम आणि गुप्तवार्ता विभागाचे कार्यालयही नाही. स्थानिक सिनियर इन्स्पेक्टरने स्वत: लेखी निवेदने दिली. चेंज ऑफ रिझर्वेशन आणि बजेट प्रोव्हीजन या बाबतीत गेल्या अडीच वर्षापासून पाठपुरावा सुरु आहे. माननीय गृह मंत्री गृह विभागाच्या अनुषंगाने उत्तर देतील, त्यावेळी खार आणि पश्चिम उपनगरातील लोकांना स्वत:चे अधिकृत पोलीस स्टेशन मिळण्यासाठी तसेच गुप्तवार्ता व दक्षता विभागासाठी मोठया प्रमाणात निधी उपलब्ध करुन देण्याची घोषणा करावी अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, या सभागृहात माननीय उद्योग मंत्री श्री.नारायण राणे उपस्थित आहेत. बाब क्रमांक 158, पान क्रमांक 156 च्या अनुषंगाने मी एक गोष्ट सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, नवीन नवीन उद्योजकांना अर्थसहाय्य देण्याबाबत प्रोव्हीजन करण्यात आलेली आहे. एका बाजूला सरकार अर्थसहाय्य करण्यासाठी प्रोव्हीजन करते, दुसऱ्या बाजूला औरंगाबादच्या एमआयडीसीमध्ये वेस्ट वॉटर आणि सिवेज वॉटर ट्रिटमेंटचे एक टेंडर दीड महिन्यापूर्वी आले आहे. या बाबतीत मी स्वत: एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांना पत्र लिहिले. त्या टेंडरमध्ये माननीय मंत्री महोदयांनी लक्ष घालावे अशी माझी नम्र विनंती आहे. त्या टेंडरमध्ये प्रपोज केलेली टेक्नॉलॉजी जी आहे, ती मोनोपोलाईस टेक्नॉलॉजी आहे. आज जगात नवीन नवीन

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार...

टेक्नॉलॉजी आलेल्या आहेत. ज्यामध्ये वेस्ट वॉटर आणि सिवेज वॉटर मधून ड्रिंकींग वॉटर बाहेर काढण्यात येते. औरंगाबाद एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांनी मोनोपोलाईस टेक्नॉलॉजीचे टेंडर का काढले याचा खुलासा त्यांच्याकडून घेतला पाहिजे. या संदर्भात मी लेखी पत्र सुध्दा संबंधित अधिकाऱ्यांकडे पाठविलेले आहे. मोनोपोलाईस टेक्नॉलॉजीचे टेंडर काढल्यामुळे एमआयडीसी, उद्योग विभाग पर्यायाने शासनावर आर्थिक बोजा वाढेल. त्यामध्ये बिडर्स कमी येतील. स्वाभाविकपणे त्याचा तोटा सरकारला होऊ शकतो. एका बाजूला अर्थसहाय्य देणे आणि दुसऱ्या बाजूला आर्थिक बोजा वाढविणे या विषयावर सन्माननीय मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे अशी माझी नम्र विनंती आहे.

यानंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/पूर्वी श्री.गिते 17:55

ॲड.आशिष शेलार.....

सभापती महोदय, नगरविकास विभागाच्या संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडले आहेत. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी एमएमआरडीएच्या कामाच्या संदर्भातील श्वेतपत्रिकेबाबत उहापोह केला आहे. बाब क्रमांक-84, पृष्ठ क्रमांक-63 वर मूलभूत सेवा आणि सुविधांसाठी तरतूद केलेली आहे. जे माननीय सदस्य मुंबई शहरामध्ये राहतात, ज्यांना मुंबईची माहिती आहे त्यांना माझे म्हणणे पटेल. एका बाजूला मूलभूत सेवा सुविधांसाठी 10 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे आणि दुसऱ्या बाजूला एमएमआरडीएच्या माध्यमातून मुंबई शहरात होऊ घातलेल्या कामांची उपयोगिता आणि त्यासाठी होणारा खर्च याचा खऱ्या अर्थाने मुंबईकर नागरिकांना कितपत उपयोग होणार आहे याचा देखील विचार होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, मुंबई शहराचा विकास आराखडा 1964 साली तयार केला होता. आजपर्यंत केवळ 12 टक्के विकास आराखड्याची अंमलबजावणी झाली आहे ही वस्तुस्थिती आहे. केवळ 10 टक्के विकास आराखड्याची अंमलबजावणी करण्यासाठी नगरविकास विभाग आणि मुंबई महानगरपालिकेने हजारो कोटी रुपयांची तरतूद, हजारो चौरस फुटाच्या एफएसआयची तरतूद आपल्या माध्यमातून केली. 2014 साली नवीन विकास आराखडा तयार होणे अपेक्षित होते. आराखडा तयार करण्याचे काम ज्या ठेकेदाराला दिले होते त्याने पलायन केले. रिप्लेसमेंटसाठी तत्कालीन आयुक्त श्री.सुबोधकुमार यांनी आपल्या परीने त्याच ठेकेदाराला कामाला लावले. परंतु 2016 पर्यंत विकास आराखड्याचे काम पूर्ण होईल अशी स्थिती नाही. मंत्री महोदयांनी या संदर्भात सभागृहाला अवगत करण्याची आवश्यकता आहे. मुंबई शहराचा विकास नवीन विकास आराखड्यामुळे खोळंबला आहे. मुंबईचा विकास झाला नाही तर आर्थिक क्षमता वाढणार नाही. कर रुपाने जो महसूल राज्य सरकारला आणि मुंबई महापालिकेला मिळतो त्यात घट होणार आहे.

सभापती महोदय, एक अलिखित नियम आहे. एका अर्थाने सर्क्युलर आहे. संपादन केलेल्या भूखंडावर जो टीडीआर जनरेट केला जातो त्यापोटी मिळणारा निधी त्याच विभागातील विकास कामासाठी खर्च झाला पाहिजे, या नियमाची अंमलबजावणी होताना दिसून येत नाही. त्याबद्दल नगरविकास विभागाने सूचना देणे आवश्यक आहे. ज्या विभागातून टीडीआर जनरेट झाला, तो त्या विभागात जो वर्कलोड वाढला आहे त्यासाठीच खर्च झाला पाहिजे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/पूर्वी श्री.गिते 17:55

ॲड.आशिष शेलार.....

सभापती महोदय, या ठिकाणी मुंबई शहरातील स्कायवॉकचा उल्लेख करण्यात आला. मुंबई शहरातील आजची परिस्थिती अतिशय दारुण आहे. एमएमआरडीएच्या माध्यमातून 7 ब्रिजेस, 16 स्कायवॉक, मोनोरेलचे 2 रुट, मेट्रो रेल्वेचे 7 रुट उभारले जाणार आहेत. त्यापैकी 80 टक्के कामे ही एलिव्हेटेड आहेत. काही वर्षानंतर मुंबईची स्थिती अशी होणार आहे की, रस्त्यावरुन चालणाऱ्या माणसाला आकाश दिसणार नाही. सगळीकडे पिलर, पिलर आणि पिलर दिसतील. ब्रिजेस आणि त्यावरुन धावणारी वाहने दिसतील. आज भूमिगत मेट्रो रेल्वेची मागणी केली जात आहे. चारकोप-वांद्रे-मानखुर्द मेट्रो रेल्वे मार्ग भूमिगत झाला पाहिजे. कुलाबा ते एअरपोर्ट मेट्रो मार्ग भूमिगत झाला पाहिजे. मुंबईतील नागरिकांना एक न्याय आणि उपनगरातील नागरिकांना वेगळा न्याय असे होता कामा नये. मुंबई शहरातील लोकांच्या सोयी सुविधांसाठी आर्थिक निधीची चणचण नाही. परंतु उपनगरातील लोकांच्या मागणीबाबत एमएमआरडीएचे म्हणणे आहे की, मेट्रो रेल्वेचे भूमिगत बांधकाम केल्यास मोठा आर्थिक लॉस होणार आहे. 7 पैकी 3 रुट किंवा 4 रुट भूमिगत केले पाहिजेत. जगभरात कोणत्याही मोठ्या शहरातील मेट्रो रेल्वेचे एक, दोन किंवा तीन लेअर असले तरी ते भूमिगत बांधण्यात आले आहेत. मुंबई शहरातील नागरिकांना काही वर्षानंतर आकाश दिसावयाचे असेल तर मुंबई मेट्रो रेल्वे ही भूमिगत असावयास पाहिजे. एमएमआरडीएला हे काम करणे सहज शक्य आहे.

सभापती महोदय, मोनोरेल प्रकल्प ॲक्टिव्ह होण्यासाठी आणखी काही वर्षांचा कालावधी लागणार आहे. सिंगापूर येथील सुमो कंपनीला हे काम देण्यात आले आहे. जपानच्या कंपनीला नॉन एलिजीबल केले आहे.

नंतर श्री.जुन्नरे....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

ॲड. आशिष शेलार .....

आपल्या सल्लागार समितीने कमर्शिअल प्रोजेक्शन्स दिलेली आहेत त्याबाबत नगरविकास खात्याने माहिती व्हेरीफाय केली तर पुढील 25 वर्षात मुंबई शहरासाठी मोनोरेल प्रोजेक्ट कमर्शिअली व्हायेबल होणार नाही ही बाब त्यांच्याही लक्षात येईल. कमर्शिअल व्हायेबल नसलेला प्रोजेक्ट मुंबई नागरिकांवर भाववाढ करणारा, कर वाढविणारा आहे. हा प्रोजेक्ट कमर्शिअली व्हायेबल नसतांना तो आग्रहपूर्वक केला जात आहे त्याबाबतीत शासनाची नेमकी काय भूमिका आहे ? मुंबईकर नागरिकांना यातून सोयी-सुविधा मिळणार आहे काय याबाबतीतील उल्लेख करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, सांडपाण्याच्या संदर्भात नगरविकास विभागाकडे एक नोट पडून आहे. चिफ सेक्रेटरींच्या नेतृत्वाखाली ठाणे कमिशनर, मुंबई कमिशनर, एनव्हायरमेंट सेक्रेटरी या सगळयांची एक कमिटी तयार केली असून मुंबई शहर किंवा संपूर्ण महाराष्ट्रातून जो घनकचरा निर्माण होतो त्यावर कशा प्रकारे ट्रिटमेंट केली पाहिजे. यासंदर्भात सर्व सेक्रेटरींच्या कमिटीने एक टेक्नॉलॉजी प्रपोज केली असून या टेक्नॉलॉजीचा उपयोग जगामध्ये केला जात नाही. या टेक्नॉलॉजीचे मोनोपोलायझेशन सरकार करु इच्छित आहे. ज्यावेळी वेगवेगळया टेक्नॉलॉजीमध्ये वेगवेगळे बिडर आर्थिक बाबतीत सुविधाजनक रेटवर येऊ शकतात अशावेळेला मोनोपोलायझेशन टेक्नॉलॉजी नगरविकास खाते इंटरनॅशनलच्या माध्यमातून का करीत आहे हे काही समजत नाही त्यामुळे ही बाब सुध्दा या सभागृहासमोर स्पष्ट होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 262, पान क्रमांक 230 वरील आश्रमशाळा, सामुग्री व पुरवठा यावर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. या विषयावर सभागृहात गंभीरपणे चर्चा होण्याची आवश्यकता आहे. आपल्या सरकारने आदिवासी विभागाद्वारे खावटी कर्जाची योजना केलेली आहे. 75 टक्के धान्य, 25 टक्के पैसे, आदिवासींना सुविधा अशा प्रकारची ही योजना आहे. परंतु खावटी कर्जाच्या माध्यमातून मिळणाऱ्या धान्याच्या रेटच्या संदर्भात वारंवार चर्चा उपस्थित करण्यात आलेली आहे व त्यावेळी माननीय मंत्री महोदयांनी यासंदर्भात लक्ष घालू, लक्ष घालू असे सांगितलेले आहे. परंतु महिला बालकल्याण, शालेय शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, समाज

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. आशिष शेलार .....

कल्याण असो की, राज्यातील कारागृह असो या सर्वांसाठी जे धान्य मिळते ते केंद्रशासनाच्या योजनेच्या माध्यमातून मिळत असते. केंद्रशासनाचे दर गव्हाला 4.30 व तांदळासाठी 6.25 रुपये आहेत. खाजगी आश्रमशाळा सुध्दा केंद्रसरकारचे धान्य घेत असतात. परंतु सरकारी आश्रमशाळा मार्केटमधील 18 ते 20 रुपये किलो या दराचे धान्य घेत असतात. मंत्री महोदय यासंदर्भात सांगतात की, आम्ही मुंबई स्टेट, कॉर्पोरेशन, कन्झूमर फेडरेशनकडून धान्य घेत असतो. या सरकारमधील अन्य विभाग केंद्रशासनाचे 4 रुपये किलोचे धान्य घेतात त्याच वेळेस आदिवासी विभाग 18 रुपये किलोचे धान्य का घेते ? हे काही समजत नाही. यातून जो काही बोजा पडतो तो राज्यसरकारवर अनाठायी पडत असतो. केवळ बोजाच नाही तर कन्झ्यूमर असलेल्या प्रोव्हिजनमध्येच धान्य मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे लाभार्थ्यांना कमी लाभ, लाभार्थी उपाशी आणि ठेकेदार भरभरुन अशा पध्दतीची स्थिती आदिवासी विभागात आपल्याला पहावयास मिळते. त्यामुळे याबाबतीतील स्पष्टीकरण सभागृहासमोर येणे आवश्यक आहे. आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल खूप खूप धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक राऊत (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सामान्य प्रशासनाच्या पान क्रमांक 9, बाब क्रमांक 12 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. महाराष्ट्र सरकारने केलेल्या विविध कामांची माहिती जनतेला व्हावी यासाठी जाहिरात फलकाचे नियोजन यासंदर्भातील पूरक मागणी आहे. शासकीय कामाची जाहिरातबाजी किती होते हा एक संशोधनाचा विषय आहे. परंतु मुंबईसारख्या मोठया शहरांमध्ये जाहिरातीचे 3-3 मजल्यापर्यंत फलक उभे राहत आहेत. जवळ जवळ 50-50 फूट उंचीच्या जाहिरातीचे फलक उभे राहत आहेत. माहिमच्या खाडीपासून ते एअरपोर्टपर्यंत आपल्याला 3-3 मजल्याचे फलक दिसून येतील. या फलकांवर कोणाचेही नियंत्रण नाही, जाहिरात फलकाची क्षमता आहे की नाही याची पाहणी केली जात नाही. अत्यंत धोकादायक परिस्थितीत जाहिरातीचे फलक उभे आहेत त्यावर शासनाने नियंत्रण आणण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री. ओटवणेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक राऊत...

सभापती महोदय, गृह विभागाच्या बाब क्र. 29 वर मी बोलणार आहे. 13 व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार सागरी धूप प्रतिबंधक बंधारे बांधण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. मी आपल्या माध्यमातून माननीय मंत्र्यांना विनंती करणार आहे की, वेंगुर्ल्यापासून पालघर पर्यंत समुद्र किनाऱ्या लगत असणाऱ्या गावांमध्ये दरवर्षी समुद्राचे पाणी शिरत आहे. आमच्या कोकणामध्ये एक म्हण आहे, भाटीच्या कोंडी आणि कोंडीच्या भाटी. या वर्षी जागा प्लेन असेल तर पुढच्या वर्षी तेथे डबके तयार होते. त्याला कूळ म्हणतो. मानवी आक्रमणामुळे समुद्राचा प्रवाह बदलत चालला आहे. त्यामुळे समुद्र किनारी असलेल्या वस्त्यांना धोका निर्माण होत आहे. त्या धोक्या पासून नागरी वस्ती वाचवायची असेल तर धूप प्रतिबंधक बंधारा बांधणे आवश्यक आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात कुडाळ तालुक्यात सोनवडे नावाचे गाव आहे. हे गाव नदीच्या किनारी आहे. मागील अनेक वर्षापासून धूप प्रतिबंधक बंधारा बांधून द्यावा अशी प्रकारची मागणी येथील जनता करीत आहे. मागील 3 वर्षामध्ये दर पावसाळ्यामध्ये किमान 50 फूटापर्यंत गाव त्या पाण्यामध्ये खेचले जात आहे. धूप प्रतिबंधक बंधारा बांधण्यासाठी शासनाने तरतूद केली,पण बंधारा मात्र अजून पर्यंत झालेला नाही. देवबाग सारख्या किनाऱ्यावर वसलेल्या गावात दरवर्षी पाणी शिरते. त्यामुळे तेथील वस्ती उद्ध्वस्त होत चालली आहे. या सर्व परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन शासनाने धूप प्रतिबंधक बंधारे बांधण्याची व्यवस्था करावी.

यानंतर मी नगरविकास विभागाच्या बाब क्रमांक 84 वर बोलणार आहे. मुंबई आणि पुणे महानगरपालिका अधिकारिता क्षेत्रामध्ये मूलभूत सोयी सुविधांच्या विकासासाठी तरतूद करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासन मुंबई महानगरपालिकेला जवळ जवळ 400 कोटी रूपये देणे आहे. मागच्या आठवड्यात प्रश्नोत्तरामध्ये सदर रक्कम देण्याचे मंत्रिमहोदयांनी मान्य केले आहे. पूर्वी मुंबई शहरामध्ये फक्त मुंबई महानगरपालिकाच काम करीत होती. पण आता म्हाडा आले. गलिच्छवस्ती सुधारणा मंडळ आले. MMRDA सारखी बिनभांडवली संस्था निर्माण झाली. MMRDA म्हणजे अधिकाऱ्यांना व कंत्राटदारांना पैसे खाण्याचे कुरण झाले आहे. किंबहुना सोन्याची अंडी देणारी कोंबडी म्हणून देखील त्याकडे पाहिले जाते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक राऊत.....

स्कायवॉक बांधणीची सखोल चौकशी तर व्हायलाच पाहिजे. ज्याच्या सुपीक डोक्यातून स्कॉयवॉकची कल्पना आली व ज्या पद्धतीने स्कायवॉक बांधले गेले व हजारो कोटींचा खर्च करण्यात आला त्याची चौकशी झाली पाहिजे. याचे कारण असे की, या स्कॉयवॉकचा किती उपयोग होत आहे व खर्च किती केला याचे गोळाबेरजेचे गणित मांडले तर त्यातून सर्व काही स्पष्ट होईल म्हणून शासनाने या कामांची देखील श्वेतपत्रिका काढली पाहिजे. तसेच MMRDA चे नेमके काम काय हे देखील स्पष्ट होणे गरजेचे आहे.

MMRDA ने सदोष रस्ते बांधायचे व नंतर महानगरपालिकेकडे हस्तांतरित करायचे. मग दुरूस्तीचा खर्च महापालिकेच्या माथी मारायचा, हा आता त्यांचा धंदा सुरू झालेला आहे. त्यांना निधीची कमतरता मूळीच नाही. निवृत्त झालेले बरेच अधिकारी MMRDA च्या खुर्चीवर घट्ट बसून राहिले आहेत. त्यांच्यावर लोकप्रतिनिधींचा अंकुश नाही. मंत्री महोदयांचे किती लक्ष आहे याबद्दल शंका आहे. MMRDA चे जाळे मुंबई पासून ठाणे, कल्याण, डोंबिवली पर्यंत पसरलेले आहे. त्यांना केवळ पैशाची खिरापत वाटली जात आहे. त्याद्वारे भ्रष्टाचार निर्माण केला जात आहे. त्यामुळेच MMRDA च्या कारभारावर नियंत्रण असणे आवश्यक आहे.

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य मुंबईच्या प्रश्नावर बोलत असताना MMRDA मध्ये भ्रष्टाचार होत आहे, मोठ्या प्रमाणावर लूट होत आहे असे म्हणत आहेत.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे...

पण या सार्वभौम सभागृहामध्ये कोणताही आरोप करायचा असेल तर त्यासाठी प्रथ्म पुरावे द्यावे लागतात. सन्माननीय सदस्यांनी अमुक एका कामामध्ये भ्रष्टाचार झाला, अमुक अधिकारी लूट करीत आहेत असे सांगताना त्याबाबत पुरावे दिले पाहिजे. सन्माननीय सदस्यांकडे पुरावे नसतील तर त्यांना अशाप्रकारे आरोप करता येणार नाहीत. त्यांनी एखादे उदाहरण मुंबई महानगरपालिकेचे द्यावे नंतर एमएमआरडीचे द्यावे. मुंबई महानगरपालिकेमध्ये काय चालू आहे याचा उल्लेख मी येथे करणार नाही. आमच्याकडे देखील बरेच पुरावे आहेत. पुरावे नसताना या सार्वभौम सभागृहामध्ये सन्माननीय सदस्यांना आरोप करता येणार नाहीत.

श्री.विनायक राऊत : सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेच्या कारभाराबाबत अनेकांनी बऱ्याच तक्रारी केल्या परंतु मुंबईच्या स्वच्छ कारभाराचे प्रशस्तीपत्रक केंद्र सरकारने दिलेले आहे हे माननीय मंत्री महोदयांनी स्पष्ट केलेले आहे आणि हे सभागृहात सांगायला मला अभिमान वाटतो. मुंबई महानगरपालिकेचा कारभार स्वच्छ आहे म्हणूनच मुंबईकरांनी मागील वीस वर्षे मुंबई महानगरपालिकेची सत्ता शिवसेना-भाजप युतीच्या हाती दिलेली आहे.

सभापती महोदय, या पुरवणी मागण्यांमध्ये पोलीस गृह निर्माणाची एक बाब आहे. मुंबईतील पोलीस गृहनिर्माण संस्थेची अवस्था भयानक आहे. ती एक नरकपुरी आहे असे म्हटले तर ते वावगे होणार नाही. त्या ठिकाणी दलदल आहे, चिखल आहे, वीज नाही, शौचालय नाही, अशा ठिकाणी पोलीस कर्मचाऱ्यांनी रहावे की जनावरांनी रहावे असा एक प्रश्न आहे. (बेल वाजविली) आपण बेल वाजवून मला माझे भाषण आटोपते घेण्यास सांगितले. तेव्हा येथेच थांबून माझे दोन शब्द पूर्ण करतो.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. जे पोलीस राज्यासाठी आपले बलिदान देतात. ते ज्या ठिकाणी राहतात ते पोलीस राहतात की जनावरे राहतात, सन्माननीय सदस्य पोलिसांबद्दल कशाप्रकारे शब्द वापरीत आहेत ? आपण रहातात असे म्हणालात आपण चेक करावे. आपण बोलण्याच्या ओघात कोणाला काय बोलतो याचे सन्माननीय सदस्यांनी भान ठेवावे. 26/11 रोजी मुंबईत झालेल्या दहशतवादी हल्ल्यामध्ये कामठे, करकरे आणि अन्य पोलिसांनी बलिदान दिले त्याबद्दल या सभागृहामध्ये त्यांच्याबद्दल किती चांगले शब्द वापरले होते आणि सन्माननीय सदस्य श्री.विनायक राऊत यांनी पोलीस चिखलात राहतात, नरकात राहतात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर....

असे शब्द प्रयोग वापरले. हे वरिष्ठ सभागृह आहे याचे भान सन्माननीय सदस्यांनी ठेवावे. सन्माननीय सदस्यांना शिकण्यासाठी थोडा वेळ लागेल परंतु त्यांनी शिकून घ्यावे. तेव्हा माझी विनंती आहे की, आपण हे सर्व शब्द कामकाजातून काढून टाकावेत.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2012-2013 च्या पुरवणी मागण्यांना पाठिंबा देण्यासाठी आणि त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 240, बाब क्रमांक 286, सहकार विभाग, छत्रपती शिवाजी महाराजाचां हा महाराष्ट्र, शाहू-फुले-आंबेडकर यांच्या विचारांना पाया मानून चालणारा हा महाराष्ट्र आहे. पण काही दिवसांपूर्वी आर्टिकल 97 मध्ये एक सुधारणा आली. त्यामुळे या राज्यातील सहकार क्षेत्रात काम करणारे ओबीसी व भटक्या विमुक्त जातीतील पदाधिकारी अतिशय चिंतेत आहेत. त्यांच्यात एक प्रकारचा असंतोष निर्माण झालेला आहे. घटना दुरुस्तीने राज्याला अधिकार दिलेले आहेत. त्यानुसार सहकार क्षेत्रामध्ये ओबीसी आणि भटक्या विमुक्त जातीचे जे पदाधिकारी आहेत त्यांना संरक्षण देण्याचे काम राज्य सरकारने करावे आणि खऱ्या अर्थाने शाहू-फुले-आंबेडकरांचा, पुरोगामी महाराष्ट्राचा जो पाया आहे जो जोपासावा अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 151, बाब क्रमांक 163, ग्राम विकास विभाग, सांगली जिल्ह्यातील कवठेमहाकाळ पंचायत समितीने रस्त्यांच्या कामासाठी तीन कोटी रुपयांची मागणी केली होती. परंतु आम्हाला फक्त 10 लाख रुपये मिळाले आहेत. तेव्हा कवठेमहांकाळ पंचायत समितीला रस्त्यांच्या कामासाठी जास्त निधी वाढवून द्यावा अशी विनंती आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 188, बाब क्रमांक 201, नियोजन विभाग, पुण्यश्लोक महाराणी अहिल्याबाई होळकर यांचे जन्म गाव चौंडी आहे. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या स्मारकासाठी आणि चौंडीच्या विकासाचा 40 कोटी रुपयांचा आराखडा तयार केलेला आहे. त्यापैकी फक्त दोन कोटी रुपये मिळालेले आहेत. उर्वरित निधी देण्यात येईल असे मागीलवेळी सांगण्यात आले होते, परंतु तो निधी अजून देण्यात आलेला नाही. तेव्हा उर्वरित 38 कोटी रुपयांचा निधी लवकरात लवकर देण्यात यावा अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, सांगली जिल्ह्यातील कवठेमहाकांळ तालुक्यामध्ये धनगर समाजाचे गिरोबा देवस्थान आहे. या देवस्थानासाठी चार कोटी रुपये देण्यात येतील असे चार वर्षापूर्वी सांगण्यात आले होते. परंतु आतापर्यंत फक्त 85 लाख रुपये देण्यात आलेले आहेत. पर्यटन व वित्त विभागाकडून पैसे येणे बाकी आहे. तेव्हा उर्वरित निधी लवकरात लवकर देण्यात यावा अशी माझी मागणी आहे.

यानंतर श्री.सरफरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे....

सभापती महोदय, बाब क्रमांक 25 व पृष्ठ क्रमांक 11 या परिवहन विभागाच्या मागणीच्या निमित्ताने सांगू इच्छितो की, काही महिन्यापूर्वी एस.टी. महामंडळामध्ये 200कोटींचा घोटाळा झाल्याचे ऐकले. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्र हादरुन गेला त्याचे पुढे काय झाले ते अजूनपर्यन्त समजले नाही. त्याबाबत सखोल माहिती घेतल्यानंतर हा 200 कोटींचा घोटाळा झालेला नसून काही लाखांचा झालेला आहे असे मला समजले. 200 कोटींचा घोटाळा झाल्याचे भासवून काही अधिकाऱ्यांनी एकमेकांवर सूड उगवण्याचे काम केले. त्यामध्ये भटक्या-विमुक्त जातीचा एक अधिकारी स्वकष्टाने डेप्युटी जनरल मॅनेजरच्या पदापर्यन्त गेला होता व ज्याची वाहवा आय.टी.सेक्टरमध्ये आंतरराष्ट्रीय पातळीवर झाली आहे त्याचा बळी घेण्यात आला आहे. त्याला न्याय देण्याचे काम शासनाने करावे अशी मी विनंती करतो. सांगली जिल्ह्यात 100 एस.टी. च्या बसेस उभ्या आहेत त्याकरिता 500 वाहन चालकांची आवश्यकता आहे. मंत्रीमहोदयांनी मागील अधिवेशनामध्ये 19हजार 700 जागा त्वरित भरण्यात येतील असे जाहीर केले होते. त्याबाबत पुढे काय झाले हे मला अजून समजले नाही. ग्रामीण भागामध्ये अत्यंत आवश्यक असलेली दळणवळण करणारी लोकांच्या दृष्टीने सोयीची असलेली एस.टी. बसेसची यंत्रणा आहे. त्यामध्ये आपण कोणती सुधारणा केली हे सांगावे अशी माझी सूचना आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 81 व पृष्ठ क्रमांक 62 या नगर विकास विभागाच्या पूरक मागणीसंदर्भात सांगू इच्छितो की, माननीय सदस्य श्री. विनायक राऊत साहेब मोठयाने इथे घोटाळा झाला, तिथे घोटाळा झाला असे सांगत होते. मी वर्तमानपत्रामध्ये छापून आलेली बातमी वाचली त्यामध्ये सांगण्यात आले की, आंतरराष्ट्रीय पर्यटक भारतात येतात व त्यानंतर मुंबईमध्ये येतात. त्यांनी येथील शहरांचा सर्व्हे केल्यानंतर जगातील सर्वात गलिच्छ शहर म्हणजे मुंबई शहर असल्याचे जाहीर केले. ही खरोखरच दखल घेण्यासारखी बाब आहे. मुंबईची महानगरपालिका चालविणे जर कुणाला जमत नसेल तर त्यामध्ये आपण लक्ष घालावे . आंतरराष्ट्रीय किर्तीच्या या मुंबई शहराची व देशाची राजधानी असलेल्या या शहराची अशाप्रकारे बदनामी होणे योग्य नाही. इतर ठिकाणी आपण आरोप करीत असतांना आपल्या मांडीखाली काय लपलेले आहे हे आपण तपासून पहा आणि आपल्या शहराची व या राज्याची, देशाची बदनामी होत आहे ती थांबवा हे मी मुद्दाम सांगू इच्छितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, शेवटी बाब क्रमांक 156 आणि पृष्ठ क्रमांक 145 च्या ऊर्जा विभागाच्या पूरक मागणी संदर्भात सांगू इच्छितो की, राज्याच्या ग्रामीण भागामध्ये भारनियमन वाढले आहे, त्यामध्ये काही तांत्रिक अडचणी असू शकतात. काही वीज केंद्रावर कोळशाचा पुरवठा कमी होत असेल तर त्याठिकाणी शासनाने लक्ष घालावे आणि गोरगरीब जनतेला न्याय द्यावा एवढे बोलून माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभागाच्या बाब क्र. 12, पृष्ठ क्रमांक 9 वर जाहिरात फलक उभारण्यासाठीचा खर्च भागविण्याकरिता पूरक मागणी करण्यात आली आहे. सभापती महोदय, इतर राज्यामधील बस स्टँड असो, रेल्वे स्टेशन असो किंवा विमानतळ असो त्या ठिकाणाहून बाहेर आल्यानंतर ज्या ठिकाणी हायलाईट पॉईंट उभारण्यात आले आहेत त्या ठिकाणी मुख्यमंत्र्यांच्या किंवा राज्यातील इतर मंत्र्यांच्या जाहिरातीचे फलक लावलेले पहावयास मिळतात. परंतु आपल्या राज्यामध्ये अशाप्रकारचे फलक कोठेही लावण्यात आलेले नाहीत. त्याकरिता या राज्यातील मुंबई शहरातील विमानतळ असो किंवा मोठया शहरातील विमानतळ असो, किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी असलेल्या रेल्वे स्टेशनच्या बाहेर माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्यमंत्र्यांचे, माननीय पर्यटन मंत्र्यांचे फोटो असलेले माहितीचे फलक लावण्यात यावेत अशी मला सूचना करावयाची आहे.

सभापती महोदय, गृह विभागाच्या पृष्ठ क्रमांक 17 व बाब क्रमांक 23 च्या अनुषंगाने सांगू इच्छितो की, ग्रामीण भागात पोलीस स्टेशनमध्ये एखादा माणूस तक्रार नोंदवायला गेला तर त्याची तक्रार लिहून घेतली जात नाही. त्याकरिता आम्ही प्रत्येक अधिवेशनामध्ये पोलीस स्टेशनचे संगणकीकरण करण्यात यावे अशी मागणी करीत आहोत. जेणेकरुन मंत्रालयामध्ये बसून पोलीस स्टेशनमध्ये सामान्य माणूस तक्रार नोंदविण्यास गेला आहे की नाही याची माहिती मिळू शकेल. माननीय गृह राज्यमंत्री तरुण असल्यामुळे आपण त्यामध्ये लक्ष घालावे अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, महसूल विभागाच्या पृष्ठ क्रमांक 35 वर अतिरिक्त पदे निर्माण करण्याकरिता मागणी करण्यात आली आहे. उप विभागीय अधिकाऱ्यांची पदे भरण्यात आली पाहिजेत. प्रत्येकी दोन तालुक्यांसाठी एक उप विभागीय अधिकारी नियुक्त केला पाहिजे. त्या करिता ही पदे तातडीने निर्माण करावीत अशी मी मागणी करतो. सभापती महोदय, वन विभागाने या ठिकाणी पूरक मागणी करुन एक नवीन निर्णय घेतल्याचे दिसून येत आहे. आदिवासी विभागातील गरीब लोकांना एलपीजी गॅस आणि कुकर इत्यादी स्वयंपाकाचे साहित्य देण्यासाठी 25 कोटींची योजना आदिवासी विभागामार्फत राबविली जात होती ती आज वन विभागाने स्वत:कडे राबविण्यास घेतली आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ही योजना वन विभागाने हाती घेतलेली आहे. ती कशी घेण्यात आली, ती कोणी डायर्व्हट केली याची चौकशी झाली पाहिजे अशी मागणी करतो.

सभापती महोदय, माननीय मंत्री श्री.बबनराव पाचपुते हे आदिवासी विभागाचे मंत्री आहेत. तुम्ही यासाठी कसे पैसे दिले हा प्रश्न आहे आणि त्याबाबत आपल्याकडून माहिती मिळण्याची अपेक्षा आहे आणि याबाबत खुलासा झालाच पाहिजे अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, पान क्र.47 वर कृषी विभागाबाबत मागणी केलेली आहे. राज्यामध्ये सातत्याने पाऊस कमी पडत आहे, त्यामुळे आपण सध्या जे पाणी शिल्लक आहे ते आपण योग्य प्रकारे वापरले पाहिजे यादृष्टीकोनातून प्रयत्न केला पाहिजे.

श्री.राजेंद्र दर्डा (खाली बसून) : आज सदनासमोर कृषी विभागाच्या मागण्या नाहीत.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांचे माझ्या भाषणाकडे लक्ष आहे की नाही हे मी पहात होतो. याठिकाणी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संदर्भात मागणी केली आहे व प्रत्येक अधिवेशनामध्ये मागणी केली जाते. कारण राज्यामध्ये वाहनांची संख्या प्रचंड झाली असून अपघातांचे प्रमाण वाढत आहे. प्रत्येक जिल्ह्या-जिल्ह्याला जोडणारे रस्ते हे चारपदरी असले पाहिजेत अशी आमची सातत्याने मागणी आहे. परंतु सदरहू मागणीकडे दुर्लक्ष होत आहे. म्हणून माझी अशी मागणी आहे की, या रस्त्याचे काम बी.ओ.टी. तत्वावर करण्यात यावे आणि तेथून येणाऱ्या-जाणाऱ्या लोकांकडून कर घेण्यात यावा. मात्र लोकांना चांगल्या प्रकारची सुविधा द्यावी अशी मागणी करीत आहे.

सभापती महोदय, माझा शेवटचा मुद्दा आहे. सदनामध्ये उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या मागण्या सादर केल्या आहेत. याठिकाणी सदरहू विभागाचे कर्तबगार माननीय राज्यमंत्री महोदय उपस्थित आहेत. मी येथे सांगू इच्छितो की, याठिकाणी उपस्थित असलेले दोन्ही मंत्री महोदय, हे कर्तव्यदक्ष आणि कर्तबगार आहेत आणि त्यांना शिक्षणाविषयी कळकळ आहे. परंतु असे असताना सुध्दा आमच्या कंत्राटी निदेशकांना उपोषणाला बसावे लागते ही बाब अत्यंत अन्यायकारक आहे. म्हणून कंत्राटी निदेशकांच्या ज्या मागण्या आहेत त्या मान्य झाल्या पाहिजेत. त्यांना सेवेमध्ये कायम केले पाहिजे. तसेच त्यांना मुदतवाढ दिली पाहिजे. तसेच तंत्रनिकेतन मधील आमचे कंत्राटी व्याख्याते आहेत त्यांची वर्षानुवर्षे गरज भासणार आहे.पण आज तंत्रनिकेतनमध्ये शिकविण्यासाठी शिक्षक नाहीत.तेथील विद्यार्थ्यांचे भवितव्य अधांतरी आहे.म्हणून कंत्राटी शिक्षकांना कायम करण्याची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे . . . .

भूमिका ही कायदा आणून करावी अशी मागणी करतो.

सभापती महोदय, प्रत्येक अधिवेशनामध्ये 1991 ते 2000 या कालावधी मध्ये लागलेले जे नेटगस प्राध्यापक आहेत, त्यांच्या बाबतीत प्रश्न उपस्थित केला जातो. मात्र अजून हा प्रश्न सुटलेला नाही. तो प्रश्न देखील सोडविला पाहिजे. आपण सहावा वेतन आयोग लागू करुन चार वर्षे झाली आहेत. पण केंद्र शासनाकडून जी 80 टक्के रक्कम येणार आहे ती आपण देऊ शकलो नाही. कालच याबाबतीत मोर्चा काढण्यात आला होता. याबाबत माननीय मुख्यमंत्री महोदयांनी बैठकीमध्ये सांगितले होते की, "मी स्वत: दिल्लीला जातो, माझे वजन खर्च करतो आणि 80 टक्क्याची रक्कम आणतो." याबाबतीत पुढे काय झाले असा माझा माननीय मंत्री महोदयांना प्रश्न आहे.

सभापती महोदय, शेवटचा मुद्दा असा की, येथे मराठी विभागाच्या बाबतीत मागणी सादर करण्यात आली आहे. बीड जिल्ह्यातील अंबेजोगाई हे आमचे गाव आहे. मराठीचे आद्य कवी श्री.मुकुंदराज यांचे ते जन्मगाव आहे. सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले साहेब आपल्याला माहिती आहे की, मराठीतील पहिला ग्रंथ अंबेजोगाईमध्ये लिहिण्यात आला. मग त्याठिकाणी मराठी विद्यापीठ झाले पाहिजे अशी आमची सातत्याने मागणी असून सन्माननीय मंत्री श्री.राजेंद्र दर्डा यांचे देखील त्याला समर्थन आहे. त्यामुळे मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, हे विद्यापीठ अंबेजोगाईला झाले पाहिजे अशी आमची या निमित्ताने मागणी आहे. सभापती महोदय, माझे चार मुद्दे मांडावयाचे राहिले आहेत. मात्र आपण मला जो बोलण्यासाठी वेळ दिला त्याबद्दल आपल्याला धन्यवाद देतो.

---

4 एफ-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, आज या सदनामध्ये ज्या पुरवणी मागण्यांवर चर्चा झाली. त्यामध्ये नगरविकास विभागाच्या मागणी क्रमांक एफ-2 ते एफ-5, यातील बाब क्र.80 ते 84 यामधील एकूण 25 कोटी रुपयांच्या मागण्यांच्या संदर्भात चर्चा करण्यात आली. त्यामध्ये अनेक सन्माननीय सदस्यांनी आपली मते व्यक्त केली. या चर्चेची सुरुवात या सदनाचे माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोद तावडेसाहेब यांनी केली. या सदनाचे सन्माननीय सदस्य सर्वश्री.मोहन जोशी, आशिष शेलार, प्रकाश बिनसाळे, सुभाष चव्हाण, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत,रामनाथजी मोते, विनायक राऊत, रमेशजी शेंडगे, विक्रम काळे अशा अनेक सन्माननीय सदस्यांनी या चर्चेमध्ये सहभाग घेतला.

यानंतर श्री.बरवड . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ....

नगरविकास विभागाबद्दल बोलत असताना सन्माननीय सदस्यांनी दोन तीन महत्वाचे प्रश्न उपस्थित केलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यांनी सांगितले की, नुकतीच 28 गावे पुणे महानगरपालिकेमध्ये समाविष्ट करण्यात आलेली आहेत आणि त्यांना सुध्दा विकासासाठी पैसे द्यावेत आणि त्यासाठी पुरवणी मागण्यांमध्ये तरतूद करावी अशा प्रकारचा आग्रह त्यांनी धरला. मला सांगितले पाहिजे की, शासनाने नुकताच 2012 मध्ये एक अत्यंत महत्वाचा निर्णय घेतलेला आहे की, ज्या ठिकाणी नवीन नगरपंचायती केल्या जातील, ज्या ठिकाणी नवीन महानगरपालिका स्थापन केल्या जातील, ज्या ठिकाणी नगरपालिकांची स्थापना होईल किंवा नगरपालिका, महानगरपालिकांची हद्दवाढ केली जाईल आणि ती गावे त्या नगरपालिकेमध्ये, महानगरपालिकेमध्ये, नगरपंचायतीमध्ये समाविष्ट झाली तर त्यांचा पुढच्या तीन वर्षाचा होणारा जो एकंदरीत विकास असेल त्या सर्व विकासाची जबाबदारी महाराष्ट्र शासनाने 27 जून, 2012 रोजी घेतलेली आहे. रत्नागिरी जिल्ह्यामध्ये दोन नगरपंचायती झाल्या आणि तिसरी नगरपंचायत सुध्दा लवकरच होईल, त्याचे नोटिफिकेशन आज उद्या निघेल. हा नवीन ऐतिहासिक आणि महत्वपूर्ण निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला असल्यामुळे जी गावे हद्दवाढीमुळे आत येतील, ज्या ठिकाणी नवीन नगरपंचायती स्थापन होतील, नवीन नगरपालिका स्थापन होतील, या सर्व नगरपालिकांना, नगरपंचायतींना हद्दवाढीसह विकासाकरिता जी काही रक्कम लागेल त्या करिताच ही 25 कोटी रुपयांची पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. त्यामधून पुणे महानगरपालिकेमध्ये जी 28 गावे अंतर्भूत केलेली आहेत त्यांचा सुध्दा विचार केला जाईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार, सन्माननीय सदस्य श्री. विनायक राऊत किंवा अन्य सन्माननीय सदस्यांनी एमएमआरडीए अंतर्गत होणारी जी कामे आहेत त्या कामांच्या संदर्भात थोडी नाराजी व्यक्त केली. सन्माननीय सदस्य श्री. विनायक राऊत यांनी सांगितले की, एकेकाळी फक्त मुंबई महानगरपालिका काम करीत होती, त्यामध्ये म्हाडा, एमएमआरडीए अशा प्रकारची वेगवेगळी विकास प्राधिकरणे स्थापन झाली. मी सन्माननीय सदस्य श्री. विनायक राऊत यांना सांगू इच्छितो की, या विषयाच्या संदर्भात काही प्रमाणात मतभेद असू शकतात. मतभेद असू शकत नाहीत असे मी म्हणत नाही पण आपण जर बघितले तर आज मेट्रो

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. भास्कर जाधव ...

रेल्वेसारखे अत्यंत महत्वपूर्ण काम तसेच आज आशिया खंडामध्ये कोठेही मोनोरेलची सर्व्हिस उपलब्ध नाही ती मोनोरेलची सर्व्हिस सुध्दा आता आपल्याला उपलब्ध होणार आहे. मुंबई हे ऐतिहासिक शहर आहे आणि त्या ठिकाणी अशा प्रकारच्या सोयीसुविधा करण्याचे काम याच विकास प्राधिकरणांकडून होत आहे. मी महानगरपालिकेला दोष देत नाही पण महानगरपालिकेने जर अशा प्रकारच्या व्यवस्था करावयाच्या म्हटल्या तर ते काम महानगरपालिका कदापि करु शकणार नाही.

मुंबईत मोठ्या प्रमाणावर पूल उभे राहिलेले आहेत. फ्लायओव्हर पुलाबद्दल, स्कायवॉक बद्दल आपले वेगळे काही मत असू शकेल. काही ठिकाणी चांगली कामे झाली. काही ठिकाणी कळत नकळत चुका घडल्या असतील. कारण मुंबईमध्ये असलेली वाहतूक कोठेही विस्कळीत न करता, असलेली वाहतूक कोठेही बंद न करता, संपूर्ण मुंबई शहरात विकासाच्या दृष्टीने जमिनीच्या खालून पाईपलाईन गेली असेल, केबल्स गेल्या असतील, बांधकाम झाल्यामुळे त्याचे पिलर्स जमिनीखाली आले असतील, मुंबई ही सात बेटांची वसलेली नगरी आहे, त्यामुळे खाली असणारे पाणी असेल यातून आज जे काही काम चालले आहे ते सुध्दा बघण्यासारखे आहे. अशा प्रकारचे ऐतिहासिक काम जे मुंबईमध्ये चालते ते मुंबई महानगरपालिका कदापिही करणे शक्य नाही. ब्रिमस्टोवॅडसारखी योजना आहे. त्याच्या विस्तारामध्ये मी जात नाही. त्या योजनेसाठी 1200 कोटी रुपये केंद्र शासनाने दिले. एमएमआरडीएसारख्या किंवा जेएनएनयुआरएमसारख्या योजनेतून मुंबई महानगरपालिकेला पैसे मिळाले. आज विस्ताराने बोलण्याचा हा विषय नसला तरी सुध्दा कोठल्याही कॉर्पोरेशनला स्वत:च्या पैशातून ते करणे शक्य नव्हते. त्यामध्ये महानगरपालिकेचा कोणत्याही प्रकारचा हिस्सा न घेता हे जे काम सरकार करीत आहे त्याचे आपण जाहीररित्या कौतुक सुध्दा केले पाहिजे.

आज मुंबईमध्ये जवळजवळ 65 टक्के लोक झोपडपट्टीमध्ये राहतात. त्याबाबत दोष देताना आपण बऱ्याच वेळा केंद्र सरकारकडे बोट दाखवितो. राज्य सरकारकडे बोट दाखवितो. परंतु मला सांगितले पाहिजे की, प्रत्येक शहराचे डीसी रुल्स आहेत. राज्य घटनेप्रमाणे कोणालाही कोठेही जाऊन राहता येते, व्यापारउदीम करता येतो, आपला व्यवसाय करता येतो, त्याला स्वत:ची प्रॉपर्टी तयार करता येते.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ...

पण डीसी रुल्स अंतर्गत ही कामे करावी लागतात. डीसी रुल्स पाळले जातात की नाहीत हे पाहण्याची जबाबदारी लोकल बॉडीची आहे. पण ते काम होत नाही. आपण दुसरीकडे बोट दाखविता कामा नये. झोपडपट्टीच्या संदर्भात 37 एए वापरण्याची कोणतीही आवश्यकता नाही. मी एक उदाहरण देतो. मुंबईतील वाढत्या लोकसंख्येला पर्याय म्हणून नवी मुंबई शहर वसविण्यात आले. 1970मध्ये हा निर्णय घेण्यात आला. नवी मुंबई महानगरपालिकेमध्ये एक देखील झोपडी नाही. झोपडी होऊ न देण्याची जबाबदारी कुणाची आहे ? तेव्हा दुसरीकडे बोट दाखविण्यापेक्षा लोकांनी आपणास 20-20 वर्षे जी सत्ता दिलेली आहे त्या सत्तेचा दुरुपयोग आपली मुंबई बकाल करण्याकरिता करु नका एवढाच मित्रत्वाचा सल्ला मी आपणास देतो. सभागृहाने या पुरवणी मागण्यांना पाठिंबा द्यावा अशी मी विनंती करतो.

सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे यांनी माळढोक अभयारण्याचे 1200 चौ.कि.मी.एवढे क्षेत्र घोषित करण्यासंबंधी काय कार्यवाही करण्यात आली असा महत्वाचा मुद्दा उपस्थित केले. माननीय आदिवासी विकासमंत्री श्री. बबनराव पाचपुते यांचे यामध्ये खूप मोठे योगदान आहे. त्यांनी मोठया प्रमाणावर पाठपुरावा केलेला आहे. त्यांनी यामध्ये लक्ष घातल्यामुळे अलीकडेच या अभयारण्याचे क्षेत्र पुनर्गठीत करुन जे पूर्वी 8496 चौ. कि.मी.होते ते आता फक्त 1231 कि.मी. इतके निश्चित करण्यात आलेले आहे. त्या संदर्भात अधिसूचना देखील काढण्यात आलेली आहे.

सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी मुंबई मधील जुन्या बंद पडलेल्या विहिरी पुन्हा वापरात आणण्याचा मुद्दा उपस्थित केला. या विषयाच्या संदर्भात लक्षवेधी देखील विचारण्यात आलेली होती. या बंद पडलेल्या विहिरींचा वापर करण्याची परिस्थिती दोन वर्षापूर्वी निर्माण झालेली होती. पिण्याच्या पाण्यामध्ये 10 टक्के आणि व्यापारासाठी 15 टक्के पाणी कपात केली होती. त्यावेळी हा विषय चर्चिला गेला होता. परंतु तशा प्रकारची परिस्थिती आता नाही. मुंबईला आज जवळ जवळ 3450 द.ल.लिटर पाणी मुंबई महानगरपालिका रोज उपलब्ध करुन देत आहे. मध्यवैतरणाचे पाणी मिळाल्यानंतर मुंबईमध्ये पाण्याचा प्रश्न निर्माण होणार नाही. एक गोष्ट मला सांगितली पाहिजे ती म्हणजे, मुंबई महानगरपालिका जेवढे स्वस्त पाणी देते तेवढे स्वस्त पाणी जगामध्ये कुठे मिळत असेल असे मला वाटत नाही.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव....

एमएमआरडीए संबंधी मी वस्तुस्थिती मांडलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते हे नेहमी माध्यमिक शिक्षकांच्या पगाराचा, सहाव्या वेतन आयोगाचा प्रश्न सातत्याने मांडत असतात. त्यांचे म्हणणे असे की, नगरविकास विभागाअंतर्गत महापालिका येते आणि महापालिकेअंतर्गत हे शिक्षक काम करतात. म्हणून त्या शिक्षकांच्या संदर्भातील जी.आर नगरविकास विभागाने काढला पाहिजे असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे आणि या संदर्भातील जी.आर. शिक्षण विभागाने काढला पाहिजे असे नगरविकास विभागाचे म्हणणे आहे. महानगरपालिका, नगरपालिका यांना सहावा वेतन आयोग लागू करायचा की नाही या संदर्भातील निर्णय हा त्या त्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या आर्थिक स्थितीवर अवलंबून राहील असे नगरविकास विभागाने सांगितले होते. सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते हे सातत्याने या विषयाचा पाठपुरावा करीत आहेत. मी एवढेच सांगेन की, जमलेच तर या दोन-तीन दिवसामध्ये बैठक घेऊन नगरविकास विभाग या विषयामध्ये काही मदत करु शकतो की नाही हे निश्चित केले जाईल. त्यानंतर सन्माननीय सदस्यांनी त्यांचे पुढचे प्रयत्न करावेत अशी मी त्यांना विनंती करतो.

सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी 25 कोटी रुपये कसे आले

...नंतर श्री. गिते...

अशुद्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव...

अशा प्रकारचा एक जोरदार प्रश्न या ठिकाणी आम्हाला विचारलेला आहे.

श्री.विक्रम काळे : आपण 25 कोटी रुपयांचा उल्लेख केलेला नाही. आदिवासी विकास विभागाने 25 कोटी रुपये तुम्हाला कसे काय दिले व तुम्ही ते पैसे कसे काय घेतले याचा कृपया माननीय नगरविकास राज्यमंत्र्यांनी खुलासा करावा.

श्री. भास्कर जाधव : माननीय दादा म्हणाले मी उत्तर देतो म्हणून मी त्याचा उल्लेख केला नाही. माननीय उद्योग मंत्री श्री. नारायण राणे हे मांडवा जे.टी.च्या उद्घाटनास गेले होते. त्या जे.टी.च्या ठिकाणी लोकांना बोटीत चढणे तसेच उतरणे कठीण होत होते. त्यामुळे तेथे एक फ्लोटींग जे.टी. व्हावी अशा प्रकारची त्यांनी सूचना केली. या संदर्भात तत्काळ कार्यवाही करा अशी सूचना माननीय उद्योग मंत्र्यांनी तातडीने दिली. मला सांगताना आनंद वाटतो की, तो विषय लक्षात घेऊन त्याची अंमलबजावणी अतिशय गंभीरपणे केली जाईल. मांडवा फ्लोटींग जे.टी. त्याला आपण पालटून म्हणतो. ते लावण्याच्या बाबतीत दिनांक 14.12.2012 निविदा सुध्दा मागविण्यात आल्या आहेत. आता एक नवीन कन्सेप्ट समोर आलेला आहे. फ्लोटींग जे.टी.साठी फायबरचा वापर केला जातो. तशाच प्रकारे आता आर.सी.सी.चे तयार मटेरियल जे देशात कोठेही वापरलेले नाही. ते मटेरिअल आमच्या माहितीमध्ये आलेले आहे. त्यासंबंधीची देखील माहिती विभाग घेत आहे. या बाबतचे प्रेझेंटेशन माननीय श्री.राणे साहेब यांच्या समोर होईल. तशा फ्लोटींग जे.टी. आहेत, त्यांचे आयूर्मान मोठे आहे. आज आपण जे.टी बांधतो त्याच्यापेक्षा 40 टक्के ते 60 टक्के खर्च कमी होतो. 40 टक्के खर्चामध्ये त्या जे.टी.होतील. अशा प्रकारची एक नवीन टेक्नॉलॉजी आपल्या समोर आलेली आहे. त्याचा सुध्दा उपयोग भविष्यामध्ये केला जाईल.

या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी अन्य प्रश्न विचारले आहेत, तसेच काही सदस्यांनी लेखी निवेदन दिलेले असेल, तर त्यांच्या सूचनेचा निश्चितपणे विचार केला जाईल. सर्व सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नांना उत्तरे दिलेली आहेत. त्या सर्वांचे म्हणणे, त्यांचे प्रश्न याची लेखी स्वरुपात नोंद घेण्यात आली आहे.

ॲड.आशिष शेलार : सॉलीड वेस्ट मॅनेजमेंटसाठी एक कमिटी नेमली आहे. या समितीने राज्यात एकाच पध्दतीचे इन्फर्मेशन ट्रिटमेंट झाले पाहिजेत असा अहवाल राज्य शासनाकडे दिला आहे. मोनोपोलॉईल करु नये अशी आमची विनंती आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव : ठीक आहे. अशा पध्दतीचे वेगवेगळे अहवाल आमच्याकडे येत आहेत. नगरपालिकांचे डी.सी.रुल सारखेच असावेत. मुंबई महानगरपालिका सोडून राज्यात ज्या महानगरपालिका आहेत, त्यांच्यासाठी एक कायदा केला. अशा पध्दतीचे वेगवेगळे विषय समोर येत असतात. ते प्रश्न समोर आल्यानंतर तेथील भौगोलिक रचनेशी, तेथील व्यवस्थापनेशी सुसंगत असेल तर राज्य शासन निर्णय घेईल अन्यथा अशा प्रकारचे निर्णय घेणार नाही. राज्य सरकार जे निर्णय घेईल ते लोक हिताचेच असतील एवढे मी या ठिकाणी खात्रीपूर्वक सांगतो. नगरविकास विभागाची मागणी क्रमांक एफ-2,एफ-5 मधील बाब क्रमांक 80 ते 84 या खाली एकूण 25 कोटी रुपयांची मागणी केलेली आहे.

सभापती महोदय, विधी व न्याय विभागाच्या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यांनी एक बाब उपस्थित केलेली आहे. त्याची सुध्दा दखल घेण्यात आलेली आहे.

श्री.रमेश शेंडगे : मुंबईच्या स्वच्छतेच्या बाबतीत काही तरी नियोजन केले पाहिजे..

श्री. भास्कर जाधव : सन्माननीय सदस्यांनी आपले मत व्यक्त करताना जी गोष्ट निदर्शनास आणून दिली आहे, ती माझ्या वाचनात आलेली आहे. या बाबतीत आपण नंतर चर्चा करु. विधी व न्याय विभागाची जे-1,जे-2,जे-4 मधील बाब क्रमांक 135 ते 150 खाली रुपये 67 लाख 82 हजार तसेच भारीत रुपये 83 कोटी 8 लाख 75 हजार, बंदरे विभागाची बाब क्रमांक 7 मधील 29 खाली 36 कोटी 25 लाख तसेच वने विभागाची मागणी क्रमांक 7, सी-10 मधील बाब क्रमांक 47 व 49 खाली 31कोटी रक्कम योजनेतर बाब क्रमांक 48 आणि 50 ते 56 मध्ये 70 कोटी 92 लाख 34 हजार एवढया रकमेची मागणी आहे. तसेच खार जमीन विभागाची मागणी क्रमांक 3 च्या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री.विनायक राऊत यांनी सांगितले की, वेंगुर्ला पासून पालघर पर्यंतच्या जमिनीची धूप होत आहे. कोकणाला 720 कि.मि.एवढा समुद्र किनारा लाभलेला आहे....

यानंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव.....

ब-याच ठिकाणी अशा प्रकारची धूप होत असते. एकाच वेळेला सर्वच ठिकाणी बंधारे बांधणे शक्य होणार नाही. ज्या ठिकाणी तातडीने बंधारा बांधणे आवश्यक होते त्या करिता आर्थिक तरतूद केलेली आहे. सभागृहाने या सर्व विभागांच्या मागण्या एकमताने मंजूर कराव्यात अशी विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक (वित्त व नियोजन राज्यमंत्री) : सभापती महोदय, वित्त, नियोजन व ऊर्जा विभागाच्या पूरक मागण्यांवरील चर्चेमध्ये माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोद तावडे, माननीय सदस्य सर्वश्री मोहन जोशी, रमेश शेंडगे यांनी सहभाग घेतला त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

सभापती महोदय, विरोधी पक्षनेत्यांनी काही विभागाचे चेक्स बँकेमध्ये डिपॉझिट केले जातात त्या संदर्भात मुद्दा मांडला आहे. वित्त विभागाच्या माध्यमातून बँकांना सूचना दिलेल्या आहेत. उपलब्ध तरतुदीच्या मर्यादेत खर्च करावा आणि त्या प्रकारचे चेक्स डिपॉझिट करावेत. या संदर्भातील विस्तृत माहिती स्वतंत्ररित्या सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांना देण्यात येईल.

सभापती महोदय, नियोजन विभागाच्या बाब क्रमांक 196 अन्वये 1.80 लाख रुपये, बाब क्रमांक 198, 205 द्वारे रुपये 73 कोटी, 98 लाख, 04 हजार, बाब क्रमांक 206 व 244 अन्वये रुपये 60 कोटी, 93 लाख, 36 हजार इतका निधी जिल्हा नियोजनाकरिता पूरक मागणीद्वारे घेण्यात आला आहे.

सभापती महोदय, ऊर्जा विभागाची 400 कोटी रुपयांची पूरक मागणी तद्वत वित्त विभागाची 1 हजार रुपयांची लाक्षणिक पूरक मागणी सादर केलेली आहे. या सर्व मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभागाच्या बाब क्रमांक 1 ते 5, 7 व 9 ते 14 वरील चर्चेमध्ये माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोदजी तावडे, माननीय सदस्य सर्वश्री विनायक राऊत, किरण पावसकर, विक्रम काळे, जयंत प्र.पाटील व डॉ.दीपक सावंत यांनी सहभाग घेतला व आपले विचार मांडले आहेत.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी हिवाळी अधिवेशनाचा कालावधी किमान 30 दिवस असावा असा मुद्दा मांडला आहे. वास्तविक सभागृहाचे कामकाज निश्चित करण्याचा अधिकार कामकाज सल्लागार समितीचा आहे. त्या समितीमध्ये सर्वपक्षीय नेत्यांचा समावेश असतो. कामकाज सल्लागार समिती सभागृहाचे कामकाज व कालावधी निश्चित करीत असते. माननीय सदस्यांनी केलेली सूचना स्वागतार्ह आहे.

सभापती महोदय, विकास कामांवर जो खर्च होतो तो खर्च वाढवावा आणि प्रशासकीय खर्च कमी करावा अशा प्रकारची सूचना करण्यात आली आहे. संगणकीकरणामुळे मनुष्यबळ कमी करता येते ही सूचना केलेली आहे ती सजेशन फॉर ॲक्शन अशीच आहे. अनेक योजना अशा आहेत, ज्या योजनांचा प्रशासकीय खर्च देखील त्यात अंतर्भूत असतो. आपल्याला दिसते तसे नसते. त्यामुळे योजनेचा खर्च जास्त दिसून येतो.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोदजी तावडे यांनी आदर्श सहकारी गृहनिर्माण संस्थेतील अनियमिततेची चौकशी करण्यासाठी आयोग नेमल्याबाबतचा मुद्दा उपस्थित केला आहे.

नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान .....

सभापती महोदय, 8 जानेवारी, 2011 रोजी अधिसूचनेच्या अन्वये उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधीश श्री.जे.ए.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली या आयोगाची काम केले जात आहे. दि. 14.4.2012 रोजी मुद्दा क्रमांक 1 व 2 च्या बाबतीतील इंग्रजी भाषेतील अहवाल प्राप्त झालेले आहेत. दि. 17.4.2012 रोजी यासंदर्भातील ॲक्शन टेकन रिपोर्ट दोन्ही सभागृहात मांडण्यात आलेले आहेत. राहिलेल्या 11 मुद्यांच्या बाबतीतील शिफारसी करण्यासाठी शासनाने दिनांक 31 डिसेंबर, 2012 पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे.

सभापती महोदय, स्व. यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दी महोत्सवाच्या बाबीत 100 कोटी रुपयांचा खर्च कशा प्रकारे करण्यात आलेला आहे या बाबतीत विचारणा करण्यात आलेली आहे. यासंदर्भात मी सांगू इच्छिते की, आतापर्यंत यासंदर्भात एकही रुपया खर्च झालेला नाही. ज्या विभागाने मागणी केली आहे त्या विभागाची मागणी वित्त विभागाकडे मान्यतेसाठी सादर करण्यात आलेले आहे.

सभापती महोदय, मतदार यादीमध्ये दुरुस्ती व सॉफ्टवेअरचे अपग्रेडेशन करण्याबाबत सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी मुद्दा उपस्थित केलेला आहे. निवडणूक सॉफ्टवेअरचे अपग्रेडेशन भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांच्याकडून होत असते त्यामुळे ही बाब राज्यशासनाच्या अखत्यारीत येत नाही एवढेच मी या निमित्ताने सांगू इच्छिते.

सभापती महोदय, आधार कार्डच्या मोहिमेच्या संदर्भात सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी मुद्दा उपस्थित केला असून याबाबतीत मी सांगू इच्छिते की, आधार कार्डच्या मोहिमेला अधिक गती देण्याची आवश्यकता असून त्या प्रमाणे पाऊल उचलण्यात येत आहे. आधार कार्डची नोंदणी करणाऱ्या ज्या नोंदणीकृत संस्था आहेत त्यांची संख्या 2000 वर गेलेली आहे. बँकसह नॅशनल पॉप्युलेशन रजिस्टारकडे नोंदणी करण्याची परवानगी देण्यात आलेली आहे. गृहनिर्माण सोसायटी, शाळा अशा ठिकाणी 300 पेक्षा जास्त संस्थेला नोंदणी करण्याची परवानगी देण्यात आलेली आहे. या सर्व उपाययोजनेमुळे आधार योजनेची गती निश्चितपणे वाढली जाणार आहे. आधारकार्डच्या मोहिमेमध्ये संपूर्ण देशात महाराष्ट्राचा दुसरा क्रमांक आलेला आहे. एसीएसने केंद्राला अनेकवेळा पत्र लिहिले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान .....

असून पोस्ट ऑफिस आणि दुसऱ्या काही ऑथेंटीक ठिकाणी आधार कार्ड सुरु करणे तसेच त्याची गती वाढण्याची बाब कळवली असून वेबसाईटवर तसेच सीएसई सेंटरच्या माध्यमातून सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्याचा सुध्दा विचार सुरु आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी माहिती फलक लावण्याची सूचना केली असून त्यासंदर्भात सजेशन फॉर ॲक्शन एवढेच मी या निमित्ताने सांगू शकते.

सभापती महोदय, भाई कोतवालच्या बाबतीत कार्यवाहीची माहिती नंतर देण्यात येईल. पत्रकारांवरील हल्ला या संदर्भातील बिल शासनाच्या विचाराधीन आहे.

सभापती महोदय, या चर्चेमध्ये अनेक सदस्यांनी सहभाग घेतला आहे त्यामुळे माझ्या विभागाच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी विनंती करते.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी मागण्या मंजूर करण्याची विनंती करण्यापूर्वी मी असे विचारु इच्छितो की, स्व.यशवंतराव चव्हाणांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त 100 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. या तरतुदीची कुणीही मागणी केली नाही, वापर केला नाही अशा प्रकारे मंत्रीमहोदयांनी जी माहिती दिली ती बरोबर आहे काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, स्व.यशवंतराव चव्हाणांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने सर्व विभागांनी मागणी केली असून ज्यांनी ज्यांनी मागणी केली आहे त्यांना तो निधी देण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर (उद्योग राज्यमंत्री) : सभापती महोदय, उद्योग विभागाच्या मागणीच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. या चर्चेच्या निमित्ताने सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी चांगली सूचना केली असून याबाबतीत शासनाच्या स्तरावर डीनोटीफिकेशनची कार्यवाही सुरु असून याबाबत माझी माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर चर्चा देखील झाली आहे.

यानंतर श्री. ओटवणेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर...

डी-नोटिफिकेशनची कार्यवाही दोन महिन्यामध्ये आपण करू या. या चर्चेच्या निमित्ताने ज्या काही सूचना करण्यात आल्या आहेत त्या पूर्ण करण्याचे काम विभागाच्या माध्यमातून केले जाईल. तेव्हा बाब क्रमांक 151, 152, 158, 159 अंतर्गत रूपये 510 कोटी 98 लाख 42 हजारची मागणी मान्य करावी अशी मी विनंती करतो.

.....

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे (पाणी पुरवठा आणि स्वच्छता राज्यमंत्री) : सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाब क्रमांक 86 ते 117 अशा मिळून जवळ पास 32 मागण्या आहेत. या मागण्यांवर सन्माननीय सदस्य सर्वश्री किरण पावसकर, प्रकाश बिनसाळे आणि मोहन जोशी यांनी सूचना केल्या आहेत. त्याचा आम्ही निश्चितपणे विचार करू.

त्याच प्रमाणे अन्न व नागरी पुरवठा विभागाची बाब क्रमांक 180 ही जवळपास 25 कोटी रूपयांची पूरक मागणी आहे.

पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाची बाब क्रमांक 307 ही 2 कोटी 53 लाखाची मागणी आहे. मी सभागृहाला विनंती करतो की, या विभागाच्या मागण्यांना मान्यता द्यावी.

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, मदत व पुनर्वसन खात्याच्या मागणी क्रमांक सी-1, सी-5 व सी-6 या खालील बाब क्रमांक 35 व 40 ते 46 अन्वये रूपये 578 कोटी 78 लाख 49 हजार योजनेतर पूरक मागण्या सभागृहामध्ये मी मांडतो व त्यास सर्वांनी पाठिंबा द्यावा अशा प्रकारची विनंती करतो.

त्याच प्रमाणे महसूल विभागाच्या मागणी क्रमांक सी-1 व सी-4 या खाली बाब क्रमांक 31 ते 34, 36, 37 अन्वये रूपये 11 कोटी 48 लाख 57 हजार योजनेतर व बाब क्रमांक 38, 39 अन्वये रूपये 40 लाख 32 हजार योजनांतर्गत अशा एकूण रूपये 11 कोटी 88 लाख 89 हजार रकमेच्या पूरक मागण्या सभागृहाने मान्य कराव्यात अशी विनंती करतो.

सहकार विभागाच्या पृष्ठ क्रमांक 348 व 240 वरील बाब क्रमांक 276 ते 278 अंतर्गत योजनेतर रूपये 44 लाख 99 हजार आणि बाब क्रमांक 279, 281, 284, 286 तील योजनांतर्गत योजनांसाठी 50 कोटी 45 लाख 2 हजार अशा एकूण रूपये 50 कोटी 90 लाख 1 हजार एवढ्या रकमेच्या पुरवणी मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी विनंती करतो.

या सभागृहातील ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेब यांनी महसूल विभागाच्या मागण्यांवर बोलताना मुद्रांक कार्यालयातील अनेक प्रश्नांवर उहापोह केला आहे. आय-सरिताच्या माध्यमातून आपण नवीन प्रणाली उपयोगात आणत आहोत. यासंबंधातील सविस्तर अडचणी त्यांनी येथे मांडलेल्या आहेत. त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यासंबंधी मी एवढेच सांगतो की, 20 रूपये दस्त हाताळणी शुल्क आहे, त्यातील साडेबारा रूपये हे बीओटी ऑपरेटरकडे व उर्वरित रक्कम आपण पीएलएकडे जमा करतो.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके...

त्यातून बीओटी ऑपरेटरच्या डिव्हजनवाईज टेंडरमध्ये आलेल्या दरानुसार त्यांना ती रक्कम दिली जाते हे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी सिक्युरिटी ऑडीटचा प्रश्न उपस्थित करण्यात आला. मला हे मान्य आहे की, अजून सिक्युरिटी ऑडीट झालेले नाही. त्याचे टेंडर आम्ही काढलेले आहे आणि हे काम येत्या दीड महिन्यामध्ये पूर्ण होईल अशी माझी अपेक्षा आहे. यामध्ये कनेक्टीव्हीटीच्या अडचणी आहेत. आपण मुंबई शहरात एमटीएनएल आणि इतर भागात बीएसएनएलकडून कनेक्टीव्हीटी घेतलेली आहे. पर्यायी नेटवर्कचे काम सुरु आहे. तेव्हा नेटवर्कमध्ये येणाऱ्या अडचणी येत्या आठ-दहा दिवसांत दूर होतील.

सभापती महोदय, डेटा एन्ट्री सर्व्हरच्या बाबतीत देखील काही प्रश्न आहेत. काही सॉफ्टवेअरचे प्रश्न आहेत. आय-सरिता सॉफ्टवेअर रुळायला थोडा वेळ लागत आहे. तेव्हा दस्त नोंदणीमध्ये काही अडचणी आल्यास दस्त नोंदणी मॅन्युअली नोंदविण्याबाबत दुय्यम निबंधकांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

सभापती महोदय, महिला शासकीय कर्मचाऱ्यांना कार्यालयीन वेळेनंतर उपस्थित राहता येत नाही. ज्या दुय्यम निबंधक कार्यालयामध्ये दोन पाळ्यांमध्ये कामे सुरु आहेत तेथून अद्याप एकही तक्रार प्राप्त झालेली नाही. परंतु शक्यतो दुपारच्या पाळीमध्ये पुरुष कर्मचाऱ्यांना डयुटी देण्याचा आमचा प्रयत्न सुरु आहे.

सभापती महोदय,ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जी तक्रार येथे सांगितली त्याची निश्चितपणे चौकशी करण्यात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी रेती उत्खननासाठी सक्शन पंपाचा वापर करण्यात येत आहे असे सांगितले. उत्खननाच्या बाबतीत मुंबई आणि उपनगरांमध्ये भ्रष्टाचार होत आहे असाही उल्लेख करण्यात आला. त्याबाबत निश्चितपणे आावश्यक ती चौकशी करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके...

सन्माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे यांनी घटना दुरुस्तीचा उल्लेख केला. 97 व्या घटना दुरुस्तीच्या संदर्भात ओबीसी आणि विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गाचे आरक्षण कमी होणार आहे असे त्यांनी सांगितले. ही बाब निश्चितपणे आमच्या विचाराधीन आहे आणि त्या जातींचा कशाप्रकारे समावेश करता येईल ही बाब तपासून त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

माझी सभागृहाला विनंती आहे की, मदत व पुनर्वसन, महसूल आणि सहकार विभागाच्या मागण्या मंजूर कराव्यात.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, गृह विभाग आणि ग्राम विकास विभागाच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी विनंती करतो. एकूण 11 बाबी आहेत. सदर मागणींवरील रक्कम रुपये 54 कोटी 87 लाख इतकी आहे.

श्री.विनोद तावडे : सन्माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे यांनी सांगितले की, महिला असुरक्षित आहेत त्याबाबत देखील आपण उत्तर द्यावे अशी माझी मंत्री महोदयांना विनंती आहे.

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनी उपस्थित केलेले मुद्दे मग त्यामध्ये आझाद मैदानासंबंधी आलेली माहिती असेल किंवा इंटेलिजन्ट विभागाला आलेले पैसे असतील त्याबाबत सांगू इच्छितो की, आजपर्यंत इंटेलिजन्ट विभागाच्या माध्यमातून अनेक गोष्टी उघडकीस आलेल्या आहेत. तेव्हा इंटेलिजन्ट विभागासाठी करण्यात आलेली तरतूद योग्य आहे.

सभापती महोदय, पालघर प्रकरणानंतर सेक्शन 66 ए मध्ये काही बदल करण्याचा केंद्र सरकार विचार करीत आहे. माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनी उपस्थित केलेल्या सर्व मुद्यांचा आम्ही विचार करीत आहोत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, पालघर प्रकरण झाले त्यापूर्वी सेक्शनमध्ये बदल करण्याचा केंद्र सरकारचा विचार नव्हता आणि कोणतेही नियम नव्हते. एखाद्या पोलीस अधिकाऱ्याने कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने त्यावेळी केलेली कृती ही त्याला ताकीद देऊन सोडण्यासारखी असताना केवळ दिल्लीचा दबाव आहे,

यानंतर श्री.सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

आणि मुस्लिम लोक आहेत म्हणून एका सचोटीने वागणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याचे निलंबन करता हे कोणत्या कायद्याचा आधार घेऊन आपण केले ते आम्हाला सांगितले पाहिजे. आपण केवळ दिल्लीहून दबाव आला म्हणून सर्वांचे निलंबन करुन टाकले. त्या मुलींचा कुणी छळ केला होता काय, हजारो माणसे, जमाव त्या ठिकाणी जमा झाल्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला होता म्हणून सावधगिरीची उपाय योजना म्हणून त्या मुलींना पोलीस स्टेशनला बोलावून घेण्यात आले. एवढया एका कारणासाठी आपण एका प्रामाणिक अधिकाऱ्याला घरी पाठविले, आपण दिल्ली, दिल्ली सारखे कशासाठी सांगत आहात, महाराष्ट्राचे सरकार दिल्ली हाकणार आहे काय, याचे कारण आपण या ठिकाणी सांगणार आहात की नाही?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्यांकडून या ठिकाणी विषयांतर होत आहे. दिल्लीचा विषय या ठिकाणी काढण्याची गरज नाही. जी काही घटना घडली त्याबाबत सर्वच माध्यमातून त्याबाबत चर्चा केली. सर्व स्तरावरील लोकांनी अनेक गोष्टींचा ऊहापोह केला. त्यानंतर आय.जी. स्तरावर या करिता एक समिती नेमण्यात आली. त्या बाबतचा अहवाल आल्यानंतर सर्व प्रशासकीय बाबी तपासून कारवाई करण्यात आली आहे. त्यामुळे दिल्लीचा दबाव असण्याचा प्रश्न उदभवत नाही हे मला या ठिकाणी स्पष्ट करावयाचे आहे. शासनाने आय.पी.एल. साठी सुरक्षा व्यवस्था पुरविण्याचे काम केले आहे. त्या संदर्भातील एक प्रकरण मुंबई उच्च न्यायालयामध्ये प्रलंबित आहे. ती बाब न्यायप्रविष्ठ असल्यामुळे त्या संदर्भात या ठिकाणी काहीही बोलता येणार नाही. सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी खारचा विषय या ठिकाणी मांडला आहे ती वस्तुस्थिती आहे. त्या ठिकाणी बांधण्यात आलेले पोलीस स्टेशन नियमित करण्याचा प्रस्ताव आपण सादर करीत आहोत. त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्य सर्वश्री किरण पावसकर, सुभाष चव्हाण यांनी सायबर गुन्ह्यांच्या संदर्भात सूचना केल्या आहेत त्या संदर्भात देखील निश्चितपणे विचार केला जाईल. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी उपस्थित केलेल्या मुद्याच्या संदर्भात सांगू इच्छितो की, शासनाने जवळ जवळ 286 लोकांची भरती केली असून पुढील भरतीची प्रक्रिया आपण सुरु केली आहे. त्यासाठी लागणाऱ्या कर्मचारी वर्गासाठी एक स्वतंत्र केडर तयार करुन पुढील भरती प्रक्रिया आपण सुरु करीत आहोत. जेणेकरुन सागरी सुरक्षा व्यवस्था करण्यासाठी उपाय योजना करण्याचा आमचा प्रयत्न राहील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील ....

सन्माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यांनी पुणे येथील वाहतूक व्यवस्थेच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केला आहे. त्याकरिता वाहतूक पोलीस नेमण्यासाठी आवश्यक असलेली तरतूद करण्यात येईल. त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्य सर्वश्री विनायक राऊत, रमेश शेंडगे, या सर्वांनी केलेल्या सूचनांबाबत निश्चितपणे कार्यवाही केली जाईल.

सभापती महोदय, केंद्र शासनाच्या धर्तीवर सी.सी.टी.व्ही. चा प्रयोग आपण करीत आहोत. या राज्यातील सर्वच पोलीस स्टेशन भविष्य काळात कॉम्प्युटराईज केले जाणार आहेत. त्यामुळे भविष्यकाळात संगणकीकरणाचा विषय निश्चितपणे मार्गी लागेल. त्याचप्रमाणे शिक्षकांच्या संदर्भात काही प्रश्न निर्माण झाल्यास शिक्षक आमदार प्रतिनिधींना तात्काळ ई-मेलव्दारे कळविण्याची व्यवस्था करण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी सांगितले की, या प्रकरणामध्ये दिल्लीचा संबंध नसून हा राज्याच्या अखत्यारीतील विषय आहे.पालघरच्या प्रकरणात त्या अधिकाऱ्यांनी मुलींना अटक केली म्हणून तुम्ही त्यांना निलंबित केले. तर मग माझा प्रश्न असा आहे की, आझाद मैदानावर आलेल्या मोर्चामध्ये एकही महिला सहभागी झालेली नसतांना तेथील बंदोबस्तासाठी ज्या पोलीस अधिकाऱ्यांनी महिला पोलीस कर्मचाऱ्यांना नेमले त्यांच्यावर आपण कारवाई का करीत नाही? त्या अधिकाऱ्याने महिला पोलीस कर्मचाऱ्यांना त्या ठिकाणी नेमले नसते तर महिला पोलीस कर्मचाऱ्यांची झालेली निर्भत्सना महाराष्ट्राला पहावयास मिळाली नसती. त्या संबंधित अधिकाऱ्यांवर आपण कारवाई का करीत नाही?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, त्या प्रकरणी पोलीस आयुक्तांवर कारवाई करण्याची भूमिका राज्य सरकारने घेतली आहे. त्यामुळे बंदोबस्तासाठी आवश्यक असणारी पोलीस यंत्रणा त्या ठिकाणी आपण नेहमी लावीत असतो. एवढे बोलून सभागृहाने गृह विभागाच्या मान्य कराव्यात अशी विनंती करतो.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी आता उत्तर देतांना सांगितले की, मुंबईच्या पोलीस आयुक्तांवर आम्ही कारवाई केली आहे. याचा अर्थ मुंबईच्या पोलीस आयुक्त पदावरुन त्यांना बढती दिली याला आपल्या आघाडीच्या सरकारमध्ये कारवाई म्हणतात काय? त्याबाबत मंत्रीमहोदयांनी माहिती द्यावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, गृह विभागाबरोबरच ग्राम विकास विभागाच्या मागण्या देखील सभागृहामध्ये चर्चेकरिता मांडण्यात आल्या होत्या. या विभागाशी संबंधित बाब क्रमांक 160 ते 179 पर्यंतच्या 20 बाबींवरील 667 कोटी 87 लाख 90 हजार रुपयांच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी विनंती करतो.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील . . .

या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्रा.पाटील साहेबांनी उपस्थित केलेल्या स्थळ, ग्राम पंचायत विभाजनाच्या मुद्याबाबत मी यापूर्वीच बोललेले आहे आणि त्याठिकाणी याची कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाली असून याबाबत निश्चितपणे निर्णय घेतला जाईल. त्याचबरोबर भीमाशंकर आणि अष्टविनायक या तीर्थक्षेत्रांच्या बाबतीत सांगावयाचे तर भीमाशंकर या तीर्थक्षेत्राला "ब" वर्गाचा दर्जा दिलेलाच आहे. तसेच अष्टविनायक देखील पर्यटन स्थळामध्ये असल्यामुळे त्या साठी निधी दिला जाईल. या सर्व मागण्या मंजूर कराव्यात अशी विनंती करतो.

. . . .4 ओ-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.डी.पी.सावंत (उच्च व तंत्रशिक्षण विभाग) : सभापती महोदय, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या पुरवणी मागण्यांच्या संदर्भात सभागृहाचे सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोदजी तावडे, सन्माननीय सदस्य सर्वश्री.भगवान साळुंखे, डॉ.दीपक सावंत, रामनाथ मोते आणि विक्रम काळे इ.सन्माननीय सदस्यांनी काही सूचना केलेल्या आहेत.

सभापती महोदय, श्री.विनोदजी तावडे यांनी अभिनव कला महाविद्यालयामधील कर्मचाऱ्यांचे चार महिन्याचे पगार थकल्याच्या संदर्भातील बाब निदर्शनास आणून दिले आहे. याबाबत सांगावयाचे तर ऑगस्ट महिन्यापासूनचा पगार त्यांच्या खात्यामध्ये जमा झालेला आहे फक्त त्याचे वितरण झाले नाही. आम्ही याबाबत चौकशी करु आणि . . . .

श्री.विनोद तावडे (खाली बसून) : अभिनव कला महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांना लवकर पगार देण्यात यावेत.

श्री.डी.पी.सावंत : सभापती महोदय, या कर्मचाऱ्यांना लवकरात लवकर पगार कसा मिळेल या दृष्टीने कार्यवाही करु असे मी सदनाला आश्वस्त करु इच्छितो. सन्माननीय सदस्य श्री.भगवान साळुंखे यांनी कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठाला शासनाने एकंदर 70 कोटी रुपये दिले असून त्याला तत्वत: मान्यता दिलेली आहे. मात्र चालू वर्षी फक्त 3 कोटी रुपयांचे प्रयोजन केलेले आहे. तसेच 70 कोटी रुपये हे टप्प्याटप्प्याने तीन वर्षामध्ये देण्याचे मान्य केले आहे. त्यामुळे शिवाजी विद्यापीठाला गोल्डन ज्युबिलीच्या संबंधात आश्वासन दिलेले आहे ते नक्की पूर्ण होईल हे मी सांगू इच्छितो. तसेच सन्माननीय सदस्यांनी 200 कोटी रुपयाच्या संबंधात सांगितले. त्याबाबत सांगू इच्छितो की, हा निधी परमनन्ट नॉन ग्रँट सॅलरीसाठी नाही. आम्ही वित्त विभागाकडे साडेसतरा कोटी रुपयांची मागणी केली होती. त्याबरोबर इतरही अनेक मागण्या होत्या. त्यामध्ये सहाव्या वेतन आयोगाच्या दहा महिन्याच्या थकीत वेतनाच्या फरकाची 400 कोटी रुपये इतकी रक्कम द्यावयाची होती. त्याबाबत सांगावयाचे तर आपण जूनमध्येच 200 कोटी रुपयांचे पेमेंट केलेले आहे. त्यावर आपण परतावा म्हणून रक्कम मागितली होती. त्यामध्ये ग्रँटच्या 60 टक्के डी.ए.चे, सी.एच.बी.चे, मेडिकल आणि लीव्ह इन्कॅशमेंट अशा अनेक बाबींसाठी मागणी केली होती आणि त्यामध्ये आपल्याला 717 कोटी रुपयांपैकी 200 कोटी रुपये मान्य झालेले आहेत आणि आपण त्यातून पेमेंट करणार आहोत.

सन्माननीय सदस्य श्री.भगवान साळुंखे यांनी सांगितले की, 100 टक्के अनुदान मंजूर झाले आहे. तर याबाबत सांगावयाचे तर त्याच्या पेमेंटसाठी आपण पुरवणी मागण्यांमध्ये प्रयोजन केलेले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे.विक्रमगड येथील आदिवासी भागातील महाविद्यालयांमधील गैरप्रकाराबाबत सन्माननीय सदस्यांनी सांगितले. याबाबत सह संचालक, उच्च शिक्षण यांच्याकडून अहवाल घेऊन वस्तुस्थितीच्या आधारे आणि विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन याबाबत जी काही कार्यवाही करावयाची आहे ती करु. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, महाविद्यालयीन शिक्षकेतर 240 ऐवजी 300 दिवसाचे अर्जित रोखेकरण करणे गरजेचे आहे. यासाठी शासनाचे इतर विभागासाठी जे आदेश आहेत तो तपासून या विभागाला ते लागू करण्यासाठी नक्की प्रयत्न करु.

सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी विक्रमगड येथील आय.टी.आय.च्या भ्रष्टाचारा चौकशी बाबत मुद्दा उपस्थित केला होता. आपल्याला माहिती असेल की, सहसंचालकांच्या मार्फत त्रि-सदस्यीय समितीने चौकशी केलेली असून विक्रमगड पोलीस स्टेशन येथे दि.9-12-2012 रोजी गुन्हा दाखल झाला आहे. यामध्ये जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर कारवाई केली जाईल. तसेच खाजगी आय.टी.आय.यांना अनुदान देण्यासंबंधात येथे चर्चा झाली. 2001 पासून शासनाने कायम विना अनुदानितचे धोरण स्वीकारलेले आहे. त्यामुळे 2001 नंतरचे अनुदान देणे शक्य होणार नाही. परंतु 2000 च्या पूर्वीच्या ज्या आय.टी.आय.आहेत त्या संदर्भात देखील आमच्याकडे एक मागणी आलेली असून तो प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. एवढे मी यानिमित्ताने आपल्याला सांगू इच्छितो. याठिकाणी उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केल्या होत्या, त्याबाबत मी माहिती दिली आहे.

सभापती महोदय, वैद्यकीय शिक्षणाच्या संदर्भात माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोदजी तावडे, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत आणि सन्माननीय सदस्य श्री.मोहन जोशी यांनी काही सूचना केल्या होत्या.

सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी जे.जे.हॉस्पिटल मधील डॉ.सिध्दीकी यांच्या संबंधात तक्रार केली होती त्याबाबत आपण जरुर चौकशी करु. त्यांच्या विरोधामध्ये खाजगी स्वरुपामध्ये प्रॅक्टीस केल्याच्या संबंधातील एक बाब सिध्द झाली असून त्याबाबत चौकशी सुरु आहे. त्या चौकशीमध्ये सन्माननीय सदस्यांनी 50 व्हॅट आणि 100 व्हॅटचा जो मुद्दा सांगितला आहे, त्याचा या चौकशीमध्ये अंतर्भाव करुन संबंधितांची जरुर चौकशी करु.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी मेयोच्या बी.ओ.टी.संदर्भात जे सांगितले त्या ट्राय पार्टी ॲग्रीमेंट संबंधात कॅबिनेट, वित्त विभाग आणि नगरविकास विभागाची परवानगी घेण्याचे काम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सुरु आहे आणि आमची ही जबाबदारी आहे की, मेयो हॉस्पिटलचे काम लवकरात लवकर मार्गी लागले पाहिजे. सन्माननीय सदस्यांनी ग्लोज खरेदीबाबत सांगितले. पण आमच्या माहिती नुसार दर करारानुसारच खरेदी करण्यात आली आहे. जर ही खरेदी ब्लॅक लिस्टेड पार्टीकडून केली असेल तर त्याबाबत जरुर चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करण्यात येईल.

यानंतर श्री.बरवड . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. डी. पी. सावंत ....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यांनी ससून येथे यंत्रसामुग्री खरेदीसाठी निधी देण्याबाबत मागणी केली. मी सांगू इच्छितो की, या वर्षी प्लॅनमधून आपण 2 कोटी 5 लाख 71 हजार रुपयांची तरतूद ससून हॉस्पिटलकरिता 17 प्रकारची विविध यंत्रे खरेदी करण्यासाठी केलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. विनोदजी तावडे यांनी नर्सिंग कॉलेजच्या संदर्भात सांगितले. नर्सिंगची जवळजवळ 1278 पदे रिक्त आहेत. आम्ही परीक्षा घेऊन वेटिंग लिस्ट सुध्दा तयार केली होती. परंतु शासनाने 3 टक्केचा जो आदेश काढला त्यामध्ये हे आलेले आहे. त्यामुळे आम्ही सामान्य प्रशासन विभागाला वेगळी विनंती करीत आहोत की, लवकरात लवकर आम्हाला पदे भरण्याची परवानगी द्यावी.

सभापती महोदय, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या बाब क्रमांक 287 ते 301 पर्यंतच्या एकूण 348 कोटी 19 लाख 66 हजार एवढ्या रकमेच्या पुरवणी मागण्यांना सभागृहाने मान्यता द्यावी अशी मी आपल्यामार्फत सभागृहाला विनंती करतो. तसेच वैद्यकीय शिक्षण विभागाच्या बाब क्रमांक 252 ते 259 पर्यंतच्या एकूण 58 कोटी 33 लाख 37 हजार रुपयांच्या पुरवणी मागण्यांना सभागृहाने मान्यता द्यावी अशी आपल्यामार्फत सभागृहाला विनंती करतो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुलाबराव देवकर (परिवहन राज्यमंत्री) : सभापती महोदय, परिवहन विभागाच्या बाब क्रमांक 23, 24 व 25 अंतर्गत 16 कोटी 87 लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या केलेल्या आहेत. या मागण्यांच्या बाबतीत सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे, सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर तसेच सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांनी काही सूचना केलेल्या आहेत.

सभापती महोदय, प्रामुख्याने माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे यांनी उल्लेख केला की, ओव्हरलोड वाहनांच्या बाबतीत कडक कारवाई झाली पाहिजे. मी सांगू इच्छितो की, गेल्या चार वर्षामध्ये ओव्हरलोडच्या संदर्भामध्ये जास्तीत जास्त कडक कारवाई करण्याचा प्रयत्न आपण केलेला आहे. 1.4.2011 पासून 31.3.2012 पर्यंत जवळपास 13 लाख 42 हजार वाहनांची तपासणी केली. त्यापैकी 48 हजार 32 वाहने दोषी आढळून आली. त्यामध्ये 48 कोटी रुपयांचा दंड वसूल केलेला आहे. यामध्ये आणखी लक्ष देण्याची आवश्यकता आहे पण कर्मचारी कमी असल्यामुळे ही मोहीम आपण पाहिजे तशी राबवू शकत नाही. परंतु आता लवकरात लवकर कर्मचाऱ्यांची पदे भरत आहोत आणि या माहिमेमध्ये जास्तीत जास्त लक्ष घालावयाचे आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांनी सांगितले की, 200 कोटी रुपयांचा घोटाळा झालेला आहे. मी नमूद करु इच्छितो की, 200 कोटी रुपयांच्या घोटाळ्याच्या संदर्भात महामंडळ किंवा शासनाने कोठेही उल्लेख केलेला नाही. इटीआयएम मशिनच्या संदर्भातील चौकशीच्या बाबतीमध्ये जे उप व्यवस्थापक श्री. मुंबाळ आहेत त्यांची चौकशी सध्या चालू आहे. त्यानंतर त्या संदर्भातील निर्णय घेतला जाईल. सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी असा उल्लेख केला की, कोकणामध्ये बस स्थानकांची परिस्थिती अत्यंत बिकट झालेली आहे. त्या बाबतीत सुध्दा निश्चितपणे प्राधान्याने दुरुस्तीच्या संदर्भात आणि सुधारणेच्या संदर्भात कामे केली जातील.

सभापती महोदय, मी परिवहन विभागाच्या बाब क्रमांक 23, 24 व 25 अंतर्गत 16 कोटी 87 लाख रुपयांच्या सादर केलेल्या पुरवणी मागण्या मंजूर कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. संजय देवतळे (सांस्कृतिक कार्य मंत्री) : सभापती महोदय, मराठी भाषा विभागाच्या पुरवणी मागण्या क्रमांक झेडएफ -02 मधील बाब क्रमांक 320 व 321 अंतर्गत 91 लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर करण्यात आलेल्या आहेत. या मागण्यांवरील चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी वाङमयीन पुरस्कारामध्ये वाढ करावी अशी मागणी केली. शासनाने 2012-2013 पासून वाङमयीन पुरस्कारामध्ये ज्या ठिकाणी 30 हजार रुपये रक्कम देत होतो ती 50 हजार केलेली आहे आणि ज्या ठिकाणी 50 हजार रुपये देत होतो त्या ठिकाणी 1 लाख रुपये अशा पध्दतीने वाढ केलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते साहेबांनी मराठी भाषा विभाग सक्षम करण्यासाठी निधी मंजूर करावा

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय देवतळे...

आणि भाषा विभागामध्ये सक्षम अधिकारी आणि कर्मचा-यांची नियुक्ती करावी अशी मागणी केली. या पुरवणी मागण्यामध्ये महाराष्ट्र-कर्नाटक सीमा भागातील मराठी भाषिक संस्थांसाठी मराठी भाषा आणि साहित्य आणि संस्कृती विकासाकरिता सन 2012-13 पासून 50 लाख रुपयाची तरतूद केलेली आहे. या विभागामध्ये 13 अधिकारी आणि 40 कर्मचारी अशी 53 पदे मंजूर असून सध्या 10 अधिकारी आणि 24 कर्मचारी अशी 34 पदे भरलेली आहेत. उर्वरित पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी अंबेजोगाई येथे विद्यापीठ स्थापन करण्याची मागणी केली होती. हा विषय उच्च व तंत्र शिक्षण विभागाशी संबंधित आहे. तथापि मराठीच्या अनुषंगाने भाषा सल्लागार समितीच्या बैठकीत हा विषय ठेऊन उच्च व तंत्र शिक्षण विभागाला अभिप्राय कळविण्यात येईल.

सभापती महोदय, मराठी भाषा विभागाची मागणी क्रमांक झेडएफ-2 मधील बाब क्रमांक 320 आणि 321 मध्ये करण्यात आलेल्या 91 लाख रुपयाच्या पुरवणी मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी विनंती करतो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते (आदिवासी विकास मंत्री) : सभापती महोदय, आदिवासी विकास विभागाच्या बाब क्रमांक 260 ते 275 मधील 240 कोटी रुपयाच्या मागण्या संमत कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करतो.

सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी सूचना केल्याप्रमाणे लिक्विड परफॉर्मर पूर्ण तपासल्या शिवाय घेत नाही. त्यांनी सांगितल्या प्रमाणे ते तपासून घेतले जाईल. कोर्टात दाखल झालेल्या पीआयएलचा उल्लेख सन्माननीय सदस्यांनी केला. 2005-06 आणि 2006-07 मधील एकूण खरेदी 70 कोटी रु.ची आहे आणि त्यामध्ये 6 हजार कोटीचा घोटाळा झालेला आहे असे सांगितलेले आहे. त्याबाबतीत आम्ही कोर्टामध्ये ॲफिडेव्हिट सादर करु.

. सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी आश्रमशाळेच्या संदर्भात सूचना केली. 28 कोटी रुपये वर्ग केलेले आहेत. त्यामुळे तो प्रश्न सुटेल. वेळेच्या संदर्भात त्यांनी सूचना केली. आश्रमशाळा या निवासी शाळा आहेत. निवासी शाळा सकाळ पासून सुरु होतात. त्यामुळे चर्चा करुनच वेळ बदलली जाईल. सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी पीडीएस मार्फत धान्य द्यावे असे सांगितले. तशा प्रकारचा प्रयोग आम्ही धारणीमध्ये केलेला होता. परंतु तो अयशस्वी ठरला. धान्य वेळेवर पोहोचले पाहिजे. धान्य देण्याच्या बाबतीत कोणतीही अडचण येत नाही. सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी 25 कोटी रुपयाच्या मागणीचा उल्लेख केला. ही मागणी कशी आली हा संशोधनाचा विषय आहे. ही मागणी मंजूर झाली तरी चौकशी केल्या शिवाय पैसे दिले जाणार नाहीत. तेव्हा सभागृहाने या मागण्या मंजूर कराव्यात अशी मी विनंती करतो.

उप सभापती : सन 2012-2013च्या पूरक मागण्यांवर सभागृहाने विचार केला आहे.

--

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी

(दुसरी सुधारणा विधेयक)

मु. शी. :

L.C. BILL NO. XIII OF 2012

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.)

AND MOTIONS FOR REFERRING THE BILL TO JOINT COMMITTEE.

श्री. भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2012 चे वि. प. वि. क्रमांक 13 महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव दिलेला आहे. त्यांनी तो मांडावा.

(प्रस्ताव मांडण्यात आला नाही.)

उप सभापती : सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव दिलेला आहे. त्यांनी तो मांडावा.

(प्रस्ताव मांडण्यात आला नाही.)

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री. विनायक राऊत यांनी विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव दिलेला आहे. त्यांनी तो मांडावा.

(प्रस्ताव मांडण्यात आला नाही.)

उप सभापती : आता मी विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

खंड 2 ते 4 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2012चे वि.प.वि.क्रमांक 13 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती : सन 2012चे वि.प.वि. क्रमांक 13 संमत झाले आहे.

...नंतर श्री. गिते...

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: ग्रामपंचायत (तिसरी सुधारणा)विधेयक.

मु.शी.:

L.A. BILL NO. XXIX OF 2012

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA VILLAGE PANCHAYATS ACT.)

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील (ग्रामविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2012 चे वि.स.वि.क्रमांक 29 महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

उप सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील (ग्रामविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2012 चे वि.स.वि.क्रमांक 29 महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती :विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 4 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1 संपूर्ण शीर्षक व हेतूवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने वि.स.वि.क्रमांक 29 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती :सन 2012 चे वि.स.वि.क्रमांक 29 संमत झाले आहे.

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. मंगळवार, दिनांक 18 डिसेंबर, 2012 रोजी सकाळी 10.30 वाजता सभागृहाची विशेष बैठक भरेल. सकाळी 10.30 ते दुपारी 12.45 वाजेपर्यंत आजच्या कार्यक्रमपत्रिकेवर दर्शविलेली शासकीय विधेयके घेण्यात येतील. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 01.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक रात्री 07 वाजून 24 मिनिटांनी, मंगळवार, दिनांक 18 डिसेंबर,2012 च्या सकाळी 10.30 वाजेपर्यंत स्थगित झाली)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही